
अन्तोन चेखव

आठ दीर्घकथा



अनुवाद-सुमती कानिटकर

चेखवच्या दीर्घकथा

एकोणिसाव्या शतकाच्या शेवटी होऊन गेलेल्या अन्तोन चेखवला आधुनिक-लघुकथेचा जनक मानले जाते. रशियन माणसांची सुखदु:खे आणि मने अत्यंत तरल, काव्यमय पण सडेतोड शैलीत चित्रित करणाऱ्या चेखवने लघुकथेला आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठा प्राप्त करून दिली आणि तो विश्वविख्यात रशियन कवी पुष्किन व कादंबरीकार दस्तयेवस्की, टॉलस्टॉय, गॉर्की यांच्या पंक्तीत जाऊन बसला.

चेखवच्या निवडक लघुकथांचा एक संग्रह प्रा. सुमती कानिटकरांनी यापूर्वीच सिद्ध केला आहे. त्या जोडीला येत आहे हा चेखवच्या दीर्घकथांचा संग्रह. चेखवची एकेक दीर्घकथा एकेका कादंबरी एवढा आवाका व सामर्थ्य घेऊन अवतरते. त्यातील पात्रे वाचकाच्या मनाला जाऊन भिडतात आणि मनात सहजपणे घर करून राहातात. रशियातील अनेक निसर्ग दृश्येही अविस्मरणीय ठसा उमटवून जातात.

चेखवच्या दीर्घकथा वाचून झाल्यावर वाचकाला एक गोष्ट पक्की जाणवते ती ही की अशा श्रेष्ठ साहित्यकृती वाचून जो अनुभव येतो, जो आनंद मिळतो तो केवळ विलक्षण असतो आणि त्याची सर दुसऱ्या कशालाही येत नाही.

मराठीतून कॉन्टिनेन्टल *विश्ववाङ्मयाकडे*

अन्तोन चेखव

आठ दीर्घकथा

अनुवाद
प्रा. सुमती कानिटकर

चेखव पुण्यशताब्दी आवृत्ती

कॉन्टिनेन्टल

चेखव पुण्यशताब्दी आवृत्ती : २००४

प्रकाशक : ऋतुपर्ण अनिरुद्ध कुलकर्णी
कॉन्टिनेन्टल प्रकाशन
विजयानगर, पुणे ४११ ०३०

मुद्रक : श्रीकांत मुद्रणालय
६१० कुंटे चौक, पुणे ४११ ०३०

अक्षरजुळणी : सौ. मोहिनी कुलकर्णी
११७/१० नवी पेठ,
पुणे ४११ ०३०

आर्टवर्क : अशोक बोकील, पुणे

चेखवच्या आठ दीर्घकथा

प्रकाशन क्रमांक : १३०९
प्रथमावृत्ती : २००४

किंमत : पंचाहत्तर रुपये

अर्पण...

ख्यातनाम रशियन साहित्यिक अन्तोन चेखव याच्या अक्षर वाङ्मयातील वेचक, अभिजात साहित्याचा मराठीत अनुवाद करतांना, माझे पती कै. माधव शंकर कानिटकर यांचे मला सतत सक्रिय प्रोत्साहन लाभले. त्यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन.

सुमती कानिटकर

БЛАГОДАРЕНИЕ

КАЖДЫЙ КУЛЬТУРНЫЙ ИНДИЕЦ СЧИТАЕТ СВОИМ ДОЛГОМ ПИТАТЬ В СЕБЕ ЧУВСТВО ГЛУБОКОЙ БЛАГОДАРНОСТИ К СВОИМ РОДИТЕЛЯМ, И ПРЕПОДАВАТЕЛЯМ. ЗДЕСЬ Я ВЫРАЖАЮ ИСКРЕННЮЮ БЛАГОДАРНОСТЬ ПРЕПОДАВАТЕЛЯМ, УЧИВШИМ МЕНЯ РУССКОМУ ЯЗЫКУ. ИМ Я ОБЯЗАНА УСПЕШНЫМ ПЕРЕВОДОМ НА ЯЗЫК МАРАТХИ ПЯТНАДЦАТИ РАССКАЗОВ АНТОНА ЧЕХОВА И ТАКЖЕ ЕГО КОМЕДИИ ВЫШНЕВЫЙ САД. НАДЕЮСЬ, ЧТО ДЛЯ МАРАТХСКОГО ЧИТАТЕЛЯ, ЖЕЛАЮЩЕГО ПРИОБЩИТЬСЯ К РУССКОЙ КЛАССИЧЕСКОЙ ЛИТЕРАТУРЕ, Я СУМЕЛА ПРИОТКРЫТЬ ДВЕРЬ, ВЕДУЩУЮ К СОКРОВИЩУ ЧЕХОВСКОГО ТВОРЧЕСТВА.

ऋणनिर्देश

प्रत्येक सुसंस्कृत भारतीय माणूस आपले आईवडील आणि गुरुजनांविषयी कृतज्ञतेची भावना जोपासण्याचा प्रयत्न करीत असतो आणि त्यांच्या ऋणातून मुक्त होण्याची बांधिलकी मानतो. या अनुवादाच्या निमित्ताने मी माझ्या सर्व रशियन भाषेच्या प्राध्यापिकांचे प्रकट आभार मानते. त्यांच्याच प्रेरणेने मी अन्तोन चेखवची 'चेरीचा मळा' ही सुखांतिका आणि त्याच्या पंधरा सर्वोत्कृष्ट कथांचा यथार्थ मराठी अनुवाद करू शकले. त्याचप्रमाणे मी अभिजात रशियन साहित्यकृतींचा रसास्वाद घेण्याची उत्कट इच्छा असलेल्या मराठी वाचकांसाठी चेखवच्या वाङ्मयीन खजिन्याचे दालन अंशत: तरी उघडले आहे असे मला वाटते.

सुमती कानिटकर

अनुवादिकेची प्रस्तावना

'चेखव-गद्यवाङ्मयातला पुष्किन', जगप्रसिद्ध रशियन साहित्यिक ल्येव तलस्तोय ह्याने आपल्या समकालिन तरुण साहित्यिकाच्या सृजनशीलतेचे असे चोखंदळ मूल्यमापन केले आहे आणि अशातऱ्हेने चेखवच्या नाविन्यपूर्ण आणि कलात्मक लेखन शैलीवर आणि लेखकाच्या अमरत्वावर मोहोर लावली आहे. खरोखरच जगभराच्या साहित्यखजिन्यात चेखवच्या लघुकथेचा ठसा अजरामर ठरला आहे.

चेखवच्या जवळजवळ पाचशे प्रकाशित कथा आहेत, आणि ह्या कथातून त्याने रशियन समाजातील सर्व स्तरातील लोकांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या व्यक्तिरेखा उभ्या केल्या आहेत. चेखवने एके ठिकाणी स्वत:विषयी अभिमानाने लिहून ठेवलय : 'खगोलशास्त्रज्ञांना आपल्या अभ्यासासाठी जशी ग्रहताऱ्यांची नितान्त गरज असते तशी मानवी जीवनाचा अभ्यास करणाऱ्यांसाठी स्वत:ला वाहून घेतलेल्या लोकांना माझ्या साहित्याची दखल घेणे आवश्यक वाटेल.'

इ. १८८० ते १९०४ हा चेखवच्या साहित्यनिर्मितीचा काळ गणला जातो. त्याच्या कथांची आपल्याला साधारणपणे लघुतम कथा, लघुकथा आणि दीर्घकथा अशी विभागणी करता येईल. मॉस्को विश्वविद्यालयात विद्यार्थी असतानाच अर्थार्जनासाठी त्याने विनोदी पाक्षिकातून आणि मासिकातून लिखाणाला सुरुवात केली होती. 'अन्तोशा चेखोन्ते', 'रुवेर', 'माझ्या भावाचा भाऊ' वगैरे टोपणनावांनी लिहिलेले, उत्स्फूर्त, खुसखुशित विनोदाने आणि सूक्ष्म निरीक्षणाने परिप्लुत असे त्याचे त्यावेळचे लिखाण वाचकांना अतिशय भावले. केवळ एका छोट्याशा प्रसंगावर बेतलेल्या त्याच्या विनोदी लघुकथा छोट्याही विषयात आशय कधी मोठा किती आढळे' ह्या उक्तिप्रमाणे बरंच काही सांगून जातात. चेखव म्हणतो, 'संक्षिप्तता - बुद्धिमत्तेची बहिण आहे. जितकं थोडकं, जितकं सुटसुटित तितकं नि:संदिग्ध आणि स्पष्ट. अचूकता छोट्या गोष्टींना जिवंतपणा आणते. "चेखवने विनोदाच्या बुरख्याआडून तत्कालिन जुलमी राजवट, सरदार, जमीनदार, बडे सरकारी अधिकारी यांच्यातला उन्मत्तपणा आणि दडपशाही, त्याचबरोबर

सर्वसामान्य माणसात आलेला बुळेपणा, लाचारी, मानसिक गुलामगिरी ह्या सर्वांवर निर्दयपणे, टीकास्त्र सोडलेले असायचे. त्याच्या 'शासकीय अधिकाऱ्याचा मृत्यू' ह्या कथेत स्वेच्छेने अंगिकारलेल्या लाचारी वृत्तीमुळे प्राणास मुकलेल्या सरळ साध्या माणसाचे वर्णन आहे. तर 'जाड्या-रड्या'तील विडंबनात नोकरीपेशातल्या उच्चनीच पदांमुळे दोन जिवलग बालमित्रांच्या भावनिक जवळिकतेला एका क्षणात तडा जातो. 'सरडा' ह्या गोष्टीत एक सामान्य पोलीस विद्यमान परिस्थितीशी जुळवून घेण्याच्या आगतिकतेमुळे क्षणाक्षणाला आपला मोहरा बदलतो तर 'कोषात गुरफटलेला' बेलीकीन जन्मभर काही भयंकर होणार तर नाही ना ह्या दडपणाखाली वावरत असतो. त्यावेळच्या ह्या आणि इतर अनेक कथा म्हणजे चेखवच्या उपहासगर्भित विनोदाचे अफलातून नमुने आहेत.

१८८५ ते १८९० ह्या कालखंडातील कथांमध्ये चेखवची काव्यात्मकता दिसून येते. ह्या बहुतेक कथांतील नायक समाजातील खालच्या स्तरातील माणसं आहेत. लेखक ह्या माणसांतील माणुसकी आणि त्यांच्या आंतरमनातील संपन्नतेचे उभे आडवे धागे वाचकांसमोर हळुवारपणे उलगडतो. रोजमराच्या जीवनातील प्रसंगात. एकमेकातील संभाषणात, त्यांच्या वागण्यात काव्यमयता आणि सफल जीवनाची सुंदर स्वप्न प्रतिध्वनित होत असतात. चेखवच्या काव्यमय लेखनशैलीचा आस्वाद 'स्टेप्स' ह्या दीर्घकथेत घेता येतो. नायकाच्या स्टेपीमधल्या प्रवास वर्णनात मैलोमैल पसरलेल्या निसर्गरम्य अवकाशाच्या काव्यमय पार्श्वभूमीवर प्रतिकूल प्रवृत्तींनी उध्वस्त झालेला मनुष्य यांच्यामधील विरोधाभासाचे मनाला चटका लावणारे चित्रण आहे.

१८९० च्या सुमारास चेखव नवीन पिढीतील प्रतिथयश साहित्यिक म्हणून गणला जाऊ लागला. यापुढेही त्याने आदर्शवादी कलात्मक वाङमय निर्मितीचा आणि समाजातील ऐरणीवरच्या प्रश्नांचा सखोल अभ्यास करून त्यांनी उकल करण्याचा आपला प्रयत्न चालूच ठेवला. आपल्याला एक डॉक्टर आणि लेखक ह्या दोन्ही भूमिका बजावीत असतांना समाजोन्नतीसाठी काय करता येईल ह्याची चाचपणी घेण्यासाठी त्याने १८९० साली झारशाहीतील जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेल्या कैद्यांना ठेवलेल्या सखालिन बेटाचा बोटीने प्रवास केला. झारची जुलमी एकाधिकारशाही कैद्यांची. दुरावस्था त्यांना भोगाव्या लागणाऱ्या असह्य यातना हे

सर्व त्याने प्रत्यक्ष पाहिल्या. त्यामुळे ह्यानंतरच्या त्याच्या कथांमधून त्याने जुलमी राजवटीविरुद्ध तीव्र विरोध दर्शवला आहे. 'सखालिन बेट' हे स्फुट निबंधात्मक पुस्तक आणि 'वॉर्ड क्रमांक सहा' ह्या दीर्घकथेत त्याचा प्रत्यय येतो. परतीच्या प्रवासात त्याने भारत, सिंगापूर, पोर्ट सईद, कॉन्स्टांन्टिनोपल वगैरे ठिकाणांना भेटी दिल्या. १८९० च्या अखेरीस रशियन जनसामान्यांची सुखदु:खे सडेतोड, तरल आणि काव्यमय शैलीत रेखाटणारा अन्तोन चेखव पुष्किन, दस्तयेवस्की, टॉलस्टॉय, गोर्की सारख्या विश्वविख्यात साहित्यिकांच्या पंक्तीत जाऊन बसला.

चेखव जरी लघुकथेचा जनक समजला जात असला तरी त्याची 'चायका', 'वान्याकाका', 'तीन बहिणी', 'चेरीचा मळा' ही नाटकं आणि 'अस्वैल' 'लग्नाची मागणी', 'लग्न' ह्या सारख्या एकांकिका पण जगप्रसिद्ध आहेत.

माझ्या ह्या अनुवादित कथासंग्रहात मी - एखादा अपवाद वगळ्यास - चेखवच्या १८९० ते १९०२ ह्या कालखंडातील दीर्घ कथा निवडल्या आहेत. ह्यावेळी चेखवची प्रतिभावत लेखक म्हणून जगभर प्रसिद्धी झाली होती. ह्यात एकंदर आठ कथा आहेत. त्यातल्या कथाविषयासंबंधी मला फारसं काही सांगायचं नाहीये. कारण त्या मुळात आहेत तशाच मी वाचकांपुढे सादर केल्या आहेत.

ह्या आठ कथांपैकी चार नायिकाप्रधान आहेत तर दोन नायक प्रधान आहेत. एक कथा त्या काळातील एका खेड्यातील जीवनावर बेतलेली आहे आणि शेवटची आठवी कथा मार्च १८८२ सालातली आहे. ती एकांकिकेशी मिळती जुळती, नाट्यमय प्रसंगांनी परिपूर्ण अशी आहे.

नायिकाप्रधान कथेतल्या नायिका उच्चभ्रू समाजातील सुशिक्षित, यैवनात पदार्पण केलेल्या सौंदर्यसंपन्न तरुणी आहेत. 'गवतातील नाकतोडी' ह्या कथेतील नायिका ओल्गा विवाहित आहे. कलानिपुण आहे. कलाविश्व आणि सुखी संसार ह्याची सांगड तिला घालता येत नाही. तिचा पाय घसरतो. अखेर पश्चाताप होतो तेव्हा वेळ टळून गेलेली असते. नाकतोडी प्रमाणे सुस्वभावी नवऱ्याच्या, आपल्या सुखीसंसाराच्या सर्वनाशाला ती कारणीभूत ठरते.

'अरिआदना' ह्या कथेतील नायिका अरिआदना सरदार जमीनदाराच्या उच्चभ्रू कुटुंबातल्या. स्वत: काहीही न करता ऐषआरामात राहण्याची सवय लागलेल्या मुलीचे प्रतिनिधित्व करते. नवीन सांपत्तिक परिस्थितीशी जुळतं घेणं तिला जमत

नाही. कोणावरही जिवापाड प्रेम करणं माहीतच नसलेली ही मुलगी निःसीम, निरपेक्ष प्रेम करणाऱ्या प्रियकराला धुडकावून लावून शेवटी एका सरदारपुत्राशीच लग्न करायला तयार होते.

'अर्धांगिनी' ह्या कथेची नायिकापण ओल्याच आहे. ती विवाहित आहे. नवऱ्याच्या समाजातील प्रतिष्ठेचा पुरेपूर उपयोग करून घेऊन ती स्वैर जीवन जगत असते. नवऱ्याशी रोजच्यारोज तंटाबखेडा करून तो मागत असतांनासुद्धा त्याला घटस्फोट देण्यास नकार देते. नवऱ्याच्या जीवावर टिच्चुन जगण्याचा विडा उचललेली अशी कावेबाज बाई आहे ती.

'जन्मस्थानच्या कुशीत' मधली वेरा वडिलांच्या मृत्युनंतर आपल्या स्टेपीमधल्या इस्टेटीवर आजवर उराशी बाळगलेली आदर्शवादी स्वप्नं साकार करण्याच्या हेतूने राहायला येते. पण तिथल्या जीवनाशी ती समरस होऊ शकत नाही. तरी सुद्धा तळ्यात राहून माशांशी वैर करावं लागेल आणि मग आपला मनावर ताबा राहणार नाही आणि आपण आपल्यातली माणूसकीच गमावून बसू की काय ह्या आशंकेने ती बेचैन होते आणि तिथल्याच एका कारखान्यातल्या डॉक्टराशी लग्न करायचा निर्णय घेते.

'गूसेव' घरापासून खूप दूर पाठवलेल्या सैन्याधिकाऱ्याच्या स्वीय सेवकाची कर्मकहाणी आहे. अत्यावस्थ परिस्थितीत अधिकारी त्याला कायमचा रजेवर पाठवून बोटीवर चढवून देतात आणि संगीत चेंडूचा खेळातल्यासारखी आपली जबाबदारी झटकून त्याची 'ना घरका ना घाटका' अशी अवस्था करतात. मरणासन्न अवस्थेत देखील त्याला आपल्या गावाची, कुंटुबाचीच स्वप्नं पडत असतात आणि स्वप्नात तरी आपण सगळ्यांना भेटलो ह्यातच तो बिचारा समाधान मानतो. त्याच्याच बरोबर प्रवास करणाऱ्या आजारी पण अन्यायाविरुद्ध आवाज उठवणाऱ्या सैनिकाच्या माध्यमातून चेखवने त्यावेळच्या शासकीय यंत्रणेविषयी आणि सामाजिक स्थितीविषयी परखडपणे विरोध दर्शवला आहे. सखालिन बेटावरच्या झोप उडवून टाकणाऱ्या अनुभवानंतर कोलंबोच्या मुक्कामात त्याने ही कथा लिहिली. त्यामुळे बोटीवरचा ताजा अनुभव, बोटीवर मरण आल्यावर प्रत्यक्षात काय होतं ह्याचा एका प्रतिभावानं लेखकाच्या लेखणीतून उतरलेला कल्पनारम्य पण दुःखाची झालर असलेला कलाविष्कार आपल्याला ह्या कथेत पहायला मिळतो. ह्या

प्रवासानंतर मित्राला लिहीलेल्या पत्रात चेखव म्हणतो की ह्या प्रवासात माझ्या अनुभवाची शिदोरी कल्पनातील वाढलीय आणि डोक्यात तऱ्हेतऱ्हेचे किडे वळवळताहेत. लेखकाच्या, जीवनाकडे पाहण्याच्या दृष्टीकोनात अपरिमित बदल झालेला आपल्याला आढळतो.

'गूसबेरी' ह्या गोष्टीचा नायक निकलाय इवानिच एका प्रादेशिक अधिकाऱ्याचा मुलगा, एकोणिसाव्या वर्षापासून अर्थखात्यात रखडला. त्याच्या मनाला लागलेल्या सततच्या टोचणीचे सुनिश्चित मनोकामनेत रुपांतर होते. येनकेन प्रकारेण गुसबेरीची झाडं असलेली जहागिरी विकत घेण्याचे शेख महंमदी स्वप्न तो पहातो. ही कथा म्हणजे हास्यास्पद, विक्षिप्त उद्दीष्ट साध्य केलेल्या आळशी माणसाचे प्रतीक आहे. निकलायचा भाऊ जेव्हा त्याच्या नवीन घरी पोहोचतो तेव्हा त्याच्या स्वागताला लाल शेपटीचा, डुकरासारखा दिसणारा, भुंकावसंसुद्धा न वाटणारा आळशी कुत्रा, स्वयंपाकीण लठ्ठ डुकरीणीशी साम्य असलेली, असं भावाच्या व्यक्तिरेखेशी अनुरुप वातावरण चेखवनं उभं केलं आहे. निकलायच्या भावाच्या तोंडी चेखवनं आपलं स्वत:च जीवन विषयक तत्वज्ञान उधृत केलं आहे.

'सुंदर घाटीत' एका छोट्याशा खेड्याचं आणि तेथील जीवनाचं वास्तववादी चित्रण आहे. वेगवेगळ्या सांपत्तिक स्तरातील अनेक स्त्री-पुरुष पात्रं ह्या कथेत वावरताना दिसतात. गरीब, असहाय लोकांना पावलोपावली फसवणाऱ्या माणसाची शेवटी 'ह्याची देही ह्याची डोळा' घरातून हकालपट्टी होते आणि त्याच्यासारखीच कावेबाज कपटी सून मात्र आयुष्यात पाहीजे ते साध्य करू शकते हा विरोधाभास आपल्याला इथे पहायला मिळतो. तर गरीबाघरच्या सालस, पापथिरु सुनेचं 'बेडकी फुगुन फुगुन किती फुगणार' ह्या म्हणीप्रमाणे आपला तान्हुला मोठा होईल, धष्टपुष्ट होईल आणि आपल्या सारखाच शेतावर मजूरीनं काम करील असं छोटसं स्वप्न असतं. आजकालच्या हिंदी सिनेमातले किंवा टी.व्ही.वरच्या मालिकांतले मोठाले बंगले, भरजरी, कीमती वस्त्रालंकार, हाणामारी, सुंदर सुंदर नट्या वगैरे पाहतांना ह्यापैकी स्वत:जवळ, काहीही नसलेला गरीब खेडूतपण जसा सुखावतो त्याप्रमाणेच श्रीमती घरच्या लग्नातील थाटमाटाचं खिडकीतून ओझरतं दृश्य पाहण्यासाठी गरीब शेतमजूर एकमेकांच्या खांद्यावर चढतांना दिसतात. लग्न जमवणारे मध्यस्थ, मुलगी पाहण्याचा कार्यक्रम, बेसूर आवाजात गाणाऱ्या बायका वगैरे आपल्याकडे १९

व्या शतकात आढळणाऱ्या गोष्टी समकालीन रशियातपण होत्या. चकमकीत खोट्या नाण्यांचा घोटाळा शंभरवर्षापूर्वीच्या रशियात उघडकीस आला होता ! माणसाच्या स्वभावातील दृष्टपणा, पाशवीवृत्ती, अतिसज्जनपणा, प्रेमळपणा, पापभीरुता कथेच्या मर्यादित आवाक्यात दाखवण्याचे लेखकाचे कौशल्य अवाक करणारे आहे.

'हिरवे भूशिर' ही निसर्ग सौंदर्याने नटलेल्या, काळ्यासमुद्रावरच्या भूशिराजवळच्या नितांत नीरव डोंगरावरच्या 'दाचातली' गोष्ट आहे. दाचाची मालकीण, तिची सुस्वभावी मुलगी, तिथे दरसुट्टीत रहायला येणारे विद्यार्थी, तरुण शिक्षक अशी अनेक पात्रे ह्या गोष्टीत आहेत. ह्या सर्व तरुण दाच्यासियांनी मालकिणीच्या मुलीचा, साखरपुडा कसा उधळून लावला आणि कथेच्या शेवटी तिचे तिच्या प्रियकराबरोबर लग्न लावण्यात ते कसे सफल झाले ह्याचे नाट्यमय चित्रण चेखवने अतिशय कलात्मक शैलीत केले आहे. ह्या कथेचे नाट्यरुपांतर केल्यास एक सुंदर विनोदी एकांकिका बसवता येईल.

आता थोडे ह्या कथांच्या संदर्भात चेखवच्या लेखन शैलीविषयी. चेखवने ह्या दीर्घ कथांमध्ये उपमा ह्या भाषालंकाराचा जागोजागी अतिशय समर्पकपणे उपयोग केला आहे. वाचतांना उपमेय आणि उपमान दोन्हीही एकसमयावच्छेदे करून आपल्या डोळ्यासमोर उभे राहतात इतका उपमेचा चपखलपणा त्यात आहे : ''दाट वृक्षांची राई, पक्ष्यांचे कूजन, गवतावर पडलेले सूर्याचे कवडसे आणि चकचकित हिरव्या पार्श्वभूमीवर आम्ही, रंगीबेरंगी कपड्यातले ठिपके म्हणजे फ्रेंच चित्रशैलीतले जणू आदीवासी.'' (नाकतोडी) ''पाण्यावरचा फेस गूसेवच्या अंगभर पसरला. असं वाटत होतं की त्याला लेसमध्ये गुंडाळला आहे.'' (गूसेव) ''मिनटा मिनटाला फसवा फसवी करीत असायची ती. एकाद्या झुरळानं मिशा हलवाव्यात किंवा चिमणीनं चिवचिव करावी ना इतकथा सहजतेनं.'' (अरिआदना) ''संताप आल्यावर अकसिन्याच्या डोळ्यात हिरवा प्रकाश चमकतांना दिसतो. काळोख असलेल्या गोठ्यात मेंढीचे डोळे चमकावेना तसा.'' (रम्य घाटीत) ''अकसिन्याच्या घाऱ्या धूर्त डोळ्यात, लांब मानेवरच्या छोट्याशा डोळ्यात आणि लवचिक शरीरयष्टीत नागिणीची झलक दिसायची. पिवळ्या जाकिटाचा हिरवागार ड्रेस आणि तिचं ते हास्य ह्यामुळे ती वसंतऋतुत हिरव्या पिवळ्या राईच्या शेतातून

आपली मान लांब करून, डोकं वर काढून झडप घालायच्या तयारीत असलेल्या सर्पिणीसारखी दिसायची.'' (रम्य घाटीत)

चेखवच्या लिखाणात निसर्गाचे वर्णन करीत असताना मधून मधून जीवन विषयक तत्वज्ञानाचा शिडकावा होत असतो. उदा :- ''समुद्राला विचारशक्ती नाही की दयामाया नाही. बोट जाडजूड लोखंडापासून बनवलेली नसती तर समुद्राच्या ह्या लाटांनी भीडभाड न ठेवता तिचा चुराडा करून टाकला असता आणि हा पापी, हा पुण्यवान असा भेदभाव न करता बोटांवरच्या सर्वच्यासर्व प्रवाशांना जलसमाधी दिली असती.'' (गूसेव)

''हा नाकाडा राक्षस (बोट) पुढेमागे करत करत मार्गात येणाऱ्या लाखो लाटांना कापत जात असतो. त्याला काळोख्याची, वाऱ्याची, अथांगतेची आणि एकांडेपणाची कश्शा कश्शाची भीती नसते.'' (गूसेव)

काही वेळा लेखक कथेतल्या एखाद्या पात्राच्या तोंडाने स्वत:चे जीवनविषयक तत्वज्ञान सांगत असतो.

''बोलायला गोड वाटतं की माणसाला किती ? सहा गुणीले दोन फूट जमिनीची गरज असते. अहो, पण एवढी जमीन प्रेताला पुरेशी असते, (जीवंत) माणसाला नाही. पृथ्वीचा अख्खा गोल, तिथला निसर्ग आपल्या कवेत घ्यायचा माणसानं प्रयत्न करायला हवा.'' (गूसबेरी)

''अभागी माणसं मुकाटपणे कालक्रमणा करीत असतात म्हणूनच सुखवस्तू मनुष्य स्वत:ला भाग्यवान समजत असतो.'' (गूसबेरी)

कथेतल्या एकाद्या पात्राच्या माध्यमातून चेखवचे स्त्रियांविषयीचे परखड विचार आपल्याला वाचायला मिळतात.

उदा :- १) ''स्त्रीनं स्वत:ची शारीरिक जडणघडण, गर्भावस्था, मुलाला जन्म देणं ह्याचच तुणतुण वाजवायचं ह्यापुढे सोडायला हवं. कारण स्त्रीकाही दर महिन्याला मुलाला जन्म देत नाही. २) प्रत्येक बाईला मूल होतच असं नाही. ३) खेडूत स्त्री बाळंतीण होण्याच्या आदल्या दिवसापर्यंत शेतात काम करते आणि तिला त्याचा काहीच त्रास होत नाही.'' (अरिआदना)

''आम्ही नेहमी स्त्रियांविषयीच बोलत असतो कारण आम्ही असमाधानी आहोत. स्त्रियांकडे पाहण्याचा आमचा दृष्टीकोन जरा जास्तच आदर्शवादी असतो.

प्रत्यक्षात संभव आहे. त्यापेक्षा जास्त अपेक्षांची आमची मागणी असते त्यामुळे आमच्या पदरात अपेक्षेपेक्षा कमी यश येतं आणि परिणामी असमाधान, अपेक्षाभंग आणि मानसिक खंत आमच्या वाट्याला येते.'' (अरिआदना)

चेखवची भाषा क्लिष्ट किंवा बोजडपण नाही. त्यामुळे १९ व्या शतकातील त्याच्या कथांचा मराठी अनुवाद करणं सुलभ जातं. कथानकाच्या अनुषंगाने तत्कालिन शहरी अथवा ग्रामीण समाज जीवन आणि कथेतील व्यक्तिरेखांचा सामाजिक स्तर ह्या गोष्टींच्या सखोल अभ्यासानंतर चेखवने गरजेनुसार आपल्या भाषाशैलीत बदल केला आहे. त्यामुळे त्याच्या कथा अधिक वास्तववादी वाटतात.


त्याच्या कथेत बरेचदा एखादे पात्र आपला अनुभव दुसऱ्या पात्राला सांगत असतो आणि त्यातून कथेला घाट येतो. कधी कधी हे दुसरे पात्र म्हणजे स्वत: लेखकच असतो. आपल्या कथेतील पात्रांच्या माध्यमातून स्वत:चे जीवनविषयक तत्त्वज्ञान किंवा परखड विचार वाचकापर्यंत पोहोचवण्याची चेखवची खासियत आहे.

सौ. सुमती कानिटकर

२१७/६ 'उमा बंगला' गणेशवाडी,
फर्ग्युसन कॉलेज रस्ता,
डेक्कन जिमखाना, पुणे ४११००४

क था नु क्र म

— — — —



: १ :

गूसेव

भाग १

अंधार पडायला केव्हाच सुरवात झाली होती. थोड्याच वेळात रात्र होईल.

कायमच्या रजेवर निघालेला सैन्यामधला शिपाई गूसेव आपल्या बोटीवरच्या कॉटवर उठून बसला आणि हलक्या आवाजात म्हणाला, ''पावेल इवानिच, ऐकता आहात का, मी काय म्हणतोय ते ? 'सूचान' मध्ये असताना एका सैनिकानं मला सांगितलं होतं, की एकदा त्यांची बोट खडकावर आदळून तिच्या तळाला भोक पडलं.''

गूसेव ज्या माणसाशी बोलत होता त्याचा सैन्यामध्ये काय हुद्दा होता ते कोणालाच माहीत नव्हतं. त्या बोटीवरच्या इस्पितळात सर्वजण त्याला पावेल इवानिच म्हणूनच हाक मारायचे. तो गप्पच होता. गूसेवचं बोलणं त्यानं ऐकलं न ऐकलंसं केलं.

पुन्हा शांतता पसरली...वारा बोटीवरच्या अवजारांमध्ये अक्षरश: घुसत होता त्यामुळं त्यांचा खणखण आवाज येत होता, लाटा आपटत होत्या. रुग्णांच्या शयनिका करकरत होत्या. पण ह्या सगळ्या आवाजांची प्रवाशांच्या कानांना चांगलीच सवय झाली होती. असं वाटत होतं की भोवतालचं सर्व जग गाढ झोपलंय. शांततेचं राज्य पसरलं आहे. दोन सैन्यामधले नि एक नौदलातला, असे तिघे रुग्ण दिवसभर पत्ते खेळत होते. पण तेसुद्धा आता झोपले होते आणि झोपेत बरळत होते.

असं वाटतंय की बोट आता जोरात हलायला लागणार आहे. गूसेव झोपला होता ती कॉट हळूच वर चढत होती आणि खाली येत होती, जणू ती उसासे टाकत होती. एवढ्यात, एकदा, दोनदा, तिनदा टण, टण, टण असा आवाज झाला...तक्तपोशीवरून काहीतरी घरंगळत गेलं आणि झंकारलं. नक्कीच कुणाचा

तरी चहाचा मग वरून खाली पडला असावा.

"वाऱ्याच्या जोरामुळे साखळदंड खळखळतोय," कान देऊन ऐकत गूसेव म्हणाला.

ह्या खेपेला मात्र पावेल चिडून खोकत खोकत म्हणाला, "अरे काय चाललंय काय तुझं ? कधी तुझी बोट खडकावर आदळते तर कधी वारा साखळदंडातून आवाज काढतोय... वारा म्हणजे काय जनावर बिनावर आहे कां पायांत बांधलेल्या साखळीतून आवाज काढायला ?"

"ख्रिस्ती लोक म्हणतात तसं."

"ख्रिस्ती लोक ना. तुझ्यासारखेच अडाणी असतात...त्याचं काय, अरे ते ज्या गोष्टींविषयी बोलत नाहीत त्या कमी का आहेत ? फक्त आपल्या खांद्यावरचं डोकं शाबूत असायला हवं, आणि खऱ्या खोट्याची शहानिशा करायची क्षमता हवी त्याच्यात. बिनडोक कुठला !"

बोट लागल्यामुळे पावेल हवालदिल झाला होता. बोट जास्त हलायला लागली की त्याचं डोकं अक्षरश: भडकायचं, अशावेळी तो अगदी क्षुल्लक कारणावरून कुणाशीही भांडायला उठायचा. तरीसुद्धा गूसेवला वाटायचं की तो कुणावरही पोटतिकडीनं रागवायचा नाही. आता बोट खडकावर आदळल्यावर काय झालं किंवा साखळदंडातून वाऱ्यामुळे आवाज निघतो का ह्या गोष्टींविषयी दोन माणसांत एकमत नसेल कदाचित, पण म्हणून एकाचं बोलणं अक्कल हुशारीचं आणि दुसऱ्याचं विक्षिप्तपणाचं आहे असं म्हणणं कितपत बरोबर आहे ? समजा, कुणी असं विधान केलं की हा मासा पर्वताएवढा मोठा आहे आणि त्याची पाठ स्टारजिन माशासारखी टणक आहे, असंही म्हटलं की जिथं जगाचा अंत होतो तिथं मोठ्या जाडजूड दगडी भिंती उभ्या असतात आणि दुष्ट वाऱ्यांना त्यांनी अडवून ठेवलेलं असतं, तर त्यात काय एवढं मोठसं... ते वारे जर साखळदंडांतून आवाज काढत नसले तर त्यांचा समुद्राच्या परिसरात अंगात भूत शिरल्यासारखा संचार कसा असतो आणि एखाद्या पिसाट कुत्र्यासारखे कशाला केकाटतात ते ? हे वारे जर भिंतींनी अडवले नसतील तर मग समुद्र शांत असेल तेव्हा ते कुठे गायब होतात ?

गूसेव कितीतरी वेळ त्या पर्वतासमान माशाविषयी आणि गंजून गेलेल्या

जाड जूड साखळदंडाविषयी विचार करीत बसला होता. पण मग त्याला त्याचा कंटाळा आला. मग पुन्हा तो आपलं गाव, तिथला परिसर ह्या विषयी विचार करू लागला. 'दालनीय वस्तोक' मध्ये पाच वर्ष नोकरी केल्यानंतर आज तो गावाकडे परतत होता. त्याच्या डोळ्यापुढे तिथला बर्फाच्छादित विस्तीर्ण तलाव आला... तलावाच्या एका बाजूला चिनीमातीची भांडी बनवण्याचा कारखाना होता. कारखान्याचा रंग विटकरी होता. त्याच्या उंच धुराड्यातून काळ्या रंगाचे धुराचे लोट बाहेर पडत होते. तलावाच्या दुसऱ्या तीराला त्याचं खेडं वसलं होतं...टोकापासूनच्या पाचव्या क्रमांकाच्या घराच्या अंगणामधून त्याचा भाऊ अलिकसेयची बर्फावरून चालणारी गाडी बाहेर पडताना दिसली त्याला, भावाच्या पाठीमागे मोठे गरम बूट घातलेला त्याचा मुलगा वान्का आणि तसेच बूट घातलेली छोटी मुलगी अकुलका बसली होती. अकुलकाचा चेहरा दिसत नव्हता, मफलरनी झाकला गेला होता तो.

गूसेवच्या मनात विचार आला, "चला भेटू या त्यांना आपण," गूसेव पुटपुटला, "आपल्या आईवडिलांचा आदर करण्याची त्यांना बुद्धि होवो आणि आईवडिलांपेक्षा जास्त शहाणी न झालेलीच बरी ती ...

"आजकालच्या काळांत प्रत्येकानं नव्या दृष्टिकोनातून विचार करायला हवा," शेजारचा आजारी खलाशी खर्जात बरळला, "हो, हो, मला तरी तसंच वाटतंय."

गूसेवची विचारमाला खंडित झाली. तलावाच्या जागी डोळे नसलेलं बैलाचं मुंडकं आता इथे तर मग तिथे असं दिसायला लागलं त्याला, बर्फावरची घोडागाडी सरळ धावत नव्हती तर काळ्या धुरामध्ये गिरक्या घेत होती ती. तरीसुद्धा आपला भाऊ, त्याची मुलं पहायला मिळाली म्हणून त्याला आनंद झाला होता. अत्यानंदाने त्याची छाती भरून आली, सर्वांगांत हुडहुडी भरली आणि बोटं थरथर कापू लागली.

"देवानेच सर्वांची भेट घडवून आणली म्हणायची," तो झोपेत बरळत होता, त्याच क्षणी त्याने डोळे उघडले आणि तो अंधारात पाण्याचा पेला शोधू लागला.

पाणी पिऊन पुन्हा आडवा झाला तो. पुन्हा बर्फावरची गाडी चाललेली

दिसली, परत बिनडोळ्याचं बैलाचं डोकं डोळ्यापुढुन सरकलं, धूर, ढग...हे असं उजाडेपर्यंत चाललं होतं.

✻

भाग २

अंधारात पहिल्याप्रथम त्याला निळं वर्तुळ दिसलं. ते गोल गवाक्ष होतं. मग गूसेवनं कॉटवरच्या त्याच्या शेजाऱ्याला, पावेलला ओळखलं. हा माणूस बसल्या स्थितीतच झोप घ्यायचा कारण आडवा झाला की त्याला श्वास घ्यायला त्रास व्हायचा, गुदमरल्यासारखं व्हायचं. त्याचा चेहरा काळवंडला होत, लांब नाक जास्तच तरतरीत दिसत होत. हाडाची काडं झाल्यामुळं डोळे मोठे, बटबटीत दिसत होते, कल्ले लोंबले होते, दाढीचे खुंट विरळ झाले होते आणि केस लांब वाढले होते त्याचे ... त्याच्या चेहऱ्याकडे पाहून तो जमीनदार आहे की व्यापारी आहे की शेतकरी आहे ह्याचा काहीच अंदाज बांधता येत नव्हता. त्याच्या चेहऱ्यावरील भावावरून, केसांवरून तो धार्मिक वृत्तीचा मोनेस्टरीमधला नवागत असावा असं वाटत होतं पण बोलण्यावरून मात्र तो नक्कीच पाद्री नाही असं दिसत होतं. खोकल्यामुळे, कुंद गरम हवेमुळे आणि दुखण्यामुळे त्याचा शक्तिपात झाला होता, त्याला धाप लागत होती. कोरड्या पडलेल्या ओठांवरून तो सारखी जीभ फिरवत होता. गूसेव आपल्याकडे पहातोय हे जेव्हा त्याच्या लक्षात आलं तेव्हा त्यानं वळून त्याच्याकडे तोंड केलं आणि म्हणाला, ''माझ्या सगळं लक्षात यायला लागलंय आता...हो...मला स्पष्ट कळतंय सर्व.''

''काय कळतंय तुम्हाला पावेल ?''

''अरे असं आहे बघ...प्रथम मला सगळं जरा विचित्र वाटत होतं, तुम्ही एवढे व्याधीग्रस्त असतांना तुम्हाला विश्रांती मिळावी म्हणून काही करण्याऐवजी त्यांनी तुम्हाला इथं बोटीवर आणून टाकलं. बोट खूप हलतेय, हवा गरम, कुंद आहे, थोडक्यात सांगायचं म्हणजे तुमच्या जिवाला भीती आहे इथं. पण मला आता सगळं स्पष्टपणे कळून चुकलय...हो...तुमच्या डॉक्टरांनी तुमच्यापासून स्वतःला सुटकारा मिळवण्यासाठी तुम्हाला बोटीवरच्या अधिकाऱ्यांच्या स्वाधीन केलं. तुमच्यासाठी वेळ द्यायचा त्यांना कंटाळा आला. तुमच्यासाठी वेळ

घालवायचा म्हणजे शेळ्यामेंढ्यासाठी आपला किंमती वेळ घालवण्यासारखंच की हो... त्यांना तुमच्याकडून पैसे मिळणार नव्हते. तुमच्यासारखा रोगी म्हणजे त्यांना एक कटकटच होती. तुमच्या मरणामुळे त्यांच्या कार्यक्षमतेला बट्टा लागला असता. त्यांच्या लेखी तुमच्यासारख्या रोग्याची किंमत शेळ्यामेंढ्याइतकीच होती. शिवाय तुमच्यापासून सोडवणूक करून घेण्यात कसलीच अडचण नव्हती. त्यासाठी फक्त एवढ्या एवढ्या गोष्टींची आवश्यकता असते.. सर्वांत महत्त्वाची गोष्ट, तुमच्यात सद्सद्विवेकबुद्धीचा आणि माणुसकीचा अभाव असायला हवा आणि दुसरं म्हणजे बोटीवरच्या व्यवस्थापनाला हातोहात फसवण्याची तुमची तयारी हवी. त्यापैकी पहिल्या अटीकडे लक्ष द्यायची फारशी गरज नाही. त्याबाबतीत आमचा हात कोणी धरू शकत नाही. राहता राहिली दुसरी गोष्ट. ती चतुराईनं सहज प्राप्त करून घेता येण्यासारखी आहे. चारशे सुदृढ, ठणठणीत सैनिकांच्या आणि नाविकांच्या जमावामध्ये पाच आजारी माणसं लोकांच्या डोळ्यांत सहसा खुपत नाहीत. म्हणजे असं की तुम्हाला बोटीवर सोडून दिलं. निरोगी माणसांत मिसळून टाकलं की झालं काम फत्ते. असं केल्यामुळे होणारा दुष्परिणाम त्या भाऊगर्दीत कोणाच्या लक्षात येणार होता ? बोटीनं किनारा सोडल्यावरच लोकांना कळलं की बोटीवर लकवा झालेले, क्षयाने पछाडलेले शेवटच्या अवस्थेत असलेले काही रुग्ण बिछान्याला खिळलेले आहेत..."

पावेल काय म्हणतोय ते गूसेवच्या डोक्यावरून जात होतं. पण पावेलला सर्वजण नेहमीच दोष लावतात असं वाटल्यामुळे गूसेवनं सारवासारवी करायचा प्रयत्न केला.

"मी डेकवर पडून राहीलो कारण माझ्यात ताकदच नव्हती उठायची. आम्हाला जेव्हा तराफ्यावरून बोटीवर चढवलं तेव्हा माझे हातपाय गारठून गेले होते नुसते !"

"संताप आणण्यासारखंच आहे सगळं !" पावेल पुढे बोलू लागला, "सगळ्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यांना चांगलं माहीत होतं की हा एवढा लांबचा प्रवास तुम्हाला झेपणारा नाहीये आणि तरीसुद्धा त्यांनी तुम्हाला बोटीवर आणून पटकलं. कदाचित् हिंदी महासागरापर्यंत तुम्ही पोहोचाल सुद्धा पण पुढे काय ? विचार करायची सुद्धा भीती वाटतेय मला. ही एवढी मेहेरबानी कशासाठी ? तर तुमच्या प्रामाणिक निष्कलंक सेवेचा मोबदला!"

पावेलच्या डोळ्यात दुष्टावा दिसत होता. तिरस्कारानं कपाळावर आठ्यांचं जाळं पसरलं होतं. उसासा टाकत तो म्हणाला, ''ह्या असल्या चोरांची वर्तमान-पत्रांत अशी खरडपट्टी काढायला हवी की सगळी पिसं झडायला हवीत त्यांची.''

आता दोन रुग्ण सैनिक आणि नाविक जागे झाले होते आणि त्यांनी त्यांचा पत्त्याचा डाव पुन्हा मांडला होता. नाविक आपल्या शयनिकेवर अर्धवट उठून बसला होता आणि सैनिक त्याच्या जवळच तक्तपोशीवर अतिशय अवघडल्या अवस्थेत बसले होते. एका सैनिकाच्या उजव्या हाताला बँडेज बांधले होते. त्याच्या टोपीचा नुसता चोळा मोळा झाला होता म्हणून तो पत्ते उजव्या काखेत नाहीतर कोपराच्या घडीत पकडून ठेवायचा आणि डाव्या हातानं पत्त्याची चाल चालायचा. बोट फारच हेलकावत होती. उठून उभं राहणं, चहा पिणं, औषधं घेणं ह्यातलं काहीच करता येत नव्हतं.

''तू वैयक्तिक सेवक म्हणून काम करीत होतास का ?'', पावेल गूसेवला विचारलं.

''अगदी बरोबर, सेनाधिकाऱ्याचा वैयक्तिक सेवक म्हणूनच.''

''अरे देवा !'' त्याची कीव करीत पावेलनं नकारार्थी डोकं हलवलं. माणसाला त्याच्या घरट्यातून बाहेर काढायचा, पंधरा हजार कोस फरफटत न्यायचा आणि क्षयासारख्या असाध्य रोगाकडे सुपूर्त करायचा आणि ...हे सगळं कशासाठी करायचं ? तर त्याला कुठल्या तरी कपेयकिन नावाच्या फौजी कप्तानाचा नाहीतर मिचमान दीर्का नावाच्या आरमारी कप्तानाचा वैयक्तिक सेवक म्हणून तयार करण्यासाठी. केवढं मोठं तर्कशास्त्र असेल नाही ह्या सर्व खटाटोपामागे !''

''काम काहीच कठीण नाही माझं पावेल. सकाळी उठायचं, बूट पॉलिश करून चकचकीत करायचे, चहाचा समवार शेगडीवर ठेवायचा, खोल्यांची झाडझूड करायची बस्स. त्यानंतर काहीच काम नसतं. कप्तान दिवसभर नकाशे काढीत असतो आणि तू तुला हवं तर देवाची प्रार्थना कर, नाहीतर पुस्तक वाचत बैस, वाटलं तर रस्त्यावरून फेरफटका मारून ये. मी तर म्हणेन की देवानी सगळ्यांना असंच आयुष्य बहाल करावं.''

''वा, फारच छान हं ! कप्तान नकाशे काढत बसणार आणि तू दिवसभर स्वयंपाकघरात बसून मायभूमीची आठवण करत करत दुःखात डुबणार. नकाशे

काढण्यासंबंधी मला काहीच म्हणायचं नाहीये पण मला माणसाच्या जीवनाची चिंता आहे. माणूस एकच आयुष्य घेऊन जन्माला येत असतो. ते दुबार असत नाही. ते असं फुकटंफाकट जाता कामा नये.''

''तुझं म्हणणं बरोबरच आहे. पावेल. दुष्ट माणसाला कोणीच क्षमा करीत नाही, ना घरी ना दारी. पण तू जर सचोटीने जगलास सांगितलेलं काम इमाने इतबारे केलंस तर तुझा अपमान करायची कोणाची काय बिशाद ? आपले वरिष्ठ अधिकारी नेहमीच सुशिक्षित असतात, त्यांना सगळं कळत असतं. गेल्या पाच वर्षांत मला एकदाही शिक्षा झाली नाही आणि मारहाण म्हणाल तर देवाची मदत घेऊनच आठवायला लागेल, पण एकदाच असेल फार तर...''

''एकदा तरी कशासाठी मारलं होतं तुला त्यांनी ?''

''मारामारी केली म्हणून. माझा हात सुजला होता, पावेल. आमच्या अंगणात चार भुरटे शिरले. लाकूडफाटा घेऊन जात होते का काय करत होते ते मला आता आठवत नाही. मला नाहीतरी कंटाळाच आला होता. मग मी त्यांची चांगली हड्डी नरम केली. एका बदमाशाच्या नाकातून रक्त यायला लागलं. आमचे साहेब खिडकीतून सगळं पाहात होते. ते संतापले आणि त्यांनी माझ्या कानाखाली लगावून दिली.''

''मूर्ख, ठोंब्या आहेस तू नुसता, कीव कराविशी वाटते रे तुझी...,'' पावेल पुटपुटला, ''तुला काऽऽही कळत नाही.''

बोटीच्या हलण्यामुळे पावेलमध्ये त्राण राहिले नव्हते. त्याने डोळे मिटून घेतले. त्याचं डोकं घटकेत मागे फेकलं जात होतं तर घटकेत छातीवर येऊन पडत होतं. कितीतरी वेळा त्यानं आडवं होण्याचा प्रयत्न केला पण व्यर्थ, तो काहीच करू शकला नाही. गुदमरायला होत होतं त्याला.

''पण तू त्या चार भामट्यांना का मारलंस ?'', थोड्या वेळानं पावेलनं विचारलं.

''असंच, ते अंगणात शिरले आणि मी त्यांना झोडपून काढलं, इतकंच.''

पुन्हा एकदा शांतता पसरली. पत्ते कुटणारे गरमीने होरपळत नि रागाने चडफडत दोन तास तसेच डाव खेळत होते. पण बोटीच्या हलण्याने त्यांचाही पिट्टा पडला. पत्ते अक्षरश: फेकून देऊन ते आडवे झाले. गूसेवच्या डोळ्यापुढे पुन: गावचा मोठा तलाव, कारखाना, त्याचं खेडं उभं ठाकलं...पुन्हा बर्फावरून

गाडी चालायला लागली. वान्का हसत होता आणि खट्याळ अकुलकानं आपला फरकोट विस्फारला, पाय बाहेर काढले आणि ती म्हणाली, ''मंडळी, तो बघा, बोटीचा धक्का दिसायला लागलाय, माझे हे फरचे बूट पाह्यलेत का ? वान्कासारखे नाहीयेत बर का. कोरे करकरीत आहेत अगदी.''

''सहा वर्षाची झाली पण अकलेच्या नावानं शून्य ! गूसेव बडबडला. पाय हवेत उडवण्याऐवजी नोकरी करणाऱ्या आपल्या काकासाठी दारू आणून दिली असती तर काही बिघडलं असतं का ? मी तिला काहीतरी छोटीशी भेट नाहीतर खाऊ दिला नसता का ?''

हा आला बघा खांद्याला बंदूक अडकवलेला अन्द्रोन. शिकार केलेला ससा आहे त्याच्या हातात. त्याच्या पाठोपाठ अपंग, अशक्त इसायचिक येतोय. सशाच्या बदल्यात साबणाचा तुकडा घेण्याची विनंती करतोय तो त्याला. ओट्यावर एक माणसाची काळी आकृती दिसतेय. हा तर दोमना सदरा शिवत बसलाय आणि का कोण जाणे रडतोय तो. पुन्हा ते बिगर डोळ्याचं बैलाचं मुंडक आणि काळाकुट्ट धूर...

वर डेकवर कुणीतरी मोठमोठ्यानं ओरडत होतं. बरेच नावाडी त्या दिशेला पळत सुटले होते. असं वाटत होतं की डेकवरून काहीतरी अवजड वस्तू ओढत नेताहेत, नाहीतर काहीतरी कडकड मोडतंय. पुन्हा नावाड्यांची धावपळ...काही संकट तर ओढवलं नाही ना आणखीन ? गूसेवनं डोक वर उचललं आणि कान देऊन ऐकण्याचा प्रयत्न केला. पहातो तर काय त्या दोन सैनिकांनी आणि नावाड्याने पुन्हा पत्ते खेळायला सुरवात केलीय. पावेल इवानिच उठून बसला होता. त्याचे ओठ थरथरत होते. हवा कुंद झाली होती. श्वास घेणं जड जात होतं त्याला. तहान लागली होती पण पाणी गरम झालं होतं. सगळंच अगदी उबग आणणारं होतं...हिंदकळ कमी होण्याचं लक्षण नव्हतं.

अचानक पत्ते खेळणाऱ्या सैनिकांचा गोंधळ उडाला...त्यांच्यातील एकजण बदामाला चौकट म्हणू लागला. हिशोबात घोटाळा करायला लागला, हातातून पत्ते पडायला लागले त्याच्या. घाबरून वेड्यासारखा हसायला लागला तो. सगळ्यांकडे भिरभिर पाहू लागला. ''मित्रांनो, एक मिनिट थांबा हं'', असे म्हणत तो जमिनीवर आडवा झाला. सगळेजण गोंधळून गेले, त्याला हाका मारू लागले. तो काही ओ देईना.

स्तिपान, तुला बरं वाटत नाहीये का ? अं ?,'' हाताला बँडेज बांधलेल्या सैनिकाने विचारले, ''पोपला बोलवायचं का ? काय रे ?''

''स्तिपान, तू थोडं पाणी पितोस का ?...'' नावाडी म्हणाला.

''असं नाही करायचं बाबा. घे, एक घोट तरी घे.''

''अरे, काय चाललंय तुझे हे ? तू त्याच्या दातांवर पाण्याचा मग ठोकतोयस काय ?,'' गूसेव रागावून म्हणाला. ''तुला दिसत नाही का ? डोकं बिकं फिरलंय का काय तुझं ?''

''का, काय झालं !''

''म्हणे काय झालं ! गूसेव चिडून म्हणाला. त्याचा श्वासोच्छ्वास थांबलाय, मेलाय तो ! हे आहे तुझ्या काय झालंचं उत्तर. अशी अडाणी असतात एकेक माणसं ना. देवा तूच बघ रे बाबा.''

*

भाग ३

बोट हलणं थांबलं होतं. त्यामुळे पावेलला मजा वाटत होती. त्याची चिडचिड जवळ जवळ थांबली होती. चेहरा गुर्मी आल्यासारखा दिसत होता. उत्साहाला उधाण आलं होतं त्याच्या. चेष्टामस्करी करावीशी वाटत होती त्याला. त्याला बहुतेक असं म्हणावसं वाटत होतं, की ''ऐका, आता मी तुम्हाला असा चुटका ऐकवणार आहे की हसून हसून पोटं फुटतील तुमची.'' गोल खिडकी उघडी होती. पावेल इवानिचच्या अंगावर वाऱ्याची झुळूक येत होती. लोकांच्या बोलण्याचे आणि वल्ही घुसळण्याचे आवाज कानावर पडत होते. झरोक्याच्या थेट खाली कुणीतरी किरकिऱ्या आणि भेसूर आवाजात किंचाळत होतं. चिनी मनुष्य गात असावा बहुतेक.

''अरेच्या, आपण राजमार्गावर आलेलो दिसतोय,'' पावेल मिश्किलपणे हसत म्हणाला. ''आता फार तर एक महिना जायला हवा की आपण पोहोचलोच रशियात बर का, माझ्या पूज्य, शिस्तशीर मित्रांनो. मग आपण ओदेसाला पोहोचू आणि तिथून पुढे सरळ खारकोवला. तिथं माझा एक साहित्यिक मित्र राहतो. त्याच्याकडे जाईन आणि म्हणेन, काही दिवस तुझं ते हलकं फुलकं

म्हणजे बायकांच्या प्रेमकथा, निसर्ग वर्णनं वगैरे लिखाण बाजूला ठेव आणि दोन पायांच्या दुष्ट प्राण्यांनी पांघरलेले बुरखे फाडायला सुरवात कर...मी देतो तुला हवे तेवढे विषय..."

तो एक मिनिट कसल्यातरी विचारात गढून गेला नि मग म्हणाला, "तुला माहीत आहे गूसेव, ह्या लोकांना मी कसं बनवलं ते ?"

"कोणाला बनवलंस तू पावेल ?"

"अरे, ह्याच लबाडांना ...तुला माहीत आहे का, की इथे बोटीवर प्रवाशांचे फक्त दोन वर्ग असतात, पहिला आणि तिसरा. तुला सांगायलाच नको की तिसऱ्या वर्गाची तिकिटं फक्त शेतमजुरांसाठी असतात त्याचाच अर्थ गावंढळ, खेडवळ लोकांनाच देण्याचा प्रघात आहे. तुझ्या अंगावर कोट असला आणि दुरून तू जर जमीनदारासारखा किंवा अल्पसंतोषी मध्यमवर्गातील बुर्ज्वासारखा दिसत असलास तर तू पहिल्या वर्गाने प्रवास करू शकतोस त्यासाठी प्राण पणाला लावून भर पाचशे रूबल्स. अशी व्यवस्था करून तुम्ही काय साधलंत ? तुमच्या ह्या व्यवस्थेमुळे रशियातील बुद्धिजीवी वर्गाचं समाजातलं स्थान उंचवावं असं तुम्हाला अजून देखील वाटत नाही, असं म्हणायचं का ? तसंच म्हणावं लागेल. तुम्हाला तिसऱ्या वर्गाचं तिकीट अशासाठी द्यायचं नाही की सद्सद्विवेकी, शिस्तबद्ध माणसाला त्या वर्गानं प्रवास करणं मना आहे. तिथे फार अस्वच्छता, बेशिस्तपणा असतो. छान. शिस्तशीर माणसांची तुम्ही एवढी काळजी घेता त्याबद्दल मी आपला आभारी आहे. पण तिथे घाण असू दे नाहीतर स्वच्छ असू दे मला त्याच्याशी काही देणं घेणं नाही. आज मितीला माझ्याजवळ पाचशे रुबल्स नाहीयेत. मी कधी सरकारी तिजोऱ्यांवर डाका घातला नाही, परदेशीयांना नागवलं नाही, तस्करीचा धंदा केला नाही की कुणाला जिवे मारलं नाही. आता तुम्हीच निर्णय घ्यायचाय, अशा परिस्थितीत मी पहिल्या वर्गाने प्रवास करायला पात्र ठरतो का ? शिवाय मी तर स्वत:ला बुद्धिजीवी वर्गात समाविष्ट केलेलं आहे. मग हे सगळं कसं जमायचं ? जाऊ दे, त्यांची कारण मीमांसा आपल्याला कळायसारखी नाही. मग काय त्या टेबलाखालून व्यवहार करणाऱ्या माणसाकडे धाव घ्यावी लागली मला. मी लांब पायमोजे, गमबूट घातले. नशेत तर्र असलेल्या गावंढळ माणसासारखी वेडी वाकडी तोंडं करत दलालाकडे गेलो आणि म्हटलं, "महाराज, कृपा करून मला तिकीट

देता का ?''

''तुमचा हुद्दा काय आहे ?,'' नावाड्याने विचारलं,

''धर्मोपदेशक आहे मी. माझे वडील एक प्रामाणिक पाद्री होते. जगातील महान सत्य ते सगळ्यांना निर्भीडपणे सांगायचे. त्यामुळे त्यांना खूप सहन करायला लागलं.''

पावेलला बोलून थकवा आला म्हणून त्याने उसासा टाकला. पण आपलं बोलणं मात्र पुढे चालूच ठेवलं.

''मी सुद्धा खरं असेल ते माणसाच्या तोंडावर स्पष्ट बोलायला मागेपुढे पहात नाही...मला कोणाची नि कशाची भीती वाटत नाही. ह्या बाबतीत माझ्यात नि तुमच्यात जमीन अस्मानाचं अंतर आहे. तुम्ही अडाणी, डोळे असून अंधळी, समाजानं वाऱ्यावर सोडलेली अशी माणसं आहात. तुम्हाला एकतर काहीच कळत नाही आणि जे प्रत्यक्ष तुमच्या डोळ्यासमोर दिसतं त्याचा तुम्हाला बोध होत नाही...तुम्हाला कोणी सांगितलं की वारा साखळदंडातून बाहेर पडतो, तुम्ही म्हणजे शेळ्यामेंढ्यांसारखी माणसं ? तरी त्यांच्या बोलण्यावर तुमचा विश्वास बसतो, तुमच्या मानेवर ते फटके मारतात तरीदेखील तुम्ही त्यांच्या हाताचं चुंबन घेता. तुमच्या फरकोटात हात घालून कुणीतरी लबाड मनुष्य डल्ला मारतो आणि मग तोच मनुष्य पंधरा कोपेकचं नाणं चिरीमिरी म्हणून तुमच्या अंगावर भिरकावतो आणि तुम्ही ''महाराज, तुमचा हात कृपाकरून माझ्या हातात द्या. मला त्याचं चुंबन घ्यायचंय'' असं म्हणता. मुलांनो, कुणीही तुमची कीवच करावी अशी माणसं आहात तुम्ही... माझी गोष्ट मात्र अगदीच निराळी आहे. मी सजगपणे जगतो. गरुड पक्षी किंवा बहिरी ससाणा आकाशातून घिरट्या घालत घालत जमिनीवर कुठे काय चाललंय ते पहात असतात तसं माझं सगळीकडे लक्ष असतं. लोकांवर होत असलेला जुलूम मला दिसला तर मी त्या विरुद्ध लागलीच आवाज उठवतो. मानभावीपणा आणि तोंडपुजेपणा आढळला तर विरोध करतो, माणसातल्या विजयोन्मत्त डुकराला जेव्हा मी पाहतो तेव्हा त्याला नामोहरम करण्याची प्रतिज्ञा करतो. मी अपराजित आहे. कुठलाही स्पॅनिशचर्चचा कायदा माझं तोंड बंद करू शकणार नाही. हो... माझी जीभ छाटून टाकली तर मी अंगविक्षेपाच्या साहाय्याने विरोध नोंदवीन. स्मशानांत जिवंत गाडून टाकलं मला तरी तिथूनसुद्धा एवढ्या जोरानं आरोळ्या मारीन की

एकमैलापर्यंत ऐकू जातील त्या. मी भूक हरताळ करून मेलो तर त्या दुष्टांच्या पापांचा घडा आणखीनच भरेल, माझा खून केला गेला तर भूत होऊन त्यांच्याच मानगुटी बसेन. सगळी ओळखीची माणसं मला म्हणतात की "पावेल इवानिच तुमचं कधी कुणाशी पटायचं नाही, तुमचा सहवास कुणालाही असह्य होतो." माझ्या तसल्या ख्यातीचा मला अभिमान वाटतो. तीन वर्ष 'दालनीय वस्तोक' मध्ये नोकरी केली पण पुढली शंभर वर्ष तिथली माणसं माझी आठवण काढतील. सगळ्यांबरोबरच थोडाबहुत तंटा बखेडा झालाच माझा. रशियातले माझे मित्र पत्र पाठवून कळवतात. "इकडे येऊ नकोस." मी त्यांचा रोष पत्करून जातोय घरी...हो, हेच तर जीवन म्हणतो मी. ह्याचचं नाव जीवन !"

गूसेवचं त्याच्या बोलण्याकडे लक्षच नव्हतं. तो खिडकीतून बाहेर पहात होता. फिक्या आरसपानी पाण्यावर डोळे दिपवून टाकणाऱ्या प्रखर सूर्य प्रकाशाचा मुलामा चढलेली होडी हेलकावत होती. त्याच्यावर उघडेबंब चिनी उभे होते. ते कॅनरी पक्षी अडकलेली जाळी वर खेचत होते आणि ओरडत होते, "पयोत, पयोत !" त्या होडीवर दुसरी होडी आदळत होती. एवढ्यात वाफेचा बॉयलर जवळून गेला. आणखी एक होडी आली. तिच्यावर एक लठ्ठ चिनी मनुष्य काड्यांनी भात खात बसला होता. समुद्राचं पाणी आळसावल्यासारखं संथ होतं, त्याच्यावर पांढरे 'सीगल' अळसुडेपणाने गिरक्या घेत होते.

"ह्या लठ्ठ माणसाचं तेलमालीश करायला हवं चांगलं", त्या चिनी माणसाकडे पाहून गूसेवच्या मनात विचार आला. त्याला पण जांभई आली.

गूसेवला डुलकी आली. आणि वाटायला लागलं की सभोवतालचा निसर्गपण पेंगुळला आहे की काय ! वेळ भराभर जात होता. दिवस केव्हा संपला आणि अंधार केव्हा पडला कळलंच नाही...बोट आता एका जागी थांबली नव्हती. ती पुढच्या प्रवासाला लागली होती.

*

भाग ४

त्यानंतरचे दोन दिवस असेच गेले. पावेल आता बसू शकत नव्हता, निजूनच होता तो. त्याने डोळे मिटून घेतले होते. त्याचं नाक जणू जास्तच तरतरीत दिसत

होतं. "पावेल," गूसेवनं त्याला हाक मारली, "अहो, पावेल !"

पावेलनं डोळे उघडले आणि ओठ हलवले.

"तुम्हाला बरं वाटत नाहीये का ?"

"काही विशेष नाही, ठीक आहे," पावेल उसासा टाकत उत्तरला. "काही होत नाहीये मला...उलट जरा बरंच वाटतंय, बघ मला आता आडवं होता यायला लागलंय...त्रास जरा कमीच झालाय..."

"बरंय बाबा, देवाची कृपाच म्हणायची पावेल."

"मी माझी आणि तुमची तुलना करू लागलो ना की तेव्हा मला तुमची दया येते. किती गरीब, सरळ साधी माणसं आहात तुम्ही. माझी फुप्फुसं स्वच्छ आहेत अगदी. खोकला पोटातून येतोय...मी नरकयातना सुद्धा सोसू शकतो, त्याच्यापुढे तांबड्या समुद्राची काय कथा. मला कश्शाची भीती वाटत नाही. म्हणून तर मी माझं दुखणं, औषधं सगळ्यावर मात करू शकतो. पण तुम्ही गरीब, दुबळी, अडाणी माणसं...तुम्हाला दुखण्याशी सामना करणं जरा जडच जातं !"

बोटीची हिंदकळ कमी झाली होती. समुद्र शांत होता पण म्हणूनच हवा गरम, दमट अगदी भट्टीमध्ये असते तशी होती. बोलायला नको वाटत होतं, कानात दडे बसल्यासारखे वाटत होते. गूसेवने गुडघे पोटाशी घेऊन हातानी विळखा घातला होता त्यांना. डोकं गुडघ्यावर टेकलं आणि तो पुन्हा गावाकडच्या आठवणीत रंगून गेला. शीः, असल्या मरगळ आणणाऱ्या कुंद हवेत बर्फ, थंडी असल्या गोष्टींचा विचार करण्यात मजा का वाटणार आहे ? तू बर्फाच्या गाडीवरून निघालायस, अचानक घोडे कशामुळे कोण जाणे बिचकले, बिथरले नि भरकटायला लागले. रस्ता नाही, टेकाड नाही. कशाचाही विचार न करात ते पिसाटासारखे तलावामधून, कारखान्या जवळून, शेतांमधून सुसाट सुटले होते..."आवरा त्यांना !, कारखान्यातली, रस्त्यावरून जाणारी येणारी माणसं ज़िवाचा आकांत करत ओरडत होती, आवरा !" उगीच कशाला आवरायचं त्यांना ! अंगावर शिरशिरी आणणारे गार वारे चेहऱ्यावर फटकारे मारू देत, हातांना झोंबू देत. घोड्यांच्या खुरांनी उडवलेले बर्फाचे गोळे टोपीवर, कॉलरवर, मानेवर, पोटावर आपटू देत. गाडीच्या पाठीमागून धावणाऱ्या पळत्याला किंचाळू देत, रस्त्याचं, पायवाटांचं नामोनिशाण राह्यलं नाही तरी चालेल, वाटोळं

होऊ देत त्यांचं, घोडागाडी उलटली आहे, हिमवादळाच्या जोराने तुझे हात पाय हवेच्या झोतात ओढले जाताहेत, तू खाली तोंड करून बर्फात घुसतोयस मग उभा राहतोस तो बर्फानं पूर्ण माखलेला, बर्फाच्या सुया मिश्यांवर लटकताहेत, टोपी उडालीय, चाबकाची मूठ गायब झालीय, कमरेचा पट्टा सुटून गेलाय...लोक खोखो हसताहेत तुझ्या अवताराकडे पाहून, कुत्री भंकताहेत, अहाहा, काय विलोभनीय दृश्य आहे !...

पावेल आपला एक डोळा किलकिला करून गूसेवकडे पहात दबक्या आवाजात विचारत होता, "गूसेव तुझा कमांडर चोरी करायचा का ?"

"तो काय करायचा ते कोणाला माहीत आहे पावेल ? आमच्यापर्यंत असल्या गोष्टी पोहोचतच नाहीत."

त्यानंतरचा बराच वेळ नि:स्तब्धतेतच गेला. गूसेवच्या मनात विचार आला. "बरळतोय लेकाचा. पाणी पण किती पितोय एकसारखा. बोलायला, श्वास घ्यायला त्रास होतोय बहुतेक त्याला, आपल्याशी कुणी बोलायला येईल की काय अशी भीती वाटतेय त्याला. असाच एक तास जातो, दोन, तीन तास संपतात, संध्याकाळ होते, रात्र पडते पण गूसेवच्या ते काहीच लक्षात येत नाही. बसल्या जागी तो हिमवादळाच्या विचारात गढलेला आहे अजून.

इस्पीतळाच्या कक्षेत कुणीतरी आल्यासारखं वाटलं. माणसांचे आवाज कानावर आदळत होते, पण पाच मिनिटांनंतर सगळं थांबलं.

"देवाच्या साम्राज्यात जाऊन पोहोचला तो, कायमची शांतता," बँडेज बांधलेला सैनिक म्हणत होता, "अस्वस्थ होता तो अगदी."

"काय म्हणतोस," गूसेवन विचारलं, "कोणाविषयी बोलतोयस ?"

"मेला तो, आत्ताच वर घेऊन गेले त्याला."

"हं, काय करणार," गूसेव जांभई देत पुटपुटला, "स्वर्गात गेला तो."

"गूसेव, तुला काय वाटतं ?" थोड्या वेळाच्या शांततेनंतर हाताला बँडेज असलेल्या सैनिकाने विचारले, "त्याला स्वर्गात स्थान मिळणार की नाही ?"

"कोणाविषयी बोलतोयस तू ?"

"अरे, दुसऱ्या कुणाविषयी, पावेल विषयी."

"नक्कीच मिळणार...खूप यातना सहन केल्या त्यानं...तसा विचार केला तर त्याचा हुद्दा धर्मोपदेशकाचा होता. शिवाय त्याचे वडील पाद्री. पाद्री लोकांचा

गोतावळा पुष्कळ असतो. ते त्याच्यासाठी प्रार्थना करतील."

हात बँडेजमध्ये घातलेला सैनिक गूसेवच्या शयनिकेजवळ जाऊन बसला आणि हळू आवाजात म्हणाला, "गूसेव, मी काय म्हणतोय ऐक, तू ह्या जगाचा फार दिवसाचा सोबती राहिला नाहीयेस, तू रशियाला पोहोचणं अशक्य प्रायच आहे."

"डॉक्टर, शल्यचिकित्सक, कुणी काही म्हणालं का ?" गूसेवनं विचारलं.

"कुणी काही म्हणालं म्हणून नाही सांगत मी हे, चक्क दिसतंय...मरण दाराशी येऊन ठेपलेला मनुष्य सहज ओळखू येतो. तू काही खात नाहीस, पीत नाहीस, हाडाची काडं झाली आहेत नुसती तुझी, घाबरवतोयस पाहणारांना. एका शब्दात सांगायचं म्हणजे क्षयरोग आहे बाबा तो ! हे सर्व सांगण्यात तुला दु:खित करायचा माझा हेतू नाहीये हं. पण मला असं सुचवायचंय की 'युरवॅरिस्ट'ला पैसे द्यायची तुझी इच्छा आहे का ? तुझ्याजवळ पैसे शिल्लक असतील तर ते तू वरिष्ठ अधिकाऱ्याला दिलेले बरे."

"मी घरी काहीच कळवलं नाहीये"...गूसेवनं उसासा सोडला, "मी मरून जाईन तरी त्यांना ते कळायचं सुद्धा नाही."

"कळेल," आजारी नावाडी खर्जात म्हणाला. "इथले अधिकारी लॉगबुकमध्ये लिहून ठेवतील. ते ओडेसातल्या सैनिक प्रमुखाकडे चिठ्ठी धाडतील. मग सैनिक प्रमुख ती तुझ्या गावच्या तालुका कार्यालयाकडे पाठवतील नाहीतर कुठे पाहिजे असेल तिथे पाठवण्याची व्यवस्था करतील."

त्यांच्यात झालेल्या संभाषणामुळे गूसेवला कलबलून आलं आणि कसल्यातरी प्रबळ इच्छेने त्याची घालमेल व्हायला लागली. पाणी पिऊन पाह्यलं त्यानं, नाही बरं वाटलं, गोल खिडकीत डोकावून गरम, दमट हवेत श्वास घेऊन पाहिला, ते पण नको वाटलं, गावाकडच्या हिमवादळाच्या आठवणीत रमायचा प्रयत्न केला. पण कसलं काय नि कसलं काय, कशानंच मनाची तळमळ कमी होईना... अखेरीस त्याला वाटायला लागलं तो अजून एक मिनिट जरी बोटीवरच्या इस्पितळात थांबला तर त्याचा प्राण इथेच जाणार.

"दोस्तानो, मला कसतरीच होतंय...," तो म्हणाला, "मला वर जायचंय. कृपा करून माझ्या बरोबर वर डेकवर चलता का ?"

"ठीक आहे," हात बांधलेला सैनिक म्हणाला, "तू आपला आपला

नाही जाऊ शकणार. मी तुला नेतो. माझी मान पकड.''

गूसेवनं त्याच्या मानेला विळखा घातला, सैनिकानं आपल्या न दुखऱ्या हातानं त्याला पकडलं आणि तो त्याला वर घेऊन जायला निघाला. डेकवर कायमच्या रजेवर जायला निघालेले सैनिक आणि नाविक आडवे तिडवे कसेही झोपले होते. त्यांची संख्या इतकी मोठी होती की त्यांच्यामधून वाट काढत जाणं कठीण होतं.

''उभा रहा जरा, इथे,'' आजारी सैनिक हळू आवाजात म्हणाला, ''हळू हळू, माझ्या पाठीमागे ये, माझ्या शर्टला धर...''

सगळीकडे काळोख पसरला होता. डेकवर, शिडांवर, सभोवतीच्या समुद्रावर कुठे कुठेही थोडासुद्धा प्रकाश दिसत नव्हता. बोटीच्या अगदी नाकापाशी पहारेकरी एखाद्या पुतळ्याप्रमाणे निश्चल उभा होता. जणू काही तोही झोपलाच होता. असं वाटत होतं की बोटीला स्वत:च्या मर्जीवर सोडलं होतं. त्यामुळे ती वाटेल तशी चालली होती.

''आता पावेलला समुद्रात सोडतील,'' सैनिक म्हणाला,

''पोत्यात घालायचं नि द्यायचं पोतं पाण्यात टाकून.''

''होना, तशीच पद्धत आहे.''

''त्यापेक्षा घरी जमिनीत पुरतात ते बरं असतं. आई थडग्याजवळ बसून रडते बिचारी, पण ते परवडलं.''

''खरंय''

तेवढ्यात शेणाचा नि गवताचा वास यायला लागला. बोटीवर बैल खाली मान घालून उभे होते. एक, दोन, तीन... चांगले सात बैल. थोडं पलीकडे घोड्याचं शिंगरू उभं होतं. त्याला गोंजारावं म्हणून गूसेवनं हात पुढे केला पण त्यानं मानेला हिसडा दिला, दात विचकले. हाताला चावा घ्यायचा इरादा होता त्याचा.

''मूर्ख कुठला''... गूसेवला राग आला.

गूसेवने आणि त्या सैनिकाने हळूहळू बोटीचं नाक गाठलं. ते कठड्याचा आधार घेऊन उभे राहिले आणि मुकाट्या मुकाट्याने खाली वर असं पहात बसले. आकाशाचा रंग गडद होता, तारे लखलखत होते, शांत, निरामय होत सगळीकडे, खेड्यात घरी असायचं ना, अगदी तस्सच. खाली बोटीवर काळोख

आणि अव्यवस्था नि पसारा होता नुसता. उंच उंच लाटा एवढा आवाज का करताहेत कळत नव्हतं. कुठल्याही लाटेकडे पहा तुम्ही. प्रत्येक लाट आधीच्या सर्व लाटांपेक्षा उंच जाण्याचा, पहिलीला दाबून टाकण्याचा किंवा हुसकावून लावण्याचा प्रयत्न करत असते. त्या दुसऱ्या लाटेवर तिसरी लाट आपली पांढरी आयाळ पसरून स्वार होते. तशीच अक्राळ विक्राळ आणि जगडव्याळ.

समुद्राला विचारशक्ती नाही की दयामाया नाही. बोट ह्याच्याहून जरा लहान असती आणि एवढ्या जाडजूड लोखंडापासून बनवलेली नसती तर समुद्राच्या ह्या लाटांनी कसलीही भीडभाड न ठेवता तिचा चुराडा करून टाकला असता आणि हा पापी आहे का, हा पुण्यवान आहे अशी विभागणी न करता बोटीवरच्या सर्वच्या सर्व प्रवाशांना जलसमाधी दिली असती त्यांनी. बोटीचं नाकाड अविचारी आणि दुष्ट वाटतं अगदी. हा नाकाडा राक्षस पुढे मागे करत आपल्या मार्गात येणाऱ्या लाखो लाटांना कापत जात असतो, त्याला काळोखाची, वाऱ्याची, अथांगतेची आणि एकलकोंडेपणाची कश्शा कश्शाची भीती नसते. त्याच्या लेखी ह्या सगळ्या गोष्टींना काडीची किंमत नसते. ह्या महासागराचे आपले स्वत:चे सगे सोयरे असते तर ह्या राक्षसाने त्यांनासुद्धा पवित्र की पापी असा विचार न करात सर्रास जलसमाधी दिली असती.

"आपण आता कुठपर्यंत येऊन पोहोचलो आहोत ?" गूसेवनं विचारलं.

"माहीत नाही. पण महासागरात आलो असू बहुतेक."

"जमीन काही दिसत नाहीये कुठे..."

"कुठून दिसणार ? म्हणताहेत की सात दिवसानंतर ती पहायला मिळेल आपल्याला."

ते दोघे सैनिक फॉस्फरसमुळे प्रकाशित झालेल्या पाण्यावरच्या पांढऱ्या फेसाकडे पहात, कसला तरी विचार करत मुकाट्याने बसले होते. गूसेवने पहिल्यांदा चुप्पी तोडली.

"ठीक आहे, ठीक आहे. हे सात दिवस पण केव्हाच संपतील. भीती वाटण्यासारखं काऽऽही नाही," गूसेव म्हणाला, "जरा जिवाची तगमग होतेय आणि आपण जणू निबीड अरण्यात बसलो आहोत असं वाटतंय. पण समजू या की अधिकाऱ्यानं एक होडी पाण्यात सोडली आत्ता आणि आज्ञा केली की समुद्रात शंभर कोस आत मासे पकडायला जा, तर तडक गेलो असतो मी किंवा

समज एखादा ख्रिस्ती मनुष्य पाण्यात पडला आणि गटांगळ्या खायला लागला तर मी पण त्याच्या पाठोपाठ पाण्यात उडी घेतली असती. जर्मन किंवा मान्झा माणसाला वाचवायला नसतो गेलो पण ख्रिस्ती माणसाला मदतीचा हात पुढे केला असता.''

''तुला मरणाची भीती नाही वाटत ?''

''वाटते ना. मला माझ्या कुटुंबाची काळजी वाटते. माझा भाऊ आहे घरी. पण अगदीच बेजबाबदार आहे तो. दारुड्या आहे नुसता. ऊठसूठ बायकोला मारतो. आई वडील तर त्याच्या खिजगणतीतही नाहीयेत. माझ्या गैरहजेरीत सर्व घरच कोलमडून जाईल. पाहशील तू माझे म्हातारे आईवडील देशोधडीला लागतील. पण मित्रा, माझे हे पाय मला उभं राहू देत नाहीयेत आता. श्वास घ्यायलाही जड जातंय. चल, जाऊ या झोपायला आता.''

❋

भाग ५

गूसेव इस्पितळात परत येऊन शयनिकेवर आडवा झाला. त्याची पहिल्यासारखीच आंतरिक उलघाल होतेय. पण काय हवंय ते कळत नाहीये. छाती भरून आली आहे. डोक्यात घाव बसताहेत, तोंडाला शोष पडलाय, जीभ हलवता येत नाही इतकी जड झाली आहे. त्याला गुंगी येत होती आणि तो बरळत होता. खोकल्यानं, श्वास कोंडल्यामुळे आणि भयचकित स्वप्नामुळं पहाटे पहाटे त्याला कुठे जरा गाढ झोप लागली. त्याला स्वप्न पडत होतं की बरॅकमध्ये नुकताच भट्टीतून पाव बाहेर काढलाय. तो भट्टीजवळ ओणवा झालाय आणि बिर्योझाच्या काटक्यांचा वाफारा तोंडावर सपकन बसला. दोन दिवस तो झोपलेलाच होता. तिसऱ्या दिवशी दोन नावाडी वरून खाली आले आणि त्याला इस्पितळातून बाहेर घेऊन गेले.

त्याला कॅनव्हसच्या कपड्यात गुंडाळून शिवून टाकलं. त्याचं शरीर जड व्हावं म्हणून दोन लोखंडी सळया पण आत घातल्या. कॅनव्हसमध्ये शिवून टाकलेला तो एखाद्या गाजर नाहीतर लाल मुळ्यासारखा दिसत होता, डोक्याच्या बाजूला रुंद आणि पायाकडे अरुंद...सूर्य मावळण्यापूर्वी त्याला डेकवर नेलं

आणि एका फळीवर ठेवलं. फळीचं एक टोक डेकवर होतं आणि दुसरं स्टुलावर ठेवलेल्या पेटीवर होतं. भोवताली रजेवर जायला निघालेले सैनिक आणि टोप्या काढलेले कर्मचारी उभे होते.

"तुम्हाला देवाचा आशीर्वाद मिळो !" धर्मोपदेशकानं सुरवात केली, "सदासर्वदा, आत्ता, इथे आणि स्वर्गातपण, युगानुयुगे !"

आमीन ! तीन नावाडी गाऊ लागले.

सुट्टीवर निघालेल्या सैनिकांनी आणि कर्मचाऱ्यांनी हाताचा क्रॉस केला आणि माना वळवून लाटांकडे पाहू लागले ते. सगळंच कसं विचित्र आहे नाही. माणसाला कॅनव्हसमध्ये शिवलाय आणि क्षणार्धात तो लाटांवर झेपावणार आहे. सगळ्यांच्याच बाबतीत असं झालं असतं तर बरं होतं नाही !

धर्मोपदेशकानं गूसेववर माती टाकली आणि तो ओणवा झाला. सर्वजण "कायमची आठवण" हे गाणं गाऊ लागले.

कार्यकारी अधिकाऱ्याने फळी वर उचलून धरली. गूसेव फळीवरून खाली डोकं वर पाय असा घसरत गेला. मग हवेत कोलांट्या मारू लागला आणि मग एकदम डुबुक ! पाण्यावरचा फेस त्याच्या अंगभर पसरला. एक क्षण असं वाटत होतं की त्याला लेसमध्ये गुंडाळला आहे. पण हा क्षण सुटला आणि तो लाटांमध्ये नाहीसा झाला.

तो भराभरा तळाकडे जायला लागला. पोहोचणार का तळापर्यंत ? तळापर्यंत चार कोसाचं अंतर असतं म्हणतात. आठ, दहा पुरुष अंतर कापल्यावर तो हळू हळू खाली जाऊ लागला. तो तालबद्धतेनं हेलकावत होता. जणू समाधी लावत होता तो. पाण्याच्या ओघाच्या आकर्षणामुळे खाली जाण्याऐवजी तो वेगाने एका बाजूला ओढला जात होता.

त्याच्या खाली जाण्याच्या मार्गावर त्याला एक माशांचा थवा भेटला. त्या माशाचं नाव आहे 'लोलामान' म्हणजे पायलट मासे. ते धूड पाहून मासे जागच्या जागी थबकले. अचानक सगळ्यांनी आपला मोहरा वळवला आणि अदृश्य झाले ते. एका मिनिटाच्या आत तीरासारखे चपळपणे ते गूसेवच्या शरीरावर चढले आणि नागमोडी वळणं घेत त्याच्या भोवतालच्या पाण्यात डुबक्या घेऊ, लागले...

त्यानंतर थोड्याच वेळात दुसरं काळ धूड दिसायला लागले. तो होता शार्क मासा. तो अगदी ऐटीत होता पण निरीच्छ असा वाटत होता. गूसेवचं ते बोचकं नक्की काय आहे हे लक्षात न आल्यामुळं तो गूसेवच्या शरीराखालून पोहत गेला. गूसेव पाठीकडून त्याच्यावर आदळला. मग शार्क मासा वळून पाठीवर उताणा पडला. त्यानं गरम, पारदर्शक पाण्याचा आनंद लुटला. दाताच्या दोन रांगा असलेला आपला जबडा त्यानं आळसुडेपणानं उघडला. लोलामान मासे आश्चर्यानं थक्क झाले. ते जागीच खिळून आता पुढे काय होतंय ते पहात बसले. गूसेवच्या शरीराशी खेळत जरा मनाविरुद्धच शार्क माशाने आपला जबडा त्याच्या खाली घातला आणि दातांनी शरीराला हळू हळू स्पर्श करत गेला. मग काय कॅनव्हसची पिशवी शरीराच्या सर्व लांबीइतकी फाटली गेली, डोक्यापासून ते थेट पायापर्यंत. पिशवीतली एक सळई पायलट माशांना घाबरवत, शार्क माशाच्या एका बाजूला फटका मारून वेगानं तळाकडे गेली.

त्याचवेळी वर पाण्यावर मावळतीला पुंजक्यांनी ढग जमा झाले होते. एक ढग विजयोत्सवी कमानीसारखा दिसत होता, दुसरा सिंहासारखा वाटत होता तर तिसऱ्याचा आकार कात्रीसारखा भासत होता. ढगांच्या मागून एक हिरवा किरण बाहेर पडला आणि आकाशाच्या मध्यापर्यंत जाऊन पोहोचला. थोड्या वेळाने त्याच्याजवळ जांभळा किरण दिसला, त्यानंतर सोनेरी मग गुलाबी...आकाशाला लिलॅक रंग चढला होता. अतिसुंदर, मोहक असं ते आकाश पाहून समुद्र सुरवातीला नाराज झाल्यासारखा वाटला पण नंतर मात्र त्या मोहक, आनंददायक, मनाला चटका लावणाऱ्या रंगांचा तो आस्वाद घेऊ लागला. माणसांच्या भाषेत त्या रंगांच नामकरण करणं अतिशयच कठीण काम होतं.

●●

अन्तोन चेखव (१८९१)

: २ :

गवतातील नाकतोडी

भाग १

ओल्गा इवानवनाच्या लग्नाला तिची सर्व मित्र मंडळी आणि हितचिंतक उपस्थित होते. "जरा बघा तरी त्याच्याकडे, मी म्हणते ते खरंय की नाही, की त्याच्यात विशेष असं काहीतरी आहे", नवऱ्याकडे पहात ती आपल्या मित्रांना म्हणाली. तिला जणू खुलासा करावासा वाटत होता की तिनं अशा साध्याभोळ्या सामान्य, कुठल्याच कलेत गती नसलेल्या माणसाशी का लग्न केलं ?

तिचा नवरा ओसिप स्तिपानिच दीमव निम्न श्रेणीतील सरकारी डॉक्टर होता. तो दोन दवाखान्यांत काम करीत असे. त्यातील एकात तो उमेदवार म्हणून तर दुसऱ्यात शव विच्छेदक म्हणून काम पाही. दररोज सकाळी नऊ वाजल्यापासून एक वाजेपर्यंत तो रोग्यांना आपल्या घरातल्या खोलीतच तपासत असे आणि दुपारी घोड्यावरून दुसऱ्या दवाखान्यात शव विच्छेदन करायला जात असे. त्याची खासगी प्रॅक्टीस नगण्य होती. वर्षाला ५०० रुबल्स. झालं एवढंच, आणखी त्याच्याविषयी सांगण्यासारखं काय होतं ? ह्या उलट ओल्गा आणि तिची मित्रमंडळी ही काही येरीगेरी माणसं नव्हती. त्यांच्यातील प्रत्येकजण कुठल्या ना कुठल्या तरी विषयात पारंगत होता, थोडीशी प्रसिद्धी पावलेला, नाव कमावलेला, सन्मानित असा होता. कदाचित एखाद्याला अजून मानसन्मान मिळाले नसतील, तरी होतकरू उमेदवार म्हणून त्याची गणना नक्कीच केली जाई. त्यांच्यातील एक नाट्यकलाकार होता. तो सुप्रसिद्ध, आकर्षक व्यक्तिमत्त्वाचा, अत्युत्कृष्ट नाट्याभिनिवेष असलेला, हुषार पण विनम्र असा होता. तो ओल्गाला शब्दाची फेक कशी करायची ते शिकवीत असे. ऑपेरामधील सुस्वभावी, ठणठणीत अशा तिच्या गायक मित्राला मनापासून वाटायचं की ओल्गा स्वत:च स्वत:च्या पायावर धोंडा मारून घेतेय. त्याचं

म्हणणं होतं की तिनं जर आळशीपणा केला नाही आणि मनावर घेतलं तर ती एक सुरेल गायिका बनेल. शिवाय कित्तीतरी कलाशिल्पी होते. त्यांच्यामधला प्रमुख रॅबवस्की हा निसर्गचित्रकार होता. तो २५ वर्षाचा देखणा, तरुण मुलगा होता. त्याचे केस भुरे होते. त्याच्या चित्रप्रदर्शनांना मोठा प्रतिसाद मिळत असे. नुकत्याच भरलेल्या प्रदर्शनातलं त्याचं शेवटच चित्र ५०० रुबल्सला विकलं गेलं होतं. तो ओल्गाला रेखाचित्रणात मार्गदर्शन करायचा आणि म्हणायचा की तिच्याकडून अर्थपूर्ण चित्रांची अपेक्षा करणं चुकीचं ठरणार नाही. त्यांच्यातला एक व्हायोलिन वादक होता. तो व्हायोलिनमधून हुबेहूब रडण्याचे सूर काढी. तो सर्वासमक्ष उघडपणे म्हणायचा की त्याच्या ओळखीच्या स्त्रियांमध्ये ओल्गा ही एकच स्त्री अशी आहे की जी त्याची साथसंगत करू शकेल. शिवाय तरुणपणीच प्रसिद्धी मिळवलेला असा एक साहित्यिक मित्र होता तिचा. लघुकथा, दीर्घकथा, नाटक लिहीत असे तो. आणखी कोण राह्यल बरं ? हं आणखी एक राह्यला ना अनेक कलांचा आस्वाद घेऊ शकणारा, बडा जहागीरदार वसीलीय वसीलिच. कागदावर, चिनीमातीच्या भांड्यांवर, स्मोकिंग केलेल्या बशांवर तो अक्षरश: अद्भुत अशी चित्रनिर्मिती करायचा. तो अभिजात रशियन शैलीचा खऱ्या अर्थानं जाणकार होता. अशा या समंजस, मर्यादशील, स्वतंत्रवृत्तीच्या, नशीबानं साथ देऊन चढवून ठेवलेल्या कलाकारांना एखाद्या डॉक्टराच्या अस्तित्वाची आठवण फक्त ते स्वत: आजारी पडल्यावरच व्हायची. दीमव हे नावसुद्धा त्यांना सिदरव, तरासवसारखं निरर्थक वाटायचं. ह्या मंडळींपुढे उंचापुरा, रुंद खांद्याचा असूनसुद्धा दीमव परका, नको असलेला, खुजा वाटायचा. असं वाटायचं की त्यानं दुसऱ्याचा कोट घातलाय, त्याची दाढी एखाद्या बेलीफासारखी छोटी आहे. मात्र हाच दीमव जर एकादा लेखक किंवा चित्रकार असता तर हेच लोक म्हणाले असते की ह्याच्या दाढीवरून फ्रेंच लेखक अेमिल झोलाची आठवण होतेय.

चित्रकार रॅबवस्की ओल्गाला म्हणाला की तिच्या पिंग्या केसांमुळे लग्नाच्या वेषभूषेत ती हुबेहुब वसंतऋतूत नाजूक पांढऱ्या फुलांनी नखशिखांत डवरलेल्या चेरीच्या शेलकाट्या झाडासारखी दिसतेय.

''नाही मी काय म्हणते ते ऐक तरी'', रॅबवस्कीचा हात हातात घेत ओल्गा म्हणाली. ''हे असं अचानक कसं घडलं हो ना ? ऐक, ऐक... तुम्हाला

सांगायलाच हवं. माझे वडील आणि दीमव एकाच दवखान्यात कामाला होते. गरीब बिचारे माझे वडील जेव्हा आजारी पडले तेव्हा दीमव त्यांच्या बिछान्याजवळ दिवसरात्र बसून होता. केवढी ही नि:स्वार्थी सेवा ! ऐक रॅबवस्की आणि लेखक महाशय तुम्हीपण ऐका. ऐकण्यासारखं आहे. या जरा माझ्याजवळ असे. केवढा त्याग आणि आंतरिक तळमळीनं केलेली शुश्रुषा ! मी सुद्धा न झोपता रात्रभर वडीलांपाशी बसून असायची आणि अचानक नवलच घडलं ! त्या तरुण युवकाच्या सहृदयतेन बाजी मारली. त्या क्षणी तो माझ्या प्रेमात आकंठ बुडाला. म्हणतात ना ते खरच आहे की माणसाचं नशीब हे अगम्य कोडं आहे ! वडिलांच्या मृत्यूनंतर पण तो मधून मधून आमच्याकडे येत असे, कधी रस्त्यातच आमची भेट व्हायची आणि एका सुंदर संध्याकाळी धाडधुम धडाड धूम ! माझ्यावर हिमवर्षावच झाला. त्याने मला मागणी घातली. मी ती सबंध रात्र रडून काढली आणि मी पण त्याच्या प्रेमात बुडून गेले. अशा तऱ्हेने तुम्ही बघताच आहात की मी त्याची अर्धांगिनी झालेय. खरंय किनाई की तो केवढा, उंचापुरा, पिळदार शरीरयष्टीचा दिसतो ! इथून तुम्हाला त्याचा फक्त ¾ चेहरा दिसतोय आणि चेहऱ्यावर उजेड पण पडत नाहीये तितकासा. पण तो जेव्हा इकडे वळेल ना तेव्हा तुम्ही त्याच्या कपाळाकडे पहा. रॅबवस्की, त्याच्या भालप्रदेशाविषयी तुझं काय म्हणणं आहे ? दीमव, आम्ही तुझ्याच विषयी बोलतोय, ती नवऱ्याकडे पाहून मोठ्यानं म्हणाली ये, इकडे ये ना. हा माझा मित्र रॅबवस्की, तुझा हात विश्वासानं त्याच्या हातात दे. आजपासून तुम्ही दोघं एकमेकांचे खरे मित्र झालात." साधाभोळा, प्रेमळ दीमव भाबडेपणानं हसला आणि रॅबवस्कीचा हात हातात घेत म्हणाला, "आपल्याला भेटून आनंद झाला. माझ्याबरोबर कॉलेजमध्ये एक रॅबवस्की होता. तो तुमचा कोणी नातेवाईक तर नाही ना ?"

*

भाग २

ओल्गा बावीस वर्षाची तर दीमव एकतीस वर्षाचा होता. लग्नानंतर ती दोघं अगदी मजेत होती. ओल्गाने दिवाणखान्यातील सगळ्या भिंतीवर जिकडे

तिकडे स्वत:ची आणि इतरांचीही चित्रं टांगली होती. त्यातल्या काहींना चौकटी होत्या, काही तशीच होती. पियानो आणि फर्निचरच्या जवळ चिनी छत्र्या, तिपाया, तलवार, अर्धपुतळे, फोटो आणि रंगीबेरंगी हातपुसणी यांची दाटीवाटीची रचना करून सुंदर सजावट केली होती. रशियन धाटणीचं जेवणघर उभं केलं होतं. त्याच्या भिंतीवर सर्वत्र आढळणारी काही छायाचित्रं चिकटवली होती. कोयते, काठ्या टांगल्या होत्या. कोपऱ्यामध्ये नांगराचा फाळ आणि दातेरं ठेवलं होतं. खरीखुरी गुहा वाटावी म्हणून झोपायच्या खोलीच्या छताला गडद रंगाच्या कापडाचे पडदे लावले होते. पलंगावर व्हेनिसचा दिवा टांगला होता आणि दारापाशी घडवंचीवर पुतळा ठेवला होता. त्यांच्याकडे येणाऱ्या प्रत्येकाला वाटत होतं की ह्या नवदांपत्याने आपलं घर कसं छान सजवलंय.

ओल्गा दररोज ११ वाजता बिछान्यातून बाहेर यायची. मग पियानो वाजवत बसायची. उन छान पडलं असलं तर ऑईलपेंटच एखाद चित्र काढत बसायची. मग एकच्या सुमारास ती आपल्या ड्रेसमेकर शिंपिणीकडे जायची. तिची आणि दीमवची सांपत्तिक स्थिती बेताचीच होती म्हणजे जेमतेम तोंडमिळवणी होत असे. त्यामुळे रोज रोज नवनवीन कपडे घालून आपल्या कपड्यांची लोकांवर छाप पडावी म्हणून तिला आणि तिच्या शिंपिणीला बरीच जोड तोड करावी लागे. बरेच वेळा जुने कपडे रंगवून पडद्याच्या लेसचा छोटासा तुकडा, क्रोशाचा रूमाल, रेशमी कापडाचा तुकडा उपयोगात आणून अफलातून आकर्षक असे नमुने तयार व्हायचे. कपडे नाही तर त्यांचं स्वप्न साकार व्हायचं. शिंपिणीकडून ओल्गा बहुतेकदा आपल्या ओळखीच्या एखाद्या अभिनेत्रीकडे जायची म्हणजे तिला नाट्यसृष्टीतल्या नवीन घडामोडी कळायच्या. शिवाय एखाद्या नव्या नाटकाच्या शुभारंभाची किंवा कुणाच्या तरी मदतीसाठी होणाऱ्या प्रयोगाची तिकिटं मिळवता आली तर बघता येत असे. नाट्यकलाकार मैत्रिणींकडून चित्रकारांच्या कार्यशाळेत किंवा चित्रप्रदर्शनाला जाणं हेही तिला आवश्यक वाटायचं. त्यानंतर मग ती एखाद्या प्रसिद्ध व्यक्तीला आपल्याकडे यायचं निमंत्रण द्यायला किंवा ती व्यक्ती तिच्याकडे येऊन गेली म्हणून परत भेट द्यायला नाहीतर नुसत्या गप्पा मारायला सुद्धा जायची. कुठही गेली तरी तिचं आनंदानं, प्रेमानं स्वागत व्हायचं. तिच्याविषयी सगळ्यांना विश्वास होता की ती एक चांगली,

प्रेमळ आणि विरळा भेटणारी अशी स्त्री आहे. ज्यांना ज्यांना ती सुप्रसिद्ध, अधिकारी व्यक्ती म्हणून संबोधायची ते सर्वजण तिला आपली, आपल्या बरोबरीची मानायचे... त्या सर्वाचं तिच्याबद्दल एकमत होतं की तिनं जर आपल्यातील कलागुण, बुद्धिचातुर्य, मर्मज्ञपणा, तिचे वेगवेगळे छंद ह्यांच्यापासून फारकत घेतली नाही तर काहीतरी विशेष करून दाखवण्याची तिच्यात क्षमता आहे. ती गायची, पियानो वाजवायची. चित्रं रंगवायची, मूर्ती घडवायची, हौशी कलावंतांच्या नाटकांतून भूमिका करायची. हे सगळं केवळ करायचं म्हणून नाही करायची ती तर अगदी जीव ओतून, कौशल्यपूर्ण अशा तऱ्हेने. तिने रोषणाई करण्यासाठी साधे दिवे करायचं ठरवलं, स्वत:साठी कपडे शिवले, कुणाला गळपट्टा विणून दिला तरी तिनं केलेली प्रत्येक वस्तू वैशिष्ट्यपूर्ण, आकर्षक, कलाकुसरीची आणि सुबक असायची. बड्या बड्या लोकांशी झटकन ओळख करून घेऊन थोड्याच वेळात त्यांच्याशी गट्टी करण्याची जी हातोटी तिच्यात होती तिच्यापुढे वरील कुठल्याही गोष्टीतलं कलानैपुण्या फिक्कच ठरलं असतं. अशावेळी कुणाची थोडी बहुत स्तुती करायला लागली किंवा त्याच्यासंबंधी माहिती मिळवण्यासाठी त्याला बोलतं करावं लागलं तरी त्याला तिची हरकत नव्हती. एखाद्याशी तिची आत्ताच कुठे ओळख झाली असली तरी त्याच दिवशी तो तिचा जवळचा मित्र बनायचा. लागलीच ती त्या माणसाला आपल्याकडे यायचं निमंत्रण देऊन मोकळी व्हायची. प्रत्येक नवीन ओळख तिला एखाद्या सणासारखी वाटायची. प्रसिद्ध, लोकप्रिय व्यक्तीविषयी तिला आदर वाटायचा, अभिमान वाटायचा, आणि अशी मंडळी रात्री तिच्या स्वप्नात पण यायची. त्यांच्या सहवासासाठी ती हपापलेली असायची. ही तिची मैत्रीची भूक कधी क्षमायची नाही. काही जुनी मंडळी लुप्त व्हायची. आठवणीतून पण निघून जायची आणि त्यांच्या जागी पटावर नवी मंडळी यायची त्यांच्याशीपण तिची लवकरच गट्टी जमायची नाहीतर त्यांचा तिला थोड्याच वेळात कंटाळा पण यायचा. पुन्हा नव्या बड्या मंडळींचा शोध सुरू व्हायचा, अशी मंडळी मिळायची पण तिला आणि परत नव्यांचा शोध सुरू व्हायचा. पण हा सगळ्या उपद्व्याप ती कशासाठी करायची ?

पाच वाजता ती आपल्या नवऱ्याबरोबर जेवण करायची. त्याचा साधेपणा,

सद्भावना, सुस्वभाव तिला फार भावायचा, ती बसल्या जागेवरून ताडकन उठायची, आसुसलेपणानं त्याला मिठी मारायची आणि त्याच्यावर चुंबनांचा वर्षाव करायची.

"दीमव तू बुद्धिमान आणि सत्शील मनुष्य आहेस", ती म्हणायची, "पण तुझ्यात एका गोष्टीची उणीव तीव्रतेनं जाणवते. तुला कलाविषयांमध्ये अजिबात रस नाहीये. संगीत आणि चित्रकलेची तर तुला नावडच आहे."

"मला नाही त्यातलं काही कळंत." तो तुटकपणे म्हणाला, "मी आजतागायच मूलभूत शास्त्र आणि वैद्यकशास्त्राशी संबंधित गोष्टींचा अभ्यास करीत आलो आहे. कलाविषयात मला कधीच गोडी वाटली नाही."

"पण दीमव हे भयंकरच आहे असं नाही वाटत तुला ?"

"का म्हणून ? तुझी मित्रमंडळी मूलभूत शास्त्रात आणि डॉक्टरी व्यवसायात अनभिज्ञ आहेत म्हणून तू त्यांना द्रोषी ठरवतेस का ? प्रत्येकाचं काहीतरी वैशिष्ट्य असतं. मला तुझी ती निसर्गचित्र किंवा त्या संगीतिका ह्यातलं काही कळत नाही. पण मला असं वाटतं काही बुद्धिमान माणसं एखाद्या गोष्टीसाठी आपलं आयुष्य वेचीत असतील तर दुसरी त्यांच्या तोलामोलाची माणसं दुसऱ्या पद्धतीनी त्याची भरपाई करीत असतात. ह्याचाच अर्थ समाजाला आमच्यासारख्या माणसांची पण गरज आहेच, मला कळत नाही न समजणे ह्याचा अर्थ तिटकारा वाटणे असा कसा होऊ शकतो ?"

"दे, तुझा निर्मळ, दिलासा देणारा हात माझ्या हातात दे !"

जेवणानंतर ओल्गा ओळखीच्या लोकांकडे जायची. मग नाटकाला नाहीतर कॉनसर्टला जाऊन मध्यरात्रीच घरी परतायची. हा असा होता तिचा दिनक्रम.

बुधवारी तिच्याकडे संध्या संमेलनं व्हायची. ह्या संमेलनात यजमानीण किंवा पाहुणे मंडळी कुणीच पत्ते खेळायचे नाहीत की नृत्य करायचे नाहीत, तर निरनिराळ्या कलाविषयांचा आस्वाद घ्यायचे. नाटक मंडळीतील नट नाट्यवाचन करायचा, गायक गायचा, चित्रकार चित्र रेखाटून त्यांचा आल्बम करायचा. ओल्गाकडे असे कितीतरी आल्बम होते. मग व्हायोलिनवादक व्हॉयोलिन वाजवून दाखवायचा, स्वत: यजमानीण पण चित्र काढायची, शिल्प तयार करायची, गायची किंवा दुसऱ्या कुणाला साथसंगत करायची. वाचनाच्या, संगीताच्या आणि गायनाच्या कार्यक्रमाच्या मधल्या विश्रांतीच्या वेळात त्यांच्या

गप्पा व्हायच्या किंवा साहित्य, नाट्य, चित्रकलेविषयी वादविवाद रंगायचे. त्यांच्यामध्ये ओल्गा सोडून दुसरी कुणीही स्त्री नसायची कारण नाटकात काम करणाऱ्या स्त्री कलाकार आणि तिची ड्रेसमेकर सोडून इतर सर्व स्त्रिया तिला कंटाळा आणणाऱ्या किंवा नटव्या वाटायच्या. एकही संध्या अशी जायची नाही की दारावरच्या प्रत्येक घंटीबरोबर यजमानीण ताडकन उठली नाही आणि विजयी मुद्रेनं म्हणाली नाही, "हो, तोच असणार बहुतेक !" तो ह्या शब्दाचा अर्थ असायचा की पहिल्यादांच आमंत्रित केलेली कुणीतरी नवीन प्रसिद्ध व्यक्ती. दिवाणखान्यात दीमव नसायचा आणि तो नाही दिसत म्हणून कुणाला त्याची आठवणही होत नसे. तरीही बरोबर ११॥ च्या ठोक्याला जेवणघराचं दार उघडायचं. प्रेमळ स्मितहास्य करीत दीमव आत येताना दिसायचा. हात चोळत चोळत तो म्हणायचा, "चला मंडळी जेवायला."

सगळी दोस्त मंडळी जेवणघरात यायची. दरवेळी टेबलावर तेच तेच पदार्थ दिसायचे. कालवाची प्लेट, डुकराच्या किंवा वासराच्या तंगडीचे तुकडे, सारडिन मासे, चीज, कॅव्हीअर, अळंबी, वोडका आणि दोन शिसे वाईन.

"माझ्या प्रिय मदतनिसा !", ओल्गा खुषीत येऊन हातवारे करीत नवऱ्याला म्हणायची, "तू किती रुबाबदार दिसतोस रे ! मित्रांनो, जरा त्याच्या कपाळाकडे तरी पहा ! दीमव, जरा असा तिरका उभा रहा बघू. बघा, त्याचं तोंड आहे बंगाली वाघासारखं आणि चेहऱ्यावरचा भाव एकाद्या हरणासारखा, प्रेमळ मोहक. किती सुंदर !"

पाहुणे मंडळी जेवायला लागायची, दीमवकडे पाहून त्यांच्या मनात विचार यायचा, "खरंच, अगदी गोड मुलगा आहे." पण थोड्याच वेळात त्यांना त्याचा विसर पडायचा. ते पुन्हा नाटक, संगीत, चित्रकला ह्या विषयांच्या गप्पात रंगून जायचे.

तरुण जोडपं अगदी भाग्यवान होतं. त्यांचं आयुष्य लोण्यावरून चालत जावं असं सुखात चाललं होतं. तरीसुद्धा मधुचंद्रातला तिसरा आठवडा अगदीच वाईट गेला म्हणजे काळजीतच म्हणाना. दीमवला दवाखान्यात 'एरिसिपेलाक'चा संसर्ग झाला. त्याला सहा दिवस बिछान्यात पडून राहावं लागलं. त्याचे सुंदर काळे केस कापून डोक्याचा गोटा करावा लागला. ओल्गा नवऱ्याच्या बिछान्याजवळ बसून रडायची. त्याला जरा बरं वाटायला लागल्यावर तिनं

त्याच्या गोटा केलेल्या डोक्यावर पांढरा रूमाल बांधला आणि त्याच्यावर उंटाच्या काफल्याचं चित्र रेखाटलं. त्यामुळे दोघांनाही खूप मजा वाटली. पूर्ण बरा झाल्यावर तीन एक दिवसांनी तो दवाखान्यात जायला लागला पण पुन्हा त्यांच्यावर एक संकट ओढवलं.

"माझं लक्षण काही खर दिसत नाही हं", एक दिवस जेवण झाल्यावर तो ओल्गाला म्हणाला, "आज मला चार शवविच्छेदनं करावी लागली तेव्हा माझी दोन बोट कापली, घरी आल्यावर माझ्या लक्षात आलं ते."

ओल्गा खूप घाबरली. तो हसला नि म्हणाला, "अग, ही अगदीच किरकोळ गोष्ट आहे. विच्छेदन करताना हाताला कुठेतरी कापून जखम व्हायची हे नेहमीचंच आहे. कामात दंग असलो ना की कधी कधी अनवधानानं असं होतं ग."

ओल्गाला दीमवला मृत शरीरामुळे संसर्ग तर होणार नाही ना अशा नुसत्या आशंकेमुळे खूप भीती वाटत होती. ती रात्र रात्र देवाची प्रार्थना करायची. पण संकट टळलं, सगळं ठीक झालं. जीवन पुन्हा शांतपणे, सुखानं जाऊ लागलं. आयुष्यात दुःख, काळज्या उरल्या नाहीत. त्यांचा वर्तमानकाळ दृष्ट लागण्यासारखा होता आणि त्यानंतर वसंताचं आगमन होणार होतं. तो लांबूनच हसत होता, भरभरून आनंदाची आश्वासनं देत होता. त्यांच्या सुखाला पारावार उरणार नव्हता. एप्रिल, मे, जूनमध्ये गावाबाहेर दाचा*वर हवापालट, भटकंती, चित्र रंगवणं, मासे पकडायला जाणं, कोकिळेच कूजन ऐकणं वगैरे वगैरे. मग पुढे जुलैपासून थेट हेमंतापर्यंत कलाकार मंडळींची वोल्गा नदीवरची सफर. आजीव सदस्य असल्यामुळे ह्या सफरीवर ओल्गाला पण जाता येणार होतं. तिनं आपल्यासाठी प्रवासात घालण्यासाठी लिननचे दोन ड्रेस आधीच शिवून ठेवले होते. प्रवासासाठी रंग, ब्रश, नवी पॅलेटची खरेदी केली होती. निसर्गचित्रांत तिनं किती प्रगती केली आहे ते पाहण्यासाठी रॅबवस्कीच जवळ जवळ दररोजच येत असे. ती त्याला आपली चित्र दाखवायची तेव्हा तो ओठ घट्ट आवळायचा, खिशात हात घालायचा आणि धूम्रवलय सोडत म्हणायचा, "वा...तुमचा हा ढग गडगडतोय वाटतंय, संध्यासमयी दिसणाऱ्या ढगांसारखा तो प्रकाशमान नाहीये. चित्राच्या पुढल्या भागाचा जो आराखडा आहे तो का कोण जाणे आकसलेला असा वाटतोय, हवा तसा जमला नाहीये...झोपडी कशानं तरी चेपली गेलीय आणि तक्रारीच्या सुरात जणू करकरतेय. हा कोपऱ्याचा रंग जरा

गडद हवा होता. पण एकंदरीत चांगलं जमलंय...शाबासकी देतो तुम्हाला त्याबद्दल.'' तो जरी असं न समजणारं, गूढ बोलायचा तरी ओल्गाला त्याला समजणं फारसं कठीण जायचं नाही.

❋

भाग ३

'त्रोइत्साच्या सणाच्या दुसऱ्या दिवशी जेवणानंतर दीमवने काही खाद्य पदार्थ आणि चॉकलेटं विकत घेतली आणि तो आपल्या बायकोकडे दाचावर जायला निघाला. तिची आणि त्याची भेट होऊन दोन आठवडे होऊन गेले होते आणि तिचा विरह त्याला सहन होत नव्हता. आगगाडीत बसला असताना आणि नंतर झाडांच्या दाट राईमधून दाचाकडे जाणारी वाट शोधता शोधता त्याला कडाडून भूक लागल्याचं आणि थकल्याचं जाणवत होतं. तो, ह्या सुट्टीत बायकोबरोबर रात्रीचं जेवण घेण्याचं आणि अंथरुणात गुडुप झोपण्याचं स्वप्न रंगवत होता. आपण बरोबर घेतलेल्या फराळाच्या पिशवीकडे पाहण्यात त्याला मजा वाटत होती कारण तिच्यात वासराची तंगडी, चीज, पांढरा मासा वगैरे बांधून आणलं होतं.

दाचा शोधत शोधत तो जेव्हा प्रत्यक्ष दाचाजवळ येऊन पोहोचला तेव्हा सूर्य मावळला होता. म्हाताऱ्या स्वयंपाकिणीनं त्याला सांगितलं की बाईसाहेब घरी नाहीयेत पण एवढ्यात येतीलच त्या. दाचाचं एकंदर स्वरूप ओंगळच होतं; कमी उंचीचं छत, कागद चिकटवलेल्या भिंती, खड्डे पडलेली खडबडीत फरशी आणि खोल्या पण इन मीन तीन. त्यातल्या एका खोलीत पलंग होता, दुसरीत खुर्च्यांवर आणि खिडक्यातून कॅनव्हास,कुंचले, डाग पडलेले कागद, पुरुषांचे ओव्हर कोट, टोप्या लोळत होत्या. तिसऱ्या खोलीत दीमवला तीन माणसं बसलेली दिसली. त्यातील दोन पिंग्या केसांची आणि दाढीवाली होती तर तिसरा घोटून गुळगुळीत दाढी केलेला लठ्ठ मनुष्य होता. तो बहुतेक नट असावा. टेबलावर समवार* उकळत होता.

''मी काय करू तुमच्यासाठी ?'' दीमवकडे माणूसघाणेपणे पहात घोगऱ्या आवाजात नटाने विचारले, ''तुम्हाला ओल्गाला भेटायचय का ? तुम्हाला

थांबायला लागेल. येईल ती एवढ्यात."

दीमव बसला वाट पहात. त्यांच्यातील एका पिंग्या केसाच्या पेंग येत असलेल्या माणसानं आळसुडेपणानं विचारलं, "काय चहा घेणार का ?"

दीमवला खरंतर तहान, भूक दोन्हीही लागली होती पण मग जेवणाच्या वेळेला भूक मरून जाईल म्हणून त्यानं चहाला नकार दिला. एवढ्यात पावलांचा आवाज कानावर पडला आणि त्याच्या ओळखीचं हसणं पण, मोठाल्या पट्ट्यांची टोपी घातलेली आणि हातात बॅग असलेली ओल्गा धावतच आत आली. तिच्या पाठोपाठ मोठी छत्री आणि घडीची खुर्ची घेतलेला रॅबवस्कीपण आला. त्याचे गाल लाल लाल होते आणि तो खूप आनंदी दिसत होता.

"दीमव !" ओल्गा आनंदान बेहोश होऊन ओरडलीचऽऽ

"दीमव !", त्याच्या छातीवर दोन्ही हात आणि डोकं टेकीत ती म्हणाली, "आलास तू ? इतक्या उशीरा का आलास तू ? का नाही आलास इतके दिवस ? का ?"

"माझे आई, मला कसा वेळ होणार यायला ? मी नेहमी माझ्या कामात बुडालेला असतो आणि जेव्हा रिकामा वेळ असायचा तेव्हा नेहमी हेच व्हायचं की गाड्यांचं वेळापत्रक आणि मला मिळणारी सवड ह्यांचा ताळमेळ बसायचा नाही."

"अरे, तुला पाहून मला किती आनंद झालाय म्हणून सांगू ! दररोज रात्री मला तुझीच स्वप्न पडायची. वाटायचं, हा आजारी तर पडला नसेल ना ? तू मला आवडतोस आणि किती वेळेवर आला आहेस तू हे जर तुला कळलं असतं तर ! तू माझी काळजी दूर करणार आहेस. फक्त तूच मला वाचवू शकणार आहेस ! उद्या ना इथे एक आगळा वेगळा लग्नसोहळा होणार आहे", ती हसत हसत नवऱ्याचा टाय सैल करत पुढे सांगायला लागली. "उद्या स्टेशनवर कोणीतरी चिकीलदियेव नावाच्या तार मास्तरचं लग्न होणार आहे. सुंदर, तरुण मुलगा आहे तो. हुशार आहे. त्याच्या चेहऱ्यावर ना करारीपणा दिसतो. अस्वलाप्रमाणे हिकमती वाटतो तो...त्याच्यावरून एखाद्या तरुण देवदूताचा पुतळा तयार करता येईल. इथे दाच्यावर राहणारे आम्ही सर्वजण त्याच्या लग्नाला जाणार आहोत. आम्ही त्याला कबूल करून बसलोय. तो गरीब आहे. एकटा आहे आणि बुजरा आहे अगदी...त्यामुळे त्याच्या लग्नात सहभागी झालो नाही

तर अपराध्यासारखं वाटेल आम्हाला. कल्पना कर, जेवणानंतर लग्न होणार मग चर्चमधून मुलीच्या घरापर्यंत सर्वजण पायी चालत जाणार...माहीत आहे. दाट झाडांची राई, पक्षांचे कूजन, गवतावर पडलेले सूर्याचे कवडसे आणि चकचकीत हिरव्या पार्श्वभूमीवर आम्ही म्हणजे रंगीबेरंगी कपड्यातले जणू ठिपके. फ्रेंच एकस्प्रेशनिस्ट शैलीचे जणू आदीवासी. पण दीमव मी कोणते कपडे घालून जाणार चर्चमध्ये ?'', रडवेला चेहरा करीत ती म्हणाली, ''इथं माझ्याकडे काहीसुद्धा नाहीये, अक्षरश: काहीही आणलं नाहीये मी ! कपडे नाहीत, फुलं नाहीत की हातमोजे नाहीत...तूच मला ह्यातून सोडवायला हवंस. तू इथ आलास ह्याचा अर्थ माझं नशीबच बलवत्तर. तेच तुला माझी ह्यातून सुटका करायला लावणारसं दिसतंय. माझ्या राजा, ह्या किल्ल्या घे, घरी जा आणि माझ्या कपाटातून माझा गुलाबी ड्रेस घेऊन ये, तुला माहीत आहे, अगदी पुढेच टांगलेला आहे तो...मग कोठीत उजव्या बाजूला जमिनीवर तुला दोन पुठ्ठ्याची खोकी दिसतील. वरचं खोकं उघडलंस की त्यात पडद्याला लावायच्या लेसेसची बंडलं, रंगीबेरंगी चिंध्या आणि त्याच्याखाली फुलं ठेवलेली आहेत. सगळी फुलं हलक्या हातानं बाहेर काढ, ती सुटी सुटी होणार नाहीत याची काळजी घे दीमव. मग मी इथं त्यातली पाहिजे ती काढून घेईन...हातमोजे तेवढे विकत घे.''

''ठीक आहे, ''दीमव म्हणाला, ''मी उद्या जातो आणि पाठवून देतो सगळं.''

''उद्या केव्हा रे ?'' त्याच्याकडे आश्चर्यानं पहात ओल्गानं विचारलं, ''उद्या तुला ते कसं जमेल ? उद्या पहिली गाडी दहा वाजता सुटते आणि लग्न आहे अकराला. नाही राजा, आजच जायला हवं, अगदी आजच. तुला उद्या लागलीच यायला जमणार नसलं तर एखाद्या निरोप्याबरोबर पाठव ते समान. जा तर मग आता...पॅसेंजर एवढ्यात येणार आहे. उशीर नको करूस.

''बर.''

''तुला आल्या पावली जावं लागतंय म्हणून मला किती वाईट वाटतंय'', ओल्गा म्हणाली, तिचे डोळे अश्रूंनी डबडबले. ''मी त्या तारमास्तरला कशाला शब्द दिला कोण जाणे.''

दीमव घाईघाईनं चहा प्यायला, त्यानं आपलं सामान उचललं, स्मित हास्य केलं आणि तो तडक स्टेशनवर गेला. कॅव्हीयर, चीज, पांढरा मासा त्या

दोन पिंग्या केसवाल्या माणसांनी आणि लठ्ठ नटानी फस्त केलं.

✲

भाग ४

जुलै महिन्याची पौर्णिमेची शांत रात्र होती ती. ओल्गा वोल्गा नदीवरच्या आगबोटीच्या डेकवर उभी राहून एकदा किनाऱ्याकडे तर एकदा पाण्याकडे पहात उभी होती. रॅबवस्की तिच्या शेजारी उभा होता. तो तिला म्हणाला की पाण्यावरच्या काळ्या सावल्या ह्या सावल्या नाहीयेत तर ते एक स्वप्न आहे. अद्भुत चमक असलेलं मंतरलेल्या पाण्याचं आणि अथांग, अनंत आकाशाचं हे दृश्य किती अनोखं आहे. तसच आपल्या जीवनाच्या फोलपणाविषयी; सर्वोच्च, अविनाशी, प्राणिमात्रावर वरदहस्त असलेल्या कुठल्यातरी शक्तीच्या अस्तित्वाविषयी साक्षी असणाऱ्या दु:खी आणि विचारमग्न अशा किनाऱ्याचे दृश्यपण एकप्रकारे विलोभनीयच आहे. निसर्गाच्या अशा एकात्मतेत स्वत:ला हरवून घेऊन मरण पत्करणं आणि आठवणींमध्ये शिल्लक राहाणं बरं. भूतकाळ रटाळपणे संपला, भविष्यकाळ कवडीमोलाचा असणार आहे आणि ही अद्भुत, एकमेव अद्वितीय अशी आयुष्यातील रात्र लवकरच संपेल आणि अनंतात विलीन होईल. मग जगायचं तरी कशासाठी ?

ओल्गा मधूनच रॅबवस्कीचं बोलणं ऐकत होती आणि रात्रीच्या नीरव शांततेचापण आस्वाद घेत होती. तिच्या मनात विचार आला की, ती अमर आहे आणि तिला केव्हाच मरण येणार नाहीये. तिनं ह्या आधी आयुष्यात कधीही न पाहिलेला असा पाण्याचा निळाशार रंग, विस्तीर्ण आकाश, वोल्गा नदीचे किनारे, काळ्या सावल्या, तिच्या हृदयात तुडूंब भरलेला अपरिमित आनंद ह्या सगळ्या गोष्टी तिला सांगत होत्या की ती एक मोठी यशस्वी कलाकार होणार आहे. दूर दूर कुठेतरी, पौर्णिमेच्या रात्रीच्या पलीकडे, अनंत अवकाशात यश, कीर्ती, लोकांचं प्रेम तिच्यातल्या कलाकाराची वाट पहाताहेत. ती दूर कुठेतरी एकटक पहात बसायची तेव्हा तिला लोकांच्या झुंडीच्या झुंडीचा, अग्नीच्या तेजाचा, संगीताच्या स्वर्गीय सुरावटीचा, लोकांच्या जल्लोशाचा भास व्हायचा. तिने पांढरीशुभ्र वस्त्रं परीधान केली आहेत आणि लोक तिच्यावर

पुष्पवृष्टी करताहेत अशा दृश्यात ती स्वत:ला पहायची. तिला असंही वाटायचं की तिच्या शेजारी कठड्यावर कोपर टेकून देवदूतच उभा आहे...आतापर्यंतची त्याची निर्मिती सुंदर, नावीन्यपूर्ण, असामान्य अशीच आहे आणि यापुढेही योग्य वेळी त्याची परिपक्व, आगळीवेगळी, उच्च श्रेणीची कला जनमानसाची पकड घेईल. इतकंच नाही तर ती विस्मयकारकरीत्या अत्युच्च पातळी गाठील हे त्याच्या चेहऱ्यावरील भावावरून, त्याच्या वागण्याच्या पद्धतीवरून आणि निसर्गाकडे पाहण्याच्या दृष्टिकोनातून व्यक्त होतंय. तो सावल्यांविषयी, संध्यासमयाच्या निसर्गातील सुरांच्या आविष्काराविषयी, चंद्रप्रकाशाच्या तेजासंबंधी आपल्या संदिग्ध भाषेत अशा तऱ्हेनं बोलतं असतो की आपल्याला नकळत त्याच्या निसर्गावरील प्रभुत्वाची प्रचीती येते. तो स्वत: देखणा स्वयंभू असा आहे आणि त्याचे जीवन स्वावलंबी, मनस्वी, लोभस आणि एखाद्या पक्षासारखं स्वैर आहे.

''हवेत एकदम गारवा आलाय, ओल्गा म्हणाली. तिला हुडहुडी भरली होती. रॅबवस्कीनं तिला आपल्या वरकोटात घेतलं आणि कंठ दाटून येऊन म्हणाला, मी तुझ्या पूर्णपणे अधीन झालोय असं मला जाणवतंय. गुलाम आहे मी तुझा. आज तू इतकी मोहक का दिसतेयस ?''

तो तिच्याकडे नुसता एकटक पहात बसला होता. त्याचे डोळे तारवटल्या-सारखे दिसत होते. त्याच्याकडे पाह्यची पण तिला भीती वाटत होती.

''मी तुझ्या प्रेमानं अगदी वेडा झालोय...''तिच्या गालावर फुंकर मारत तो म्हणाला, ''फक्त एकाच शब्दात सांग मला. मग मला जगायचीसुद्धा इच्छा नाहीये. मी तुझ्यासाठी माझ्या कलेचा सुद्धा त्याग करीन...तो अतिशय अधीरेपणानं पुटपुटला. ''तुझं माझ्यावर प्रेम आहे, आहे ना माझ्यावर तुझं प्रेम...''

''असं बोलू नका'', डोळे मिटून ओल्गा म्हणाली, ''भयंकर आहे हे सर्व, मग दीमवचे काय ?''

''दीमवचं काय ? कशाला हवाय दीमव ? त्याच्याशी काय करायचंय ? ही वोल्गा नदी, चंद्र, सृष्टी सौंदर्य, माझं प्रेम, माझा आनंद ह्या सगळ्यांत दीमवला कुठंच स्थान नाहीये... मी काही जाणत नाही...मी भूतकाळ मानत नाही...मला तुझ्या प्रीतीचा एक क्षण नव्हे पळसुद्धा पुरेसा आहे !

ओल्गाच्या हृदयाचे ठोके जलद पडायला लागले. आपल्या नवऱ्याचा विचार तिच्या मनात वारंवार यायचा पण त्याचवेळी तिचा सगळा भूतकाळ म्हणजे तिचं लग्न, दीमव, तिच्या घरच्या संध्याकाळच्या त्या पार्ट्या ह्या सर्व गोष्टी तिला अगदी छोट्या, फालतू, झाकोळलेल्या, अनावश्यक आणि वर्तमनापासून दूरचदूर अशा वाटल्या. तसं पाहीलं तर दीमव असा कोण लागून गेलाय ? कशाला हवाय दीमव ? दीमवशी तिला काय करायचंय ? इथल्या निसर्गरम्य वातावरणात त्याला काही स्थान आहे का ? तो कुठे बसतो का ? का तो म्हणजे एक स्वप्न तर नाही ना ?''

''त्याच्यासारख्या साध्या भोळ्या, सामान्य माणसाला नशीबानं जे मिळालं ते जास्तीच आहे. आपला चेहरा दोन्ही हातांनी झाकत ती विचार करू लागली. ठरवू देत मला तिकडे अपराधी, देऊ देत शिव्या शाप. मी सर्वांचा तिरस्कार सहन करीन आणि मरून जाईन, आयुष्य संपवून टाकीन...आयुष्यात माणसानं सर्व तऱ्हेचा अनुभव घ्यायला हवा अरेऽ देवा, पाप काय नि पुण्य काय !''

''मग काय ? काय म्हणतेस ?'' तिला मिठीत घेत तो म्हणाला. हातांनी त्याला आपल्यापासून दूर करायचा ती लटका प्रयत्न करीत होती. त्याच हातांची त्यानं आधाशासारखी चुंबनं घेतली. ''ओल्गा तुझं माझ्यावर प्रेम आहे ना ? किती सुंदर, मंतरलेली रात्र आहे ही !''

''हो ना, किती सुंदर आहे ही रात्र !'' अश्रूंमुळे चमकणाऱ्या त्याच्या डोळ्यात एक टक पहात ती पुटपुटली. मग तिने इकडे तिकडे पाहिलं आणि त्याला मिठी मारून त्याच्या ओठांचे दीर्घ चुंबन घेतले

''पलीकडे जाऊ या !'' डेकच्या दुसऱ्या टोकाकडून कुणीतरी बोललं.

पावलांचा धप धप आवाज आला. अल्पोपहार गृहातला कुणीतरी सेवक त्यांच्याजवळ येत होता.

''हे बघा, आमच्यासाठी शँपेन आणाल का ?'' ओल्गा त्या सेवकाला म्हणाली. आपल्या नशीबावर खूष झाल्यामुळे तिच्या डोळ्यात हसू आणि आसू याचं मिश्रण दिसत होतं. आनंदाश्रू दिसत होते.

भावनातिरेकाने रॅबवस्कीचा चेहरा उतरला होता. तो बाकावर बसला. ओल्गाकडे आभारपूर्वक आणि प्रेमळ नजरेने पाह्यल त्यानं. त्याने डोळे मिटून घेतले मग मोठ्या कष्टाने चेहऱ्यावर हसू आणत तो म्हणाला, ''मी दमलोय

अगदी'' आणि त्यानं आपलं डोकं बोटीच्या कठड्यावर टेकवलं.

※

भाग ५

दोन सप्टेंबरचा दिवस शांत, गरम पण ढगाळ आणि निरुत्साही असाच होता. पहाटे पहाटे वोल्गा नदीवर विरळ काळे ढग सरकायला लागले होते. नऊ वाजल्यानंतर पावसाचे थेंब पडायला सुरवात झाली. आकाश, खुलं निरभ्र होण्याचं काही लक्षण नव्हतं. चहाच्या वेळी रॅबवस्कीच ओल्गाला म्हणाला की, चित्रकला ही एक अनुदार आणि कंटाळवाणी कला आहे. खर बोलायचं तर तो काही मोठा कलाकार नाहीये. काही बोटावर मोजण्यासारख्या मूर्ख माणसांना वाटत की त्याच्या हातात कला आहे. एकदम अचानक त्यानं हातात सुरी घेतली आणि एक अतिसुंदर चित्र रेखाटलं. चहा प्यायल्यानंतर त्याचा चेहरा चिंताग्रस्त दिसला खिडकीजवळ बसून वोल्गेकडे पहात बसला होता तो. त्या वेळी वोल्गापण निस्तेज, निष्प्रभ संथ आणि थंड पडल्यासारखी दिसत होती. ह्या सगळ्या गोष्टी आठवण करून देत होत्या की सुन्न, भयानक नि कंटाळवाणा हेमंतऋतू जवळ येऊन ठेपलाय. असं वाटत होतं की किनाऱ्यावरचे सुंदर हिरवे गालीचे, हिऱ्यासारखी चमकणारी सूर्यकिरणं, पारदर्शक नीलवर्ण अवकाश ह्या सर्व भपकेबाज, प्रदर्शनीय गोष्टी निसर्गानं वोल्गेपासून हिरावून घेऊन पुढल्या वसंत ऋतूपर्यंत पेटीत घालून ठेवल्या आहेत. कावळे वोल्गेवरून उडत जाताना तिला चिडवत होते, ''तुझे सर्व वस्त्रालंकार ओरबाडून घेतलेयत आणि तू उघडी वागडी पडलीयेस. रॅबवस्कीला त्यांची काव काव ऐकू येत होती. त्याला वाटायला लागलं की त्याचे पण प्राण उडून गेलेयत, तो त्याची कला हरवून बसलाय, ह्या जगातल्या सर्व नियमबद्ध, परस्परावलंबी आणि क्षणभंगुर गोष्टीत त्याला रस उरला नाहीये. ह्या स्त्रीबरोबरची स्वतःची बांधिलकी आता संपुष्टात आली आहे...एका शब्दात सांगायचं तर तो आता त्याचा राहिला नाहीये, त्याचं अस्तित्व संपलंय.

ओल्गा पार्टीशनच्या पलीकडे पलंगावर बसली होती. आपल्या सळसळीत सुंदर केसांमधून बोटं फिरवत कल्पनाविश्वात रमली होती. स्वतःला घटकेत

आपल्या घराच्या बसायच्या खोलीत, दुसऱ्या क्षणी झोपायच्या खोलीत नाहीतर नवऱ्याच्या केबीनमध्ये वावरताना पहात होती. तिचा कल्पनाविलास तिला थिएटरमध्ये, तिच्या ड्रेसमेकर बाईकडे, बड्या बड्या मित्रांकडे घेऊन जात होता. ती सर्वजण कशात एवढी मग्न आहेत ? कुठल्या कामात गुंतली आहेत ? तिची त्यांना आठवण होत असेल का ? आता घरी परतायला हवं. शहरातल्या संध्याकाळच्या पार्ट्यांचा सीझन सुरू झाला असेल आता आणि दीमव माझा लाडका दीमव ! आपल्या पत्रांतून मोजक्या आणि लहान मुलांनी केलेल्या तक्रारीवजा शब्दात लवकरात लवकर घरी येण्याचा तगादा लावलाय त्यानं माझ्या मागे ! दर महिन्याला तो तिला पंचाहत्तर रुबल्स पाठवत असे. पण तिनं जेव्हा कळवलं की चित्रकार मित्रांचे शंभर रुबल्स तिला देणं झालय तर त्यानं आणखी शंभर रुबल्स पाठवून दिले. किती प्रेमळ मोठ्या मनाचा मनुष्य आहे तो ! ह्या प्रवासाचा ओल्गाला आता वीट आला होता ती कंटाळली होती. तिला वाटायला लागलं होतं की इथल्या ह्या खेडवळ, अनाडी माणसांपासून, नदीवरच्या शेवाळ्याच्या वासापासून आणि इथे आलेल्या शारीरिक निष्क्रियतेच्या मरगळीतून स्वत:ची सुटका करून घेऊन लवकरात लवकर दूर निघून जावं. शेतकऱ्यांच्या झोपड्यामध्ये राहात असताना किंवा एका खेड्यातून दुसऱ्या खेड्यात अशी एकसारखी भटकंती करीत असताना नेहमीच तिला अशा तऱ्हेची अनुभूती यायची. मी २० सप्टेंबरपर्यंत इथं तुमच्याबरोबर राहीन असा विश्वासाचा शब्द रॅबवस्कीनं आपल्या कलाकार मित्रांना दिला नसता तर आजसुद्धा इथून निघायला तिला कोणतीच अडचण नव्हती. तसं झालं असतं तर किती मजा आली असती!

''अरे देवा'', रॅबवस्की उसासा टाकत म्हणाला, आज शेवटी सूर्य उगवणार तरी आहे की नाही ? मला सूर्यप्रकाशातलं निसर्गचित्र सूर्याशिवाय कसं काढता येणार ?

''तुझ्या जवळ आकाशात ढग जमायच्या आधीचं रेखाटण आहे ना'', पार्टीशनच्या मागून बाहेर येत ओल्गा म्हणाली, ''तुला आठवतंय त्या चित्राच्या उजव्या बाजूला जंगल आणि डाव्या बाजूला बदकांचे थवे आहेत ? ते चित्र तुला आत्ता पूर्ण करता येईल की.''

''अे बाई'', कपाळाला आठ्या घालत रॅबवस्की म्हणाला, ''तुला काय

वाटतं, मी इतका का मूर्ख आहे की मी काय करायला हवं ते सुद्धा मला कळत नाही म्हणून !''

''तुझं माझ्याशी वागण केवढं बदललंय !'' ओल्गानं उसासा सोडला.

''बरच झालं की ते.''

ओल्गाचा चेहरा थरथरायला लागला. ती त्याच्यापासून लांब शेगडीजवळ गेली नि रडू लागली.

''नुसते अश्रू ढाळून काही होत नसतं. आवर ते अश्रू ! मला तर रडायला हजारो कारणं आहेत. तरीसुद्धा मी नाही असा रडत बसत.''

''हजारो कारणं !'' हुंदके देत ओल्गा म्हणाली, ''पण त्यातलं सगळ्यात महत्त्वाचं कारण म्हणजे मी म्हणजे तुला एक ओझं वाटायला लागलेय.'' हो ! ती म्हणाली, ''खरं बोलायच तर तुला आपल्या प्रेमसंबंधाविषयी लाज वाटतेय. इतर कलाकारांना त्याबद्दल काही कळू नये असा तुझा सारखा प्रयत्न असतो. पण खरं तर एवढी गुप्तता राखण्याची काहीच गरज नाहीये. त्यांना ते केव्हाच कळलेलं आहे.''

''ओल्गा माझी तुला एकच विनंती आहे.'' छातीवर हात ठेवत आर्त स्वरात चित्रकार म्हणाला, ''मला तुला फक्त एकच गोष्ट सांगायची आहे की मला असं छळू नकोस, तुझ्याकडून मला दुसरी कुठलीही अपेक्षा नाहीये.''

''शपथ घेऊन सांगाल की तुमचं माझ्यावर अजून प्रेम आहे म्हणून !''

''हे अगदी संताप येण्यासारखं आहे हं.'' सटक्यात दूर जाऊन, दात ओठ खात चित्रकार म्हणाला. ह्या सगळ्याचा शेवट असा व्हायचा आहे की मी वोल्गेत उडी तरी घेईन नाहीतर वेडा होईन ! मला एकट्याला सोड जरा !''

''मग मारून टाक मला, कर माझा खून'', ओल्गा ओरडली, ''मार ना !''

ती पुन्हा हुंदके देत देत पार्टीशनच्या मागे गेली. झोपडीच्या गवताच्या छपरामधून पाऊस ठिबकत होता. रॅबवस्की दोन्ही हातात डोकं धरून ह्या कोपऱ्यापासून त्या कोपऱ्यापर्यंत येरझारा घालत होता. मग कुणाला काहीतरी सूचित करण्याच्या हेतूनं निश्चयी चेहरा करीत त्याने कोट घातला, खांद्याला बंदूक अडकवली आणि झोपडीतून बाहेर पडला तो.

तो निघून गेल्यावर कितीतरी वेळ ओल्गा पलंगावर पडून रडत होती.

आधी तिला वाटलं की विष घेऊन आत्महत्या करावी म्हणजे मग रॅबवस्की घरी आल्यावर आपलं मृत शरीरच पाहील तो. नंतर मात्र तिच्या मनातले विचार तिला त्यांच्या शहरातल्या घराच्या दिवाणखान्यात, तिच्या नवऱ्याच्या खोलीत ओढून घेऊन गेले. तिने कल्पना केली की ती कशी दीमवच्या समोर गुपचूप बसलीय आणि शारीरिक निरामयता आणि निर्मळतेचा अनुभव घेतेय. संध्याकाळी थिएटरमध्ये ती इटालियन गायक माझीनिन आंदजोलाचा ऑपेरा पहातेय. शहरी, सांस्कृतिक जीवन, तिथली वर्दळ, प्रसिद्धीच्या झोतातील कलावंताच्या गाठीभेटी ह्या सगळ्यांच्या ओढीनं तिचं हृदय हेलावून गेलं. एवढ्यात जेवण करणारी म्हातारी स्वयंपाकीण झोपडीत आली. तिनं सावकाश चूल पेटवली तसा जळका वास यायला लागला आणि हवेत निळसर धूर कोंडला. चिखलाने माखलेले उंच मळकट पायमोजे घातलेली आणि पावसाने चेहरे ओलेचिंब झालेली चित्रकार मंडळी आत शिरली. ती सर्वजण स्वतःचीच चित्रं निरखून पहात होती आणि मनाची समजूत घालत होती की खराब हवा असली म्हणून काय झालं वोल्गा नदीची अनोखी शोभा कुणी हिरावून नेऊ शकत नाही. भिंतीवरील जुन्या घड्याळाची टिकटिक चालली होती...पुढच्या कोपऱ्यातल्या ख्रिस्ताच्या तसबिरीजवळ गारठलेल्या माशा घोंघावत होत्या. बाकाखाली चित्रांच्या जाडजाड भेंडोळ्यांतून झुरळं डोकावत होती.

रॅबवस्की सूर्यास्तानंतर घरी आला, त्यानं टेबलावर कोट भिरकावला. त्याचा चेहरा पांढरा फटफटीत, त्रासलेला दिसत होता. चिखलाने माखलेले मोजे न काढताच तो बाकावर आडवा झाला आणि त्याने डोळे मिटून घेतले.

''मी दमलोय'', भुवया उंचावून आणि प्रयत्नपूर्वक सर्व शक्ती एकवटून तो म्हणाला.

आपण त्याच्यावर रागावलो नाही हे दाखवण्यासाठी ओल्गा लाडात हसली, हळूच त्याच्याजवळ गेली आणि त्याचं चुंबन घेतलं तिनं. त्याच्या पिंग्या केसावरून तिनं कंगवा फिरवला. त्याचे केस नीट करावे असं तिला वाटलं.

''कोण आहे ?'' ताडकन उठत त्यानं विचारलं. त्याच वेळी त्याला कसलातरी थंड स्पर्श जाणवला. त्याने डोळे उघडले ''काय करताय ? मला एकट्याला शांत पडू द्या. हात जोडतो मी.''

त्याने तिला हातांनी दूर ढकललं आणि आपण पण तिच्यापासून दूर झाला. त्याच्या चेहऱ्यावरचा तुसडेपणा आणि राग तिला जाणवत होता. त्याचवेळी म्हातारीनं त्याच्या हातात हळूच सूपची बशी दिली. आपली जाडजूड बोटं तिनं सूपमध्ये कशी बुडवली होती ते ओल्गाच्या नजरेतून सुटलं नव्हतं. ती कळकट ढेरपोटी बाई, रॅबवस्की आधाशासारखं पीत असलेलं ते सूप, ती झोपडी आणि तिथलं दैनंदिन जीवन सर्वच तिला आता ओंगळ वाटत होतं. हाच इथला खेडवळपणा, निसर्गातील कलात्मक अव्यवस्था सुरवाती सुरवातीला तिला फार आवडायचा. शिवाय रॅबवस्कीच्या आताच्या वागण्यानं तिला अचानक अपमानित झाल्यासारखं वाटलं नि ती थंडपणे म्हणाली, ''आपल्याला आता काही दिवस एकमेकांपासून अलग व्हायला हवं. नाहीतर कंटाळा येऊन आपलं कडाक्याचं भांडण होण्याची शक्यता आहे. मला ह्या सर्व गोष्टींचा उबग आला आहे. आजच मी इथून घरी निघून जाईन.''

''कशी जाणार आहेस ?''

''आज गुरवार आहे, म्हणजे साडेनऊला बोट येणार.''

''आँ ? बरोबर, बरोबर...ठीक आहे. मग जा तू...हात पुसायच्या रुमाला-ऐवजी मोठ्या टॉवेललाच हात पुसत रॅबवस्की हळुवारपणे म्हणाला, ''तू इथं कंटाळलीयेस, करायसारखं काही नाहीये. तुला इथ थांबून ठेवायला एखादा घमेंडखोर माणूस असायला हवा होता. जा तू, बारा तारखेनंतर पुन्हा भेटू या.''

ओल्गा खुषीत येऊन आडवी झाली. आनंदानं तिचे गालसुद्धा लाल लाल झाले. खरंच अस होणार की काय तिनं स्वत:लाच प्रश्न विचारला की ती लवकरच आपल्या दिवाणखान्यात चित्र काढणार; झोपायला झोपायच्या खोलीत जाणार आणि टेबलक्लॉथ घातलेल्या टेबलावर जेवणार ! तिनं सुटकेचा नि:श्वास टाकला. आज तिला चित्रकार महाशयांचा थोडासुद्धा राग आला नाही.

''रंग आणि कुंचले मी तुझ्यासाठी ठेवून जातेय रॅबुशा'', ती म्हणाली, राहिलेलं सर्व सामान तू घेऊन ये...मी नाही म्हणून आळशीपणा करायचा नाही हं, काम चालू ठेवायचं जोरात. तू शहाणा मुलगा आहेस रॅबुशा.''

नऊ वाजताच रॅबवस्कीने तिचा निरोप घेऊन तिचे चुंबन घेतले. तिच्या मनात विचार आला की ह्यानं आधीच अशासाठी चुंबन घेतलं असेल की इतर कलाकारांच्या उपस्थितीत ते बरं दिसलं नसतं. मग तो तिला सोडायला धक्क्यावर

गेला. लागलीच बोट आली आणि तिला घेऊन पुढे गेली.

दोन दिवसांत ती घरी येऊन पोहोचली. मन उचंबळून आल्यामुळं तिला श्वास घेणं जड जात होतं. रेनकोट आणि टोपी न काढताच ती तडक दिवाणखान्यात आणि तिथून जेवण घरात गेली. दीमवनं वरकोट घातला नव्हता तर ढगळ वेस्टकोट घालून टेबलाजवळ बसून तो सुरी काटे पारजत होता. त्याच्या समोर बशीत कोंबडी ठेवलेली होती. ओल्गा जेव्हा आपल्या घरात शिरली तेव्हा तिनं मनाशी खूणगाठ बांधली होती की तिकडे घडलेल्या सर्व गोष्टी नवऱ्यापासून लपवून ठेवण्याशिवाय गत्यंतर नाहीये आणि त्यासाठी लागणारा खंबीरपणा आणि ताकद तिच्यात आहे. पण आत्ता, जेव्हा तिनं दीमवचा मोकळेपणा, सभ्यता, निर्व्याज हास्य आणि चमकणारे आनंदी डोळे पाहिले तेव्हा तिला वाटायला लागलं की अशा माणसापासून कुठलीही गोष्ट लपवणं म्हणजे तिरस्करणीय आणि मनाच्या कोतेपणाचं लक्षण आहे. निंदानालस्ती, लपवाछपवी आणि खून खराबा ह्या गोष्टी तिच्या स्वभावधर्मात बसण्यासारख्या नव्हत्या. एका क्षणात तिनं निश्चय केला की जे जे घडलं ते जसंच्या तसं त्याला सांगायचं. तिनं त्याला चुंबनं घेऊ दिली. मिठी मारू दिली मग ती त्याच्या समोर गुडघ्यावर बसली आणि तिनं आपलं तोंड झाकून घेतलं.

"काय, काय झालं गं ?", तो हळुवारपणे म्हणाला, कंटाळलीस का तू तिथे ?"

तिनं शरमेनं लाल लाल झालेलं आपलं तोंड वर केलं आणि अपराध्यासारखी आणि विनवणी केल्यासारखी ती त्याच्याकडे पाहू लागली. पण भीती आणि लाज ह्या दोन्हीमुळे सत्य सांगायचं धाडस तिला झालं नाही.

"काही नाही", ती म्हणाली, मी आपली उगीचच....

"बसू या इथं", तिला उठवून खुर्चीवर बसवत तो म्हणाला, "हं बस अशी, खा, ही कोंबडी खा. तुला बिचारीला भूक लागलीयसं दिसतंय." तिनं आपल्या घरच्या हवेत प्रदीर्घ श्वास घेतला आणि ती कोंबडी खाऊ लागली. तो भारावून गेला. तिच्याकडे पाहून आनंदानं हसला तो.

*

भाग ६

बहुधा शिशीराच्या मध्यावर दीमवला शंका यायला लागली होती की त्याची फसवणूक केली जातेय. त्याच्या मनात बायकोविषयी संशय यायला लागल्यामुळे तो तिच्या दृष्टीला दृष्टी भिडवू शकत नव्हता, तिच्या सहवासात दिलखुलास हसत नव्हता आणि तिची समोरासमोर गाठ पडू नये म्हणून तो आपला मित्र करस्तल्येवला बरेचदा घरी जेवायलाच घेऊन जायचा. करस्तल्येव छोट्या कदाचा, लहान केसांचा, गुबगुबीत गालाचा असा होता. ओल्गाशी बोलताना त्याला अवघडल्यासारखं व्हायचं त्यामुळे तो कोटाच्या बटनांची काढ घाल करायचा नाहीतर उजव्या हाताने डावीकडच्या मिशीला पीळ द्यायचा. जेवायच्या वेळेला कधी त्यांची चर्चा चालायची की डायफ्रॅम वरती आला असताना कधी कधी हृदय बंद पडतं किंवा नर्व्हस ब्रेक डाऊन सुद्धा होतो. नाहीतर सीव्हीयर अॅनेमियांच्या डायग्नॉस्टिक सेंटरमध्ये शवविच्छेदन करीत असताना दीमवला असं आढळून आलं की रोग्याला कर्करोगाचा प्रादुर्भाव झाला आहे वगैरे वगैरे. अस वाटायचं की दोघं मित्र वैद्यकीय विषयावर अशासाठी गप्पा मारत बसायची की ओल्गाचं तोंड आपोआपच बंद होईल आणि तिला थापेबाजी करायची सवड मिळणार नाही. जेवणानंतर करस्तल्येव पियानो वाजवायला बसायचा तेव्हा दीमव त्याला म्हणायचा, "दोस्ता, अरे काहीतरी करुण रसातलं वाजव ना." खांदे उंचावून बोटं फाकून करस्तल्येव बऱ्याच पट्ट्या छेडायचा आणि उंच आवाजात गायला सुरवात करायचा, "मला अशी जागा दाखव जिथं रशियन खेडुताला दुःख भोगावं लागणार नाही." दीमव पुन्हा पुन्हा उसासे टाकायचा, कपाळावर मुठी मारून घ्यायचा आणि विचार करत बसायचा.

आताशी ओल्गा इवानवना उठायची तीच मुळी चिडचिड करीत आणि विचार करीत की आता तिला रॅबवस्कीचं मुळीच प्रेम वाटत नाहीये आणि देवाचीच कृपा की त्या सगळ्या प्रकरणावरच पडदा पडलाय आता. पण थोड्या वेळानं कॉफी पिताना तिला वाटायचं की रॅबवस्कीनं तिच्या नवऱ्याला तिच्यापासून वेगळं केलं आणि आता ती रॅबवस्की आणि नवरा दोघानांही हरवून बसलीय, मग तिला तिच्या मित्रमंडळीबरोबर झालेल्या गप्पांची आठवण

व्हायची. ते म्हणत होते की सध्या रॅबवस्कीय एका खळबळजनक अशा प्रदर्शनाच्या तयारीत गढून गेला आहे. त्यानं पोलेनवच्या शैलीत निसर्गचित्र आणि जीवनप्रणाली यांचं मिश्रण आपल्या ह्या चित्रांत केलं आहे. त्याच्या स्टुडिओत जाणारा प्रत्येकजण त्याची तारीफ करत सुटलाय. तिच्या मनात विचार आला की त्याच्या निर्मितीमागे तिचीच प्रेरणा तर कारणीभूत आहे आणि त्यामुळे तर त्याची एवढी प्रगती झालीय. इतकंच नाही तर तिची प्रेरणाच त्याच्या दृष्टीनं महत्त्वाची आणि फायदेशीर ठरणार आहे. त्या वेळी ती जर त्याच्यापासून दूर गेली असती तर कदाचित तो रसातळाला सुद्धा गेला असता. मग तिला आणखीही एका प्रसंगाची आाठवण झाली. मागल्या खेपेला तो जेव्हा तिच्याकडे आला होता तेव्हा त्याने करड्या रंगाचा ठिपक्या ठिपक्याचा कोट आणि नवा टाय घातला होता. तिच्याजवळ रेंगाळत तो तिला विचारत होता, "काय, मी दिसतोय ना सुंदर !" खरंच त्याच्या कुरळ्या लांब केसांमुळे आणि निळ्या निळ्या डोळ्यांमुळे तो रुबाबदार दिसत होता ह्यात शंकाच नाही. कदाचित तिला तसं वाटत होतं.

अशा तऱ्हेच्या बऱ्याच आठवणी काढत आणि त्यावर विचार करत करत ओल्गानं कपडे केले आणि उतावळेपणाने ती रॅबवस्कीच्या स्टुडीओत गेली. तो तिला खूप आनंदी दिसला. स्वत:वर आणि आपल्या चित्रांवर बेहद्द खूष होता तो. उड्या काय मारत होता, अचरटासारखे हावभाव करीत होता आणि तिनं विचारलेल्या गंभीर प्रश्नांना हास्यास्पद उत्तरे देत होता. रॅबवस्कीच्या स्वत:च्या त्या चित्रावर खूष होण्याचा ओल्गाला तर हेवा वाटला आणि त्या चित्राविषयी तिला मत्सरच वाटायला लागला. पण केवळ सभ्यता दाखवण्यासाठी ती त्या चित्रासमोर पाच मिनीटं एखाद्या पवित्र जागी आपण जसं उभं राहातो तसं स्तब्धपणे उभी राहिली. मग शांतपणे म्हणाली, "खरंच, ह्या चित्रासारखं तू आजपावेतो कुठलंही चित्रं काढलं नाहीस. अगदी अप्रतीम आहे, नाही का ?"

त्यानंतर ओल्गानं त्याची विनवणी केली की त्यानं तिच्यावर पहिल्यासारखं प्रेम करावं. तिला असं वाऱ्यावर सोडू नये, तिच्यासारख्या गरीब बिचाऱ्या अभागिनीवर दया करावी. ती रडली, तिनं त्याच्या हाताचं चुंबन घेतलं आणि हट्ट धरून बसली की तो तिच्यावर प्रेम करतो अशी शपथ घ्यावी त्यानं त्याला

तिनं सुनावलंसुद्धा, की तिची अंत:करणपूर्वक प्रेरणा जर त्याच्या पाठीशी नसेल तर तो भरकटण्याची, विनाशाकडे पोहोचण्याची शक्यता नाकारता येणार नाही. आनंदानं बेहोश झालेल्या त्याचा तिनं विरस केला. तिला स्वत:लापण अपमानित झाल्यासारखं वाटत होतं. ती तिथून सरळ आपल्या ड्रेसमेकर बाईकडे आणि नंतर ओळखीच्या नटीकडे तिकिटाविषयी चवकशी करायला निघून गेली.

तो आज तिला स्टुडीओमध्ये भेटला नसता तर तिनं त्याला लिहून ठेवलेली चिठ्ठी दिली असती. ज्यात तिनं शपथेवर बजावलं होते की जर तो तिच्याकडे आला नाही तर ती विषप्राशन करील. तो घाबरून तिच्याकडे आला आणि तिथेच जेवायला थांबला. तिच्या नवऱ्याच्या उपस्थितीची पर्वा न करता तो तिला उर्मटपणे अद्वातद्वा बोलत होता आणि ती पण त्याला त्याच भाषेत उत्तर देत होती. त्यांना दोघांनाही वाटत होतं की ती एकमेकात गुंतली आहेत. दोघजण एकमेकांवर कुरघोडी करत होते, एकमेकांना शत्रू समजत होते. त्यामुळे त्यांच्या लक्षातही आलं नाही की ती दोघंही एकमेकांशी असभ्यपणे वागली. इतकंच नाही तर छोट्या केसाच्या करस्तल्येवला पण हे सगळं कळतंय याचंही त्यांना भान राहिलं नाही. जेवण झाल्यावर रॅबवस्कीनं घाईघाईनं माफी मागितली आणि तो जायला निघाला.

''कुठे निघालास तू ?'', त्याच्याकडं तिटकाऱ्यान पहात ओल्गानं त्याला ओसरीवर विचारलं.

कपाळाला आठ्या घालून आणि भुवया उंचावून त्यानं मुद्दामच दोघांच्या ओळखीच्या कुठल्यातरी बाईचं नाव घेतलं. स्पष्ट दिसत होत की तिच्यातल्या मत्सराच्या भावनेची तो टर उडवतोय आणि त्याला तिची कीव करावीशी वाटतेय. ती तशीच तिच्या झोपायच्या खोलीत जाऊन बिछान्यावर पडली. द्वेष, राग, अवमान आणि शरमेनं ती उशी चावू लागली, जोरजोरानं हुंदके देऊ लागली. करस्तल्येवला दिवाणखान्यात सोडून दीमव त्यांच्या झोपायच्या खोलीत गेला. भांबावून आणि विषण्ण होऊन तो हलक्या आवाजात म्हणाला, ''मोठ्या मोठ्यानं रडू नकोस गं...कशाला रडतेस ? गप्पच बसायला हवं,...काही झालंच नाही असं दाखवायला हवं...तुला माहीतच आहे जे झालं ते झालं, ते आता सुधारता येणार नाही.''

डोकं फुटायची वेळ आणणाऱ्या आपल्या मनात खदखदणाऱ्या द्वेषभावनेवर

कशी मात करायची ते तिला समजेना. तिला वाटत होतं की पुन्हा सर्व सुरळीत करता येण शक्य आहे. तिनं अंघोळ केली, आपल्या रडवेल्या चेहऱ्यावर पावडर फासली आणि तडक त्याच्या ओळखीच्या एका मैत्रिणीकडे निघून गेली. तिथं तिला रॅबवस्की दिसला नाही म्हणून मग दुसऱ्या मैत्रिणीकडे, तिथून तिसरीकडे गेली ती. पहिल्यांदा सगळ्यांकडे अशी चवकशी करायची तिला लाज वाटली पण मग त्याचीपण तिला सवय झाली. एक दिवस संध्याकाळी तर रॅबवस्कीच्या शोधात ती सगळ्या मैत्रीणींकडे जाऊन आली अर्थातच ती असं का करतेय ते सगळ्यांनाच कळून चुकलं होतं.

एक दिवस ओल्गा रॅबवस्कीबरोबर आपल्या नवऱ्याविषयी बोलत होती. ती म्हणाली, ''ह्या माणसाच्या अति सज्जनपणामुळेच मला गुदमरायला होतं.''

स्वत:चं हे वाक्य तिला इतकं आवडलं की तिचं आणि रॅबवस्कीचं प्रेमप्रकरण माहीत असलेली त्यांची कलाकार मित्र मंडळी भेटली की ती हातवारे करीत म्हणू लागली, ''ह्या माणसाच्या अति सज्जनपणामुळेच मला गुदमरायला होतं.''

त्यांच्या आयुष्याचं रहाटगाडगं मागल्या वर्षाप्रमाणेच फिरत होतं. बुधवारी संध्याकाळी पार्ट्या व्हायच्या. नटांचं नाट्यवाचन, चित्रकारांचं रेखाटण, व्हायोलिन वादन, गायन चाललेलं असायचं. रात्री साडेअकरा वाजता जेवणघराचं दार उघडून दीमव हसत आत येत म्हणायचा, ''चला मंडळी, जेवायला चला.'' पहिल्यासारखंच ओल्गा नवनवीन बड्या कलाकारांना शोधून काढायची, भेटायचे पण तिला तसे लोक. पण मनाचं समाधान न झाल्यामुळे तिचा पुन्हा शोध सुरू व्हायचा. दररोज रात्री ती उशीरा घरी परतायची. पण मागल्या वर्षीप्रमाणे ती यायच्या आधीच तो झोपून गेलेला नसायचा. आपल्या खोलीत तो काहीतरी काम करत बसलेला असायचा तो रात्री तीन वाजता झोपायचा आणि सकाळी आठला उठायचा.

एक दिवस संध्याकाळी ती नाट्य मंदिरात जाण्याच्या तयारीत आरशासमोर उभी होती एवढ्यात कोट आणि पांढरा टाय लावलेला दीमव खोलीत आला. त्यानं स्मित हास्य केल आणि पूर्वीसारखी बायकोच्या नजरेला नजर भिडवली. त्याचा चेहरा उजळल्यासारखा दिसत होता.

''अलीकडे मी माझा प्रबंध पार करायच्या पाठीमागे होतो. खाली बसत

स्वत:चेच गुडघे थोपटत तो म्हणाला.

"झाला का मग पार ?" ओल्गानं विचारलं

"अग हो !" तो हसला. बायकोचा चेहरा आरशात पाहण्यासाठी त्यानं मान लांब केली. कारण ती त्याच्याकडे पाठ करून केस नीट करत होती.

"हो !" तो परत म्हणाला, "अशी वदंता आहे की मला पॅथॉलॉजी विभागाकडून केंद्राची उ्च्च शिक्षणातील प्राध्यापकाची जागा देणार आहेत असं वाटतं. तसा सुगावा लागलाय.

त्याच्या आनंदानं उजळलेल्या चेहऱ्यावरून स्पष्ट होत होतं की त्याच्या ह्या यशामध्ये ती वाटेकरी झाली तर त्यानं तिला भूतकाळातील आणि भविष्यकाळातील सुद्धा घडलेल्या आणि घडणाऱ्या सर्व गोष्टींबद्दल क्षमा केली असती आणि झालं गेलं सर्व विसरून गेला असता तो. पण तिला केंद्राचा उच्च शिक्षणातील प्राध्यापक आणि विशेष चिकित्साविभाग यातलं काही कळलं नाही. शिवाय थिएटरला जायला उशीर होईल की काय अशी भीती होतीच तिला म्हणून ती काहीच बोलली नाही.

तो दोन मिनिटं तिथंच बसून राह्यला अपराध्यासारखा हसला आणि खोलीतून बाहेर निघून गेला.

❋

भाग ७

तो दिवस एकंदरीतच अतिशय उद्वेगजनक असा होता.

दीमवचं डोकं सटकुन दुखत होतं. त्यानं सकाळी चहा घेतला नव्हता की दवाखान्यात गेला नव्हता तो. दिवसभर आपल्या खोलीतच टर्कीश दिवाणावर तो झोपून होता. ओल्गा नेहमीप्रमाणे एक वाजता रॅबवस्कीकडे निघून गेली. तिला आपलं 'नातुरे मोर्ते', म्हणजे निर्जिव निसर्ग हे रेखाचित्र दाखवायचं होतं आणि तो काल का आला नाही ते पण विचारायचं होतं. ते रेखाटण तिला अगदीच साधारण वाटत होतं पण त्याच्याकडे जायला काहीतरी सबळ कारण हवं म्हणून तिनं ते काढलं होतं.

ती घंटा न वाजवताच त्याच्या घरात शिरली ती ओसरीत ओव्हरकोट

काढत असताना स्टुडिओमधून कुणीतरी पावलं न वाजवता घाईघाईनं इकडून तिकडे गेल्याचा आणि बाईच्या ड्रेसच्या कपड्याच्या सळसळीचा आवाज तिच्या कानावर पडला. तिनं गडबडीनं स्टुडिओमध्ये डोकावून पाह्यलं तेव्हा एक क्षण करड्या रंगाचा ब्लाऊजचा कोपरा डोळ्यापुढून सरकल्याचा आणि मोठ्या चित्राच्या पाठीमागे नाहीसा झाल्याचा भास झाला तिला. हे चित्र तिकाटण्यासह जमिनीपर्यंत काळ्या कॅलिकोच्या कापडाने झाकलेलं होतं. संशयाला जागाच नव्हती. नक्कीच चित्रामागे कुणीतरी स्त्री लपून बसली होती. ओल्गानं सुद्धा पूर्वी कितीतरी वेळा असाच चित्रामागे आसरा घेतला होता ! रॅबवस्की अगदी गोंधळल्यासारखा दिसत होता तिच्या एकदम आत येण्यानं तो भांबावून गेला होता. त्यानं आपले दोन्ही हात तिच्यापुढे केले आणि चेहऱ्यावर उसनं हास्य आणून म्हणाला, "ओ हो हो ! तुला पाहून खूप आनंद झाला. कोणती चांगली बातमी आणली आहेस आज ?"

ओल्गाचे डोळे अश्रूंनी डबडबले. तिला वाईट वाटलं, शरमिंदा झाली ती. चित्राच्या दुसऱ्या बाजूला लपलेल्या खोटारड्या, तिच्याशी स्पर्धा करणाऱ्या बाईच्या उपस्थितीत चकार शब्द बोलायची इच्छा नव्हती तिला, कोणी कोटी रुबल्स दिले असते तरीसुद्धा ! चित्रापाठीमागे लपलेल्या स्त्रीला नक्कीच आसुरी आनंदाच्या उकळ्या फुटत असणार असं तिला वाटलं.

"मी तुला दाखवायला एक रेखाचित्र आणलंय", ती भीत भीत हळू आवाजात म्हणाली. तिचे ओठ थरथरत होते. "नातुर मोर्ते."

"ओ-हो-हो, रेखाचित्र ?"

चित्रकारानं तिचं चित्र हातात घेतलं, त्याच्याकडे निरखून पाह्यलं आणि तो यंत्रवत दुसऱ्या खोलीत निघून गेला.

ओल्गा आज्ञाधारकपणे त्याच्या मागोमाग गेली. "मृत निसर्ग", पहिला प्रकार, चित्राचं भेंडोळं उलगडत तो पुटपुटला, "विश्राम धाम...कुंपण...बंदर...

स्टुडिओमधून झपझप जाणाऱ्या पावलांचा आणि कपड्याच्या सळसळीचा आवाज आला. म्हणजे "ती" गेली. ओल्गाला ओरडावसं वाटलं, कुठल्यातरी जड वस्तूनं चित्रकाराच्या डोक्यावर फटके मारावे आणि मग तिथून निघून जावं असं वाटलं. पण डोळे अश्रूंनी भरले होते त्यामुळे तिला काही दिसत नव्हतं. शरमेनं एक प्रकारचं दडपण आलं होतं तिच्यावर आणि आपण ओल्गा इवानवना

किंवा एक कलाकार नाही आहोत तर किडामुंगी आहोत असं वाटत होतं तिला.

"मी दमलोय अगदी..." रेखाटनाकडे पहात तो आळसुडेपणाने म्हणाला. डोळ्यावर आलेली झापड घालवण्यासाठी त्यानं डोकं जोरजोरात हलवलं. "हे रेखाचित्र सुंदरच आहे. पण आज रेखाचित्र, मागल्या वर्षीपण रेखाचित्र आणि महिन्याभरानं पुन्हा रेखाचित्रच काढशील...तुला एकच एक प्रकाराची चित्र काढायचा कंटाळा कसा येत नाही ? मी जर तुझ्या जागी असतो तर निसर्गचित्र काढायचं सोडून दिलं असतं आणि गाण्याच्या किंवा दुसऱ्या कुठल्यातरी छंदात स्वत:ला गुंतवून घेतलं असतं. खर म्हणशील तर तू चित्रकार नाहीयेस तर गायिका आहेस. ते जाऊ दे. मी किती दमलोय माहीत आहे ! चहा मागवू या आता... काय ?

तो खोलीबाहेर निघून गेला आणि त्यानं नोकराला काहीतरी करायला सांगितलेलं ओल्गानं ऐकलं. त्याचा निरोप घ्यायला नको. काही खुलासा बिलासा करायला नको आणि सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे त्याच्यासमोर हुंदके द्यायची वेळ येऊ नये म्हणून रॅबवस्की परत यायच्या आत ती घाईघाईनं ओसरीवर गेली, तिनं रेनकोट घातला आणि ती रस्त्यावर आली. मग तिनं हलकासा उसासा टाकला. तिला वाटलं आपण रॅबवस्कीपासून, निसर्गचित्रणापासून, शरमेमुळे स्टुडिओत आलेल्या जबरदस्त दडपणापासून कायमचे मुक्त झालो आहोत. सगळं काही संपलेलं आहे !

ती ड्रेसमेकरकडे गेली, तिथून कालच गावाहून आलेल्या बर्नायकडे, बर्नायकडून वाद्य दुरुस्तीच्या दुकानात गेली. पण हे सर्व करत असताना तिच्या मनात सारखा एकच विचार घोळत होता कि रॅबवस्कीला आत्मसम्मान राखून तुटक पण खरमरीत पत्र कसं लिहिता येईल ! शिवाय असाही विचार करीत होती ती की वसंतात नाहीतर उन्हाळ्यात आपण दीमवबरोबर क्रीमियामध्ये जायचं आणि भूतकाळाचं जोखड कायमचं झुगारून देऊन नव्यानं जीवनाची सुरवात करायची.

संध्याकाळी उशिरा घरी आल्यावर कपडे सुद्धा न बदलता ती दिवाणखान्यातच पत्राच्या मजकुराची जुळवणी करीत बसली. ती चित्रकार नाहीये असं रॅबवस्की तिला म्हणाला होता. म्हणून प्रत्युत्तरादाखल जशास तसे

म्हणून ती आता त्याला लिहिणार होती की तो सुद्धा दरवर्षी एकाच तऱ्हेची चित्र काढतो आहे आणि प्रत्येक दिवशी तेच तेच बोलत असतो. त्याची कला संपुष्टात आली आहे आणि आजामितीस ती ज्या ठिकाणापर्यंत पोहोचली आहे त्यापेक्षा जास्ती वेगळं तो काहीही करू शकणार नाहीये. तिला अजून असंही लिहायचं होतं की तिचा त्याच्यावर स्फूर्तीदायक असा जो प्रभाव आहे त्यासाठी त्यानं खरं तर तिचं ऋणी असायला हवं. तो अलिकडे तिच्याशी जरासा तुटक वागतोय कारण तिची त्याच्यावरची पकड इतर स्त्रियांच्या लुडबुडीमुळे शिथील झाली आहे. त्यातलीच एक म्हणजे आज सकाळी चित्रापाठीमागे लपलेली ती स्त्री.

''अग'', दार न उघडता दीमवनं हाक मारली,

''ए बाई !''

''काय म्हणतोसय ! काय हवंय तुला ?''

''अग, मी म्हणतोय की तू इकडे माझ्या खोलीत येऊ नकोस. फक्त दाराजवळ ये, हं, अशी...तीन दिवसापूर्वी दवाखान्यात मला घटसर्पाचा संसर्ग झालाय. माझी तब्येत आज बरी नाहीये. कोणालातरी करस्तल्येवला बोलवायला धाड.''

ओल्गा इतर बायका नवऱ्याला जसं नावानं हाका मारतात तसं न करता आडनावानच हाक मारायची कारण दीमवचं ओसिप हे नाव तिला आवडलं नव्हतं. तिला गोगलच्या नाटकातलं पात्र ओसिपची आठवण व्हायची सारखी ''ओसिप, ओखरिप, आरखिप, ओसिप.'' आत्ता मात्र ती एकदम ओरडली, ''ओसिप, काय सांगतोयस तू हे, असं कसं शक्य आहे ?''

''जा, पाठव कुणालातरी करस्तल्येवला बोलवायला ! माझी तब्येत ठीक नाहीये...'' तो दाराआडून म्हणाला आणि मग तो दिवाणाकडे गेल्याचा आणि निजल्याचा आवाज ऐकू आला.

''काय हे झालं असं ?'', तिच्या मनात विचार आला. भीतीनं तिची गाळण उडाली होती. ''भलतीच आपत्ती येऊन ठेपलीय की ही.''

काहीतरी करायलाच हवं होतं म्हणून ती मेणबत्ती हातात घेऊन झोपायच्या खोलीत गेली. ह्या परिस्थितीत काय करायला हवं ह्याचा विचार करत असतानाच तिची नजर आरशातल्या आपल्या प्रतिबिंबाकडे गेली. पांढरा फटफटीत,

घाबरलेला चेहरा, उंच बाह्यांच जाकीट, छातीवरची सोनेरी पिसं, स्कर्टवरचे नेहमीपेक्षा वेगळ्या पद्धतीचे पट्टे ह्या सर्व अवताराकडे पाहून तिला वाटलं आपण किती भयानक आणि कुरूप दिसतोय. तिच्यावरचं त्याचं अगाध प्रेम, त्याचं रसरसलेलं तारुण्य, इतकंच नाही तर ज्याच्यावर तो बरेच दिवस झोपला नव्हता असा तो त्याचा पोरका वाटणारा बिछाना सगळ्या सगळ्यामुळे तिला दीमवची काळजी वाटायला लागली आणि अगदी भडभडून आलं. तिला त्याच्या नेहमीच्या निर्व्याज, स्मितहास्याची आठवण येत होती. ती हमसुन हमसून रडत होती. तिनं करस्तल्येवला विनवणीची चिठ्ठी लिहिली तेव्हा रात्रीचे दोन वाजले होते.

*

भाग ८

रात्रभर झोप न आल्यामुळे ओल्गाचं डोकं जड झालं होतं. वेणीफणी न केल्यामुळे भेसूर दिसणारी आणि अपराधी चेहरा झालेली ओल्गा जेव्हा झोपायच्या खोलीच्या बाहेर आली तेव्हा तिच्या जवळून एक काळी दाढीवाला गृहस्थ ओसरीवर गेला. बहुतेक तो डॉक्टर असावा. घरभर औषधांचा घमघमाट सुटला होता. दाराजवळ करस्तल्येव आपल्या उजव्या हाताने डाव्या मिशीला पीळ देत उभा होता.

"मी तुम्हाला त्याच्याजवळ जाऊ देणार नाही", तो ओल्गाला दरडावून म्हणाला. तुम्हालासुद्धा संसर्ग होण्याची शक्यता आहे. सद्य:परिस्थितीत तुम्हाला तस काही व्हायला नकोय. नाहीतरी त्याला भ्रमच झालाय."

"त्याला घटसर्पच झालाय ना ?" ओल्गानं हळू आवाजात विचारलं.

"जो जाणूनबुजून स्वत:वर संकट ओढून घेतो त्याच्यावर खरं तर खटलाच भरायला हवा." ओल्गाच्या प्रश्नाचं सरळ सरळ उत्तर न देता करस्तल्येव पुटपुटला. "तुम्हाला माहीत आहे का त्याला संसर्ग कसा झाला ? मंगळवारी ह्यानं एका घटसर्प झालेल्या मुलाच्या घशातला बारकासा तुकडा तपासण्यासाठी नळीतून ओढून घेतला. कशाकरता करायच असं ? मूर्ख मनुष्य...नुसता वेड्याचा बाजार."

"खूप धोका आहे का त्याला ? अगदी हाताबाहेर गेलंय का ?", ओल्गानं विचारलं.

"हो, म्हणतात की गंभीरच आहे परिस्थिती. खरं तर आता 'श्रेकोमला' बोलवायलाच हवा."

पहिल्यांदा बुटका, लाल केसांचा, लांब नाकाचा आणि युरोपियन पद्धतीचे उच्चार असणारा एक तरुण मुलगा, मग उंचेला, पोक काढलेला, पिंजारलेल्या केसांचा चर्चमधल्या धर्मोपदेशकासारखा दिसणारा आणि त्यानंतर गलेलठ्ठ, लालबुंद चेहऱ्याचा चष्मेवाला तरुण असे सर्वजण एकापाठोपाठ घरात शिरले. आपल्या सहकाऱ्याच्या देखभालीसाठी हे सर्व डॉक्टर दीमवच्या घरी जात येत होते. आपली रोग्याच्या देखभालीची पाळी संपल्यावर सुद्धा करस्तल्येव तेवढा घरी न जाता तिथेच थांबला होता आणि सावलीप्रमाणे सर्व खोल्यांतून येरझारा घालत होता. स्वयंपाकीण बाई शुश्रुषा करणाऱ्या डॉक्टर मंडळींना चहा देत होती आणि सारखी औषधाच्या दुकानात पळत होती. खोलीच्या पसाऱ्याकडे कुणाचं लक्ष नव्हतं. सगळीकडे शांतता आणि नैराश्य पसरलं होतं.

ओल्गा आपल्या झोपायच्या खोलीत बसली होती. तिला वाटत होतं की तिनं नवऱ्याची फसवणूक केलीय आणि म्हणून देव तिला अशी शिक्षा देतोय. ह्या इथे गप्प बसलेला, कोणाशीही संवाद न साधणारा, मनाचा ठाव न लागू देणारा, सज्जनपणामुळे स्वत:चं व्यक्तिमत्त्व गमावून बसलेला, प्रबळ इच्छा-शक्तीचा अभाव असलेला, अतिसहृदयतेमुळे दुर्बल झालेला हा जीव मुकाट्यानं सोफासेटवर पडून रोगाशी झगडतोय आणि तक्रारीचा एक शब्दही काढत नाहीये. त्यानं भ्रमिष्ठ अवस्थेत का होईना तक्रार केली असती तर निदान शुश्रुषा करणाऱ्या डॉक्टरांना कळलं असतं की त्याच्या ह्या आजाराला ज़वाबदार फक्त घटसर्पच नाहीये. मग त्यांनी करस्तल्येवला तरी विचारलं असत. त्याला सगळं माहीत आहे. उगीच नाही काही तो आपल्या मित्राच्या बायकोकडे ती अगदी दुष्ट बाई आहे आणि दीमवच्या आजाराचं मूळ कारण ती आहे अशा तऱ्हेनं पहात असतो. घटसर्प केवळ निमित्तमात्र आहे. तिला आता वोल्गेवरच्या चांदण्या रात्रीची, प्रेमाची कबुली देणऱ्या शब्दांची, झोपडीतल्या काव्यमय जीवनाची कश्शा कश्शाची आठवण होत नाहीये. तिला आता पक्कं कळून चुकलंय की तिनं खोट्या, फालतु गोष्टीच्या आहारी जाऊन केलेल्या दुराचरणानं स्वत:चा

नायनाट करून घेतलाय आणि आपल्या स्वैर वर्तनानं सर्वांग बरबटून टाकलंय. त्या तिच्या पापकर्माचं परिमार्जन आता कशानंही करता येणार नाहीये.

"मी कसली भयानक फसवणूक केलीय", मनाला उद्विग्न करणाऱ्या रॅबवस्की बरोबरच्या संबधांच्या आठवणीमुळे तिच्या मनात विचार आला, शापच म्हणायचा तो...!"

चार वाजता ती करस्तल्येवबरोबर जेवायला बसली. तो काही खायला प्यायला नाही त्यानं फक्त लाल मद्य प्राशन केलं आणि तो खाली मान घालून बसून राह्यला नुसता. तिनं पण काही खाल्लं नाही, ती मनातल्या मनात देवाची प्रार्थना करीत होती कि दीमव जर बरा झाला तर ती त्याच्यावर परत मनापासून प्रेम करायला लागेल आणि त्याची एकनिष्ठ पत्नि म्हणून राहील. ती मधून मधून स्वत:लाच हरवून बसायची. करस्तल्येवकडे पाहिलं की तिच्या मनात विचार यायचा कि "ह्याच्यासारखा अगदी साधाभोळा,काहीही वैशिष्ट्य नसलेला, लोकांनी दखल न घेतलेला तसंच गुबगुबीत गालाचा गावंढळ चालीरीतीचा मनुष्य असणं म्हणजे दुर्भाग्यचं नाही का ?"

आपल्याला संसर्ग होऊ नये म्हणून ती एकदाही नवऱ्याच्या खोलीत फिरकली नाही म्हणून आत्ताच देव तिला शिक्षा देतोय. एकंदरीतच तिला उदास, खिन्नस्क वाटत होतं. आपलं आयुष्य अगदीच वाया गेलंय आणि ते सुधारण्याच्या पलीकडचं आहे, याबद्दल तिच्या मनात किंचितही संदेह उरला नव्हता.

जेवणानंतर थोड्याच वेळात अंधार पडला. ओल्गा दिवाणखान्यात गेली तेव्हा करस्तल्येव जरीकाम केलेली रेशमी उशी कुशीला घेऊन डाराडूर झोपला होता.

खोलीतील पसारा शुश्रुषेसाठी जा ये करणाऱ्या डॉक्टरांच्या लक्षातही येत नव्हता. तिऱ्हाईत मनुष्य दिवाणखान्यात घोरत पडलाय, भिंतीवर लावलेली चित्रं वेडीवाकडी झालीयत, फॅन्सी फर्नीचर धूळ खात पडलंय, घरच्या मालकिणीने केससुद्धा नीट केले नाहीयेत, कपडे बदलले नाहीयेत ह्या सर्व गोष्टींना ह्या क्षणी तरी काही महत्त्व उरलं नव्हतं. त्यांच्यातला एक डॉक्टर उगीचच हसला. त्याचं ते हसणं विचित्र, घाबरवणारं इतकंच नाही तर भेसूर अस वाटलं.

ती जेव्हा दुसऱ्यांदा दिवाणखान्यात गेली तेव्हा करस्तल्येव झोपलेला नव्हता तर बसून सिगरेट ओढत होता.

"त्याच्या नाकाच्या पोकळीत घटसर्पाचे जंतू पोहोचलेयत" तो हळू आवाजात म्हणाला. इतकंच नाही तर हृदयाची क्रियापण ठीक चालत नाहीये खरं म्हणजे एकंदरीत कठीणच आहे."

"तुम्ही श्रेकला बोलावणं धाडा ना", ओल्गा म्हणाली

"तो येऊन गेलाय. घटसर्प नाकात पोहोचलाय हे त्याच्याच तर लक्षात आलं. हं, तो श्रेक तरी आता काय करणार ? आता श्रेक ना ब्रेक कुणी काही करू शकत नाही. तो श्रेक आणि मी करस्तल्येव काही फरक नाही ह्या घडीला."

वेळ जाता जात नव्हता. ओल्गा सकाळपासून अंथरूण न काढता तशीच बिछान्यावर लोळली होती आणि मधून मधून डुलक्या घेत होती. तिला असा भास झाला की एका अवाढव्य लोखंडी तुकड्यानं सगळी खोली जमिनीपासून तो थेट छतापर्यंत व्यापलेली आहे. आता एवढंच करायचं की तो तुकडा उचलून बाहेर ओढून न्यायचा. म्हणजे मग सगळ्यांना आनंद होईल आणि हायसं वाटेल ती जागी झाल्यावर तिला आठवलं की ते लोखंड नव्हतं तर दीमवचा आजार होता.

"मृत निसर्ग, बंदर...तिच्या मनात विचार आला. पुन्हा तिला गुंगी आली "खेळ, थंड हवेचं ठिकाण...हा श्रेक कोण ? श्रेक, ग्रेक...ब्रेक...क्रेक. माझे ते सर्व मित्र कुठे गेले. आम्ही किती संकटात आहोत हे त्यांना माहीत तरी असेल का ? देवा, सोडव आम्हाला यातून...वाचव...श्रेक, ग्रेक..."

मग पुन्हा तो लोखंडाचा तुकडा आला, वेळ लांबत लांबत चालला होता. खालच्या मजल्यावरचं घड्याळ तासाचे ठोके देत होतं. इतक्यात घंटेचा आवाज कानावर पडला, डॉक्टर्स आत आले...स्वयंपाकीण रिकामे कप ट्रेमध्ये घेऊन आत आली आणि म्हणाली, "बाईसाहेब, बिछाना ठीक करू का?"

उत्तर न मिळाल्यामुळे ती निघून गेली. खाली घड्याळाने ठोके दिले. वोल्गा नदीवर पाऊस पडतोय असं स्वप्न पडलं तिला. परत कोणीतरी झोपायच्या खोलीत आलं. कोणीतरी अनोळखी असावा. ओल्गा झटकन उठली तेव्हा तिला करस्तल्येव दिसला.

"किती वाजले ?", तिनं विचारलं.

"तीन वाजले असावे."

"काय म्हणताय ?"

"काय म्हणणार ! मी सांगायला आलोय की सगळं संपलंय."

तो हुंदके द्यायला लागला, तिथंच पलंगावर बसला आणि बाहीने अश्रू पुसू लागला. तिला त्या क्षणाला काही लक्षात आलं नाही पण तिचे हात पाय गार पडले आणि क्रॉस करण्यासाठी तिचे हात हळूच वर झाले.

"सगळं संपलंय..."तो पुन्हा म्हणाला आणि हुंदके देऊ लागला. "तो मरतोय कारण त्यानं आत्मसमर्पण केलंय. शास्त्राची केवढी हार म्हणायची," तो कळकळीनं म्हणाला. आपली सर्वांची त्याच्याबरोबर तुलना करायची म्हटली तर तो महान, असामान्य मनुष्य होता ! केवढा गुणी होता तो ! आमच्या त्याच्याबद्दल केवढ्या आशा आकांक्षा होत्या !, करस्तल्येव हात चोळत म्हणाला "हाय रे देवा, केवढा विद्वान होता तो, शोधून सापडायचा नाही असा मनुष्य. ओस्का* दीमव, ओस्का दीमव, तू हे काय केलंस ? कर्म माझं, देवा रे देवा !"

करस्तल्येवनं निराश होऊन दोन्ही हातांनी तोंड झाकून घेतलं, डोकं हलवत बसला तो.

"केवळं हे नैतिक बळ !", तो दुसऱ्या कोणावर तरी ठपका ठेवतोय अशा कडवटपणे तो पुढे बोलू लागला, "सहृदय, निर्मळ, प्रेमळ जीव, मनुष्य नव्हता काही तो, आरसा होता आरसा. शास्त्राच्या शाखेत नोकरी केली आणि शास्त्रापुढे हार मानून मरण पत्करलं. एखाद्या बैलासारखा दिवस-रात्र राबत होता तो. त्याच्या कामाची कुणाला किंमत नव्हती. तरुण शास्त्रज्ञ आणि भावी प्रोफेसर होता तो. खासगी प्रॅक्टीस त्याची त्यालाच शोधावी लागत होती. भाषांतर करीत रात्रीच्या रात्री अशासाठी जागून काढायचा की असल्या...सटर फटर गोष्टींसाठी पैसे हवेत म्हणून.

करस्तल्येवनं ओल्गाकडे तिरस्कारानं पाहिलं. दोन्ही हातांनी पलंगावरची चादर चुरगळली आणि रागानं गुरगुरला, जणू ह्या सगळ्या गोष्टीत तीच अपराधी होती.

"आपलंही भलं केल नाही त्यानं आणि त्याचंही कोणी भलं केलं नाही, बघा, ह्या सगळ्याचा शेवट काय झाला ?"

"खरंच, अगदी वेगळा मनुष्य होता तो," कोणीतरी दिवाणखान्यात घोगऱ्या आवाजात म्हणालं.

ओल्गाला आपलं त्याच्याबरोबरचं सर्व आयुष्य आठवत होतं, सुरवातीपासून शेवटपर्यंत, अगदी खडान् खडा. तिला पण समजून चुकलं होतं की खरंच तो एक असामान्य, विरळा आणि तिच्या माहितीच्या सर्व लोकांच्या तुलनेत महान होता. तिचे दिवंगत वडील आणि त्याचे सर्व सहकारी डॉक्टर त्याच्याशी कसं वागायचे हे जेव्हा तिनं आठवायचा प्रयत्न केला तेव्हा तिला कळलं की ते सर्व जण त्याच्याकडे भावी काळातील अलौकिक व्यक्तिमत्त्व म्हणूनच पहात होते. घरातल्या भिंती, दिवा, जमिनीवरचा गालीचा सर्व गोष्टी तिच्याकडे उपहासानं डोळे मिचकावित पहात होत्या. त्यांना जणू म्हणायचं होतं, "बसली आहे जांभया देत ! जांभया देतेय! तिनं रडत रडतच झोपायच्या खोलीतून बाहेर झेप घेतली. दिवाणखान्यातल्या कुठल्यातरी अनोळखी माणसाच्या अंगावरून तीरासारखी नवऱ्याच्या खोलीत येऊन पोहोचली. तो टर्की दिवाणावर कमरेपर्यंत ब्लँकेट ओढून पडला होता. त्याचा चेहरा भेसूर, सुरकुतलेला, ओढग्रस्त आणि काळापिवळा दिसत होता. असा चेहरा जिवंत माणसाचा कधीच दिसत नाही. फक्त त्याच्या कपाळावरून, काळ्या भुवयांवरून आणि ओळखीच्या स्मित हास्यावरून हा दीमव आहे म्हणून ओळखता येत होतं. ओल्गानं भराभर त्याची छाती, कपाळ आणि हाताला स्पर्श केला. त्याची छाती अजून गरम लागत होती पण कपाळ आणि हात थंडगार पडले होते. अर्धवट उघडलेले डोळे ओल्गाकडे नाहीतर अंगावरच्या ब्लँकेटाकडे पहाताहेत असं वाटत होतं.

"दीमव !", ती मोठ्यानं ओरडली, 'दीमव !'

तिला त्याला समजावून सांगायचं होतं की ती एक अक्षम्य घोडचूक होती, सगळं काही गमावलेलं नाहीये आपण अजून. आयुष्य खूप सुंदर आणि सुखाचं होऊ शकेल. तो म्हणजे लाखात एक, असाधारण, महान मनुष्य आहे. आयुष्यभर ती त्याची ऋणी राहील. पूजनीय देवाचं सदैव स्मरण करील आणि त्याची भीती बाळगेल...

"दीमव !" थरथरत्या हाताने त्याचे खांदे पकडत आणि तो आता पुन्हा कधी जागा होणार नाही ह्यावर अविश्वास दाखवत ती म्हणाली, 'दीमव, प्रिय दीमव !'

दिवाणखान्यात करस्तल्येव स्वयंपाकीण बाईला म्हणत होता, "काय विचारायचंय त्यात ? त्या चर्चमधल्या चौकीदाराकडे जा आणि त्याला घर कुठय ते विचार. तेच त्याचं अंग स्वच्छ करतील आणि त्याचं शव घेऊन जातील, जे करायला पाहिजे ते सगळं ते शिस्तीने करतील.

●●

अन्तोन चेखव (१८९२)



: ३ :

अरिआदना

ओडेसाहून सिवस्तपोलला निघालेल्या बोटीच्या डेकवर एक बऱ्यापैकी देखणा, गोल दाढी ठेवलेला सद्‌गृहस्थ सिगरेट ओढायला म्हणून माझ्याजवळ आला नि म्हणाला, ''डेकच्या केबिनजवळ बसलेल्या त्या जर्मनांकडे बघा जरा. जेव्हा जर्मन किंवा इंग्लिश माणसं एकमेकांना भेटतात ना तेव्हा लोकरीचे सध्याचे भाव, शेतावरची पिकं, धनधान्य, नाहीतर स्वत:च्या वैयक्तिक कामाविषयी गप्पा मारत असतात, पण आपण रशियन माणसं मात्र फक्त स्त्रियांविषयी आणि आपल्या आदरणीय पूजनीय मातांविषयी बोलत असतो, थोडक्यात काय स्त्रिवर्गाविषयी बोलत असतो.

ह्या सद्‌गृहस्थाचा चेहरा मला ओळखीचा वाटत होता. काल संध्याकाळी परदेशच्या प्रवासाहून परत येत असताना आम्ही एकाच आगगाडीतून प्रवास केला होता. 'वलचिस्क'ला जकातीच्या तपासणीच्या वेळी मी त्याला बघितलं होतं. त्याच्या बरोबरची सहप्रवासी महिला आणि तो पुढ्यात ढीगभर पेट्या आणि करंड्या घेऊन उभे होते. त्या सगळ्या प्रवासी पेट्या कपड्यांनी भरलेल्या होत्या. कुठल्यातरी एका रेशमी कापडाच्या तुकड्यासाठी त्याला जकात भरावी लागली तेव्हा त्याचा चेहरा गोंधळल्यासारखा, मनावर दडपण आल्यासारखा दिसत होता. त्याच्या मैत्रिणीनं मात्र आरडा ओरडा करून नाराजी दर्शवली आणि आम्ही वर तक्रार करू म्हणून कुणाला तरी धमकी पण दिली. नंतर पुढे ओडेसाच्या प्रवासात बायकांच्या कक्षेत आत्ता केक्स तर जरावेळानं मोसंबी असं काहीतरी देण्यासाठी येरझारा घालताना मी पाहिलं होतं त्याला.

हवा जरा दमट होती तरीपण बोट फारशी हालत नव्हती. महिला प्रवासी आपापल्या खोल्यात परतल्या होत्या. गोल दाढीवाला तो गृहस्थ माझ्या शेजारी येऊन बसला आणि पुन्हा गप्पा मारायला लागला. ''मी म्हणत होतो ते खरं

आहे की नाही, की रशियन माणसांच्या गप्पांचा विषय वीरमाता आणि स्त्रीवर्ग ह्यांच्यापुरताच मर्यादित असतो म्हणून ? आपण एवढे हुशार आणि लब्धप्रतिष्ठित लोक सदैव फक्त एका सत्याविषयीच आदराने बोलत असतो आणि आपल्या-पुढच्या समस्यादेखील उच्च पातळीवरूनच सोडवू बघतो. रशियन नटाला वाहवत जाता येत नाही. विनोदी पात्र उभं करतानादेखील त्याचा विचारपूर्वक अविर्भाव असतो. आम्ही पण त्यातलेच ! एखाद्या फालतू गोष्टीविषयी जरी बोलायचा प्रसंग आला तरी तिच्याकडे पाहण्याचा आमचा दृष्टिकोन उच्च पातळीवरचाच असतो. असं असणं म्हणजे माझ्या दृष्टीने धैर्याचा, पारदर्शकतेचा आणि सरळसोटपणाचा अभावच होय. आम्ही स्त्रियांविषयीच सारखं बोलत असतो कारण आम्ही असमाधानी आहोत. स्त्रियांकडे पाहण्याचा आमचा दृष्टिकोन जरा जास्तच आदर्शवादी असतो. प्रत्यक्षात संभव आहे त्यापेक्षा जास्त अपेक्षांची आमची मागणी असते. त्यामुळे आमच्या पदरात अपेक्षेपेक्षा कमी यश येतं आणि परिणामी असमाधान, अपेक्षाभंग आणि मानसिक खंत आमच्या वाट्याला येते...ज्याला नैराश्य येतं तोच त्याविषयी बोलणार ना ! आपल्यातल्या ह्या गप्पा अशाच चालू ठेवण्यात तुमची काही हरकत नाही ना ?''

''नाही, मुळीच नाही.''

''तर मग मला माझी ओळख करून देण्याची परवानगी द्या'', हळूच उठून उभं राहून माझ्याशी गप्पा मारण्यास उत्सुक असलेला माझा सहप्रवासी म्हणाला, ''मी इवान इवानिच शामोखिन, मॉस्कोतील एक जमीनदार...''
''मी तुम्हाला चांगलं ओळखतो.'' माझ्या तोंडाकडे आपुलकीने आणि प्रेमाने पहात तो खाली बसला आणि पुढे बोलू लागला.

''ही बायकांविषयी निरंतर केली जाणारी विधानं 'मॅकस नोरदे' सारख्या एखाद्या सामान्य तत्त्ववेत्त्याने म्हटल्याप्रमाणे कामुकतेच्या अतिरेकामुळे केली जात असतील किंवा ती म्हणजे आपल्यासारख्या निरुद्योगी जमीनदार वर्गाच्या विकृत मनोवृत्तीचा परिपाक असेल. पण मला मात्र हे पटत नाही. मला परत तेच म्हणायचंय की आपण समाधानी नाही कारण आपण आदर्शवादी माणसं आहोत. आपली अशी इच्छा असते की ज्या स्त्रियांनी आपल्याला अथवा आपल्या मुलांना जन्माला घातलं त्या आपल्यापेक्षा इतकंच नाही तर जगातील कोणत्याही पुरुषापेक्षा श्रेष्ठ मानल्या जाव्यात. तरुणपणी आपण ज्या स्त्रीवर प्रेम

करतो तिला काव्यरूप आणि देवपण देतो. प्रेम आणि सुख हे दोन्ही शब्द आमच्या दृष्टीने समानार्थी आहेत. आपल्याकडे रशियात प्रेमविवाहाकडे तुच्छतेने पाहिले जाते. भावनाप्रधानता हास्यास्पद ठरते आणि तिच्याकडे तिरस्काराने पाहतात. अशाच कादंबऱ्या लोकांच्या पसंतीला उतरतात ज्यांच्या नायिका सुंदर, कवितेत शोभून दिसतील अशा आणि बौद्धिक पातळी उंचावलेल्या असतात. रशियन मनुष्य जर फार पूर्वीपासून राफाएल्येवस्कीच्या मॅडोनावर खूष होत असला किंवा तो स्त्रीमुक्तीचा पुरस्कार करीत असेल तर त्यात मला अनैसर्गिक असं काहीच वाटत नाही. ग्यानबाची मेख तीच तर आहे. लग्न झाल्यावर किंवा एखाद्या स्त्रीच्या सहवासात दोन-तीन वर्षांतच आपल्याला आपला भ्रमनिरास किंवा फसवणूक झाली आहे असं वाटू लागतं, मग दुसऱ्याबरोबर आपण संबंध वाढवतो पण तिथेही भ्रमनिरास होतो, पुन्हा पराकोटीचे नैराश्य. सरतेशेवटी आपण ह्या निर्णयाप्रत येऊन पोहोचतो की स्त्रिया ह्या खोटारड्या, अनुदार, अहंकारी, अप्रामाणिक, बुरसटलेल्या आणि दुष्ट असतात. एका शब्दात सांगायचं झालं तर त्या पुरुषांपेक्षा वरच्या पातळीवर तर नसतातच, उलट त्या आमच्यापेक्षा कितीतरी पटींनी खालच्या दर्जाच्या असतात. त्यामुळे आमच्यासारख्या असमाधानी, फसवल्या गेलेल्यांच्या हातात कुरकुरण्याशिवाय किंवा आमची किती घोर फसवणूक झाली असं निराशाजनक बडबडण्यापलीकडे काहीच उरत नाही.

शामोखिन बोलत असताना माझ्या लक्षात येत होतं की मातृभाषा आणि घरेलु गप्पांमुळे त्याला खूप समाधान वाटत असावं. त्याचं कारण एकच होतं की परदेशात त्याला मायभूमीची खूप उणीव भासत असावी. तरीसुद्धा रशियन माणसांची स्तुती करताना आणि त्यांच्यातला असाधारण आदर्शवाद मान्य करीत असताना त्याने परदेशीयांवर टीकास्त्र सोडून कधीच तोंडसुख घेतलं नाही. तेही त्याच्या पथ्यावरच पडलं होतं. हे पण लक्षात येत होतं की कुठलीतरी गोष्ट त्याला सलत असावी. त्यामुळे स्त्रीवर्गाविषयी बोलण्यापेक्षा स्वत:विषयी बोलण्याची त्याची इच्छा होती. तरीसुद्धा एखाद्या लांबच लांब कबुली-जाबाबावजा प्रेमप्रकरण ऐकून घेण्यासाठी माझी मनधरणी करावी असंही त्याला वाटत नव्हतं.

शेवटी आम्ही जेव्हा शँपेनची बाटली मागवली आणि आमचा एकेक

पेला पिऊन झाला तेव्हा त्यानं बोलायला तोंड उघडलं, "तुम्हाला आठवतंय, बेल्तमानच्या एका कादंबरीतलं कुठलसं पात्र म्हणतं, "हा असा घडला इतिहास.", त्यावर दुसरा मनुष्य म्हणतो, "हा घडलेला इतिहास नाहीये, ही तर इतिहासाची तोंडओळख आहे." मला तेच म्हणायचंय की आतापर्यंत मी जे बोललो ती एक झलक होती. तुम्हाला माझ्या अखेरच्या प्रेमकहाणीविषयी सांगायची माझी फार इच्छा आहे. खरं तर मला जरा संकोचल्यासारखं होतंय. म्हणून मी तुम्हाला पुन्हा एकदा विचारतोय, तुम्हाला माझं रडगाणं ऐकण्याचा कंटाळा नाहीना येणार ?"

मी जेव्हा म्हटलं की, "मुळीच नाही", तेव्हा तो पुढे बोलू लागला.

"हे घटनाचक्र मॉस्को परगण्यातल्या उत्तरेकडच्या एका जिल्ह्यात घडलं. तिथलं दवापाणी, निसर्ग अवर्णनीय असा आहे. हे तुम्हाला सांगितलंच पाहिजे. आमची शेतीवाडी वेगानं वाहणाऱ्या नदीकाठच्या टेकाडावर आहे. त्या जागेचं नावच मुळी होतं. 'खळखळणारी जागा' रात्रंदिवस पाण्याची खळखळ ऐकू यायची तिथे. कल्पना करा, एक जुनीपुराणी मोठीच मोठी बाग, डोळ्याचं पारणं फेडणारे फुलांचे ताटवे, मधुसंचयिका, परसबाग, खाली नदीकाठी वेटोळी वेटोळी असलेलं वेळूचं बेट असं सुंदर दृष्य आहे ते. दंव पडलं की हे बेट पिकल्या केसांसारखं फिकुटलेलं निस्तेज दिसायचं. पलीकडच्या काठाला हिरवळ, हिरवळीच्या पलीकडे टेकडीवर पाईन वृक्षाचं भिववणारं घनदाट जंगल आहे. ह्या राईत अधून मधून भगव्या टोप्यांच्या आळंबी जमिनीबाहेर आलेल्या दिसतात. मी मरेन आणि मला जेव्हा शवपेटीत ठेवतील ना तेव्हासुद्धा मला वाटतं मला आमच्या वाडीतल्या पहाटवेळांचीच स्वप्न पडतील, त्यावेळी डोळे सूर्य किरणामुळे चुरचुरत असतील. बागेच्या पलीकडे वसंत ऋतूतल्या रम्य संध्यासमयी नाईटिंगेल आणि लॅन्ड्रेल पक्षाचं गाणं ऐकायला येतं. तर पलीकडच्या खेड्यातून बाजाच्या पेटीचा आवाज कानावर पडतो, त्याच वेळी घरात कुणीतरी पियानो वाजवत असतं, नदीचा खळखळाट, एका शब्दात सांगायचं झालं तर ते असं संगीत असतं की रडावंसं नाहीतर मोठमोठ्यांदा गावंसं वाटावं. शेती आमची खूप मोठी नसली तरी कुरणाचा मोठा आधार आहे. कुरण आणि जंगल मिळून दरवर्षी एकंदोन हजार रुबल्स देऊन जातात. मी माझ्या वडिलांचा एकुलता एक मुलगा आहे. आम्ही मर्यादशील माणसं आहोत. हे शेतीवर मिळणारे

पैसे आणि वडिलांचं पेन्शन आम्हाला भरपूर होतं. विद्यापीठातून बाहेर पडल्यावर पहिली दोन-तीन वर्षं इस्टेटीची देखभाल करत नोकरीसाठी कुठेतरी आपली नेमणूक होईल ह्या आशेवर खेड्यातच राहिलो मी. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे ह्याच वेळी मी एका अतिसुंदर, मंत्रमुग्ध करून टाकणाऱ्या मुलीच्या प्रेमात पडलो. आमच्या शेजारचा दिवाळखोर कतलोविच ह्याची बहीण होती ती. त्यांच्या वाडीत अननस होते, पीचची झाडं होती, वीज संरक्षक कंडक्टर बसवलेले होते, अंगणाच्या मध्यभागी कारंज होतं. पण इतकं सगळं असूनसुद्धा पैशाचा मात्र खणखणाट होता. जमीनदार स्वत: इकडची काडी तिकडे करत नव्हता, कशातच गती नव्हती त्याला, तो म्हणजे एक वल्लीच होती. अशी माणसं पैशाला पासरी असतात. तो शेतमजुरांना होमिओपाथीची औषधं देत असे आणि भुताखेतावरचे प्रयोग करण्याचा उद्योग होता त्याचा. मनुष्य म्हणून म्हणाल तर तो नाजूक, हळवा, हुशारसुद्धा होता. पण मला मात्र मृतात्म्यांशी संवाद साधणाऱ्या आणि बायाबापड्यांना लोहचुंबकाच्या सहाय्याने बरं करणाऱ्या असल्या सद्‌गृहस्थाविषयी यत्किंचितही सहानुभूती वाटत नाही. पहिली गोष्ट म्हणजे मानसिक दृष्ट्या दुर्बल माणसांच्या डोक्यात नेहमीच वैचारिक गोंधळ असतो. अशा लोकांशी संवाद साधणं अतिशय कठीण असतं. दुसरं म्हणजे सहसा हे लोक कोणावरच प्रेम करीत नाहीत, स्त्रियांबरोबर राहू शकत नाहीत. त्यांच्यासारख्या एकांड्या माणसाचा माझ्यासारख्या भावनाप्रधान माणसावर चांगला प्रभाव पडत नाही. त्याचं बाह्य रूप पण मला आवडत नाही. तो उंच, लठ्ठ, पांढरा फेक, लहान डोक्याचा, बारीक चमकदार डोळ्यांचा, पांढऱ्या जाडजूड बोटांचा आहे. तो तुमच्याशी हस्तांदोलन नाही करत तर तुमचा हात मुरगळतो. एकसारखा क्षमा याचनेच्या भाषेतच बोलतो. त्याला काही मागायचं असलं तरी "माफ करा, मला तेवढं देता का ?" आणि तुम्हाला काही द्यायचं असलं तरी "कृपा करून घेता का ?" असलं बोलणं असायचं ह्याचं. त्याच्या बहिणीविषयी बोलायचं झालं तर भावाबहिणीत दोन ध्रुवाचं अंतर होतं. तुम्हाला सांगणं जरूरीचं वाटतं मला की बालपणी आणि तरुणपणीदेखील माझा कतलोविच कुटुंबाशी फारसा परिचय नव्हता. कारण माझे वडील 'अेन' मध्ये प्राध्यापक होते आणि आमचं बरचसं आयुष्य जिल्ह्याच्या ठिकाणी गेलं. माझी त्यांच्याशी ओळख झाली तेव्हा मुळी ही मुलगी बावीस वर्षांची झाली होती.

ती इन्स्टिट्यूटमधून पास होऊन बाहेर पडली होती आणि दोन-तीन वर्ष मॉस्कोमधल्या तिच्या एका श्रीमंत आत्याकडे रहात असे ती. ह्या आत्यानेच उच्चभ्रू लोकांच्या सामाजिक वर्तुळात तिचं पदार्पण करून दिलं होतं. माझी आणि तिची पहिल्यांदा जेव्हा ओळख झाली आणि तिच्याशी बोलायचा योग आला तेव्हा तिच्या अपरिचित सुंदर नावानीच मला भुरळ पाडली. 'अरिआदना'* हे नाव तिच्या रूपाला साजेसंच होतं. ती पिंग्या केसाची, सडपातळ कमनीय बांध्याची, तरतरीत, नाजूक आणि अतिशय मोहक होती. स्वर्गीय लावण्य लाभलेला अस्सल खानदानी चेहरा होता तिचा. तिच्या आणि तिच्या भावाच्या डोळ्यांत फरक इतकाच होता की भावाचे डोळे स्वप्नाळू, मधाळ, लिमलेटच्या गोळीसारखे होते. तर तिच्या सुंदर डोळ्यात तारुण्याची नि गर्विष्ठ पणाची झाक होती. आमची ओळख झाल्या दिवसापासूनच मी तिचा अक्षरश: गुलाम बनलो. त्याला दुसरा पर्यायच नव्हता. आमच्या पहिल्या भेटीतच मी इतका झपाटलो गेलो होतो की आजतागायत ते मोहमयी मायावी स्वप्न कधी विरून गेलच नाही. मला अजूनही असं वाटतं की ब्रह्मदेवानं जेव्हा हिला निर्माण केली तेव्हा एक अपूर्व सुंदर शिल्प साकारायचं त्याच्या मनात होतं. अरिआदनाचा आवाज, तिची चाल, तिची टोपी, 'पिसकार' मासे पकडायला किनाऱ्यावर जाताना बारीक वाळूवर उमटणाऱ्या तिच्या नाजूक, छोट्या छोट्या पावलांच्या पाऊल-खुणा ह्या सर्व गोष्टी मला आनंद देऊन जायच्या आणि माझ्या मनात जगण्याविषयीची अवर्णनीय अशी ओढ निर्माण करायच्या. सुंदर चेहरे आणि रेखीव आकृतिबंध याला मी दैवी देणगी मानतो. अरिआदनाच्या प्रत्येक शब्दानं, तिच्या चेहऱ्यावर विलसणाऱ्या हास्यानं मला भारून टाकलं होतं, मला गुलाम केलं होतं आणि तिला सर्व गुणसंपन्न स्त्री म्हणून मानायला भाग पाडलं होतं. ती मोहक, बोलकी, आनंदी, होती. तिच्या हावभावात सहजता होती. कविमनाच्या अशा तिचा देवावर विश्वास होता आणि मरणाविषयी खुलेपणाने वादविवाद करायची ती. नानाविध छटांनी संपन्न अशी तिची मानसिक घडण होती. त्यामुळे स्वत:तील उणीवांना ती शिताफीने, बेमालूमपणे झाकून टाकायची. समजा तिला नवीन स्वारीचा घोडा हवा असला आणि तिच्याजवळ तर पैसे नाहीयेत, तेव्हा तिला वाटायचं, हात्तीच्या त्यात काय एवढं मोठं, आपण काहीतरी विकू किंवा गहाण टाकू शकतोच की ! त्या

वेळी नोकर जर म्हणाला की विकण्यासारखं किंवा गहाण ठेवण्यासारखं काही शिल्लक नाही तर आऊटहाऊसच्या छपराचे पत्रे उतरवायचे नि कारखान्यात पाठवून द्यायचे की झालं. नाहीतर सगळ्यात सोपा मार्ग म्हणजे शेतावरच्या कामकरी घोड्यांना बाजारात पिटाळायचं आणि कवडी मोलानं फुंकून टाकायचं त्यांना. ह्या तिच्या अनिर्बंध लहरी स्वभावामुळे कधीकधी सगळ्या घरादारावर संकट ओढवायचं. पण त्या सगळ्या घडामोडी ती लोकांना अशा खुबीनं पटवायची की अखेर सर्वजण तिला माफ करायचे, तिला देवतास्वरूप मानायचे, नाहीतर सीझरची बायको क्लिओपात्रा आहे म्हणून नावाजायचे तिला ! माझं तिच्यावर जिवापाड प्रेम होतं. ही बातमी थोड्याच दिवसात माझे वडील, शेजारी पाजारी, नोकरचाकर, सगळ्यांपर्यंत वाऱ्यासारखी पसरली. त्यात गैर असं कोणालाच काही वाटलं नाही. मी माझ्या नोकरांना खुषीनं जेव्हा वोडका प्यायला द्यायचो तेव्हा ते माझ्यापुढे गुडघे टेकून बसायचे नि म्हणायचे, "देवाच्या कृपेनं तुमचं आणि कतलोविच बाईसाहेबांचं लग्न होऊ दे !"

अरिआदनालादेखील कळत होतं की मी तिच्या प्रेमात पडलोय. ती बऱ्याचदा आमच्याकडं घोड्यावरून नाहीतर बग्गीतून यायची. कधी कधी तर माझ्या आणि वडिलांच्याबरोबर दिवस दिवस घालवायची. माझ्या वृद्ध वडीलांबरोबर तिची चांगलीच गट्टी जमली होती. त्यांनी तिला सायकल चालवायलासुद्धा शिकवलं होतं. हा माझ्या वडिलांचा एक आवडता छंद होता. मला आठवतंय एक दिवस संध्याकाळी त्या दोघांनी सायकलवरून रपेट मारायचं ठरवलं. मी तिला वर चढून बसायला मदत केली, तेव्हा ती इतकी सुंदर दिसत होती की मला वाटलं तिच्या स्पर्शाने माझे हात पोळताहेत. मन थाऱ्यावर न राहिल्यामुळे माझे सर्वांग कापायला लागले. ती आणि माझे वडील, सुंदर, सडसडीत अशी ती दोघं आपआपल्या सायकलवर बसून एकमेका शेजारून महामार्गावरून जात असताना काळ्या घोड्यावर स्वार झालेल्या एका घोडेस्वाराचा घोडा एकदम रस्त्यावरून बाजूला फेकला गेला. मला वाटलं तो घोडासुद्धा तिच्या सौंदर्याने बेभान झाला असावा आणि म्हणूनच त्याचा पाय घसरला बहुतेक. माझं प्रेम आणि तिच्याविषयी मला वाटणारा आदर यामुळे अरिआदना हेलावून गेली होती. तिलापण प्रेमात वाहवत जावसं आणि माझ्या प्रेमाला प्रतिसाद द्यावासा वाटू लागला. केवढं काव्यमय आहे नाही हे सगळं !

पण माझ्यासारखं अंतःकरणापासनू प्रेम करणं तिला जमलं नसतं. कारण ती थंड प्रकृतीची आणि बरीचशी शेफारलेली होती.तिच्यात सैतानानं केव्हाच आपलं बस्तान बसवलं होतं. दिवसरात्र तो तिच्या कानात कुजबुजायचा की ती अतिसुंदर आहे. दैवी अवतारच ! तिला स्वतःला तरी कुठं माहीत होतं की देवानं तिला नक्की कोणत्या उद्देशानं हे जीवन बहाल केलंय ते. भावी आयुष्याच्या कल्पनेनं रेखाटलेल्या तिच्या चित्रात ती एक गर्भश्रीमंत, खानदानी बाई असायची. तिला बॉलडान्स, घोड्यांच्या शर्यती, लष्करी पोषाखातला अधिकारी, राजमहालातल्यासारखा दिसणारा प्रशस्त दिवाणखाना, तिचा रंगमहाल, तिच्या भेटीसाठी रीघ लावून बसलेले सरदार, राजदूत, मंत्री, प्रख्यात शिल्पकार, कलावंत मंडळी वगैरे वगैरेंची स्वप्नं पडायची. वरील सर्व मंडळी तिच्या सेवेला तत्पर असायची आणि तिच्या सौंदर्यावर, पोषाखावर फिदा झालेली दिसायची तिला. सत्तेची आणि वैयक्तिक विजयाची ही हाव आणि मनात कायमचे घर करून बसलेले असले विचार माणसाला एका अहंपणाकडेच नेत असतात. अरिआदना भावनाशून्य होती. माझ्याकडे, निसर्गाकडे, संगीताकडे पहाण्याचा तिचा दृष्टिकोण असाच अनासक्त, अरसिक होता. पाहता पाहता दिवस जात होते. तिच्या स्वप्नातले राजदूत प्रत्यक्षात कधी आलेच नाहीत. अरिआदना आपल्या भोंदू भावाजवळच राह्यला लागली. सगळ्याच गोष्टींची चणचण भासायला लागली तिला. कपडे, टोप्यांसारख्या साध्यासाध्या वस्तुसुद्धा कशा आणि कुठून विकत घ्यायच्या अशी वेळ आली तिच्यावर. गरिबी लपवण्यासाठी तिला नाना क्लृप्त्या करायला लागायच्या आणि वारंवार आपला मोहरा बदलायला लागायचा.

अरिआदना मॉस्कोमध्ये आत्याकडे राहात असताना माकतुयेव नावाच्या एका राजपुत्राने केवळ योगायोगानेच तिला मागणी घातली होती. तो खूप श्रीमंत होता पण अगदीच कुचकामी. त्यावेळी तिनं त्याला नकार दिला होता. आता मात्र कधी कधी पश्चात्तापाचा भुंगा तिचं मन पोखरत होता. आज तिला वाटत होतं आपण उगीचच त्याला नकार दिला, असं करायला नको होतं. आमच्या इथला शेतमजूर झुरळं पडलेल्या क्वास वर उमासे येत असले तरी फुंकर मारून झुरळं बाजूला करतो आणि मुकाटपणे ते प्यायला लागतो. तसंच राजपुत्र माकतुयेवची आठवण झाल्यावर अरिआदनाच्या कपाळावर अनेक आठ्या

पडल्या. तरीपण ती मला म्हणाली, ''माणसाच्या सन्माननीय पदवीमध्ये अवर्णनीय आणि आकर्षक असं काहीतरी असतं ह्यात शंकाच नाही.''

तिला पदवी, प्रतिष्ठा, चमकधमक, डामडौल याचं आकर्षण होतं. त्याच गोष्टींची स्वप्न पहात होती ती. पण त्याचवेळी मलाही सोडायची तयारी नव्हती तिची. एखादा राजदूत आपल्याकडे येण्याची स्वप्न पहाणं जरी आताशा तिनं सोडून दिल होतं तरीसुद्धा माणसाचं हृदय म्हणजे काही पथ्थर नाही. त्यामुळे तरुणपणाला दोष देण्याखेरीज तिच्या हातात काही उरलं नव्हतं. अरिआदना माझ्यावर प्रेम करण्याचा प्रयत्न करीत होती, तिचं माझ्यावर प्रेम आहे असं भासवत होती, प्रेमातल्या आणाशपथापण घेत होती. मी भावनाप्रधान आणि संवेदनशील मनुष्य आहे. माझ्यावर जेव्हा कोणी मनापासून प्रेम करतं ना तेव्हा दूर राहून देखील मला ते जाणवत असतं. मग त्यासाठी आश्वासन, आणाभाकांची जरूरी नसते. हिच्या बाबतीत मात्र मला तिच्यात एकप्रकारची उदासीनता जाणवत होती. ती जेव्हा प्रेमालाप करायची ना तेव्हा मला असं वाटायचं की मी धातूपासून बनवलेल्या एखाद्या नकली नाईटिंगेलचं गाणं ऐकतोय. अरिआदनाला स्वत:लापण जाणवायचं की जिवापाड प्रेम करणं तिला जमण्यासारखं नाहीये. तिला स्वत:चीच कीव यायची. मी तिला कितीदातरी रडताना पाह्यलंय.

कल्पना करा, तुम्हाला खरं नाही वाटायचं पण तिनं मला कडकडून मिठी मारली आणि माझ्यावर चुंबनांचा वर्षाव केला. हे सगळ संध्याकाळी नदीकाठी घडलं. पण त्यावेळीवेळीसुद्धा तिच्या डोळ्यांवरून मला कळत होत की तिचं माझ्यावर खरं प्रेम नाहीये. केवळ कुतुहलापोटी तिनं मला मिठी मारली होती. तिला अनुभवायचं होतं की शेवटी ह्यात असतं तरी काय एवढं ? माझी मात्र दयनीय अवस्था झाली. मी तिचा हात पकडला आणि दु:खित अंत:करणानं तिला म्हणालो, ''प्रेमाशिवायचं हे अंजारणं गोंजारणं माझं अंत:करण विदारून टाकतं.''

''तुमचं आपलं काहीतरीच असतं हं. तुम्ही अगदी मजेशीरच आहात !'', असं म्हणत ती तिथून निघून गेली.

अशा तऱ्हेनंच वर्ष दोन वर्षं गेली असती आणि मी तिच्याशी लग्न केलं असतं आणि त्याबरोबरच आमचं प्रेमप्रकरण तिथंच संपलं असतं. पण नशिबाला

आमच्या ह्या प्रेमाला निराळीच कलाटणी द्यायची होती. त्याचं असं झालं, आमच्या मर्यादित विश्वात एका नव्या व्यक्तीचं आगमन झालं. अरिआदनाच्या भावाकडे त्याचा विद्यापीठातला मित्र लुबकव मिखाईल इवानिच पाहुणा म्हणून आला. गोडबोल्या होता तो नुसता. गाडीवान आणि नोकरचाकर त्याच्याविषयी प्रशंसोद्गार काढायचे, "पाहुणे कामात दंग असतात नेहमी !" लुबकव मध्यम बांध्याचा, सडपातळ, टक्कल पडलेला होता. विशेष उल्लेखनीय असं काही नसतानासुद्धा देखणा, गोरापान एखाद्या प्रेमळ बुर्जवा माणसासारखा दिसायचा तो. त्याच्या मिश्या खरखरीत पण नीटनेटक्या होत्या, मान गुबगुबीत आबरी गोबरी होती आणि मोठा कंठमणी होता त्याला. तो नाकावर बसणारा जाड काळा गोफ असलेला चष्मा घालायचा. जरासा तोतरा होता तो. तो 'र' आणि 'ल' चा उच्चार 'व' करायचा. उदाहरणार्थ 'स्देलाल' म्हणायचं असेल तर तो 'स्देवाव' म्हणायचा. तो खुशालचेंडू होता. सगळ्याच गोष्टी त्याला हास्यास्पद वाटायच्या. अगदीच मूर्खासारखं, म्हणजे फक्त विसाव्या वर्षी लग्न केलं होत त्यानं. लग्नात हुंडा म्हणून त्याला मॉस्कोच्या 'देवीचे' ह्या भागात दोन घरे मिळाली होती. स्नानगृहं बांधायचा आणि त्यांची दुरुस्ती करायचा धंदा होता त्याचा. पण सगळा आतबट्याचा व्यवहार असायचा. थोड्याच दिवसात त्याचा फुगा फुटला. सध्या त्याची बायको आणि चार मुलं 'वस्तोचनीय नोमेर' मध्ये रहाताहेत, अडचणीशी सामना करताहेत. खरं तर त्यानीच त्यांची देखभाल करायला हवी पण तेसुद्धा तो हसण्यावारी नेत असे. आत्ता तो छत्तीस वर्षांचा आहे आणि बायकोला बेचाळीस वर्ष पूर्ण झाली आहेत, ती सुद्धा एक गंमतच आहे त्याच्या दृष्टीनं. त्याची आई अहंमन्य, राजेरजवाड्यांच्या पोकळ डामडौलाने शेफारलेली बाई होती. ती सुनेचा दु:स्वास करायची आणि आपल्या कुत्र्यामांजरांच्या पलटणीसह स्वतंत्र राह्यची. तिला एकटीला दर महिन्याला पंचाहत्तर रुबल्स न चुकता द्यावे लागायचे त्याला. तो एक अस्सल खवय्या होता. त्याला 'स्लाव्यान्स्की बाजारात' नाष्टा तर 'अेरमिताज' मध्ये दुपारचे जेवण करायला आवडायचं. त्यासाठी पुष्कळ पैसे लागायचे. त्याचे काका त्याला वर्षाला फक्त दोन हजार रुबल्स देत असत. ते त्याच्या पासंगाला सुद्धा पुरायचे नाहीत. त्यामुळे तो दिवसभर भेटेल त्याच्यापुढे हात पसरून उधार पैसे मिळविण्यासाठी मॉस्कोभर पळत असायचा. सगळं हास्यास्पदच होतं त्याचं

वागणं. त्याच्या म्हणण्याप्रमाणे कतलोविच मंडळींकडे कौटुंबिक जीवनापासून दूर, निसर्गाच्या सान्निध्यात राहण्यासाठी आला होता तो. सकाळ संध्याकाळ, जेवणाच्या वेळी, फिरायला गेलो असताना तो आम्हाला स्वत:च्या बायकोविषयी, आईविषयी, त्याला उधार पैसे देणाऱ्या धनकोंविषयी, कायदेकानूनविषयी सांगत असायचा. इथून तिथून सगळ्यांची टिंगल करायचा. मग त्यात तो स्वत:पण वगळला जायचा नाही आणि छातीठोकपणे सांगायचा की त्याच्या लोकांकडून पैसे मिळविण्याच्या कलेमुळे मोठ्या मोठ्या लोकांशी ओळखी झाल्या आहेत. तो अखंड हसत असायचा आणि मग आम्हीपण हसायचो. त्याच्या सहवासात आम्ही आमचा वेळ आमच्या नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणे नव्हतो घालवत. शांत, निसर्गरम्य वातावरणाचा आनंद लुटण्याकडे माझा कल होता. उदा. मला मासे पकडायला आवडतात, संध्याकाळी दूर दूर भटकंती करायला आवडतं. अळंबी गोळा करायला आवडतं. त्याला मात्र सहलीला जायला, बॉल बॅडमिंटन खेळायला, पाठलाग करून शिकार करायला आवडायचं. तो आठवड्यातून तीनदा तरी सहली आयोजित करायचा. अशा वेळी अरिआदना फुरफुरायची. गंभीर चेहरा करून सहलीसाठी लागणाऱ्या मासे, चॉकलेटस, शॅम्पेनसारख्या वस्तूंची लांबचलांब यादी करून माझ्याकडे पुरेसे पैसे आहेत की नाही हे न विचारताच मला मॉस्कोला पिटाळायची. सहलीमध्ये ते एकमेकांना 'टोस्ट' करणे, हास्यविनोद आणि परत त्याच नेहमीच्या घरगुती गप्पा, उदा. बायको कशी वयस्क दिसते, आईकडची कुत्री कशी खाऊन पिऊन माजली आहेत, सावकार मंडळी किती प्रेमळ नि समजुतदार आहेत वगैरे वगैरे.

लुबकव निसर्गप्रेमी होता. पण त्याच्याकडे पाहण्याचा त्याचा दृष्टिकोन मात्र इतरांपेक्षा भिन्न होता, त्याला वाटायचं त्यात नवीन असं काय असतं, त्याच्याविषयी तर त्याला खडान् खडा माहिती आहे. शिवाय त्याला असंही वाटायचं की वास्तवात माणूस निसर्गापेक्षा किती तरी श्रेष्ठ आहे आणि निसर्गाची निर्मिती फक्त त्याच्या आनंदासाठी केलेली आहे. एखाद वेळेस असं व्हायचं की तो एका अप्रतिम निसर्ग चित्रासमोर उभा राह्यचा नि म्हणायचा, ''इथे बसून चहा प्यायला काय मजा आली असती नाही !'' एक दिवस हातात छत्री घेतलेली अरिआदना त्याला दुरून येताना दिसली. त्यानं तिच्याकडे पाहून

डोकं हलवलं नि म्हणाला, "ही मुलगी कशी सडसडीत सुंदर दिसते नाही. म्हणून तर मला ती फार आवडते. लठ्ठ माणसं नाही आवडत बाबा आपल्याला."

त्याच्या तिच्याविषयीच्या त्या विधानाने माझ्या डोक्यात सणक आली. बायकांविषयी असले उद्गार पुन्हा माझ्यासमोर काढत जाऊ नकोस असं मी त्याला बजावलं. माझ्याकडे आश्चर्याने पहात तो म्हणाला, "मला सडपातळ माणसं आवडतात आणि लठ्ठ माणसं आवडत नाहीत असं म्हणण्यात अक्षेपार्ह काय आहे?"

मी त्याच्या या प्रश्नाला काहीच उत्तर दिलं नाही त्यावेळी. नंतर पुढे केव्हातरी एका अतिशय निसर्गरम्य स्थळी चेष्टामस्करी करीत असताना तो म्हणाला, "माझ्या लक्षात आलंय की अरिआदनाला तुम्ही आवडता. मला आश्चर्यच वाटतंय की तुम्ही जांभया देत कास बसला आहात नुसते."

ह्या त्याच्या बोलण्याने मला जरा अवघडल्यासारखं झालं. पण नंतर मी त्याला मोठ्या दिमाखाने प्रेमाविषयीचा आणि स्त्रियांकडे पाहण्याचा माझा दृष्टिकोन विषद करून सांगितला.

"माहीत नाही खरं काय ते", उसासा सोडत तो म्हणाला, "माझ्या मते मात्र स्त्री ही शेवटी स्त्रीच असते आणि पुरुष पुरुषच असतो. तुम्ही म्हणता त्याप्रमाणे अरिआदना कवीमनाची, सुसंस्कृत, विद्याविभूषित असेल पण म्हणून काही ती निसर्ग नियमांच्या चौकटीबाहेर अलिप्तपणे राहू शकणार नाही. तुम्हाला दिसतंच आहे की तिचं आत्ताचं वय असं आहे की तिला पुरुषाच्या सहवासाची ओढ असणार, प्रियकराची गरज भासणार. स्त्रिवर्गाविषयी मला तुमच्याइतकाच आदर आहे. पण मला असं वाटतं की सर्वश्रुत स्त्री-पुरुष नातेसंबंध काव्याच्या बाहेरचा नाहीये. काव्य काव्याच्या ठिकाणी आणि प्रियकर प्रियकराच्या ठिकाणी असतो. सर्वच बाबतीत हे असतं. आता पहाना कृषिक्षेत्रात निसर्गसौंदर्य, आणि जंगल शेती यातून मिळणारं उत्पन्न ह्या दोन्ही गोष्टी परस्परविरोधी नसल्या तरी त्या तराजूच्या एकाच पारड्यात घालून चालणार नाही.

एकदा मी आणि अरिआदना 'पिसकार' मासे पकडत होतो. त्या वेळी लुबकव तिथेच पलीकडे वाळूवर लोळत पडला होता आणि एकीकडे माझी खिल्ली उडवत होता, मला कसं जगावं ते शिकवत होता.

"मला आश्चर्य वाटतं महाराज की तुम्ही प्रेमाशिवाय जगूच कसे

शकता ?'', तो म्हणाला, ''तुम्ही तरुण, देखणे, आकर्षक आहात, एका शब्दात सांगायचं म्हणजे तुमचं व्यक्तिमत्त्व अतिशय लोभस आहे. पण जगता मात्र तुम्ही साधुसंतासारखे. बापरे बाप, अठ्ठावीस वर्षांचा म्हातारा माणूस वाटताहात तुम्ही मला. मी तुमच्या पेक्षा दहा वर्षांनी तरी मोठा असेन, पण मग आपल्यातला तरुण कोण ? अरिआदना आमच्या दोघांत कोण तरुण आहे सांग ना ?''

''अर्थातच तुम्ही, '' अरिआदनानं उत्तर दिलं.

आमच्या मौनांचा आणि माशांच्या हालचालींकडे एकटक पाहाण्याचा लुबकवला जेव्हा कंटाळा आला तेव्हा तो तडक घरी निघून गेला. माझ्याकडे रागानं पहात अरिआदना म्हणाली, ''खरं सांगायचं तर तुम्ही पुरुष नाही आहात. एक अगदी गावंढळ गृहस्थ, नामर्द आहात नुसते. पुरुषाला कशाचं तरी आकर्षण वाटायला हवं, वाहवून जायला हवं त्यानं, वेडं व्हायला हवं, चुका करायला हव्यात, तळमळायला हवं. कोणतीही स्त्री तुमच्या अडमुठेपणाबद्दल, उद्धटपणाबद्दल तुम्हाला क्षमा करील पण बुळेपणाबद्दल मात्र कधीही क्षमा करणार नाही.''

हे ती काही थट्टेत बोल नव्हती. तिची बडबड पुढे चालूच राहिली. ''माणसाला आयुष्यात जर शिखर गाठायचं असेल तर त्याच्यात ठामपणा आणि धैर्य असायला हवं. लुबकव तुमच्याइतका सुंदर नसेल पण त्याची लोकांवर छाप पडते आणि म्हणूनच स्त्रियांच्या बाबतीत तो नेहमी यशस्वी होतो. तो तुमच्यासारखा नाहीये, तो पुरुष आहे.''

तिच्या आवाजात एक प्रकारचा कडवटपणा जाणवत होता. एक दिवस रात्री जेवणानंतर माझ्याकडे दुर्लक्ष करीत ती म्हणाली, ''ती जर पुरुष असती ना तर इथं खेड्यात ती कुजत राहिली नसती तर हिवाळ्यात कुठेतरी परदेशात इटलीला वगैरे जाऊन राहिली असती. अरे बापरे, इटली ! म्हणजे माझ्या वडिलांनी नकळत आगीत तेल टाकलेलं दिसतंय. इटली संबंधी ते कितीतरी गोष्टी सांगायचे, तिथे राहण्यात काय मजा असते, तिथली हवा किती मस्त असते, कितीतर संग्रहालयं आहेत तिथे पहाण्यासारखी त्यामुळेच अरिआदनाच्या डोक्यात एकदम इटलीला जायची सणक आली. ती टेबलावर मुठी आपटायला लागली. तिचे डोळे चमकायला लागले ''जायचंच'', ती म्हणाली.

त्यानंतर दररोज 'इटली' ह्या एकाच विषयावर गप्पा चालायच्या. आहा, तिथं किती छान असेल नाही, इटलीला जाणं म्हणजे मज्जाच मज्जा ! अरिआदना जेव्हा माझ्या खांद्यावर डोकं ठेवून माझ्याकडे पाह्यची तेव्हा तिच्या उदास, रूष्ट चेहऱ्यामोहऱ्यावरून मला दिसंत होतं की सध्या तिच्या कल्पनाविश्वात फक्त एकाच गोष्टीला स्थान आहे. आणि ती म्हणजे इटली, तिथली उपहारगृह, तिथले ते पर्यटक निवास, स्वदेशी आणि परदेशी पर्यटक. आता तिला थोपवून धरणं अशक्य कोटीतलं होतं. मी तिला अजून थोडे दिवस वाट पहा आपला परदेश प्रवास एकदोन वर्ष तरी लांबणीवर टाक असा सल्ला दिला पण तत्क्षणी तिच्या कपाळावर आठ्या पडल्या. ती म्हणाली, "तुम्ही अगदी हिशोबी आहात, एखाद्या म्हाताऱ्या बाईसारखे."

लुबककवपण प्रवासाला जावं ह्याच मताचा होता. तो म्हणायचा, इटलीचा प्रवास तसा काही फार खर्चाचा नाहीये. तो पण इटलीला जायला एका पायावर तयार होता. म्हणायचा की कौटुंबिक जीवनापासून दूर गेलं तर मस्त विश्रांती होईल. मला आता पश्चात्ताप होतोय की मी त्या वेळी अगदी अननुभवी माणसासारखं म्हणजे जिम्नाझियामधल्या विद्यार्थ्यासारखं वागलो. दुःस्वासामुळे नाही तर काहीतरी भयंकर नि अघटित घडण्याची चाहूल लागल्यामुळे शक्यतो त्या दोघांना एकांत मिळू नये असा माझा प्रयत्न असायचा. ती दोघं मात्र माझा मामा करायचे. उदाहरणार्थ, मी जेव्हा एकदम ते असतील तिथं गेलो तर त्यांनी नुकतंच एकमेकांच चुंबन घेतलंय असं नाटक करायचे ते.

एक दिवस सुप्रभाती अरिआदनाचा तो पांढरा फटफटीत, लठ्ठ, भोंदू भाऊ माझ्यापुढे उभा ठाकला. त्यानं माझ्याशी खासगी बोलायची इच्छा प्रकट केली. तो सुसंस्कारित, नाजूक प्रकृतीचा असूनही चंचल होता. त्याच्यासमोर टेबलावर दुसऱ्या कोणाला आलेलं बंद पाकीट पडलेलं असलं तर ते फोडून वाचल्याशिवाय त्याला चैन पडायचं नाही. आत्ता माझ्याशी बोलताना मात्र त्यानं केवळ अनवधानानं लुबककवचं अरिआदनाला आलेलं पत्र वाचलं असं म्हणाला तो.

"ह्या पत्रावरूनच मला कळलं की ती लवकरच परदेशी जाणार आहे", तो म्हणाला. "प्रिय मित्रा मी खूपच अस्वस्थ झालोय. मला तिचं हे काय चाललंय ते स्पष्ट सांगशील का ? मला तर काही कळतंच नाहीये !" हे बोलत असताना त्याचा श्वासोच्छ्वास जोरजोरात होत होता, माझ्या तोंडावर पण येत

होता. त्याच्या तोंडाला गायीच्या मांसाचा वास येत होता.

"मला क्षमा करा, मी तुमच्यापुढे ह्या पत्राचा गौप्यस्फोट करतोय", तो पुढे म्हणाला, पण तुम्ही अरिआदनाचे मित्र आहात. ती तुमचा आदर करते ! कदाचित् तुम्हाला ह्यातलं काही माहीत असेल. तिची परदेशात जायची इच्छा आहे, पण कोणाबरोबर ? लुबकव महाशयपण जायच्या तयारीत आहेत. विचार केला तर हे सगळं विचित्र नाही का वाटत ? तो विवाहित आहे. मुलंबाळं आहेत त्याला आणि ह्याच्या वरताण म्हणजे तो तिच्या प्रेमात पडलाय असं मला स्पष्ट दिसतंय. ह्या पत्रात तो अरिआदनाला 'तू', 'तू' म्हणून संबाधतोय. क्षमा करा, पण हे सगळं भयंकरच आहे हो !"

आश्चर्यानं मी तर गारच पडलो. हात पाय गोठले नुसते माझे, छातीत कळ आली. जसं काही कुणीतरी माझ्या छातीवर अणकुचिदार दगड ठेवला होता. कतलोविचला थकवा आल्यामुळे तो एकदम आरामखुर्चीत कोसळलाच आणि त्याचे हात चाबूक धरल्यासारखे वर झाले.

"मी काय करू शकतो या बाबतीत ?" मी विचरलं.

"तिला सुचवून पहा, तिला पटवून द्या. आता तुम्हीच सांगा हं, कुठे लुबकव आणि कुठे ती. तो तिच्या तोडीचा का आहे ? अरे देवा, किती भयंकर, विचित्र होऊन बसलंय सगळं !" त्यानं डोक गच्च धरलं नि पुढे बोलायला लागला, "तिला योग्य असे कितीतरी नवरे मुलगे आहेत, युवराज माकतुयेव आणि आणि दुसरे कितीतरी आहेत हो. हा राजपुत्र तर तिची सारखी स्तुती करीत असतो. मला वाटतं फार दिवस नाही झाले त्या गोष्टीला. त्याचे पूज्य आजोबा इलारिओन यानी मागच्याच आठवड्यात प्लँचेटवर चार वेळा होकार भरला की अरिआदनाच त्यांच्या नातवाची पत्नी होणार. ते स्वर्गवासी झालेयत. फार हुशार होते हं ते. त्यांच्या आत्म्याला आम्ही दररोज बोलावत असतो."

ह्या आमच्या भेटीनंतर रात्रभर माझा डोळ्याला डोळा लागला नाही, स्वत:वर गोळी झाडून घ्यावीशी वाटली. त्या दिवशी सकाळी मी कमीतकमी पाच तरी पत्रं खरडली असतील आणि सर्वांचे फाडून तुकडे तुकडे केले. खळ्यात जाऊन हुंदके देत बसलो. मग वडिलांकडून पैसे घेतले आणि कोणाचाही निरोप बिरोप घेण्याच्या भानगडीत न पडता कॉकेशसमध्ये निघून गेलो.

हे तर खरंच आहे की स्त्री म्हणजे स्त्री आणि पुरुष पुरुष असतो. जगबुडीपर्यंत

हे विधान लागू होतं पण वर्तमानकाळात तसं म्हणणं वस्तुस्थितीला धरून होईल का ? माझ्यासारख्या सुसंस्कृत, गुंतागुतीची मानसिक जडण घडण लाभलेल्या माणसाने एखाद्या स्त्रिविषयी वाटणाऱ्या प्रबळ आकर्षणाविषयी चारचौघात कबुली देणं शक्य तरी आहे का ? कारण काय तर आम्ही दोघं भिन्नलिंगी आहोत म्हणून ? अमुक अमुक स्त्रीच्या केवळ कमनीय बांध्यावर बेहद्द खूष होऊन तिच्या प्रेमात पडलो असं स्पष्टीकरण देणं योग्य आहे का ? मला असं वाटतं की निसर्गाशी लढा दिल्यानंतर तल्लख बुद्धीच्या माणसाला प्रेमसंबंधातील शारीरिक आकर्षणावर, लढाईत शत्रूवर मात करावी लागते तशी मात करावी लागली आणि त्यानंतरही त्याने स्त्रीवर विजय मिळवला नसेल तरीही बंधुत्व आणि प्रेमभाव असल्या काल्पनिक जाळ्यात वस्तुनिष्ठ प्रेमाला अडकवण्यात तो सफल झाला असंच म्हणावं लागेल. पण माझ्यापुरतं बोलायचं झालं तर माझ्या मते स्त्री-पुरुष प्रेम हे इहलोकातील सामान्य प्राणिमात्राच्या जीवनाप्रमाणे म्हणजे कुत्र्या-मांजराप्रमाणे शारीरिक आकर्षणापुरते मर्यादित नाही. निर्व्याज प्रेम किंवा दिलेले प्रत्येक आलिंगन मनोमनी पवित्र, आंतरिक ऊर्मीतून प्रत्यक्षात आलेले आणि स्त्रीजातीच्या विषयीच्या आदरभावनेतून साकारलेलं असतं. सर्वात महत्त्वाचे म्हणजे प्राणिमात्रातील भिन्नलिंगी शारीरिक आकर्षणाच्या उपजत ऊर्मीचा वर्षानुवर्षे, जवळजवळ शंभराहून अधिक पिढ्यांनी तरी आजवर उपहासच केला आहे. अनुवंशिकतेने माझ्याही रक्तात तो भिनला आहे आणि माझ्या अस्तित्वाचा अविभाज्य भाग झाला आहे. अशा परिस्थितीत मी प्रेमाला काव्यमय आविष्कार असं म्हटलं तर आजसुद्धा ते संयुक्तिक आणि अनिवार्य ठरणार नाही का ? जणू काही माझ्या कानाची शिंप निश्चलच आहे आणि मी मेंढीचं कातडं पांघरलेलं आहे. मला वाटतं बहुतांशी सुसंस्कृत माणसं असाच विचार करतात. कारण सध्याच्या दिवसात प्रेमात पडलेल्या माणसांमध्ये नैतिकतेचा आणि काव्यात्मक स्फुल्लिंगाचा अभाव दिसतो. अशी माणसं वर्षानुवर्ष अगदी आजोबा पणजोबांच्या पिढीपासून प्रस्थापित संकल्पनेचा अपमान करीत असतात. असं म्हणतात की त्यामुळेच माणसातल्या उत्कृष्ट गुणांचा लोप होतो आणि बुद्धिभ्रंश होतो. हे खरं आहे की प्रेमाला काव्यरूप देऊन आपण असं धरून चालतो की आपण जिच्यावर प्रेम करतो ती व्यक्ती सर्वगुणसंपन्न आहे. पण पुष्कळ वेळा प्रत्यक्षात ते तसं नसतं. आणि हेच आपल्याकडून

होणाऱ्या अनेक चुकाचं आणि आपल्याला होणाऱ्या त्रासाचं मूळ असतं. पण माझ्या मते स्त्री ही शेवटी स्त्रीच असते आणि पुरुष पुरुष असतो अशी मनाची समजूत घालून घेण्यापेक्षा त्रास सहन करणं बेहत्तर आहे.

तिफ्लिसमध्ये मला माझ्या वडिलांचे एक पत्र आले. त्यात त्यांनी लिहिलं होतं की 'अरिआदना अमक्या अमक्या तारखेला परदेशी गेली आहे. तिचा तिथे सबंध हिवाळाभर राहण्याचा इरादा आहे. एका महिन्यानी मी घरी परत आलो तेव्हा हेमंतऋतूचे आगमन झाले होते. अरिआदना दर आठवड्याला माझ्या वडिलांना सुवासिक कागदावर पत्र पाठवायची. तिची पत्र नमुनेदार असायची, अलंकारिक साहित्यिक भाषेत लिहिलेली असायची ती. माझं तर असं मत आहे की प्रत्येक स्त्री ही लेखिकाच असते. तिच्या सख्ख्या आत्याकडून प्रवासखर्चासाठी हजार रुबल्स मिळवणं किती जड गेलं तिला, त्यासाठी आत्याची किती मनधरणी करावी लागली, एका दूरच्या नात्यातल्या वयस्क बाईंचा शोध घेण्यात आणि तिला सोबत म्हणून नेण्यासाठी राजी करण्यात मॉस्कोमध्ये तिचे किती दिवस वाया गेले ह्या सर्व गोष्टींचे अरिआदनाने आपल्या पत्रातून खडा न् खडा वर्णन केले होते. गोड गोड शब्दातल्या त्या तपशीलवार वर्णनाला थापाथापीचा वास येत होता आणि मला ठामपणे कळून चुकलं होतं की प्रवासात तिची सोबतीण म्हणून कुणीही गेलं नव्हतं. थोड्या दिवसानंतर मला पण तिचं ते सुवासिक कागदावरचं साहित्यिक भाषेतलं पत्र मिळालं. तिला तिथे माझी त्याचप्रमाणे माझ्या सुंदर, पाणीदार, प्रेमाने ओथंबलेल्या डोळ्यांची खूप आठवण येत होती. तिनं लिहिलं होतं की मी खेड्यात राहून माझ्या तारुण्याचा गळा घोटतोय, पाला पाचोळा करून टाकतोय त्याचा. खरं तर आयुष्यातला हा काळ असा आहे की मलासुद्धा तिच्यासारखंच पामच्या झाडाखाली बसून हवेत दरवळणाऱ्या संत्र्याच्या सुगंधाचा आस्वाद घेत स्वर्गसुख उपभोगता आलं असतं. तिनं पत्राच्या खाली सही केली होती, "तुम्ही वाऱ्यावर सोडलेली अरिआदना." त्यानंतर एकदोन दिवसांत त्याच धर्तीचं आणखी एक पत्र येऊन पोहाचलं. खाली सही होती, "तुम्हाला विसर पडलेली." माझं डोकं भणभणायला लागलं. मी तिच्यावर जिवापाड प्रेम करायचो, रोज रात्री ती माझ्या स्वप्नात यायची आणि ती तर म्हणतेय मला तिचा विसर पडलाय म्हणून. हे सगळं काय चाललंय त्याची कशात परिणती होणार आहे काही कळत

नव्हतं. त्यात आणखीन खेड्यात येणारा कंटाळा, संपता न संपणारी संध्याकाळ लुबकोवमुळे मनात डोकावणाऱ्या शंका कुशंकाची भर पडत होती. दिवसच्या दिवस आणि रात्ररात्र वाया जात होती माझी. असह्य झालं होतं सगळं. मला राहवलं नाही आणि मी पण मग इटलीला गेलो.

अरिआदनानं मला अब्बात्सिया बोलावलं होतं. मी तिथे पोहोचलो, तेव्हा नुकताच पाऊस पडून गेला होता. हवा स्वच्छ होती पण गरम होती. झाडांवर पावसाचे थेंब पडलेले दिसत होते अजून. मी अरिआदना आणि लुबकव राहात होते त्या एखाद्या बराकीसारख्या दिसणाऱ्या 'डिपेन्डन्से' मध्येच उतरलो. त्या वेळी ती दोघंही घरात नव्हती. मी तिथल्याच जवळच्याच एका बागेमध्ये गेलो. बागेतल्या छोट्या छोट्या रस्त्यांवरून हिंडलो आणि एका बाकावर जाऊन बसलो. माझ्या जवळून पाठीमागे हात अडकवलेला धीम्या चालीनं चालणारा ऑस्ट्रियन जनरल गेला. त्याच्या गणवेशावर आमच्याकडच्या जनरलसारखेच लाल पट्टे होते. चिमुकल्या बाळाला बसवलेली एक बाबागाडी आली. तिची चाकं वाळूवरून जाताना कर्कश आवाज करीत होती. त्यानंतर कावीळ झालेला, म्हातारचळ लागलेला एक माणूस, इंग्लिश लोकांचा घोळका, कॅथॉलिक पाद्री आणि परत तो ऑस्ट्रियन जनरल असे सर्व एकामागून एकेक जात होते. नुकताच 'फिऊमे'हून आलेल्या सैनिकांचा वाद्यवृंद बँडस्टँन्ड पाशी येऊन पोहोचला होता. त्यांच्या हातातले बिगुल चमचम करीत होते. संगीत सुरू झालं. तुम्ही कधी 'अब्बात्सियाला' गेला होतात का ? हे एक अतिशय गलिच्छ स्लाव गाव आहे. गावातून दुर्गंधी येणारा असा एकच एक रस्ता जातो. पाऊस पडल्यावर गमबुट घातल्याशिवाय ह्या रस्त्यावरून चालणंच शक्य नसतं. मी आजपर्यंत किती तरी वेळा मिटक्या मारत ह्या पृथ्वीवरच्या स्वर्गातलं वर्णन वाचलं होतं. मी पँट वर केली आणि हळू हळू तो अरुंद रस्ता ओलांडला. कंटाळलो होतो म्हणून उगाचच एका म्हाताऱ्या बाईकडून कच्चेच होते तरी पेअर्स विकत घेतले. तिला मी रशियन आहे हे लक्षात यायला वेळ लागला नाही. ती 'चितिरी' 'दवात्सात' असं तिच्या मोडक्या तोडक्या रशियन मध्ये बोलू लागली. आता कुठे जायचं, काय करायचं असा विचार करीत मी रस्त्यावरून जात असताना मला बरेच रशियन लोकपण दिसत होते. तेव्हा मला वाटलं इथल्या लोकांनी ह्या लोकांनापण आपल्याला फसवलं तसं लुबाडलं असणार. मला चीड आली,

शरमपण वाटली. तिथल्या शांत उपसागरामधून रंगीबेरंगी शीडांच्या बोटी, होड्या जात असतात. इथून अस्मानी रंगाची धुकं पांघरलेली 'फियूमे' आणि त्याच्याही पलीकडची दूरवरची बेटं दिसतात. हा देखावा अतिशय प्रेक्षणीय होता पण कालबाह्य आणि ओंगळ वास्तुरचनेच्या विश्रामगृहांनी आणि कुटीरांनी तो झाकोळून टाकला होता. मोठ मोठ्या श्रीमंत कंत्राटदारांनी अशा टोलेजंग इमारती उठवून किनाऱ्यावरचा हिरवागार परिसर विशोभित करून टाकला आहे. त्यामुळे बहुतांश भागातून इथल्या स्वर्गाचे दर्शन तुम्हाला होऊ शकत नाही. तुम्हाला फक्त खिडक्या, आगाशा, पांढरे खांब असलेले चौक आणि काळ्या गणवेशातले नोकरचाकर दिसतात. परदेशातल्या प्रत्येक थंड हवेच्या ठिकाणी हमखास पहायला मिळणारा बगीचा इथेही होता. काळपट, निश्चल, नीरव हिरवे पाम, गल्ल्याबोळातून पसरलेली गडद पिवळ्या रंगाची वाळू, हिरवी बाकं, कानठळ्या बसणारा आवाज काढणाऱ्या सैनिकांच्या चकचकीत तुताऱ्या, तांबड्या फीतीवाले जनरल्स ह्या सगळ्याचा दहा-पंधरा मिनिटांतच कंटाळा येतो, जर काही कारणामुळे तुम्हाला इथे दहा दिवस, कदाचित दहा आठवडे रहावं लागणार असेल तर ह्या असल्या थंड हवेच्या ठिकाणांचा विचार अनिच्छेने का होईना माझ्या मनात सारखा घोळत असतो आणि माझी अशी ठाम समजूत झाली आहे की इथल्या ह्या धनवान, खाऊन पिऊन मस्त अशा लोकांबरोबर राहणं किती असुखावह, कंटाळवाणं, तापदायक वाटतं! ह्यांची कल्पनाशक्ती कमकुवत असते त्यांच्या आवडी निवडी इच्छा आकांक्षांवरदेखील बंधनं असतात. हॉटेलमध्ये राहण्याची ऐपत नसलेले, जागा मिळेल तिथे समाधानाने राहणारे, समुद्राच्या रम्य देखाव्याचा आणि गगनचुंबी डोंगरांच्या भव्यतेचा आस्वाद घेणारे, हिरवळीवर आकाशाकडे पहात लोळत पडणारे, पायी चालणारे, जंगल आणि खेडीपाडी जवळून पहाणारे, परदेशातील रीतीरिवाजांचं निरिक्षण करणारे, तिथली गाणी ऐकणारे, तिथल्या बायकांच्या प्रेमात पडणारे आबालवृद्ध पर्यटक ह्या श्रीमंत लोकांपेक्षा कितीतरी पटींनी आनंद मिळवतात.

मी बागेत बसलो असतानाच अंधार पडायला लागला होता. सूर्य मावळायला आला होता आणि एकदम सुडौल बांध्याची, एखाद्या राजकन्येला शोभेल असा पेहराव केलेली माझी अरिआदना मला दिसली. तिच्या पाठोपाठ लुबकव येत होता. त्याच्या अंगावर नवा कोरा ढगळ, बहुतेक 'वेने' मध्ये

खरेदी केलेला पोषाख होता. ''तू का रागावली आहेस एवढी, मी असं काय केलंय ?'' तो म्हणत होता.

मला पहाताक्षणीच अरिआदना आनंदानं ओरडली. आम्ही जर पार्कात नसतो ना तर ती चक्क माझ्या गळ्यातच पडली असती. माझे दोन्ही हात हातात घेऊन तिनं ते आवेगाने दाबले आणि ती हसली. मीपण हसलो. भावना उचंबळून आल्यामुळे रडायचंच बाकी राह्यलं होतं माझं. मग गप्पाटप्पा, एकमेकांची विचारपूस सुरू झाली, गावाकडची काय हालहवाल आहे, माझे वडील काय म्हणताहेत, तिचा भाऊ भेटला होता का कधी मला, वगैरे वगैरे. मी तिच्या नजरेला नजर भिडवावी असा जणू ती हट्टच करीत होती. तिनं मला आमचं गावात राहात असतानाचं ते मासे पकडणं, छोटी मोठी भांडणं, सहली वगैरेची आठवण करून दिली.

''ह्या सगळ्या गोष्टींचा अनुभव घेताना काय मजा यायची नाही'', तिनं श्वास घेतला, ''पण इथेसुद्धा आमचे दिवस अगदी आनंदात चाललेयत. माझ्या लाडक्या मित्रा, इथे पण आमच्या खूप ओळखी झाल्या आहेत ! उद्या इथल्या एका रशियन कुटुंबाची मी तुला ओळख करून देईन हं. फक्त कृपा करून एक नवीन टोपी विकत घेऊन ये तुझ्यासाठी.'' तिने कपाळाला आठ्या घालून माझ्याकडे पाह्यले. अब्बात्सिया म्हणजे काही एखादं खेडेगाव नाहीये. इथल्या उच्चभ्रू समाजाला जे अभिप्रेत आहे तसंच राह्यला नि वागायला हवं इथे.

मग आम्ही एका रेस्टॉरंटमध्ये गेलो. अरिआदना सारखी हसत होती, चेष्टामस्करी करीत होती, मला म्हणत होती की मी किती प्रेमळ आहे, चांगला आहे, हुश्शार आहे. तिचा स्वतःच्या डोळ्यावर विश्वास बसत नव्हता, की मी अब्बात्सियाला प्रत्यक्ष तिच्याजवळ बसलो आहे. असेच आम्ही जवळ जवळ अकरा वाजेपर्यंत बसलो होतो. तिथल्या जेवणावर आणि स्वतःवर मी बेहद्द खूष होतो. त्यानंतर आम्ही एकमेकांचा निरोप घेतला. दुसऱ्या दिवशी अरिआदनानं माझी त्या रशियन कुटुंबाशी ओळख करून दिली. माझी ओळख करून देताना, ''प्रख्यात प्रोफेसराचा मुलगा, आमच्या शेजारचा जमीनदार'' असं सांगायची. ह्या कुटुंबाबरोबर बोलताना ती फक्त आमच्या इस्टेटींविषयी, शेतात होणाऱ्या पीकपाण्याविषयी बोलत होती आणि अशा वेळी ती जे सांगतेय त्याला मी साक्षीदार आहे असं दाखवंत होती. तिला असं दाखवायचं होतं की

ती एक बडी जहागिरदारीण आहे. असं करण्यामागचा तिचा हेतू पूर्णत: सफल झाला होता. जन्मजात खानदानी स्त्री असण्याचं नाटकं तिनं हुबेहुब वठवलं होतं. तसं बघितलं तर मुळात जन्मानं ती श्रीमंत जमीनदाराचीच मुलगी होती.

''माझी आत्या कशी आहे बघ ! ती अचानक माझ्याकडे पाहून डोळे मिचकावत म्हणाली, ''माझी आणि तिची थोडी वादावादी काय झाली नि ती 'मिरान' ला निघून गेली. काय म्हणायचं काय ह्या बेजबाबदार बाईला?''

थोड्या वेळानं बागेत हिंडताना मी तिला विचारलं. ''मघाशी तू कुठल्या आत्याविषयी बोलत होतीस ? ही आत्याची आणखी काय भानगड आहे ?''

''स्वत:ला संकटमुक्त करण्यासाठी मारलेली ती एक लोणकढी थाप होती,'' अरिआदना हसायला लागली, ''इथल्या लोकांना सुगावासुद्धा लागायला नको होता की मी कोणा बाईच्या सोबतीशिवाय इथं आलेय म्हणून'' त्यानंतर मिनिट दोन मिनिट ती चुपचाप बसली होती. मग ती मला अगदी खेटून बसली नि म्हणाली, ''माझ्या राजा, त्या लुबकवशी मैत्री का नाही करत ! तो बिचारा फारच दुर्दैवी आहे रे ! त्याची बायको, आई विचित्रच आहेत सगळे, एकाच माळेचे मणी !

लुबकवशी बोलताना ती त्याला 'तुम्ही' म्हणून संबोधत असे. निजायला जाताना त्यालापण मला म्हणायची तसंच शुभरात्री म्हणायची. त्या दोघांच्या खोल्या वेगवेगळ्या मजल्यावर होत्या. त्यामुळे मला वाटायला लागलं की आपण उगीचच शंका घेत होतो. सगळाच मूर्खपणा झाला आपला. त्यांच्या दोघांचे काही लफडं बिफडं नाहीये. त्यामुळे दुसऱ्या दिवशी ती दोघं भेटल्यावर माझ्यावरचं दडपण गेलं. लुबकवनं जेव्हा माझ्याजवळ तीनशे रुबल्स उधार मागितले तेव्हा मी ते मोठ्या आनंदाने देऊ केले.

दररोज आम्ही नुसते हिंडत होतो आता पार्कात जायचो. की परत खाण्यापिण्याचा कार्यक्रम व्हायचा. त्या रशियन कुटुंबाबरोबर पण आमची रोज गाठभेट व्हायची, गप्पागोष्टी चालायच्या. इथली सर्वदृश्य हळू हळू माझ्या अंगवळणी पडू लागली होती. आपण बागेत गेलो तर आपल्याला तो कावीळ झालेला भ्रमिष्ठ म्हातारा, कॅथॉलिक पाद्री, हातात पत्त्यांचा पॅक घेऊन जाणारा ऑस्ट्रियन जनरल दिसणार. त्याला फक्त इथेच पेशन्सचा डाव मांडून खांदे उडवत बसणं शक्य होतं. तेन तेच संगीतपण ऐकायला लागत होतं. घरी आमच्या

गावात मी ह्या मंडळींबरोबर आठवड्याच्या कुठल्याही दिवशी सहलीला, मासे पकडायला जायचो ना त्यावेळी जर आम्हाला शेतमजूर दिसले तर माझं मलाच ओशाळल्यासारखं वाटायचं आणि इथे पण खासगी सेवक, गाडीवान, रस्त्यात भेटणारे कामगार पाहून मला अवघडल्यासारखं व्हायचं. मला असं वाटायचं की ते माझ्याकडे पहाताहेत नि म्हणताहेत, "तू काहीच काम कसं करत नाहीयेस ?" उजाडल्यापासून रात्रीपर्यंत प्रत्येक दिवशी मला शरमेनं खाली मान घालायला लागायची. भयानक, सुस्त, रटाळ असे दिवस होते ते. विरंगुळा फक्त एकाच गोष्टीचा होता, लुबकवनं माझ्याकडून आज शंभर रुबल्स उधार घेतले, उद्या पन्नास गुलदेनची सुटी नाणी मागितली वगैरे वगैरे. पैसे मिळाल्याबरोबर अंगात वारं संचारायचं त्याच्या. मॉर्फीयाचं व्यसन असलेल्या माणसाला मॉर्फियाचं इंजेक्शन घेतल्यावर जसं होतं ना तसं. मोठमोठ्यानं हसायला लागायचा तो. त्यावेळी तो स्वत:ची बायकोची, त्याला पैसे उधार देणाऱ्या सावकारांची सगळ्यांची टिंगल करायचा.

आणि मग एक दिवस पाऊस पडला, हवेत गारवा आला. आम्ही इटलीला जायला निघालो. मी वडिलांना तार करून कळवलं की त्यांनी मला रोमला बँकेचा सातशे रुबल्सचा ड्राफ्ट पाठवावा. रोमला जाता जाता आम्ही व्हेनिसला, बोलोन्याला, फलॉरेन्सला भेटी दिल्या. प्रत्येक ठिकाणी आम्हाला महागडं हॉटेल मिळायचं आणि प्रत्येक ठिकाणी आमच्याकडून लाईटसाठी, नोकरांसाठी, खोली गरम ठेवण्यासाठी, नाष्ट्यात देण्यात येणाऱ्या ब्रेडसाठी आणि सर्वसामान्य लोकांपेक्षा वेगळ्या अशा दालनात जेवणासाठी देण्यात येणाऱ्या परवान्यासाठी, असे वेगवेगळे पैसे उकळले जायचे तिथे. आम्ही भरमसाट खायचो, सकाळी आम्हाला कॉफी आणि हलकासा फराळ द्यायचे. एक वाजता नाष्टा व्हायचा, मटण, मासे, कुठल्यातरी प्रकारचं ऑम्लेट, चीज, फळं आणि दारू. सहा वाजता आठ कोर्सचं जेवण. दोन कोर्समध्ये लांबच लांब मध्यंतर असायचा. त्या वेळी आम्ही बियर, वाईन काहीतरी घ्यायचो. रात्री नऊ वाजता चहा. मध्यरात्री अरिआदना फर्मान काढायची की तिला काहीतरी खावंसं वाटतंय मग हॅम आणि अर्धवट उकडलेली अंडी मागवायची ती. तिला सोबत म्हणून मग आम्ही पण खायचो नि प्यायचो. ह्या खाण्यांच्या मधल्या वेळात आम्ही संग्रहालय, प्रदर्शनांना भेटी द्यायचो. पण सगळ्यांच्या मनात एकच विचार

असायचा कि नाष्टा, जेवण ह्यातलं काही चुकता कामा नये. तिथल्या त्या चित्रांपुढे उभं राहून राहून मी अगदी कंटाळून गेलो होतो. मला घरी जाऊन चक्क ताणून द्यावंसं वाटायचं, मी थकायचो अगदी. डोळ्यानं खुर्ची शोधत असायचो आणि तोंडापुरतं लोकांपाठोपाठ तोच तोच पाढा वाचायचो ''किती सुंदर, वाहवा'' ! ''हवा काय छान आहे नाही आज ?'' वगैरे वगैरे आम्ही जणू खाऊन पिऊन माजलेले वळू ! आमचं लक्ष फक्त चमकणाऱ्या वस्तूंकडे असायचं. तिथल्या दुकानांच्या त्या शोभिवंत खिडक्यांनी आम्हाला मंत्रमुग्ध केलं होतं. आम्हाला नकली, फालतू वस्तूंचा मोह पडायचा. त्यामुळ ढीगभर, निरूपयोगी, कवडीमोलाच्या वस्तू खरेदी केल्या आम्ही.

रोममध्ये पण तीच अवस्था झाली. इथेपण पाऊस पडला होता. हवेत गारवा आला होता. खूप तळकट तेलकट पदार्थ नाष्ट्यात खाल्ले होते आम्ही आणि सेंट पीटरच चर्च पहायला गेलो. भरपेट खाण्यामुळे किंवा कदाचित वाईट हवामानामुळे असेल पण त्या पवित्र जागेनं आमच्यावर काहीच छाप पाडली नाही. आम्ही एकदुसऱ्याला त्याच्या कलेविषयीच्या आरसिकपणाबद्दल दूषणं देऊ लागलो आणि क्षुल्लक गोष्टींवर वाद घालत बसलो.

वडिलांकडून मला पैसे आले होते. ते आणण्यासाठी माझ्या आठवणीप्रमाणे मी सकाळीच निघालो होतो. माझ्याबरोबर लुबकवही जायला निघाला.

''तुमच्या मानेवर जर भूतकाळाचं जोखड असलं तर वर्तमानकाळ तुम्हाला भरभरून सुख देऊ शकत नाही'', तो म्हणाला, ''माझी अगदी तश्शीच अवस्था आहे. पैसे असले तरीसुद्धा दुर्दैव पाठ सोडीत नाही. तुम्हाला खरं नाही वाटायचं की आज मितीला माझ्याजवळ फक्त आठ फ्रँक्स शिल्लक आहेत म्हणून,'' तो हळू आवाजात पुढं बोलू लागला, ''शिवाय मला बायकोला शंभर रुबल्स पाठवायला हवेत आणि तितकेच आईलापण. इथलाही खर्च आहेच. अरिआदना म्हणजे एक लहान मूलच आहे. आलेल्या परिस्थितीला तोंड देण्याची तिला इच्छा नाहीये. एखाद्या डचेससारखी पैशाची उधळपट्टी करीत असते ती. आता काल तिला नवीन घड्याळ घ्यायचं काय कारण होतं ? तुम्ही मला सांगा आपण चारित्र्यसंपन्न माणसं आहोत असं नाटक करंत राह्यचं तरी काय कारण आहे. नोकराचाकरांपासून आणि ओळखीच्या लोकांपासनू आमचे दोघांचे संबंध लपवून ठेवत असतो आम्ही. त्याच्यासाठी आम्हाला रोजाना दहा पंधरा फ्रँक्स

जास्त खर्चावे लागतात, दोघांना दोन वेगवेगळ्या खोल्या घ्याव्या लागल्या आहेत. मला कळतंच नाही हे सगळं कशासाठी ?''

माझ्या छातीवर परत तो अणकुचीदार दगड आला. मला अज्ञात असं काही उरलं नाही, शंकेला कुठं जागाच राहिली नाही. सगळ्याच गोष्टींचा स्पष्ट खुलासा झाला. माझे हात पाय थंडगार पडले आणि त्या क्षणी मी निश्चय केला की त्या दोघांना न विचारता दूर पळ काढायचा, ताबडतोब घरी निघून जायचं...

''एखाद्या स्त्री बरोबर संबंध ठेवणं सोपं असतं,'' लुबकव पुढे म्हणाला, पण ते छपवण्यासाठी सारवासारव महाकठीण ! सगळाच मूर्खपणा !''

मी वडिलांकडून आलेले पैसे मोजत असतानाच लुबकव म्हणाला, ''तुम्ही जर मला हजार फ्रॅंक्स दिले नाहीत ना तर माझ्यापुढे मरणाशिवाय दुसरा पर्याय उरणार नाही. तुमच्याकडून पैसे घेणे हा एकमेव मार्ग दिसतोय मला.''

मी त्याच्या हातावर पैसे ठेवले मात्र, पुन्हा तो उर्मट झाला. आपल्या तऱ्हेवाईक काकांचा उपमर्द करायला लागला, का तर म्हणे हे त्याचे काका त्याचा इथला पत्ता त्याच्या बायकोपासून गुप्त ठेवू शकले नाहीत. हॉटेलवर आल्यानंतर मी सामानसुमान आवरलं, हिशोबाप्रमाणे हॉटेलवर बिल चुकतं केलं. आता फक्त अरिआदनाचा निरोप घ्यायचं तेवढ बाकी होतं.

मी तिच्या खोलीच्या दारावर टकटक केली.

तिच्या खोलीत सकाळच्या वेळी असतो तसा अस्ताव्यस्त पसारा दिसत होता. टेबलावर चहाची किटली, अर्धवट खाऊन टाकलेला बनचा तुकडा, अंड्यांची टरफलं इत्यादी दिसत होतं. खोलीभर अत्तरांचा घुसमटवून टाकणारा घमघमाट सुटला होता. अंथरुण आवरलेलं नव्हतं. स्पष्ट दिसत होतं की त्यावर दोन माणसं झोपलेली असावीत. अरिआदना नुकतीच बिछान्यातून बाहेर आली होती. तिचे केस विस्कटलेले होते आणि अजून ती फ्लॅनेलच्या गाऊनमध्येच होती.

मी तिला अभिवादन केलं. ती केस नीटनेटके करीपर्यंत मिनिटभर मुकाट्यानं बसलो. माझ्या शरीराचा थरकाप होत होता. मी तिला विचारलं, ''कशासाठी तू मला इथं परदेशात बोलावून घेतलंस ?''

मला वाटतं मला काय म्हणायचं होतं ते तिला कळून चुकलं होतं. तिनं माझा हात हातात घेतला नि म्हणाली, ''मला वाटत होतं की तुम्ही इथे असावेत.

तुम्ही कसे अगदी सरळ, निर्मळ, आहात !''

माझ्या विमनस्कतेची, स्वत:च्या होणाऱ्या थरकापाची मलाच लाज वाटायला लागली. मला एकदम हुंदके यायला लागले. आणखी एकही शब्द न बोलता मी खोलीबाहेर पडलो आणि एका तासानंतर रेल्वेच्या डब्यात बसलेलो होतो. सबंध प्रवासात का कोण जाणे माझ्या डोळ्यापुढे गर्भवती अरिआदना येत होती. मला तिचा एकदम तिटकारा येऊ लागला. डब्याडब्यातून आणि स्टेशनांवरून ज्या ज्या बायका मला दिसल्या त्या सर्वजणी गर्भवती असाव्यात असं वाटायला लागलं. त्यांची पण मला चीड आली आणि त्या अगदी फालतू, क्षुद्र वाटायला लागल्या. माझी अवस्था एखाद्या हावऱ्या, कमालीच्या स्वार्थी माणसासारखी झाली होती, ज्याची सगळी सोन्याची नाणी नकली निघाली. जी निष्कलंक, मोहक व्यक्तिचित्रं मी माझ्या कल्पनाविश्वात अनेक वर्षे रंगवली होती त्यांना आज तडे गेले होते. माझे संकल्प, आशा आकांक्षा, माझे संस्कार माझा प्रेमाच्या संबंधीचा दृष्टिकोन ह्या सर्व गोष्टी मला हसताहेत, माझी खिल्ली उडवताहेत, मला वाकोल्या दाखवताहेत. मला शिसारी आली. मी स्वत:लाच प्रश्न विचारला, अरिआदनासारख्या तरुण, रूपवान, सुशिक्षित सिनेटरच्या मुलीनं लुबकवसारख्या अति सामान्य, भंपक, असभ्य फडतूस माणसाशी कसा संबंध ठेवला ? पुन्हा वाटलं, तिनं लुबकववर का म्हणून प्रेम करायचं नाही, माझ्यापेक्षा काय कमी आहे त्याच्यात. जाऊ दे, करेना का ती कोणावरही प्रेम. मला काय करायचंय. तरी पण माझ्याशी तिनं खोटं कशाला बोलायचं ? पण मी म्हणतो तिच्यालेखी मी कोण की ज्याच्या जवळ तिनं आपलं मन मोकळं करावं. थोडक्यात काय झाला तो सर्व माझाच मूर्खपणा म्हणायचा. माझ्या डब्यातली हवा खूप थंड झाली होती. मी खरं तर पहिल्या वर्गातून प्रवास करीत होतो. पण इथे तर एका कोचावर तीन तीन जण बसले होते, दोन कोचांची चौकट तुटली होती. शेजारचं दार कूपेत उघडत होतं. मला तर खुंटाला जखडून ठेवल्यासारखं, चिमटल्यासारखं, कुठेतरी फेकून दिल्यासारखं, अगदीच दयनीय, बिकट अवस्थेत असल्यासारखं वाटत होतं. माझे पाय गारठून गेले होते. ह्या अवघडलेल्या अवस्थेतसुद्धा माझ्या डोळ्यांसमोर सकाळचे ते चित्र हुबेहुब उभं राह्यलं. आपल्या विस्कटलेल्या केसात आणि गाऊनमध्ये असतांनाही ती कुठल्याही पुरुषाला भुरळ पाडू शकत होती. पराकोटीच्या अशा मत्सरानं मला घेरून टाकलं होतं.

मी एकदम बसल्याजागीच ताडकन उठून उभा राह्यलो. शेजारचे प्रवासी गडबडून गेले आणि माझ्याकडे कुतुहलाने पाह्यला लागले. घरी आल्या आल्या मी हिमवादळात सापडलो. पारा वीस अंशाच्या खाली गेला होता. मला हिवाळा फार आवडतो. कारण, हिवाळ्यात घरी किंवा बाहेर गोठलेल्या बर्फातसुद्धा मला मात्र गरम वाटायचं. आखुडसा ओव्हरकोट आणि फेल्टबूट घालून हिवाळ्यातल्या निरभ्र दिवशी बागेत नाहीतर अंगणात छोटं मोठं काम करायला, किंवा तेज गरम केलेल्या माझ्या खोलीत वाचत बसायला, वडिलांच्या खोलीत फायरेप्लेस समोर बसायला, नाहीतर सार्वजनिक स्नानगृहात अंघोळ करायला खूप मजा येते. फक्त आई, बहीण, लहान मुलं घरात असायला हवीत. नाहीतर संध्याकाळच्या वेळी का कोण जाणे उदासवाणं, शांत शांत वाटतं. वेळ जाता जात नाही. परदेशाहून परतल्यावरच्या त्या हिवाळ्यातपण संध्याकाळची वेळ संपता संपत नसे, बेचैनी यायची. त्यामुळे वाचायलाही मन करायचं नाही. दिवसा तरी मी इकडे तिकडे काहीतरी करत बसायचो. बागेतलं बर्फ साफ करायचो नाहीतर कोंबड्यांना, वासरांना खायला घालायचो. पण संध्याकाळच्या कातरवेळी मात्र हुरहुरल्यासारखं व्हायचं.

पूर्वी मला घरी पाहुणे आलेले फारसे आवडायचे नाहीत. पण आता मात्र ते आले तर आनंदच व्हायचा. कारण मला माहीत होतं की आमच्या गप्पागोष्टीत अरिआदनाचा विषय हमखास निघणार. मांत्रिक कतलोविच बहिणीची विचारपूस करायला बरेचदा यायचा आमच्याकडे. कधीकधी त्याच्याबरोबर अरिआदनावर माझ्यापेक्षा कांकणभर जास्तच प्रेम करणारा त्याचा मित्र. राजपुत्र माकतुयेवपण यायचा. अरिआदनाच्या खोलीत बसून तिच्या पियानोच्या खुंट्या फिरवणं, तिची गाण्याची वही पाहणं ही ह्या जमीनदाराची गरजेची बाब होऊन बसली होती. तसं केल्याशिवाय त्याला चैनच पडायचं नाही. शिवाय त्याचा आजोबा इलारिओनचा, आत्मा कायमच भविष्यवाणी सांगत असायचा की आज ना उद्या अरिआदना त्याची बायको होणारच. हा जमीनदार आमच्याकडे पण कधीकधी सकाळी नाष्ट्यापासून रात्री उशीरापर्यंत येऊन बसायचा. मात्र तोंडातून एक शब्दही काढायचा नाही. मुकाट्या मुकाट्यानं बीअरच्या दोन-तीन बाटल्या रिचवायचा. मधूनच आमच्या गप्पात भाग घेतोय असं दाखवण्यासाठी वेडपटासारखं केविलवाणं हसायचा. घरी परतायच्या आधी न चुकता मला

एकीकडे नेऊन तो विचारायचा, ''तुम्ही अरिआदनाला शेवटी केव्हा भेटला होतात हो ? तिची प्रकृति ठीक होती ना ? मी धरून चाललोय की तिला तिथं कंटाळा नसेल आला.''

वसंत ऋतूचं आगमन झालं. आता कामाला लागायला हवं होतं. ह्या मोसमातल्या पिकांची आणि कल्येवेरची लागवड करायची होती. इतके दिवस कसं उदास उदास वाटत होतं. पण आता मात्र वसंत ऋतूला साजेसं म्हणजे हातातून निसटलेल्या गोष्टींशी समजोता करावासा वाटत होता. शेतात काम करीत असताना लावी पक्षिणीची किलबिल ऐकता ऐकता मी स्वत:लाच विचारत होतो की आपल्या नशिबाचा एका झटक्यात सोक्ष मोक्ष लावायला नको का ? थोडाही विलंब न करता एखाद्या साध्याभोळ्या शेतकऱ्याच्या मुलीशी लग्न करून मोकळं व्हावं का ? कामाचा इतका रेटा असताना अचानक अरिआदनाचं इटॅलियन तिकीट लावलेलं पत्र येऊन धडकलं, ती कल्येवेरची लागवड, मधुसंचयिका, बासरं आणि ती शेतकऱ्याची मुलगी सगळ्या गोष्टी धुरासारख्या दाही दिशांना विरून गेल्या. ह्या खेपेला अरिआदनानी लिहिलं होतं की तिच्या दु:खाला पारावार राहिला नाहीये. तिनं मला टोमणा मारला होता की मी तिला मदतीचा हात पुढे केला नाही, स्वत:च्या गुणवत्तेच्या निकषाच्या उंचीवरून तिच्याकडे पहात बसलो आणि ऐन संकटात असताना तिला वाऱ्यावर सोडून दिलं. हे सगळं तिनं रागारागात, मोठ्या, ठळक अक्षरात लिहिलं होतं. कुठेकुठे पेन्सिलीनं खुणा केल्या होत्या. कुठे डाग पडले होते. स्पष्ट दिसत होतं की पत्रं लिहिताना तिला असह्य यातना होत होत्या आणि तिनं ते घाईघाईनं खरडलं होतं. पत्राच्या शेवटी तिनं विनवलं होत की मी तिकडे यावं आणि ह्या सगळ्यातून तिला मुक्त करावं. परत एकदा माझ्या अंगात भूत संचारलं आणि ते मला तिच्याकडे घेऊन गेलं. अरिआदना रोममध्ये राहात होती. मी तिच्या घरी संध्याकाळी उशीरा पोहोचलो. मला पाहिल्याबरोबर ती हुंदके द्यायला लागली आणि माझ्या गळ्यात पडली. एवढा हिवाळा गेला होता पण तिच्या देखणेपणात काडीइतकाही बदल झाला नव्हता. ती तशीच तारुण्यानं मुसमुसलेली, मोहक दिसत होती. आम्ही एकत्र जेवण घेतलं आणि उजाडेपर्यंत रोमभर भटकत राहिलो. सबंध वेळ ती झाल्यागेल्या गोष्टींविषयी बोलत होती. मी तिला लुबकव सध्या कुठे आहे म्हणून विचरलं, ''मला त्या जनावराची आठवणसुद्धा करून

देऊ नकोस'', ती ओरडून म्हणाली, ''मला त्या दुष्टाचा तिटकारा येतो.''

''पण मला तर वाटलं तुझं त्याच्यावर प्रेम होतं.''

''कधीसुद्धा नव्हतं ! पहिले काही दिवस मला त्याच्या वागण्यात अपूर्वाई वाटायची आणि त्याची दया यायची एवढंच. नंबर एकचा उद्धट आहे तो. जबरदस्ती करतो म्हणून बायकांना त्याचं आकर्षण वाटतं. पण ह्या पुढे आपण त्याचाविषयी मुळीच बोलायचं नाही. तो म्हणजे माझ्या आयुष्यातील काळेकुट्ट पान आहे. आता तो पैसे आणण्यासाठी रशियात गेला आहे. तिथेच त्याच्या जाळ्यात कोणीतरी अडकण्याचा संभव आहे ! मी त्याला इथे परत न येण्याची ताकीद दिलीय.'' आता ती हॉटेलात नव्हती राहात तर दोन खोल्यांच्या घरकुलात राहात होती. ते तिनं तिच्या आवडीप्रमाणं सजवलं होतं. ऐषआरामी पण निर्जिव, अचेतन वाटावं असं. लुबकव गेल्यानंतर तिनं आपल्या ओळखीच्या माणसांकडून जवळ जवळ पाच हजार फ्रँक्स कर्ज घेतलं होतं. माझ्या येण्यानं ती, मोठ्या संकटातून वाचली होती म्हणायची. मी धरून चाललो होतो की ह्या खेपेला तिला सरळ गावी घेऊन जायचं. पण ते काही जमलं नाही. तिला आता आपल्या देशाची ओढ लागली होती. पण तिथे गरिबीत काढलेल्या दिवसांच्या, तिथल्या उणीवांच्या, भावाच्या घरावरील गंजलेल्या छपरांच्या आठवणीनंसुद्धा तिला दु:ख होत होतं, तिच्या अंगावर शहारे येत होते. मी जेव्हा तिला माझा घरी परतायचा बेत सांगितला तेव्हा तिचा गळा दाटून आला. माझा हात दाबून धरत ती म्हणाली, ''नको, मी तिथे मनाला होणाऱ्या यातनांनीच मरून जाईन.''

त्यानंतर माझ्या प्रेमानं चवथा म्हणजे शेवटचा टप्पा गाठला होता.

''माझ्याशी मनात काही किल्मिष न ठेवता पहिल्यासारखं वागाल ना ? तुमचं थोडं तरी प्रेम माझ्या वाट्याला येईल का'', माझ्या अंगावर रेलून अरिआदना म्हणाली, ''तुम्ही स्वाभिमानी आहात, प्रत्येक गोष्टीबद्दल सांगोपांग विचार करता, झोकून द्यायला तुम्ही कचरता, परिणामाचा विचार करता म्हणून मला ते कंटाळवाणं होतं. तुमची विनवणी करते, प्रार्थना करते की तुम्ही माझ्याशी असं तुटकपणे वागू नका !...माझ्या निर्मळ, पवित्र प्रेमळ मित्रा माझं तुझ्यावर प्रेम आहे !''

मी तिचा प्रियकर झालो. निदान गेला महिनाभर तरी मी अगदी वेडा झालो होतो. फक्त आनंद आणि आनंदच उपभोगत होतो. तारुण्यानं

मुसमुसलेल्या, कमनीय शरीराला आलिंगन देणं, सुखोपभोग घेणं, दरवेळी आपण एखाद्या स्वप्नातून तर जागं होत नाही ना असं वाटणं आणि ती अरिआदना आपल्याजवळ आहे, आपली आहे ह्याची आठवण होणं ह्या सगळ्या गोष्टींचा स्वीकार करणं इतकं काही सोपं नव्हतं ! पण मला अखेर त्याची सवय झाली आणि हळूहळू सहजपणे मी माझ्या नवीन परिस्थितीशी जुळतं घेऊ लागलो. सर्वात पहिली गोष्ट म्हणजे मला कळून चुकलं की अरिआदनाचं पहिल्यासारखच माझ्यावर प्रेम नाहीये. पण आता गंभीरपणे कोणावर तरी प्रेम करावं असं वाटत होतं तिला. शिवाय एकाकीपणाची भीती वाटायला लागली होती. सर्वात महत्त्वाचं म्हणजे मी तरुण, सदृढ, हाडापेरानी मजबूत असा होतो आणि ती मात्र थंड प्रकृतीच्या माणसासारखी उदासिन होती. आम्ही दोघंही असं दाखवत होतो की आम्ही एकमेकांच्या उत्कट प्रेमात पडलोय. त्यानंतर मला आणखी कितीतरी गोष्टींचा उलगडा होत गेला.

आम्ही रोम, नेपल्स, फ्लॉरेन्समध्ये राह्यलो. पॅरीसला पण राह्यलो असतो पण तिथे जरा जास्त थंड वाटलं म्हणून आम्ही इटलीमध्ये परतलो. आम्हाला सगळीकडे नवरा बायको, श्रीमंत जमीनदार असंच समजत होते. त्यामुळे आमची ओळख करून घेण्यासाठी सर्वजण उत्सुक असत. अरिआदना तर चांगलाच भाव खात होती. ती निसर्ग चित्रकलेचे धडे घेत होती. म्हणून तिला सर्वजण कलाकार म्हणायचे. ते तिच्या व्यक्तिमत्त्वाला फारच शोभून दिसायचं. खरं तर तिच्यात कलागुण नावालाच होते. दररोज दुपारी तीन वाजेपर्यंत ती झोपलेली असायची. नाष्टा आणि कॉफी अंथरुणातच घ्यायची. जेवणाला सूप, खेकडा, मासे, ॲसपॅरागस, रानकोंबड्या मागवायची. नंतर ती आडवी व्हायची तेव्हा मी तिला अंथरुणातच काहीतरी चाऊ, माऊ, उदा. रोस्ट बीफ वगैरे द्यायचो. ते ती वाकडी तोंड करीत खायची. रात्री जाग आल्यावर सफरचंद नाहीतर संत्र्यांचा फलाहार असायचा तिचा.

ह्या बाईचं वैशिष्ट्य सांगायचं झालं तर तिची मूळ प्रकृती म्हणजे तिच्या रोमरोमात भिनलेली लबाडी. ती मिनिटामिनिटाला म्हणजे अगदी जरूर नसतानादेखील कायम फसवाफसवी करीत असायची. हे ती एखाद्या झुरळानं मिश्या हलवाव्यात किंवा चिमणीनं चिवचिव करावं इतक्या सहजतेनं करायची. ती माझ्याशी, नोकराचाकरांशी, हमालाशी, दुकानातल्या विक्रेत्यांशी, ओळखी-

पाळखीच्या माणसांशी. सगळ्या सगळ्यांशी बेमालूमपणे लबाडी करायची. तिच्याबरोबरच्या प्रत्येक संभाषणात, प्रत्येक भेटीत लपवालपवी करताना तिच्या चेहऱ्यावरची रेषासुद्धा हलायची नाही की अंगविक्षेप पण करायची नाही ती. आमच्या खोलीत एखाद्या नवख्या पुरुषानं प्रवेश केला, मग तो कुणी अधिकारी असू दे नाहीतर सरदार एका क्षणात तिची नजर, हावभाव आवाज इतकंच नाही तर शारीरिक हालचाली पण पालटून जायच्या. आमच्या त्या मुक्कामात तुम्ही एकदा जरी तिला भेटला असतात ना तर आमच्या इतकी उच्चभ्रू, गर्भश्रीमंत माणसं अख्ख्या इटलीमध्येसुद्धा पहायला मिळायची नाहीत असं तुम्हीसुद्धा म्हणाला असतात. एकही कलाकार किंवा संगीतकार तिच्या तावडीतून सुटला नसेल की ज्याच्यातील अप्रतिम कलागुणांची तिनं तोंडभर स्तुती केली नसेल.

"आपण केवढे मोठे कलावंत आहात!", गोड सुरेल आवाजात म्हणायची ती, "तुमच्या सहवासात आम्हाला अगदी अवघडल्यासारखं वाटतं हं. मला वाटतं तुम्ही लोकांना मध्यस्थामार्फत भेटायला हवं."

हे सगळं ती कशासाठी करायची तर आपण लोकांना आवडावं. त्यांना भुरळ पडावी आणि त्यात आपण यशस्वी व्हावं. ती झोपेतून जागी व्हायची तेव्हापासून तिला एकाच गोष्टीचा ध्यास असायचा, की सर्वांचा केंद्रबिंदू होण्याचा. तिच्या आयुष्याचं ते एकमेव ध्येय होतं. मी जर तिला म्हणालो असतो की अमक्या अमक्या रस्त्यावर अमुक घरात एक मनुष्य राहतो, त्याला ती अजिबात आवडत नाही तर ती ते कदापी सहन करू शकली नसती. कोणालातरी मोहाच्या जाळ्यात अडकवायचं, गुलाम बनवायचं किंवा कुणालातरी वेड लागायची पाळी आणायची हा तिचा दैनंदिन उपक्रम असायचा. मी तिच्या मुठीत आहे आणि थिल्लरपणे तिच्या कच्छपी लागलोय ह्या गोष्टी तिला भरभरून आनंद देऊन जायच्या. अशा प्रकारचा आनंद प्रतियोगिता जिंकणाऱ्या खेळाडूंनादेखील केव्हातरीच अनुभवायला मिळतो. माझा केलेला अवमान तिचा उत्साह वाढविण्यास पुरेसा पडत नव्हता म्हणून की काय ती रात्री एखाद्या वाघिणीसारखी अंगावर पांघरुण न घेता पालथी पडायची. तिला बारामहिने अठरा काळ गरमी होत असे. अशा वेळी ती लुबकवकडून आलेली पत्र मिटक्या मारत वाचायची. तिनं रशियात परतावं म्हणून तो त्यातून तिची विनवणी करीत असे, शपथेवर सांगत असे की तिनं जर असं केलं नाही तर

कुणालातरी लुटल्याशिवाय, ठार मारल्याशिवाय पैसे जमवून तिच्याकडे येण्याचा त्याच्यापुढे दुसरा मार्ग नव्हता. ती एकीकडे त्याचा द्वेष करायची. पण त्याची ती एखाद्या गुलामाने लिहिल्यासारखी उत्कट प्रेमाविष्काराने भरलेली पत्रे तिला बेचैन करायची. स्वत:च्या मोहकतेसंबधी तिच्या कल्पना विचित्रच होत्या. तिला वाटायचं माणसांच्या एखाद्या मेळाव्यात तिच्या सुंदर शरीरसौष्ठवाकडे, त्वचेच्या नितळतेकडे जर लोकांचं लक्ष गेलं तर तिनं इटलीच काय सर्व जगच जिंकलं. शारीरिक सौंदर्य आणि त्वचेचा रंग या विषयावरच्या तिच्या अघळ पघळ बोलण्यानं माझा मात्र पारा चढायचा. हे लक्षात आलं तर ती आणखीनच भडकायची. मला राग यावा म्हणून ती काहीतरी मूर्खासारखं, अडाण्यासारखं बोलायची, मला चिडवायची, एक दिवस तर अगदी कळसच झाला. त्या दिवशी एका बड्यालब्धप्रतिष्ठित बाईच्या बंगलीवर गेलो होतो आम्ही. कशामुळे आठवत नाही पण ती संतापली होती. मला म्हणाली, ''तुम्ही जर तुमचं उपदेश करणं थांबवलं नाहीत तर मी आत्ता सगळे कपडे काढून इथल्या ह्या फुलांवर लोळायला लागीन.''

ती निजली की कशी दिसते, कशी खाते, पिते, दृष्टिक्षेपात कसा दिलखुलासपणा आणायचे प्रयत्न करते हे पाहिल्यावर मला असं वाटायचं की देवानं हिला असामान्य रूप आणि तरल बुद्धी कशासाठी बहाल केलीय ? अंथरुणात लोळण्यासाठी, खाण्यासाठी आणि खोटं बोलण्यासाठी अगदी अखंड खोटं बोलण्यासाठी तर नाही ना ? हो, पण ती बुद्धिमान तरी होती का ? ती तीन मेणबत्त्या आणि तेरा तारखेला भ्यायची, वाईट नजर, घाणेरड्या स्वप्नांनी ती भयभीत व्हायची. स्वैराचार आणि एकंदरीतच साळढाळ मोकळं वागणं तिला बिलकुल कबूल नाही असा आव आणायची. 'तुर्गेनेव पेक्षा 'बोलेस्लाव मार्केविच' श्रेष्ठ आहे असा एखाद्या देवभोळ्या म्हाताऱ्या बाईसारखा तिचा विश्वास होता. त्याबरोबरच तिचा खट्याळपणा जीवघेणा होता, बुद्धी कुशाग्र होती आणि समाजात वावरताना ती किती प्रागतिक, सुशिक्षित विचारांची पुरोगामी बाई आहे, असं भासवायची हुशारीपण तिच्यात होती.

अगदी उत्कट आनंदाच्या क्षणीसुद्धा नोकराला अपशब्द बोलायला, त्याचा अपमान करायला, किडामुंगीसारख्या कीटकांना फटाफट मारायला तिचं मन थोडंसुद्धा कचरत नसे. बैलाच्या झुंजी तिला आवडायच्या. अपराध्याला दोषमुक्त

केलं तर तिला संताप यायचा.

ज्या तऱ्हेचं जीवन मी आणि अरिआदना जगत होतो ना त्यासाठी आम्हाला भरपूर पैशाची आवश्यकता होती. माझ्या गरीब वडिलांनी त्यांची पेन्शन, सर्व मिळकत मला पाठवली वेळोवेळी, माझ्यासाठी जे मिळेल ते छोटं मोठं काम केलं. पण एकदा जेव्हा त्यांनी माझ्या मागणीला "नाइलाज आहे" म्हणून नकार दिला तेव्हा मी हताशपणे त्यांना तार पठवली, इस्टेटीवर कर्ज काढायसाठी विनवलं. काही दिवसांनी गहाणखत करून मिळतील तेवढे पैसे पाठवायची गळ घातली. हे करा, ते करा अशी मी त्यांना सारखी गळ घालत होतो तरी देखील थोडीही कुरकुर न करता त्यांनी माझी विनंती मान्य केली. अगदी शेवटच्या कोपेकपर्यंत पैसे पाठवले. इकडे अरिआदनाची मात्र चैन चालली होती. तिचं ह्या सगळ्या गोष्टींशी काही देणंघेणं नव्हतं. तिच्या वेडपटासारख्या मागण्या पूर्ण करण्यासाठी मी जेव्हा हजार फ्रॅंकस तिच्यापुढे अक्षरश: फेकले आणि वठायला आलेल्या झाडासारखी नुसती कुरकुर केली तेव्हा तिनं प्रफुल्लित अंत:करणानं "प्रेक्षणीय नेपल्सला अखेरचा सलाम." हे इटॅलियन गाणं गायला सुरवात केली. हळूहळू तिच्याविषयीचं माझं आकर्षण ओसरायला लागलं. आमच्या-मधल्या संबंधाची मला लाज वाटायला लागली. मला गर्भावस्था आणि मुलाच्या जन्माच्या वेळी स्त्रीला होणाऱ्या यातना ह्या गोष्टी कधी आवडायच्या नाहीत. पण आता मात्र मी लहान बालकाची स्वप्न पाहू लागलो होतो. त्यामुळे तरी आमच्या ह्या संबंधाला कायदेशीर प्रतिष्ठा प्राप्त झाली असती. स्वत:विषयीच अति द्वेषाची भावना निर्माण होऊ नये म्हणून मी वस्तुसंग्रहालयं, कलादालनाला भेटी द्यायला सुरवात केली, पुस्तक वाचायला लागलो, आहार कमी केला, दारू पिणं सोडून दिलं. अशा तऱ्हेनं स्वत:ला रिंगणातल्या घोड्याप्रमाणे फिरवायचं ठरवलं. त्यानं मनावरचं दडपण कमी होईल असं मला वाटलं.

अरिआदनालापण माझा कंटाळा आला होता. सध्या अरिआदनाने ज्या माणसांवर छाप पडली होती ती सर्व मध्यमवर्गीय माणसं होती. मागल्याप्रमाणे त्या लोकांत मंत्री, राजदूत, दूतावासातील माणसांसारखी बडी धेंडं , त्यांच्या घोडागाड्या वगैरे काही नव्हतं. पैसे अपुरे पडत होते. ह्या सर्व गोष्टींनी तिला व्यथित केलं. तिला रडू कोसळायला जणू भाग पाडलं. शेवटी रशियात परत जायला तिची पण कसलीच हरकत नाही असं आर्जवानं म्हणाली ती. म्हणून हे

आम्ही रशियाच्या प्रवासाला निघालो आहोत. प्रवासाला निघायच्या काही महिने आधीपासून तिचा भावाशी सारखा प्रत्रव्यवहार चालला होता. असं दिसत होत की काहीतरी रहस्य ती दडवत होती. देव जाणे कुठलं ते. मला तिची लबाडी जाणून घेण्याचासुद्धा कंटाळा आला होता. आत्ता आम्ही सरळ आमच्या गावाला नाही जात आहोत तर याल्ताला नंतर याल्ताहून कॉकेशसमध्ये. आता तो फक्त थंड हवेच्या ठिकाणीच राहू शकते. तुम्हाला कल्पना नाही यायची की ह्या असल्या थंड हवेच्या ठिकाणाचा मला किती तिटकारा आहे. आणि मला तिथे किती घुसमटल्यासारखं होतं ते ! मला आता माझ्या गावाला जायचंय, कामाला लागायचंय, निढळाचा घाम गाळून शेतातून पीक काढायचय आणि झालेल्या चुकाचं परिमार्जन करायचय. आता माझ्यात खूप बळ आलंय अस जाणवतंय मला. ह्या माझ्या शक्तीचा कणन कण वापरून मी पाच वर्षांत इस्टेट खरेदी केली असती पण तुम्हाला दिसतंच आहे कसा गुंता झालाय इथं ते. रशीया म्हणजे काही परदेश नाही. मायभूमी आहे आपली ती. तिथं गेल्यावर कायदेशीर लग्नाचा विचार करावाच लागेल. एकमेकांचं आकर्षण वाटणं केव्हाच संपलंय, प्रेम पहिल्यांदाही नव्हतं आता तर त्याचा लवलेशही उरला नाहीये. तरीसुद्धा तिच्याशी लग्न करायला मी बांधील आहे.

आपल्या कर्मकहाणीमुळे अस्वस्थ झालेला शामोखिन आणि मी डेकवरून खाली उतरलो. आमच्या स्त्रियांविषयीच्या गप्पा चालूच होत्या. खूप उशीर झाला होता. त्याला आणि मला एकच खोली मिळाली होती.

''अजूनही ग्रामीण भागातली स्त्री, पुरुषांपासून स्वतंत्र झालेली नाही'', शामोखिन म्हणाला, ''तिथे त्याचं मत तेच तिचं मत आहे. आजही सगळी शक्ती एकवटून शरीर आणि मनाने ती सामाजिक बांधिलकीतून निसर्गाशी लढत असते. शहरी, उच्चभ्रू स्त्री मात्र बरेच दिवसांपासून स्वतंत्र झाली आहे. त्यामुळे की काय तिची मूळ प्रवृत्तीकडे वाटचाल सुरू झाली आहे. अर्ध्या वाटेतच तिच्यात मानवी जीवनात डोकावणारे पशुत्व जागृत झाले आहे आणि मानवाने आपल्या हुशारीने जी सांस्कृतिक उन्नती केली होती त्यातील बराचसा भाग ती गमावून बसली आहे.तिची जागा प्राचीन स्त्रीतल्या मादीनं घेतली आहे. बुद्धिवादी स्त्रीचा हा मागासलेपणा संस्कृतीला गंभीर संकटात आणतोय. तिच्या ह्या अधोगतीच्या मार्गक्रमणात ती पुरुषाला आपल्या अंकित बनवण्याचा प्रयत्न

करते, त्याच्या मार्गातील धोंड बनते ह्यात शंकेला जागाच नाही.''

मी त्याला विचारलं, ''एका अरिआदनाच्या उदाहरणावरून एकूण एक शहरी स्त्री-वर्गाला का दोषी ठरवायच? शिक्षणा विषयीची आणि स्त्रीपुरुष समानतेसाठीची धडपड हीच माझ्यादृष्टीने प्रामाणिक आणि योग्य दिशेने टाकलेले पाऊल आहे आणि स्त्रीच्या प्रतिगामी वाटचालीच्या गृहीताला छेद देणारे आहे. पण शामोखिनने माझ्या बोलण्याकडे कानाडोळा केला आणि तो अविश्वास-दर्शक हसला. ''तुमचं विधान स्त्री जातीचा भयंकर तिटकाराच दर्शवते. मग त्याच्यावर मात करण अशक्य आहे.''

''अरे बाबा, पुरे झालं तुझं'', तो मध्येच म्हणाला, ''एकदासुद्धा स्त्री मला माणूस म्हणून, आपल्या बरोबरीचा म्हणून समजत नाही तर एका मादीच्या दृष्टीने पहाते. मला ती आवडावी ह्या एकाच उद्देशानं ती आयुष्यभर झटत असते, माझ्यावर कुरघोडी कशी करता येईल ह्याच प्रयत्नात असते ती सारखी. ही कुठली आली आहे पूर्ण वास्तवता ? बाबारे, ह्या बायकांवर कधी विश्वास ठेवू नये. त्या फार कावेबाज असतात ! आपण पुरुष स्त्री स्वातंत्र्यासाठी धडपडत असतो पण त्यांना ते स्वातंत्र नकोच आहे. त्या फक्त तसा आव आणत असतात. भयंकर लबाड, अति धूर्त असतात त्या !''

मला त्याच्याशी वादविवाद करण्याचादेखील कंटाळा आला होता. चक्क झोपावंसं वाटत होतं. मी भिंतीकडे तोंड वळवलं.

''हो, मी म्हणतो तेच'', मी गुंगीतच ऐकलं, ''हो, तेच खरं आहे. ह्या सगळ्याला जबाबदार जर काही असेल ना तर ते म्हणजे आपलं पालनपोषण, संगोपन असतं बाबा. सगळ्या तथाकथित सुसंस्कृत, सुशिक्षित शहरी स्त्रिया अक्षरश: एकाच गोष्टीच्या पाठीमागे लागलेल्या असतात की त्यांच्यातल्या पाशवी वृत्तीला काहीही करून जोपासायचं. म्हणजे मग पुरुषांना त्या आवडतील आणि त्यांच्यावर त्या कुरघोडी करू शकतील. हो, असंच, शामोखिननं उसासा सोडला. मुलामुलींचं संगोपन एकत्र होण्याची आणि सहशिक्षणाची अतिशय जरूरी आहे. स्त्रीला लहानपणापासून असं पटवून द्यायला हवं की ती पुरुषाइतकीच समर्थ आहे. तिच्या चुकांची तिला जाणीव करून द्यायला हवी. नाहीतर ती अशा भ्रमात असते की तिच्या हातून चूक कधी होणारच नाही. पाळण्यात असल्यापासून मुलीच्या मनावर ठसवायला हवं की पुरुष तिच्या

सर्वात जवळचा, प्रत्येक क्षेत्रात तिच्या तोलामोलाचा असा एक मित्र असतो, तो काही कुणी शिलेदार नाही, की फक्त तिचा नवरापण नाही. तर तिचा जिवाभावाचा मित्र आहे तिला विचार करायला एकचित्त राह्यला शिकवायला हवं. तिला समजवायला हवं की तिच्या स्नायूंचे वजन पुरुषाच्या स्नायूंपेक्षा जराही कमी नसतं. म्हणून तिनं शास्त्र, कला आणि सर्वच सांस्कृतिक समस्यांकडे आपपरभावाने पाहू नये, डावं, उजवं करू नये. बुटाच्या कारखान्यात किंवा एकाद्या रंगाऱ्याकडे काम करणाऱ्या बाल मजुराचे स्नायू मोठ्या माणसांच्या स्नायूंपेक्षा आकाराने लहान असतील तरी पण जगण्यासाठीच्या रोजगाराच्या जीवनाशी तो लढत असतो, राबराब राबतो. दुःख झेलतो. शारीरिक जडणघडण, गर्भावस्था, मुलाला जन्म देणं ह्याचंच तुणतुणं वाजवायची लागलेली सवय बायकांनी सोडायला हवी. त्याचं पहिलं कारण असं की स्त्रीला काही दर महिन्याला मुलाला जन्म द्यावा लागत नाही. दुसरं म्हणजे प्रत्येक बाईला मूल होतच असं नाही. तिसरं म्हणजे खेडूत स्त्री बाळंतीण होण्याच्या आदल्या दिवशी संध्याकाळपर्यंत शेतात काम करीत असते आणि त्याचा तिला काहीच त्रास होत नाही. ह्या खेरीज रोजच्या जीवनात स्त्रीपुरुषात संपूर्णपणे समानता असायला हवी. समजा, पुरुषानं स्त्रीला बसायला खुर्ची पुढे केली किंवा तिचा खाली पडलेला रुमाल उचलून दिला तर देईना का ? त्यात बिघडलं कुठे ? तिनी पण त्याची परतफेड तशीच करावी म्हणजे झालं. एखाद्या चांगल्या घरातल्या मुलीनं मला ओव्हरकोट घालायला मदत केली किंवा मला भांडभर पाणी दिलं प्यायला, तर मी तरी त्याला कधीच विरोध करणार नाही...''

मला झोपच लागली त्यामुळे तो पुढे काय बोलला मला काहीच माहीत नाही. दुसऱ्य दिवशी सकाळी आमची बोट सेवस्तपोल जवळ पोहोचत होती त्या वेळी अगदी घाणेरडी, दमट हवा पडली होती. बोट खूप हालत होती. शामोखिन आणि मी डेकवरच्या केबिनमध्ये बसलो होतो. तो अगदी गप्प होता, विचारत पडला होता. चहाची घंटा झाली तेव्हा ओव्हरकोटाची कॉलर वर केलेले पुरुष आणि खूप वेळ झोपल्यामुळे फिकट पांढरे चेहरे झालेल्या स्त्रिया जिन्यावरून खाली जाऊ लागल्या. त्यातली एक तरुणी अतिशय सुंदर होती. हीच ती वोलोचिस्कमध्ये कस्टममधल्या अधिकाऱ्याशी भांडणारी बाई. ती शामोखिन समोर उभी राहिली आणि एखाद्या फाजील, लाडावलेल्या मुलासारखा

चेहरा करीत म्हणाली, "जान, तुझा पक्षी आकाशाकडे झेपावला !"

त्या याल्तामध्ये माझा मुक्काम असताना ह्या सौंदर्यवतीला गजगतीने हेलकावत जाताना आणि तिच्या मागून मागून उगाचच रेंगाळत जाणाऱ्या दोन अधिकाऱ्यांना पाह्यलं. एक दिवस सकाळी एप्रन आणि फ्रिजीयन टोपी घालून समुद्रकिनाऱ्यावर बसून ती ब्रशने चित्र रंगवण्यात रमलेली दिसली. लोकांचा एक घोळका लांब उभं राहून तिची तारीफ करत होता. माझी पण तिच्याशी ओळख झाली. तिन अति उत्साहित होऊन हस्तांदोलन केले आणि गोड गोड आवाजात माझे आभार मानले. म्हणाली की माझं लेखन तिला खूपच आवडतं.

"खरं समजू नका हं, ती काय बोलतेय ते", शामोखिन हलकेच पुटपुटला, "तुमचं कोणचंही लिखाण तिनं वाचलेलं नाहीये."

मी संध्याकाळी बीचवर फिरायला गेलो असताना अचानक मला शामोखिन भेटला. त्याच्या हातात खाद्यपदार्थ आणि फळांची भली मोठी पिशवी दिसत होती.

"राजपुत्र माकतुयेव इथं आलाय !" तो आनंदाने हसत म्हणाला, "काल संध्याकाळी तिच्या त्या मांत्रिक भावाबरोबर आलाय तो. आता मला कळलं की त्यांचा कसला एवढा पत्रव्यवहार चालला होता ते ! "परमेश्वरा", आकाशाकडे पाहून आणि हातातलं ओझं छातीवर दाबून तो सांगू लागला, "तिच्या आणि त्या राजपुत्राच्या लग्नासंबंधी जर बोलणी चालली असतील तर ह्याचा अर्थ मी झालो मुक्त. मला गावी वडिलांकडे जायला कुठलाच अडथळा राहणार नाही !"

तो लगबगीनं पुढे जाता जाता म्हणाला, "माझा पण आता गेलेल्या आत्म्यावर विश्वास बसायला लागलाय !" इकडे तिकडे नजर टाकत तो ओरडला. "इलारिओन आजोबांच्या आत्म्याने केलेली भविष्यवाणी खरी ठरणारसं दिसतंय ! असं झालं तर काय मजा येईल !"

त्याच्या दुसऱ्याच दिवशी मी याल्ता सोडलं आणि शामोखिनच्या त्या प्रेमकथेचा काय शेवट झाला तो मात्र मला काही कळला नाही.

●●

अन्तोन चेखव (१८९५)

: ४ :

अर्धांगिनी

"मी तुला कितीदातरी बजावलंय की तू माझ्या टेबलाची साफसफाई करू नकोस म्हणून," निकलाय इवग्राफिच् म्हणत होता, तुझ्या त्या आवराआवरीनंतर एक गोष्ट जागेवर सापडेल तर शपथ, तार कुठं गेली इथली? दिलीस का फेकून ? शोधायची तसदी घ्या आता जरा. ती कझानहून आलेली कालच्या तारखेची होती बघ."

सडपातळ, निस्तेज, निर्विकार चेहऱ्याच्या मोलकरणीला टेबलाखालच्या टोपलीत बऱ्याचशा तारा सापडल्या. त्या तिनं डॉक्टरला दिल्या. पण त्या सगळ्या त्याच्या गावातल्याच पेशन्टस्नी धाडलेल्या निघाल्या. मग त्या दोघांनी दिवाणखान्यात आणि ओल्गा दिमत्रिएवनाच्या खोलीत शोधाशोध केली.

रात्रीचे बारा वाजून गेले होते. निकलायला माहीत होतं की त्याची बायको कमीतकमी सकाळी पाच वाजायच्या आधी घरी येणं शक्यच नाही त्याचा तिच्यावर विश्वास नव्हता. तिला घरी यायला उशीर व्हायला लागला तर त्याला झोप यायची नाही. त्याच्या मनात हजार शंकाकुशंका यायच्या आणि त्याचवेळी आपली पत्नी, तिचा तो बिछाना, आरसा, नेदर्लंडची चॉकलेटं, कुणीतरी रोजच्या रोज पाठवलेल्या आणि घरभर पसरलेल्या लिलीच्या आणि हियासिन्थच्या फुलांचा फुलवाल्याच्या दुकानातल्याप्रमाणे सुटलेला घमघमाट, सगळ्या सगळ्याची उबग आली होती त्याला. अशावेळी तो कोत्या मनाचा, चंचल, छिद्रान्वेशी वृत्तीचा माणूस व्हायचा. आत्ता पण पहाना काल त्याच्या भावाकडून आलेली ती तार आत्ताच्या आत्ता सापडायला हवी असा हट्ट होता त्याचा. तसं पाहिलं तर त्या तारेत विशेष असं काहीच नव्हतं. सणासाठीच्या शुभेच्छा होत्या नुसत्या.

त्याला बायकोच्या खोलीत टेबलावर पत्रं, पाकिटं वगैरे ठेवायच्या पेटीच्या खाली कुठलीतरी एक तार सापडली. ती त्यानं बारकाईनं निरखून पाहिली. ती

ओल्गासाठी त्याच्या सासूच्या नावावर आलेली, मोन्ते कार्लोहून मिशेल नावाच्या माणसाच्या सहीची होती...तारेतील मजकुराचा एक शब्दही डॉक्टरला कळत नव्हता. कारण ती कुठल्यातरी परभाषेत...बहुतेक इंग्लीशमध्येच लिहिलेली असावी.

''हा मिशेल कोण असेल बरं ? त्यानं ही तार मोन्ते कार्लोहून कशाला पाठवलीय ? शिवाय सासूबाईंच्या नावावर पाठवायचं काय कारण ?

आपल्या वैवाहिक जीवनाच्या सात वर्षांच्या काळात शंकेखोरपणाची, अंदाज बांधण्याची, पुराव्यांची शहानिशा करायची इतकी सवय झाली होती त्याला की त्याच्या डोक्यात कधी हे नाही आलं की ह्या घरगुती अनुभवाच्या जोरावर तो एक निष्णात गुप्तहेर होऊ शकला असता. आपल्या खोलीत येऊन विचार करायला लागल्या बरोबर त्याला आठवलं की दीड वर्षापूर्वी तो आपल्या पत्नीसह पिटरबुर्गला गेला होता. तेव्हा कयूब नावाच्या त्याच्या मित्राकडे त्यांना आणि त्यांच्याच एका शाळा मित्राला नाष्ट्यासाठी बोलावलं होतं. माहिती आणि तंत्रज्ञान शाखेत इंजिनिअरची पदवी घेतलेल्या त्याच्या ह्या मित्राने त्याची बावीस तेवीस वर्षांच्या मिखाईल इवानिच नावाच्या तरुणाशी ओळख करून दिली होती. त्याचं अडनाव दोन अक्षरी आणि जरा चमत्कारिकच होत-रीस. त्या प्रसंगानंतर दोन महिन्यांनी डॉक्टरने बायकोच्या आल्बममध्ये ह्या तरुणाचा फोटो पाहिला होता. फोटोखाली फ्रेंच भाषेत संदेश लिहिला होता, ''वर्तमान काळासाठी आणि भविष्य काळाच्या अपेक्षेने, आठवण म्हणून'' त्यानंतर हाच इसम त्याला एक दोनदा त्याच्या सासूकडे भेटला होता... आणि हे नेमकं त्याचवेळी घडत होतं जेव्हा त्याची बायको बरेचदा घरात गैरहजर असायची, तिला घरी परतायला पहाटेचे चार किंवा पाच वाजायचे आणि आल्याबरोबर मला आंतरदेशीय पारपत्र मिळवून द्या म्हणून धोशा लावायची ती. तो तिला नकार द्यायचा. अशा वेळी दोघांमध्ये दिवसभर खडाजंगी चालू असायची. नोकराचाकरांसमोर दोघांमध्ये चाललेल्या या लढाईची त्याला शरम वाटायची.

दीड वर्षापूर्वी त्याच्या डॉक्टर मित्रांनी त्याला क्षय झाल्याचं निदान केलं होतं आणि तिथला सगळा कामधंदा सोडून त्यानं हवापालट म्हणून 'क्रिमिया' मध्ये जावं असा सल्लापण दिला होता. ओल्गाला जेव्हा हे कळलं तेव्हा तिनं असा आव आणला की हे ऐकून ती अगदी घाबरून गेलीय. नवऱ्याचे लाड

करायचं नाटक सुरू केलं तिनं आणि परत परत त्याच्या मनावर ठसवण्याचा प्रयत्न करू लागली की क्रिमिया खूपच थंड अशी जागा आहे आणि तिथे त्यांना कंटाळापण येईल. त्यापेक्षा 'नित्से' मध्ये गेलेलं बरं. त्याची काळजी घ्यायला, देखभाल करायला, त्याला धीर द्यायला त्याच्याबरोबर जायला ती तयार आहे...

आत्ता त्याच्या डोक्यात प्रकाश पडला की पत्नीचा नित्से मध्येच जायचा का हट्ट होता. तिचा तो मिचेल, मोन्ते कार्लोमध्ये असतो ना !

त्याने इंग्लिश-रशियन शब्दकोश काढला, तारेतील शब्दांचे भाषांतर करून तर्काने त्याचा गोळाबेरीज अर्थ लावला आणि जेमतेम अशा प्रकारचं एक वाक्य तयार केलं; ''मी जिच्या प्रेमात पडलोय त्या माझ्या प्रेयसीच्या आरोग्यासाठी मी हा पेला तोंडाला लावतोय, तिच्या छोट्या पावलांचं हजारदा चुंबन घेतोय आणि तिच्या आगमनाची आतुरतेने वाट पाहतोय.'' त्याने कल्पना केली की बायकोच्या आग्रहाखातर जर त्याने नित्सेला जायला संमती दिली असती तर किती लाजिरवाणी आणि हास्यास्पद भूमिका त्याच्याकडून वठवली गेली असती ! घोर फसवणुकीच्या भावनोद्वेगानं तो फक्त रडायचाच बाकी होता. मनाची पराकोटीची चलबिचल झाल्यामुळं तो घरभर फेऱ्या मारू लागला. त्याच्यातला स्वाभिमान आणि त्याच्यात उपजतच असलेला असंस्कृत एककल्लीपणा उफाळून वर आला.

हाताच्या मुठी वळून, तिटकाऱ्यानं कपाळावर आठ्या घालून त्यानं स्वत:लाच प्रश्न केला, की, खेड्यातल्या धर्मगुरूचा मुलगा, सेमिनारीमध्ये लहानाचा मोठा झालेला, सरळसोट पण शिस्तीचा, पेशाने शल्यविशारद असा मी, मी ही अशी गुलामगिरी कशी पत्करली ? स्वत:हून असले निंद्य, नीच, खालच्या पातळीवरचे, स्वत्व हरवून टाकणारे कृत्य करण्यास मी कसा प्रवृत्त झालो ? ''छोटासा पाय ! तारेचा चुरगळून बोळा करीत तो पुटपुटला, ''छोटासा पाय म्हणे !''...

तो तिच्या प्रेमात पडला आणि त्याने तिला मागणी घातली. त्या दिवसापासून आजपर्यंतच्या लग्नानंतरच्या सात वर्षांच्या कालवधीतील फक्त तिचे लांबसडक सुवासिक केस, पोशाखावरील मऊ लुसलुशीत लेस आणि तिची इवलीशी पावलं, खरं सांगायचं झालं तर तिची ती कोमल, सुबक, मोहक

पावलं, एवढ्याच गोष्टी त्याच्या आठवणीत शिल्लक होत्या. आत्ता असं वाटतंय की पहिल्या पहिल्या आलिंगनसमयी हातातोंडावरून सळसळणाऱ्या रेशमी वस्त्राची आणि लेसची फक्त स्पर्शानुभूती त्याने हृदयाच्या एका कप्प्यात ठेवली आहे. बस्स, दुसरं काहीच नाही, कांगावा, किंचाळ्या, आरोपप्रत्यारोप, धमक्या, वंचना, मानहानी, विश्वासघात ह्या सर्व गोष्टी हिशोबात धरायच्या नाही. असं म्हटलं तर... त्याला बालपणीची एक गोष्ट आठवली. एक दिवस वडिलांच्या खेड्यातल्या घरात एक पक्षी उडत उडत घुसला. त्याने उगाचच आरशावर टोचे मारायला आणि घरातल्या इतर वस्तूंची नसधूस करायला सुरवात केली. अगदी हुबेहूब त्याचप्रमाणे त्याला अपरिचित अशा सामाजिक स्तरातून आलेल्या ह्या बाईनं त्याच्या जीवनात चंचुप्रवेश केला आणि त्याचं सर्व आयुष्यच उद्ध्वस्त करून टाकलं. आयुष्यातले सोनेरी दिवस नरकवासात गेले, सुखस्वप्नांची नुसती थट्टा झाली आणि त्यांची राखरांगोळी झाली. त्याचं शरीरस्वास्थ्य संपुष्टात आलं होतं. घराचा रंगमहाल झाला होता. दिवसभर कष्ट करून त्याने कमावलेल्या हजारो रुबल्सपैकी पाचदहा रुबल्ससुद्धा त्याला आईवडिलांना पाठवता येत नव्हते. उलट हजार पंधराशेच्या प्रॉमिसरी नोटा लिहून द्यायला लागत होत्या. त्याच्या घरात दरोडेखोरांची एखादी टोळी आली असती तरी सुद्धा त्यांच्या आयुष्याची अशी कल्पनातीत भरून न येणारी हानी नसती झाली, जशी आता ओल्गामुळे झाली होती.

त्याला खोकल्याची उबळ आली. दम लागल्यासारखं वाटू लागलं. अंथरुणात पडून उबदार पांघरुणात शिरायला हवं होतं पण तो तसं करू शकला नाही. तो खोल्यातून येरझारा घालत होता, मधूनच टेबलाशी बसायचा, घाईघाईनं कागदावर खरडायला लागायचा, "छोटी पावलं..."

पाच वाजायला आले होते. तो थकून गेला होता. स्वत:लाच दोषी ठरवायला लागला होता. त्याला वाटू लागलं की समजा ओल्गानं तिच्यावर प्रेमळपणानं चांगले संस्कार करू शकणाऱ्या माणसाशी लग्न केलं, तर कुणी सांगावं, कदाचित असंही होऊ शकेल की तिचं एखाद्या सहृदय गरती स्त्रीत रूपांतर होईल. मानसशास्त्राचा त्याला गंध नाहीये म्हणून त्याला स्त्रीमन कळत नसेल आणि त्यामुळेच तो असा अलिप्त, अरसिक झाला असावा...त्याच्या मनात विचार आला, "मी आता थोड्या दिवसांचा सोबती असणार आहे. मी

म्हणजे जेमतेम चालतं बोलतं प्रेतच आहे आणि एका जिवंत माणसात ढवळाढवळ करण्याचा मला अधिकार नाहीये. सद्य:परिस्थितीत नवरा म्हणून असलेल्या हक्का बिक्काची भाषा बोलणं मूर्खपणाचं आणि विक्षिप्तपणाचं ठरेल. मी तिला स्पष्टपणे सांगेन की तिनं आपल्या प्रियकराशी खुश्शाल लग्न करावं...मी तिला घटस्फोट देईन. इतकंच नाही तर झाल्या गेल्या गोष्टींबद्दल सर्व दोष स्वत:चाच आहे असं कबूल करीन...''

शेवटी पांढरा कलोक, टोपी आणि गमबूट अशा अवतारातील ओल्गा एकदाची घरी आली, सरळ आपल्या खोलीत जाऊन तिनं स्वत:ला आरामखुर्चीत झोकून दिलं.

''राग आणणारा. लठ्ठ पोरगा आहे तो,'' उसासे टाकत आणि हुंदके देत म्हणाली ती, ''खोटारडा कुठला, वाईट्ट आहे मेला.'' तिनं जोरजोरात पाय आपटले. ''मला नाही सहन व्हायचं ते, नाही पटत, मुळीच नाही खरं वाटत.''

''काय झालं तरी काय ?'', तिच्या जवळ जात निकलायनं विचारलं. ''मला सोडायला अझरबेकव म्हणून एक विद्यार्थी आला होता. त्यानं माझी पर्स हरवली कुठंतरी तिच्यात पंधरा रुबल्स होते. आईकडून घेतले होते ते मी.''

एखाद्या लहान मुलासारखी रडत होती ती. रुमालच नाही तर तिचे हात-मोजे देखील अश्रूंनी ओले चिंब झाले होते.

''त्यात काय झालं एवढं,'' डॉक्टरनं उसासा टाकला ''हरवले तर हरवले, देवाची मर्जी. तू आता शांत होशील का ? मला तुझ्याशी जरा बोलायचंय.''

''मी काही करोडोपती नाहीये अशी बेफिकिरी दाखवायला. तो म्हणतोय की मी ते पैसे फेडीन. पण माझा त्याच्यावरचा विश्वास उडालाय. अगदी गरीब आहे तो...''

नवरा तिला सारखं शांत व्हायला आणि तो काय म्हणतोय ते ऐकून घ्यायला सांगत होता आणि ती मात्र तो विद्यार्थी आणि तिचे हरवलेले पैसे ह्या शिवाय दुसरं काही बोलायलाच तयार नव्हती.

''जाऊ दे ग, मी उद्या तुला पंचवीस रुबल्स देईन. मग तर झालं. फक्त आत्ता तू गप्प बसायला काय घेशील?'' तो चिडून म्हणाला.

''मला कपडे बदलायला हवे आधी,'' ती रडत रडत म्हणाली, मी एखाद्या गंभीर विषयावर ओव्हरकोट घालून नाही बोलू शकणार, काही तरीच काय ?''

त्यानं तिचे गमबूट आणि ओव्हरकोट काढला. त्याचवेळी त्याला पांढऱ्या शँपेनचा वास आला. तिला ती अतिशय आवडायची, ती अगदी मनसोक्त प्यायची ती. आपली शान बिघडतेय ह्याची जरासुद्धा परवा न करता आज तिनं भरपेट खाल्लं होतं आणि ओतप्रोत शँम्पेन पण घेतली होती. आपल्या खोलीत जाऊन तिनं कपडे बदलले, तोंडाला पावडर फासली आणि थोड्या वेळानं रडवेल्या, सुजल्या डोळ्यांनी ती बाहेर आली. लेसचा हलकासा हाऊस कोट लपेटून आराम खुर्चीत विसावली ती. तिच्याकडे पहात पहाता दिवास्वप्नात रंगून गेलेल्या नवऱ्याचे लक्ष फक्त तिच्या पाठीवर रुळणाऱ्या केसांवर आणि बुटातल्या छोट्याशा पावलावर स्थिरावलं होतं.

"तुला कशाविषयी बोलायचं होतं माझ्याशी ?" खुर्ची हलवत हलवत तिनं विचारलं.

"आज माझ्या पाहण्यात सहजच ही..." असं म्हणत डॉक्टरनं तिच्यापुढं ती तार धरली.

तिने ती वाचली नि खांदे उडवले नुसते.

"मग त्यात काय झालं येवढं ? खुर्ची जोरजोरात हलवत ती म्हणाली, "ह्या नववर्षाच्या शुभेच्छा आहेत. दुसरं काऽऽही नाही. लपवाछपवी तर मुळीच नाही." तू अजून भ्रमात आहेस की मला काय इंग्रजी भाषा कळणार ह्यातली ! मला इंग्लिश येत नाही हे जरी खरं असलं तरी माझ्याजवळ शब्दकोश तर आहे ना. ही तार तुझ्या त्या रीसकडून आलीय. होय नां ? आपल्या प्रेयसीच्या आरोग्यासाठी तो दारूचे घोट घेतोय आणि तिचं हजारदा चुंबन घेतोय. पण ते जाऊ दे. हे सगळं जरावेळ बाजूला ठेवू या"..., डॉक्टर घाईघाईनं म्हणाला. "तुला दोष द्यायची आणि तमाशा करायची माझी मुळीच इच्छा नाहीये. लोकांसमोरची ती नाटकं, आरोप, प्रत्यारोप, खूप झालं ते सर्व. आता ह्या सगळ्या गोष्टी संपवायची वेळ आलीय. मी तुला हे सांगू इच्छितो की तू आता स्वतंत्र आहेस, तुला पाहिजे त्या पद्धतीनं तू आपलं जीवन जगू शकतेस."

दोघही जण क्षणभर स्तब्ध झाली. मग ती मुसमुसून रडू लागली.

आजपासून मी तुला नवनव्या क्लृप्त्या रचण्यापासून, खोटं बोलण्यापासून मुक्त करतोय", निकलाय पुढे बोलू लागला, तुला त्या रीसकडे परदेशात जायचं असलं तर जा तू. तू तरुण आहेस, निरोगी आहेस. मी आधीच रोगानं पछाडलोय

आणि आयुष्याचे दिवस मोजतोय. एका शब्दात सांगायचं तर...कळतंय ना तुला मला काय म्हणायचंय ते ?''

तो इतका भावनाप्रधान झाला की त्याच्या तोंडातून पुढं शब्दच फुटे ना. ओल्गानं रडत रडत आणि स्वत:लाच दोष देतांना माणसं जसा वेगळाच आवाज काढतात, तसला आवाज काढत कबूल केलं की तिचं रीसवर प्रेम आहे. त्याच्याबरोबर ती कितीदा तरी शहरापासून दूर स्केटिंगला गेली होती. त्याच्या खोलीवर देखील जायची ती आणि सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे तिची परदेशात जायची खूप इच्छा आहे.

''पाह्यलंस ना, मी तुझ्यापासून काहीसुद्धा लपवलं नाहीये,'' उसासा टाकत ती म्हणाली, ''माझ्या मनाची कवाडं मी तुझ्यापुढे उघडी केली आहेत. आज माझी तुला विनंती आहे की परदेशी जायचं पारपत्र तू मोठ्या मनानं मला मिळवून दे !''

''मी तुला परत परत तेच समजवतोय कि तू काहीही करायला स्वतंत्र आहेस.''

त्याच्या चेहऱ्यावरचा भाव न्याहाळण्यासाठी ती त्याच्या जवळ जाऊन बसली. त्याच्या बोलण्यावर तिचा विश्वास बसत नव्हता. त्याच्या मनातला हेतू जाणून घ्यायचा होता तिला. तिनं आजवर कोणावरही विश्वास ठेवला नव्हता. कोणाचा हेतू कितीही प्रांजल असला तरी त्याकडे पाहण्याची तिची दृष्टी मात्र पूर्वग्रहदूषित, कुत्सित असायची. त्यात तिच्या अहंकाराची छटा दिसायची. तिनं जेव्हा त्याच्या नजरेला नजर भिडवून पहायचा प्रयत्न केला तेव्हा तिला दिसलं की त्याच्या डोळ्यातून मांजरीच्या डोळ्यासारख्या हिरव्या रंगाच्या ठिणग्या पडताहेत.

''मग मला साधारण केव्हा पारपत्र मिळायची शक्यता आहे ?'', तिनं शांतपणे विचारलं.

त्याला झटकन असं वाटलं की 'कधीच नाही' असं म्हणावं, पण त्यानं स्वत:ला सावरलं आणि तो म्हणाला, ''तू म्हणशील तेव्हां.''

''मला फक्त महिन्यासाठीच जायचंय.''

''तू त्या रीसकडे कायमची सुद्धा जाऊ शकतेस. मी तुला सोडचिठ्ठी देतो, सगळा दोष स्वत:वर घेतो. म्हणजे मग रीसला तुझ्याशी विवाहबद्ध होण्यास

कुठलीच अडचण राहणार नाही.''

''पण मला कुठे हवीय सोडचिठ्ठी, आश्चर्यचकित होऊन ती एकदम म्हणाली, ''मी तुला सोडचिठ्ठी द्यायला नाही सांगत आहे, मला फक्त आंतरदेशीय पारपत्र मिळवून दे, म्हणजे झालं.''

''पण तुला सोडचिठ्ठी नको असायचं कारण काय ? तू एक विक्षिप्तच बाई आहेस अगदीच विक्षिप्त ! तुला त्या माणसाचं एवढं आकर्षण वाटत असलं आणि तो पण तुझ्यावर प्रेम करीत असला तर अशा परिस्थितीत तुम्हाला लग्नाशिवाय दुसरा सोयीस्कर पर्याय मला तरी दिसत नाही. लग्न करणं आणि लग्नाशिवाय एकत्र राहणं ह्यातलं कुठलं योग्य हे तुला कळत नसेल असं नाही वाटत मला.''

''तुला काय म्हणायचंय ते लक्षात आलंय माझ्या,'' त्याच्यापासून दूर जात ती म्हणाली. तिच्या चेहऱ्यावर आसूया आणि सूड यांचे मिश्रित भाव उमटले. ''मी अगदी चांगलं ओळखलंय तुझा काय हेतू आहे ते. तुला माझा कंटाळा आलाय आणि माझ्यापासून सुटकारा हवाय. त्यासाठी घटस्फोटाचा हा खटाटोप दिसतोय. मी तुझी आभारी आहे त्याबद्दल. पण मी इतकी काही दुष्ट बाई नाहीये हं. मी घटस्फोटाला मुळीच कबुली देणार नाही आणि तुला सोडून कायमची कुठेही जाणार नाही ! जाणार नाही म्हणजे जाणार नाही ! पहिली गोष्ट म्हणजे समाजातली आपली प्रतिष्ठा गमवायला माझी तयारी नाहीये.'' तिच्या बोलण्यात तो अडथळा आणील म्हणून ती भरभर बोलू लागली, ''दुसरं असं की मला सत्तावीस वर्ष पूर्ण होऊन गेली आहेत आणि रीस जेमतेम तेवीस वर्षाचा असेल आणखी एखाद्या वर्षात त्याला माझा कंटाळा येईल आणि तो केव्हाही मला सोडून जाईल आणि तिसरी गोष्ट तुला जाणून घ्यायची इच्छा असेल तर सांगते कि माझं त्याच्यावरचं हे प्रेम खूप दिवस टिकेल अशी ग्वाहीपण मला देता यायची नाही तुला, कळलं ना ? मी तुला सोडून जायची नाही.''

''मग मीच तुला घरातून घालवून देईन !'' पाय आपटत निकलाय ओरडला. आत्ताच हाकलून देतो की नाही ते बघायचंय ? नीच, अप्पलपोटी कुठली !''

''बघतेच की, कसं हाकलतोस ते,'' असं म्हणत ती खोलीत निघून गेली.

बाहेर चक्क उजाडलं होतं. पण डॉक्टर मात्र अजूनपर्यंत टेबलापाशी बसून भरकटल्याप्रमाणे कागदावर पेन्सिलिनं काहीतरी खरडत होता. ''माननीय सद्गृहस्थ हो...छोटंस पाऊल...मध्येच उठून फेऱ्या मारायला लागायचा. थोड्यावेळानं दिवाणखान्यात टांगलेल्या, सात वर्षांपूर्वी त्यांच्या लग्नानंतर लगेचच काढलेल्या फोटोकडे पाहात कितीतरी वेळ उभा राह्यचा. तो फोटो चारजणांचा होता. त्यात त्याचा सासरा, सासू, वीस वर्षाची त्याची नवोढा पत्नी ओल्गा आणि तरुण, सुखसंपन्न असा तिचा नवरा, म्हणजे तो स्वत:. त्याचा सासरा गुळगुळीत दाढी केलेला, गुबगुबीत गालाचा, खासगी गुप्त सल्लागार होता. तो लबाड, पैशाला हपापलेला असा होता आणि सासू गलेलठ्ठ, उदमांजरीसारख्या चेहऱ्यामोहऱ्याची, मुलीवर जिवापाड प्रेम करणारी आणि तिला सर्व प्रकारे मदत करणारी अशी होती. तिच्या मुलीनी जरी एखाद्या माणसाचं जिणं असह्य करून टाकलं असेल तरी ती मुलीला एका शब्दानी बोलायची नाही. उलट ती तिच्या पाठीशी खंबरीपणे उभी राह्यची, तिला पदराखाली घ्यायची. मुलीचे नाक-डोळे आईसारखेच होते. म्हटलं तर जरा जास्त बोलके नि करारी होते. तिची तुलना छोट्या उदमांजरीशी नाहीतर एखाद्या क्रूर, पाशवी जनावराशीच करायला हवी होती ! ह्या फोटोमधला निकलाय अगदी साधा, सज्जन, छोट्या चणीचा, सरळ, मोकळ्या मनाचा दिसत होता. त्याच्या चेहऱ्यावर सेमिनारी मधल्या मुलासारखं निरागस हास्य विलसत होतं. त्याची भोळसटासारखी समजूत होती की केवळ नशिबानं त्याची ह्या असल्या लबाड लोकांशी गाठ बांधली गेली आहे. पण तरीदेखील हीच माणसं त्याच्या जीवनाला कलाटणी देऊ शकतील, समाजात मानाचं स्थान मिळवून देतील आणि आजपर्यंत तो ज्या गोष्टीची स्वप्न रंगवत होता त्या सर्व गोष्टी साध्य करून देतील. अगदी शाळकरी मुलगा होता तेव्हापासून तो हे गाणं म्हणायचा, ''प्रेम नाही करू शकलास तर त्याचा अर्थ, आपल्या तारुण्याचा गळाच घोटलास...''

मनाच्या द्विधा मन:स्थितीत त्यानं स्वत:लाच परत एकदा प्रश्न विचारला की एका खेड्यातील धर्मगुरूचा मुलगा, सेमिनारीमध्ये वाढलेला, सरळ सोट शिस्तीचा माणूस तो. त्यानेच अशा अगदीच सर्वसाधारण, खोटारड्या, मिजासखोर, हीन प्रवृत्तीच्या त्याला अनाकलनीय अशा व्यक्तिमत्त्वाच्या बाईची गुलामगिरी कशी पत्करली ?

अकरा वाजता दवाखान्यात जाण्यासाठी त्याने कोट चढवला. एवढ्यात त्यांची मोलकरीण त्याच्या खोलीत आली.

"तुला काय पाहीजे ?", त्याने विचारले.

"बाईसाहेब निजून उठल्याहेत आणि त्यांनी तुम्ही काल कबूल केलेले पंचवीस रुबल्स मागितलेयत."

●●

अन्तोन चेखव (१८९५)



: ५ :

जन्मस्थानाच्या कुशीत

भाग १

डॉन नदीकाठचा रस्ता. एकाकी, सर्वदूर शुकशुकाट असलेलं, पांढऱ्या रंगानं स्टेपीमध्ये उठून दिसणारं, उदासवाणं रेल्वेस्टेशन होतं ते. त्याच्या भिंती उन्हाच्या झळांमुळे तापल्या होत्या नुसत्या. कुठही सावलीचं नामोनिशाण नव्हतं. निर्मनुष्य, चिटपाखरूही दृष्टीस पडायचं नाही असं ते स्टेशन होतं. आगगाडीनं तुम्हाला फलाटावर सोडून पुढे प्रयाण केलं होतं. तरी तिचा आवाज अजून थोडा थोडा ऐकू येत होता. शेवटी थांबला एकदाचा...स्टेशनच्या अवतीभोवती शांतताच शांतता होती आणि आमचे घोडे सोडून दुसरे कुणाचेही घोडे दृष्टीस पडत नव्हते. तुम्ही घोडागाडीत बसता-रेल्वेच्या डब्यापेक्षा ह्या गाडीत एकदम किती मजा वाटते. तुमची गाडी स्टेपीमधून जायला लागते आणि हळू हळू तुमच्या डोळ्यासमोरून मॉस्कोभोवती कधीही पहायला मिळणार नाहीत असे अगणित, भव्य, एकाच साच्याचे असले तरी अति आकर्षक असे देखावे झरझर सरकू लागतात. स्टेपी अन स्टेपी ! दुसरं काही दिसायचं नाही इथं. दूरवर दफन भूमीचा टेकाडावरील उंचवटा आणि पवनचक्की दिसत होती तेवढी. दगडी कोळसा वाहून नेणाऱ्या बैलगाड्या जवळून जात होत्या...एक एकटे पक्षी सपाट प्रदेशावरून कमी उंचीवरून आपल्या पंखांची नियंत्रित हालचाल करीत उडत होते आणि येणाऱ्या डुलकीला पळवून लावत होते. भयानक गरमी होती. एक दोन तास असेच गेले स्टेपी संपायचं काही लक्षण नव्हतं. दूरवरची दफनभूमी तितक्याच अंतरावर दिसत होती अजून. तुमचा गाडीवान मधून मधून चाबूक फडकावत दूरची कुठली तरी जागा दाखवत काहीतरी सांगत असतो. माझं मन तल्लीन झालं होतं आणि भूतकाळाविषयी विचार करण्याची त्याची तयारी नव्हती...

वेरा इवानवना कारदिनाला स्टेशनावरून आणण्यासाठी तीन घोड्याची 'त्रोयका' पाठवण्यात आली होती. गाडीवानानं सामान गाडीत टाकलं आणि घोड्यांची जोखडं नीट केली.

"जसं होतं अगदी तस्सच आहे जिकडे तिकडे," वेरा सभोवार नजर टाकून म्हणाली, "मागल्या खेपेला, म्हणजे दहा वर्षांपूर्वी मी इथं आले होते तेव्हा लहान मुलगीच होते मी. मला आठवतंय त्या वेळी मला न्यायला म्हातारा बरीस आला होता. काय रे, आहे का तो अजून ?"

गाडीवानानं प्रश्नाचं उत्तर दिलं नाही. त्याने आपल्या केसांच्या बटांमधून तिच्याकडे एक तीक्ष्ण कटाक्ष टाकला आणि उडी मारून आपल्या जागेवर जाऊन बसला तो.

स्टेशनापासून तीस कोस प्रवास करायचा होता. वेरा स्टेपीमधल्या निसर्ग सौंदर्यानं भारावून गेली होती. तिला भूतकाळाचा विसर पडला होता. केवढी मोकळी ढोकळी अनिर्बन्ध जागा आहे ही. हा एकच एक विचार मनात येत होता तिच्या. सुदृढ, बुद्धिमान, तारुण्यसंपन्न, सुंदर अशा तिला आजपर्यंत अशी ऐसपैस जागा आणि बंध मुक्तता कधीच लाभली नव्हती. आताशी कुठं तिला तेविसावं वर्ष लागलं होतं.

स्टेपी नि स्टेपी...घोडे धावताहेत, सूर्य वरवर येतोय... तिला वाटलं तिच्या लहानपणी स्टेपी इतकी संपन्न, साजिरी नव्हती दिसत. गवत भरभरून आलंय. हिरवं, पिवळं, गुलाबी, पांढरं असं नाना रंगानी नटलंय. गवतामधून आणि तावून सुलाखून निघालेल्या मातीतून एक प्रकारचा सुगंध दरवळतोय. वाटेनं जाताना कुठलेतरी अनोळखी, निळे पक्षी उडताना दिसताहेत. देवाला साकडं घालण्यासाठी त्याची प्रार्थना करायची तिला सवय नव्हती पण आत्ता डोळ्यावर आलेली झापड झटकून टाकत ती पुटपुटायला लागली, "देवा इथं मला सुख लाभेल असं काहीतरी कर."

तिच्या मनाला एक प्रकारची शांती आली. गोड स्वप्नात ते रंगून गेलं. जणू काही आयुष्यभर असंच स्टेपीमधून प्रवास करायला मनानं संमती दिलीय. अचानक ओक आणि आल्डरच्या झाडांची नवीनच लागवड केलेली खोल दरी समोर येऊन ठाकली. हवेत दमटपणा जाणवायला लागला. खालून पाण्याचा झरा वहात असावा बहुतेक. दरीच्या बाजूवरून तितर पक्षांच्या थव्यानं हवेत

भरारी मारली. वेराला आठवलं की ह्या दरीच्या जवळपास मागे केव्हातरी संध्याकाळी ती फिरायला आली होती. ह्याचाच अर्थ त्यांची वाडी आता जवळ आली आहे !'' हे बघा, पॉपलर आणि 'क्लून' वृक्षांचे शेंडे डोकवायला लागले. एका बाजूने काळा धूर येतोय. बहुतेक वाळक्या काड्या पेटवल्या असाव्यात कुणीतरी. अरे ही तर माशा आत्या मला भेटायला पुढे पुढे येतेय, रुमाल हलवतेय. गच्चीवर आजोबा उभे आहेत. आऽहा, काय मज्जा आहे !''

''माझ्या लाडक्या गोड पोरी ! माझी बाबी ती !'', एखाद्या हिस्टेरीया झालेल्या बाईप्रमाणे आत्या ओरडून म्हणाली, ''आमची खरीखुरी मालकीण आली एकदाची ! समजतंय ना मला काय म्हणायचे ते ? तू आमची सर्वांची मालकीण आहेस, राणी आहेस तू आमची ! इथली वस्तू न वस्तू तुझ्या मालकीची आहे ! सुंदर, गोड पोरी, मी तुझी नुसती आत्या नाहीये. ह्यापुढे तुझं हवं, नको सगळं सगळं मी पाहणार आहे !''

वेराला आजोबा आणि आत्या सोडून सख्ख असं कोणीही नव्हतं. आई कधीच देवाघरी गेली होती आणि वडिलांचा पण तीन महिन्यापूर्वी सैबेरियातून येताना प्रवासातच कझानमध्ये मृत्यू झाला. आजोबा स्थूल होते आणि दम्याची व्यथा असल्यामुळे लाल लाल दिसायचे. त्यांची दाढी लांब राखट रंगाची होती. पोट पुढं आलेलं होतं आणि काठी टेकत टेकत चालायचे ते. आत्या बेचाळीस वर्षांची होती. तिनं उंच बाह्यांचा कमरेशी घट्ट बसणारा ड्रेस घातला होता. जणू काही तिला वाटत होतं की दिवसेंदिवस ती तरुण होत जातेय आणि अजून आपण लोकांच्या डोळ्यात भरावं अशी तिची इच्छा आहे. ती फतक फतक चालायची त्यामुळे चालताना तिची पाठ थरथरायची.

''करशील ना तू आमच्यावर प्रेम ?,'' वेराला मिठी मारत ती म्हणाली, तू नक्कीच गर्विष्ठ नसणार, मला माहीत आहे.''

आजोबांच्या इच्छेनुसार तिच्या आगमनाप्रीत्यर्थ ईश्वराच्या प्रार्थनेचं आयोजन केलं होतं. नंतर जेवणाखाणात बराच वेळ गेला. अशातऱ्हेनं वेराच्या नवजीवनाची सुरवात झाली. तिला घरातली सगळ्यांत चांगली हवेशीर खोली देण्यात आली. त्या खोलीत घरात असतील नसतील तेवढे गालीचे पसरले होते. फुलदाण्यांत फुलांची सजावट केली होती. रात्री ती जेव्हा आपल्या उबदार, ऐसपैस गुबगुबीत बिछान्यावर आडवी झाली आणि ठेवणीच्या कपड्याचा

सुवास येणारी रझई तिनं पांघरली तेव्हा आनंदानं ती स्वत:शीच हसली. दाशा आत्या तिला शुभरात्री म्हणण्यासाठी मिनिटभर तिच्या खोलीत आली होती.

''बर झालं बाई, देवाचीच कृपा की तू इथं राह्यला आलीस,'' पलंगावर टेकत आत्या म्हणाली, ''तू पहातेसच आहेस की आम्ही अगदी सुखात आहोत. ह्यापेक्षा आणखी कश्शाची गरज नाहीये आम्हालां. फक्त एकच गोष्ट जरा काळजी करण्यासारखी आहे. तुझ्या आजोबांची प्रकृती अलीकडे बरीच खालावली आहे. तुला कल्पनाही नसेल किती ते ! त्यांना आताशी श्वास लागतो, पावलोपावली विसरायला होतंय. तुला आठवत असेल ना ? कशी छान तब्येत होती त्यांची. केवढी ताकद होती त्यांच्यात ! ते काही लेचे पेचे नव्हते... पुर्वीचा त्यांचा खाक्या म्हणजे नोकर एखादवेळेस जरा मोठ्या आवाजात बोलला किंवा त्यांनी सांगितलेलं काम करायला नाखुष दिसला तर ''पंचवीस गरमा गरम फटके'' बसायचे त्याला. आता ते खूप नरमले आहेत. आपलं कोणी ऐकत नाही असं वाटतं त्यांना. तसं पाह्यलं तर आता पूर्वीचे दिवस नाही राह्यले मुली. कुणाला मारून चालायचं नाही. खरंच आहे. मारायचं कशाला कोणाला ? अग नोकरांना साधं कामावरून काढून सुद्धा टाकता येत नाही.''

''आजोबा नाही पण दुसरं कोणी मारतं का अजून त्यांना ?''

''कारभारी देतो क्धी मधी फटका. पण मी नाही हं मारत कोणाला. त्यांचं पण देव भलं करो ! तुझे आजोबा मात्र जुन्या सवयीची आठवण झाली की फक्त काठी उगारतात. मारत नाहीत.''

दाशा आत्यानं जांभाई दिली. तोंड आणि उजव्या कानाला क्रॉस केला.

''इथं कंटाळवाणं होईल का तुला,'' तिनं वेराला विचारलं.

''आता काय नि कसं सांगू तुला ? जमीनदार मंडळींनी इथून आपलं बस्तान हलवलंय. ते आता इथे राहात नाहीत. पण आता सभोवताली नवीन नवीन कारखाने उभे राह्यले आहेत. इथं आता इंजीनिअर्स, डॉक्टर्स, खाणप्रमुख ह्यांचीच चलती आहे. नाटकं, कॉन्सर्टस्, होतातच पण मुख्यत्त्वेकरून पत्ते चालतात. आपल्याकडे पण सर्वांचं येणं जाणं आहे. फॅक्टरीतला डॉक्टर निशापव येत असतो नेहमी आपल्याकडे. देखणा आहे तो अगदी आकर्षक व्यक्तिमत्त्व आहे त्याचं. तुझा फोटो त्याला खूप आवडलाय. मी तर माझ्या मनाशी ठरवलंच आहे. पण म्हटलं वेरच्का*च्या नशिबात काय आहे ! तो तरुण, सुंदर, श्रीमंत

आहे. एका शब्दात सांगायचं तर चांगला जोडीदार आहे. पण तू, आमची नवरीमुलगी ! तुझाच पत्ता कुठे होता इतके दिवस. दोघांची घराणी प्रतिष्ठित आहेत. आपली वडिलोपार्जित इस्टेट चांगल्या स्थितीत आहे, घडी बसलेली आहे. माझा त्यात वाटा असला तरी तो मी तुझ्यासाठीच ठेवणार आहे. मी तुझ्या पाठीशी उभी आहे. शिवाय माझ्या भावानं म्हणजे तुझ्या वडिलांनी तुझ्यासाठी पंधरा हजार रुबल्स ठेवलेयत...अगं, मला वाटतं तुझे डोळे मिटायला लागले आहेत. झोप आता तू हं."

दुसऱ्या दिवशी वेरानं बराच वेळ घराभोवती भटकंती केली. जुन्या पुराण्या बागेची अवस्था दयनीय होती. पाऊलवाटांचा पत्ताच नव्हता. बाग अगदीच दुर्लक्षित होती. सूर्यप्रकाशाच्या दृष्टीने थोडासुद्धा विचार केलेला नव्हता. ही बाग म्हणजे इस्टेटीतला एक अनावश्यक भाग समजला जात असावा. झाडांच्या खालून उडत जातांना हुपाई पक्षी "उ-तू-तूत !" असा आवाज करीत ओरडत जायचे. जणू त्यांना कशाची तरी आठवण करून द्यायची होती. खाली नदी वाहात होती. तिच्या काठी उंचच उंच वाढलेल्या बांबूची बेटं होती. नदीच्या पैलतीराच्या पलीकडे किनाऱ्यापासून जवळ जवळ एक मैलावर गाव वसलं होतं. बागेतून वेरा शेताकडे जायला लागली. खूप दूरवर दृष्टी स्थिर करून आपल्या हक्काच्या घरट्यातल्या नवजीवनाविषयी विचार करत ती पुढे पुढे चालली होती. आपल्यापुढे भविष्यात काय वाढून ठेवलंय, ते तिला जाणून घ्यायचं होतं. इथला विस्तीर्ण भूप्रदेश, स्टेपीमधली मनाला भुरळ घालणारी शांतता ह्या सर्व गोष्टी तिला सांगत होत्या की तुझा भाग्योदय जवळ जवळ येतोय, नव्हे तो येऊनच ठेपलाय दाराशी. हजारो लोकांनी कदाचित म्हटलही असेल की , आपल्या स्वत:च्या शेतीवाडीवर राह्यला आलेली ही निरोगी तरुण, सुशिक्षित मुलगी किती भाग्यवान असेल ! त्याच वेळी इथला हा मैलोनमैल पसरलेला, जिवंत प्राण्याचा मागमूसही नसलेला, तोच तोपणा असणारा सपाट भूप्रदेश तिला भिववत होता. एका क्षणांत तिला स्पष्टपणे कळून चुकलं की इथला हा हिरव्या रंगाचा शांत बसलेला राक्षस तिचं जीवन गिळंकृत करून टाकणार आणि तिच्या हाती काहीच लागणार नाही. ती घरंदाज मुलगी आहे, तारुण्यानं मुसमुसली आहे, जीवनाचा आस्वाद घेण्यास उत्सुक आहे. शिवाय ती पदवीधर आहे, तीन भाषा सफाईदारपणे बोलू शकते, तिचं वाचन दांडगं

आहे, वडिलांबरोबर खूप प्रवास झालाय तिचा. हे सगळं काय अशासाठी केलंय का तिनं की अखेर स्टेपीमधल्या ह्या चिडीचुप्प अशा वाडीत कायमचं येऊन राह्यचं, दिवसं दिवस रिकामटेकडेपणात घालवायचे, बागेतून शेतात नि शेतातून बागेत येरझारा घालायच्या आणि मग दमेकरी आजोबांच्या छातीच्या भात्याची खर खर ऐकत घरीच बसायचं ! पण काय करणार काय ! ह्यातून सुटकेची अंधुकशी तरी आशा आहे का ? ह्याचं उत्तर तिला काही केल्या सापडेना. ती जेव्हा घरी परतली तेव्हा तिला वाटायला लागलं इथं राहून सुखासमाधानात आयुष्य व्यतीत करणं अशक्यप्रायच आहे. स्टेशनापासून घरापर्यंतचा तिचा प्रवास इथे राहण्यापेक्षा कितीतरी पटींनी मानोरंजक होता म्हणायचा.

एक दिवस डॉक्टर निशापव कारखान्यातून सरळ वेराच्या घरी आला. व्यवसायानं तो डॉक्टर होता. तीन वर्षांपूर्वी त्याने कारखान्याचे शेअर्स विकत घेतले आणि तो कारखान्याच्या मालकांपैकी एक मालक झाला. तो जरी डॉक्टर म्हणून व्यवसाय करीत असला तरी आता तो वैद्यकीय व्यवसाय हा त्याचा एकमेव उद्योग मानत नव्हता. निस्तेज चेहरा, सुदृढ बांधा, पिंगे केस, अंगावर पांढरा वेस्ट कोट असं त्याचं बाह्य स्वरूप होतं. पण त्याच्या हालचालींकडे पाह्यलं की वाटायचं की ह्याच्या मनात नि डोक्यात काहीतरी गोंधळ आहे. घरात आल्याबरोबर दाशा आत्याचे शुभचिंतन करून त्याने तिच्या हाताचे चुंबन घेतले आणि मग तिला बसायला खुर्ची देण्यासाठी किंवा जागा रिकामी करून देण्यासाठी तो उड्या मारत धावपळ करू लागला. प्रकृतीनं तो अगदी गंभीर आणि अबोल असा होता आणि बोलायला लागला तर त्याचं पहिलं वाक्य कोण जाणे नीट ऐकू यायचं नाही आणि कळायचं पण नाही. तसं पाह्यलं तर त्याचं बोलणं हळू पण स्पष्ट होतं.

''मी पियानो वाजवू का ?,'' त्याने वेराला विचारले आणि दुसऱ्या क्षणी तिचा खाली पडलेला हातरुमाल उचलून देण्यासाठी त्यानं उडी मारली.

दुपारपासून रात्री बारापर्यंत तो मुकाट्यानं बसून राह्यला होता. वेराला तो मुळीच आवडला नव्हता. तिला वाटलं खेड्यात पांढऱ्या कोटातला माणूस म्हणजे अवलक्षणच. तर मर्यादशील, सभ्य चालचलन, काळ्या भुवयांचा फिक्कट गंभीर चेहरा म्हणजे अति सौजन्यशीलच की तिला वाटलं कायम गप्प गप्प

असतो तो म्हणजे नक्कीच कोत्या मनाचा असावा तो. तो गेल्यावर आत्या आनंदानं म्हणाली, "मग काय ? आहे की नाही राजबिंडा डॉ. निशापव ?"

❋

भाग २

घराचा सर्व कारभार दाशा आत्याच पाह्यची. तिचे कपडेलत्ते अगदी व्यवस्थित असायचे. दोन्ही हातातल्या कंकणांचा किणकिण आवाज करत ती घटकेत स्वयपाकघरात तर घटकेत गुरांच्या गोठ्यात मेंढीच्या चालीनं डुलत डुलत फेऱ्या मारत असायची तेव्हा तिची पाठ थरथरायची. पण नोकराचाकरांशी किंवा शेतमजुरांशी बोलताना का कोण जाणे ती डोळ्यावर काळे गॉगल्स चढवायची. आजोबा मात्र एका जागी पेशन्सचा डाव मांडून बसलेले असायचे नाहीतर डुलक्या घेत असायचे. दुपारचं आणि रात्रीचं जेवण मात्र ते बकाबका आणि जरूरीपेक्षा जरा जास्तच खायचे. त्यांना आज केलेले पदार्थ, कालचे शिळे पदार्थ, रविवारी केलेले शिल्लक राहिलेला गार केक, नोकरांसाठी केलेलं खारावलेलं बीफ पण वाढायचे आणि आजोबा ते सर्व पदार्थ आधाशासारखे खायचे. वेरा जेव्हा नोकरांना मेंढीला ओढत नेतांना किंवा चक्कीवरून पीठ दळून आणतांना पाह्यची तेव्हा तिला दरवेळी वाटायचं की "हे सगळं आता आजोबांच्या एकट्याच्या पोटात जाणार." दिवसातला बहुतेक वेळ ते एक तर मुकाट्याने पेशन्स खेळत असायचे नाहीतर खाण्यात गर्क असायचे. कधीतरी जेवणानंतर वेराकडे पाहून त्यांचं मन द्रवायचं. त्यांना प्रेमाचा पाझर फुटायचा आणि ते हळुवारपणे म्हणायचे, "वेरच्का, माझी एकुलती एक नात आहे ती." असं म्हणत असतांना त्यांच्या डोळ्यात पाणी तरळायचं, चेहरा लाल लाल व्हायचा नि मानेच्या शिरा ताणल्या जायच्या. ते रागारागाने सेवकाकडे पाह्यचे आणि काठी आपटत विचारायचे, "मला जेवतांना मुळा का नाही दिलात तोंडी लावायला ?"

हिवाळ्यात ते अंथरुण सोडायचे नाहीत पण उन्हाळ्यात मात्र कधीमधी शेतात कुरण कसं वाढलंय किंवा ओटचं पीक कसं आलंय ते पाह्यला जायचे. घरी आल्यावर सर्वांना सांगायचे की ते आता लक्ष घालत नाहीत त्यामुळे

जिकडे तिकडे अव्यवस्थाच अव्यवस्था आहे आणि मग काठी फिरवत विचार करत बसायचे.

"तुझ्या आजोबांची गाडी रुळावरून घसरायला लागलीय आताशा," आत्या पुटपुटली, "पण ह्या वयात असच व्हायचं. पूर्वीचे आजोबा पाह्यला हवे होतेस तू. बाप रे, जरा काही चुकलं की "पंचवीस गरमा गरम फटके बसायचे !"

आत्याची कुरकुर चालायची की सगळी माणसं आळशी झाली आहेत नुसती. कुणीच काही काम करत नाही त्यामुळे इस्टेटीतून काहीच उत्पन्न येत नाही. तसं पाह्यलं तर शेतावर काही कामंच होत नाहीये. शेताची मशागत जवळजवळ नसल्यातच जमा आहे. नांगरणी, पेरणी परिपाठाप्रमाणे थोडीफार करतात पण नाटकंच चाललेली असतात जास्त. प्रत्यक्षात सर्व जण हातावर हात आणि पायावर पाय ठेवून मजेत वेळ घालवत असतात. मधल्या वेळात इकडून तिकडे नि तिकडून इकडे फेऱ्या मारतात, हिशोब करत असतात, धुडगुस घालतात नुसता. घरात सकाळी पाच वाजल्यापासून धावपळ सुरू असते. सारखं कानावर पडतं "दे ते इकडे", "इकडे आण", "चल पळ लवकर" कनिष्ठांना आज्ञा सुटायच्या. सेवक मंडळी मात्र संध्याकाळपर्यंत मेटाकुटीला यायची. दर आठवड्याला आत्याच्या स्वयंपाकिणी आणि मोलकरणी बदलायच्या. एक तर त्यांच्या असभ्य वर्तनासाठी आत्या त्यांना काढून टाकायची, नाहीतर फार कटकट आहे इथं कामाची असं म्हणून त्याच काम सोडून जायच्या. त्यांच्या स्वत:च्या जहागिरीतून कोणी घरकामाला यायला तयार नसायचं त्यामुळे दूरच्यांना ठेवावं लागत असे कामाला. त्यांच्या खेड्यातली अल्येना ही एकच मुलगी त्यांच्याकडे टिकली होती. ती सोडून गेली नव्हती कारण तिच्या पगारावर घरी सगळं कुटुंब म्हणजे वयस्क माणसं आणि मुलं सगळ्यांचं पोट भरत होतं. अल्येना बुटकी, किरकोळ आणि जराशी वेडपटच मुलगी होती. दिवसभर तिचं काम म्हणजे खोल्या साफ करणं, टेबलावर जेवणाऱ्यांना हवं नको करणं, आवरा आवरी करणं. शेगड्या पेटवणं, कपडे धुणं, शिवण टिपण करणं वगैरे वगैरे. कुठलंही काम करताना तिची धडपड व्हायची. ती बूट आपटत चालायची आणि स्वयंपाकघरात उगीचच लुडबुड करायची. बहुतेक आपल्याला कामावरून काढून टाकतील ह्या भीतीनं तिच्या

हातून पडझड, भांड्यांची आदळ आपट होत असावी. तिच्या बद्दल तक्रारी यायच्या. म्हणून तिचे पैसे कापले जायचे. मग तिची आई नाहीतर आजी यायची, दाशा आत्याच्या हातापाया पडायची.

आठवड्यातून एकदा कधीकधी बरचेवरपण लोक त्यांच्याकडे भेटायला यायचे. तेव्हा आत्याबाई वेराच्या खोलीत जायच्या नि म्हणायच्या, "तू जरा पाहुण्यांशी गप्पा मारायला जाऊन बैस, नाहीतर लोक म्हणतील ही फार गर्विष्ठ आहे म्हणून."

वेरा पाहुण्यांचं आगत स्वागत करायची, त्यांच्याशी तासनृतास विंट नावाचा पत्याचा खेळ खेळायची, पियानो वाजवायची. पाहुणेमंडळी पियानोच्या सुरांवर डान्स करायची. अति उत्साही आत्याची नाचता नाचता दमछाक व्हायची. मग वेराच्या जवळ जाऊन ती हळू आवाजात म्हणायची, "त्या मारीया निकीफोखनाची जरा प्रेमानं चौकशी कर बरं का ?"

सहा डिसेंबरला सेंट निकोलिनचा दिवस असतो. त्या दिवशी त्यांच्याकडे जवळ जवळ तीस एक पाहुणे मंडळी भराभरा येऊन पोहचली. रात्री उशीरापर्यंत सर्वजण विंट खेळत होती. काहीजण तर रात्री मुक्कामाला राह्यच्या हिशेबानच आली होती. दुसऱ्या दिवशी उठल्यापासून पुन्हा पत्ते सुरू झाले. मग सगळेजण जेवलेपण त्यांच्याकडेच. त्यांच्या त्या गप्पांना आणि सिगरेटच्या धुराला कंटाळून वेरा आपल्या खोलीत जायला निघाली तरी सुद्धा पाहुण्यांचा घरी जाण्याचा काही रंग दिसत नव्हता. तिला इतका कंटाळा आला होता की ती रडायचीच बाकी होती. संध्याकाळी जेव्हा मंडळी हलू लागली तेव्हा वेराला हायसं वाटलं. पण मग ती उगाचच म्हणाली, "तुम्ही अजून थांबला असतात तर बरं झालं असतं !"

पाहुण्यांचा तिला कंटाळा यायचा, वैताग यायचा नुसता पण तरी सुद्धा अंधार पडला रे पडला की ती अस्वस्थ व्हायची. असं दररोज व्हायचं. आणि मग ती कारखान्यात नाहीतर एखाद्या शेजारच्या जमीनदाराकडे जायची. तिथे मग पत्ते, डान्स, फलश, रात्रीची जेवणं...कारखान्यात आणि खाणीत काम करणारी तरुण मंडळी नवनिर्मित रशियाची देशभक्तिपर गाणी म्हणायची. त्यांची प्रस्तुती अगदीच काही वाईट नसायची. ती ऐकताना प्रत्येकाचं मन हेलावून जायचं. एखाद दिवशी सगळी जणं एका खोलीत जमायची. तिथे संधिप्रकाशात

खाणीविषयी, स्टेप्समध्ये कुणीतरी कधीतरी पुरलेल्या गुप्त धनाविषयी, भूता खेताविषयी गप्पा चालायच्या...रात्रीच्या वेळी उशिरा कधी कधी असं व्हायचं की अचानक "का-रा-ऊ-ऊल" असा आवाज कानावर पडायचा. कुणीतरी दारुड्या रस्त्यावरून जात असायचा, नाहीतर शेजारच्या खाणीत लूटमार व्हायची, कधी फायर प्लेसमध्ये हवा घुसायची तिचा सू-सू आवाज यायचा, खिडक्यांची तावदानं आपटत असायची. थोड्यावेळानं चर्चमधून भयसूचक घंटा ऐकायला यायची, ही हिमवादळाची सूचना असायची.

सगळ्या संध्याकाळच्या कार्यक्रमात, सहलीत, जेवणाच्या पार्ट्यात सगळ्यांचं लक्ष वेधणारी स्त्री होती दाशा आत्या आणि सगळ्यांना आकर्षित करणारी व्यक्ती होती डॉक्टर निशापव. कारखान्यात किंवा वाड्यावरच्या बैठकीत गायनाचा कार्यक्रम क्वचितच व्हायचा, 'मार्श' आणि 'पोल्का' ही दोनच प्रकारची नृत्य व्हायची. तरुण मंडळी स्वत:ला ज्या संबंधी काडीचं ज्ञान नाही अशा विषयावर उगाचच तावातावानी वादंग घालीत असायची. सगळाच वेड्याचा बाजार असायचा. अगदी मोठमोठ्यानं पोटतिडकीनं वाद विवाद चाललेला असायचा पण आश्चर्य म्हणजे वेराला आजपर्यंत दुसऱ्या कुठल्याही ठिकाणी इथल्या सारखी असंस्कृत, निर्विकार, निष्काळजी माणसं पाह्यला मिळाली नव्हती. असं वाटायचं की त्यांना देशाभिमान नाहीये, त्यांचा कुठला एक धर्म नाहीये आणि सामाजिक बांधिलकी पण दिसत नाही त्यांच्यात. वाङ्मयासंबंधी चर्चा चालू असली किंवा एखाद्या काल्पनिक पेचाविषयी निश्चित मतप्रदर्शन करायचं असलं तर निशापवच्या चेहऱ्यावरून स्पष्ट लक्षात यायचं की त्याला ह्या सर्व गोष्टींशी काही देणं घेणं नाहीये आणि कैक वर्ष त्यानं काही वाचन केलेलं नाही आणि वाचायची त्याला इच्छापण नाहीये. त्याचा चेहरा सदा गंभीर, निर्विकार असा होता. अगदीच घाणेरड्या पद्धतीनं रेखाटलेलं व्यक्तिचित्र असावं ना तसा होता तो. पांढरा कोट, तोंडातून शब्द बाहेर पडेल तर शपथ असं गूढ व्यक्तिमत्त्व होतं ते. पण सभ्य स्त्रिया आणि जमीनदारणींवर त्याची चांगली छाप पडायची. त्याच्या वागण्यातील अदब त्यांना सुखावून जायची. त्यामुळे वेराचा त्यांना हेवा वाटायचा कारण वेरा त्याला खूप आवडली होती. वेरामात्र दर वेळी पाहुण्यांच्या घोळक्यातून जरा घुश्श्यातच निघून जायची आणि स्वत:ला अक्षरश: घरात कोंडून घ्यायची. दिवस असातसा संपायचा पण

संध्याकाळ झाली की तिची पावलं पुन्हा कारखान्याकडे धाव घ्यायची. हिवाळाभर अशी होती तिची दिनचर्या. ती पुस्तक, मासिकं, वर्तमानपत्र मागवून घ्यायची आणि आपल्या खोलीत वाचत बसायची. रात्रीसुद्धा अंथरुणावर पडल्या पडल्या वाचन चालू असायचं तिचं. ओसरीतल्या घड्याळात जेव्हा दोन किंवा तीनचे ठोके पडायचे आणि डोकं ठणकायला लागायचं तेव्हा ती अंथरुणात उठून बसाची आणि आपल्याच विचारात गढून जायची. काय करायचं यापुढे ? कुठे जायचं ? मनाला भेडसावणारे, हिडीस असे प्रश्न होते ते. त्यांची उत्तरं तिनं खूप पूर्वीच शोधून काढली होती. पण सद्य:परिस्थितीत ती लागू पडत नव्हती. लोकांची सेवा करणं. त्यांची दु:ख सुसह्य करणं, त्यांना सुसंस्कृत करणं हा नक्कीच पवित्र, उदात्त कल्पनारम्य असा विचार आहे. पण तिची म्हणजे वेराची अजून जनसामान्यांशी ओळख झाली नव्हती. त्यांच्याशी संवाद कसा साधायचा? ती माणसं तिला परकी, अनोळखी होती. तिला त्यांच्यात म्हणावा तेवढा रस नव्हता. झोपड्यांमधला कुबट वास, तिथल्या लोकांची अचकट विचकट, गावंढळ भाषा, अंघोळ न केलेली त्यांची ती मुलं, खेडवळ, अडाणी शेतकऱ्यांच्या बायकांच्या दुखण्याबाण्याविषयीच्या त्या गप्पा. थंडीनं कुडकुडत, बर्फ तुडवत त्यांच्या गावापर्यंत जायचं, नंतर कोंदट झोपडीत बसून आपल्याला न आवडणाऱ्या अशा त्या मुलांना शिकवायचं – नको रे बाबा, त्यापेक्षा मेलेलं बरं ! एकीकडे आपण ह्या मुलांना शिक्षण देऊन जागृत करण्याचा प्रयत्न करणार आणि त्याचवेळी दाशा आत्या दारूच्या दुकानदारांकडून कर वसूल करणार आणि शेतमजुरांना दंड ठोठावणार कसलं विनोदी नाटक झालं असतं नाही ते ! तिथल्या शाळांविषयी, खेडेगावातील ग्रंथालयांविषयी, एकंदरीतच सर्व प्रकारच्या शिक्षणाविषयी तिथे किती वेळ तरी नुसती चर्चा व्हायची पण ह्या सर्व इंजिनिअरांनी, कारखानदारांनी, सुशिक्षित उच्चभ्रू महिलांनी जर दांभिकपणा केला नसता आणि ह्या लोकांच्या सर्वांगीण उन्नतीची अतिशय गरज आहे अशी मनाशी खूणगाठ बांधली असती तर त्या बिचाऱ्यांना शिक्षकांवर आज खर्च होणारे दरमहा पंधरा रुबल्स द्यावे लागले नसते आणि त्यांची उपासमार पण टाळता आली असती. शिक्षण व्यवस्था आणि सर्वसामान्य लोकांमधील अज्ञानाविषयीच्या ह्या नुसत्या गप्पा फक्त आपल्या सद्सद्विवेक बुद्धीला गप्प करण्यासाठी असायचं. स्वत:ची शेकडो एकर जमीन असताना गरीब जनतेकडे

निर्विकारपणे पाह्यचं ह्यापेक्षा शरमेची गोष्ट दुसरी कुठली असेल ? म्हणूनच डॉक्टर निशापवची तिथल्या त्या सभ्य महिला तोंड भरून स्तुती करीत असायच्या की डॉक्टर उदार, कनवाळू मनुष्य आहे कारण त्यानं आपल्या कारखान्यातील कामगारांच्या मुलांसाठी शाळा बांधली आहे. खरंय की कारखान्यातले जुने दगड वापरून त्याने सातशे रुबल्समध्ये शाळा बांधली आहे. पण म्हणून काय त्याच्या ह्या सत्कृत्याविषयी त्याच्यावर वर्षांनुवर्षे स्तुतिसुमने वाहाय्रची का ? खर तर हा इसम लोकांसाठी स्वत:च्या पदरची एक दमडीसुद्धा खर्च करणार नाहीये आणि त्याच्या डोक्यात कधीही असा विचार येणार नाहीये की हे शेतमजूर आपल्या सारखीच माणसं आहेत. आणि त्यांनासुद्धा कारखान्यातल्या त्या भिकार शाळेमध्ये न शिकता विद्यापीठात शिक्षण घेणं जरूरीचं आहे.

वेराला स्वत:चा आणि ह्या सगळ्यांचा तिटकारा वाटायला लागला होता. ती डोळ्यापुढे पुस्तक घेऊन वाचायचा प्रयत्न करायची पण थोड्याच वेळात तिच्या डोक्यात विचारचक्र सुरू व्हायचं. डॉक्टर व्हायचं का आपण ? पण त्यासाठी लॅटीन भाषेची परीक्षा द्यायला हवी शिवाय प्रेत आणि आजार ह्या दोन्ही गोष्टी तिला कमालीचं औदासीन्य आणायच्या त्याचं काय ? त्यापेक्षा मेकॅनिकल इंजिनिअर, वकील, बोटीवरचा कप्तान, शास्त्रज्ञ ह्यापैकी काही व्हावं का ? थोडक्यात म्हणजे असं काहीतरी करायला हवं की ज्याच्या पूर्ततेसाठी शारीरिक आणि मानसिक शक्ती खर्ची पडेल आणि मग कामाच्या थकव्यामुळे रात्री गाढ झोप लागेल. आपलं आयुष्य अशासाठी खर्ची पाडायला हवं की आपण एक आदर्श व्यक्ती बनू शकू आणि समाजातील प्रतिष्ठित व्यक्ती आपली प्रशंसा करतील. आपलं स्वत:चं कुटुंब असेल, त्यातील माणसांवर आपण जिवापाड प्रेम करू...पण हे सगळं व्हायचं कसं ? सुरवात कुठून करायची ?

लेन्टच्या सणाच्या दिवसात कुठल्यातरी एका रविवारी भल्या पहाटे आत्या तिच्या खोलीत छत्री न्यायला आली. त्यावेळी वेरा हातात डोकं धरून अंथरुणावर आपल्याच विचारांच्या तंद्रीत बसली होती.

''माझ्या लाडक्या पोरी, तू चर्चमध्ये गेली असतीस तर बरं झालं असतं, नाहीतर लोकांना वाटेल की तू नास्तिक आहेस म्हणून.''

वेरानं काहीच उत्तर दिलं नाही.

''मला दिसतंय गरीब पोरी की तुला कंटाळा येतोय इथं,'' पलंगापुढे

गुडघे टेकून बसत, भाचीकडे कौतुकाने पहात आत्या म्हणाली, ''खरं सांग, कंटाळली आहेस ना तू ?''

''खूपच''

''माझ्या सुंदर राजकुमारी, मी तुझी विश्वासू मैत्रीण आहे ना ? तू सुखात आनंदानं राहावंस एवढीच माझी इच्छा आहे...मला सांग डॉ. निशापवशी तुला लग्न करावंसं का वाटत नाहीये ?...तुला आणखी कसा मुलगा हवाय ? तू मला क्षमा कर, पण अशी अळंटळं करून नाही चालायचं. आपण काही सरदार दरकदार नाही आहोत...वेळ निघून जाईल. तू काही आता सतरा वर्षांची राहिली नाहीयेस. मला काही कळतच नाही. तो तुझ्यावर प्रेम करतो, तुझा सन्मान करतो !''

''हाय रे देवा,'' वेरा रागारागानं म्हणाली, ''अगं पण मला हे सगळं कसं कळायचं ? तो तर मुखस्तंभासारखा बसलेला असतो नेहमी, एक शब्द उच्चारील तर शपथ.''

''त्याला संकोच वाटतो वेरच्का...तू फटकन् त्याला नकार दिलास तर !''

आत्या तिच्या खोलीतून बाहेर गेली. मग कपडे बदलावे की परत अंथरुणात आडवं व्हावं अशा द्विधा मन:स्थितीत वेरा आपल्या खोलीच्या मध्यावर ताटकळत उभी होती. वीट आलेलं ते अंथरुण, खिडकीतून बाहेर पाह्यलं तर तिथे निष्पर्ण झाडं, राखट रंगाचा बर्फ, वैताग आणणारे डोमकावळे, आजोबांचं खाद्य, ती डुकरं.

''असल्या या निरुत्साही वातावरणात, लग्न करण योग्य ठरेल का ? काय ?'' तिच्या मनात विचार आला.

*

भाग ३

गेले दोन दिवस आत्याचा चेहरा रडवेला झाला होता. ती उगाचच भरमसाट पावडर फासून तो लपविण्याचा प्रयत्न करीत इकडे तिकडे येरझारा घालीत होती. जेवणानंतर उसासे सोडत ख्रिस्ताच्या तसबिरीकडे आशाळभूतपणे पहात

होती. तिला कसली एवढी काळजी लागली होती समजणं कठीण होतं. मग तिनं मनाशी निश्चय केला आणि ती वेराच्या खोलीत गेली आणि तिच्यापाशी आपलं मन मोकळं केलं.

''त्याचं काय आहे मुली, बँकेत व्याजाचा हप्ता भरायला हवाय. कुळं हप्त्याचे पैसे देत नाहीयेत. तुझ्या वडिलांनी तुझ्या नावावर ठेवलेल्या पंधरा हजार रुबल्समधून तू काही पैसे देऊ शकशील का ?''

असंच एक दिवस दाशा आत्यानं बागेमध्ये चेरीचा मुरंबा शिजायला ठेवला होता. विस्तवाच्या आचेनं गाल लालीलाल झालेल्या अल्येनाची घरातून बागेत, बागेतून तळघरात अशी धावपळ चालली होती नुसती. एखादं धार्मिक कृत्य मनोभावाने, एकाग्रतेने करताना माणसाचा चेहरा गंभीर होतो ना अगदी तसाच चेहरा करून आत्याचं दिवसभर मुरंबा करणं चाललं होतं. तिच्या ड्रेसच्या आखुड बाह्यातून तिचे छोटे छोटे पण बळकट, जुल्मी हात डोकावत होते. अल्येना अव्याहतपणे त्या उकळत्या भांड्याभोवताली अस्वस्थपणे धावाधाव करीत होती. खरं तर त्यातला एकही थेंब तिला चाखायला मिळणार नव्हता. ह्या विचाराने माझ्या मनाला एक प्रकारची टोचणी लागून राह्यली होती...

गरमागरम उकळत्या चेरीचा वास बगीच्याभर दरवळत होता नुसता. सूर्य मावळला होता. मुरंब्याचं भांड घरात गेलं होतं तरीपण हवेत सुंदर गोड वास भरून राह्यला होता. वेरा बाकावर बसून नवा तरुण कामगार तिनं सांगितल्याप्रमाणे वाटिका तयार करतो आहे का नाही ते पहात होती. हा कामगार नुकताच सैन्यातून सुटून आला होता. तो पात्यानं हिरवळ कापित होता आणि एकचाकी गाडीत भरत होता.

''तू कुठं होतास नोकरीला ?'' वेरानं त्याला विचारलं.

''बेरद्यानस्कीमध्ये होतो मी.''

''आणि इथून कुठं जाणार आहेस ? घरी का ?''

''नाही, मुळीच नाही,'' कामगार उत्तरला, ''मला घरच नाहीये.''

''तू जन्मलास कुठे नि लहानाचा मोठा तरी कुठे झालास ?''

''अरलवस्की प्रांतात. नोकरीला लागेपर्यंत मी आईबरोबर जमीनदाराच्या घरी राहात होतो. आई त्यांच्याकडे काम करीत असे. मालक मंडळी तिचा आदर करायची आणि तिच्याबरोबर मलाही जेवण मिळायचं. नोकरीवर

असतानाच मला आई वारल्याचं पत्र आलं. त्यामुळे आता घरी जाण्याची मला मुळीच घाई नाहीये. जन्मदाते वडील नसले म्हणजे आपल्याला घर पारखं होतं."

"तुझे वडील पण वारले का ?"

"मला ते सांगता यायचं नाही. कारण मी अनौरस मुलगा आहे."

नेमकी त्याचवेळी खिडकीशी आत्या येऊन टपकली आणि फ्रेंचमध्ये म्हणाली, "नोकरांशी इतक्या गप्पा मारायची गरज नाहीये..."

"ए पोरा, स्वयंपाकघरात ये", ती सैनिकाला म्हणाली, "तुला काय सांगायचंय ते तिथे सांग."

मग दुसऱ्या दिवशी कालच्या सारखंच, आजही रात्रीचं जेवण, वाचन, न संपणारी रात्र आणि न संपणारे डोक्यात थैमान घालणारे विचार, सगळं तेच अन् तेच. तीन वाजता सूर्योदय झाला. अल्येना केव्हाच ओसरीवर कामाला येऊन पोहोचली होती. पण वेरा मात्र अजून झोपलीच नव्हती. ती वाचायचा प्रयत्न करीत होती. एक चाकी गाडीची करकर कानावर पडत होती. नवीन जवान कामगार कामावर आला होता...वेरा पुस्तक घेऊन खिडकीजवळ बसली होती. तिला अधून मधून डुलकी लागत होती. त्या जवानानं तिच्यासाठी बागेतला रस्ता कसा तयार केलाय ते पण तिला तिथून दिसत होतं. ह्या सगळ्यात तिचा वेळ चांगला जात होता. बागेतले छोटे, अरुंद रस्ते चामड्याच्या पट्ट्याप्रमाणे सपाट, गुळगुळीत दिसत होते. त्यांच्यावर सोनेरी वाळू टाकल्यावर ते कसे दिसतील याची कल्पना करण्यात तिला मजा वाटत होती.

पाच वाजण्याच्या सुमारास गुलाबी हाऊस कोट घातलेली आत्या घरातून बाहेर पडताना दिसली तिला. ती पोर्चमध्ये थोडावेळ मुकाट्यानं उभी होती आणि मग सैनिकाला म्हणाली, "तुझा पासपोर्ट घे आणि इथून निघून जा. मला माझ्या घरात अनौरस व्यक्तीला ठेवता येणार नाही."

वेराला तिच्या छातीत कुणीतरी दुष्टपणे जड, अणुकुचीदार दगड खुपसल्यासारखं वाटलं. ती आत्यावर संतापली. ती तिचा तिरस्कार करू लागली. आत्यानं तिला वैताग आणला होता नुसता. आता तर तिला तिचा दुःस्वास वाटू लागला...पण करणार काय ? तिच्याशी भांडण करायचं की अपमान करायचा तिचा ? त्याचा काय उपयोग होणार होता. समजा तिच्याशी झगडा

केला. तिला स्वत:पासून दूर केलं, तिच्यापासून दुसऱ्या कोणाला त्रास होणार नाही अशी उपाययोजना केली तर ? आजोबा काठी उगारणार नाही आणि ती तर सरळ होईल असं काही करता येईल का ? पण त्याचाही कितपत उपयोग होईल कोण जाणे. काही केलं काय नि न केलं काय, सारखंच आहे इथे. जिचा अंत दृग्गोचर नाही अशा ह्या स्टेपीत उंदीर मारला काय नि साप मारला काय सगळं सारखंच. इथला हा असा अति विस्तीर्ण भूप्रदेश, दीर्घ काळ टिकणारा असह्य हिवाळा, तोच तोपणा, आयुष्यात वाटणारा एकाकीपणा यामुळे प्रत्येकाच्या मनात असहायतेची भावना मूळ धरून बसलेली असते इथे. काहीच करावंसं वाटत नाही. काहीही केलं तरी पालथ्या घड्यावर पाणी घालण्यासारखं आहे.

अल्येना खाली वाकून आदर व्यक्त करीत वेराच्या खोलीत शिरली आणि धूळ झटकण्यासाठी खुर्च्या बाहेर काढू लागली.

"आत्ता झाला का वेळ तुला धूळ झाडायला ?", वेरा फणकाऱ्यानं म्हणाली, "चल, निघ इथून."

अल्येना बिचारी घाबरून गेली. तिला कळेना की तिला काय म्हणायचंय. तिनं भराभर कप्प्यांचं कपाट झटकायला सुरवात केली. "अग मी तुला काय सांगितलं, कळत नाही का ? जा इथून !" वेरा तुसड्यासारखी ओरडली. ह्यापूर्वी तिच्या मनावर एवढं दडपण नव्हतं आलं कधी.

अल्येनानं घाबरून पक्षासारखा चित्कार केला आणि सोन्याचं घड्याळ गालिचावर पाडलं.

"जातेस का नाही इथून", वेरानं उडी मारली आणि ती थरथर कापत नेहमीपेक्षा निराळ्याच आवाजात ओरडली. "हिला बाहेर घालवा बघू. हिनं मला वैताग आणलाय", अल्येनाच्या पाठोपाठ तवातावानं पाय आपटत जात ती म्हणाली. "फटके मारा चांगले तिला !"

मग मात्र वेरा एकदम भानावर आली. केस विसकटलेली, पारोशी, गाऊन घालूनच पायात स्लीपर चढवून सुसाटासारखी घराबाहेर पडली ती. तिला आता माहिती झालेल्या खिडकीपर्यंत ती उतावळेपणे पळत गेली आणि ती कोणाला दिसणार नाही आणि तिलाही कोणी दिसणार नाही अशा तऱ्हेनं एका काटेरी झुडपाच्या मागे लपून बसली. तिथल्या गवतावर निश्चल पडून राहीली ती.

तिला रडायला येत नव्हतं की ती घाबरली पण नव्हती. आकाशाकडे एकटक पाहात पडल्यापडल्या अल्येनाच्या बाबतीत जे घडलं त्याचाच विचार करीत होती ती. आयुष्यात त्या प्रसंगाचा तिला कधीही विसर पडणार नव्हता आणि त्याबद्दल तिनं स्वत:ला माफपण केल नसतं कधी. चूक काय नि बरोबर काय ह्याचा डोकं शांत ठेवून विचार चालला होता तिचा.

''नाही, नाही, ही घोडचूकच झाली आपली'', तिनं विचार केला, ''यापुढे योग्य दिशेने पावलं टाकायला हवीत, नाहीतर हे असंच चालत राहील जन्मभर...पुरे झालं आता हे सगळं !''

मध्यान्हाच्या सुमारास डॉक्टर निशापव खिंडीतून त्यांच्या वाडीकडे जात होता. तिनं त्याला पाह्यलं आणि एकदम निर्णय घेतला की ती आता नवीन जीवनाला सुरवात करणार म्हणजे स्वत:ला तसं करायला भाग पाडणार. ह्या निर्णयानं तिच्या मनावरचं ओझं उतरलं. डॉक्टर जवळ न जाता केवळ डोळ्यांनीच त्याच्या त्या बांधेसूद आकृतीचा तिनं निरोप घेतला. आपल्या निर्णयाची तीव्रता सौम्य करण्यासाठी ती स्वत:शीच पुटपुटली, ''सुंदर आहे तो...ठीक जमेल आमचं...''

ती घरी परतली. तिने कपडे बदलले. तेवढ्यात दाशा आत्या तिच्या खोलीत येऊन म्हणाली, ''वेरच्का, अल्येनानं तुला सतावून सोडलं ना अगदी. मी तिला दिली पाठवून खेड्यात. आईनं तिचा चांगला समाचार घेतला आणि ती स्वत: इकडे येऊन रडत बसलीय.''

''आत्या'', तिला मध्येच थांबवत वेरा एकदम म्हणाली, ''मी डॉक्टर निशापवशी लग्न करायला तयार आहे. फक्त तू त्यांना सांगायचस हे....मला नाही जमायचं ते...''

तिथून ती तडक शेतात निघून गेली. वाट फुटेल तिकडे जात होती ती. तिनं मनाशी ठरवलं की तिचं लग्न झालं म्हणजे मग ती घरचा कारभार पहायला लागेल. लोकांना औषधपाणी देईल, त्यांना सुशिक्षित करील. तिच्या वर्तुळातल्या इतर स्त्रिया जे जे करतात ते ते सर्व ती करील. ही अशी कायमची असमाधानी वृत्ती स्वत:विषयी आणि इतरांविषयी बरी नाही. नाहीतर आपल्या हातून अक्षम्य चुका होतील. पाहता पाहता डोळ्यासमोर डोंगर तयार होईल त्यांचा. मग तू तुझ्या भूतकाळाकडे त्रयस्थपणे पाहशील. तुझ्या वर्तमानातून तुझ्या भूतकाळाचा

विचार केला जाईल. आजचं तुझं जीवन हेच विधिलिखित होतं. ह्यापेक्षा आणखी काही चांगलं होईल अशी अपेक्षा करणं बरोबर नाही...ह्याहून चांगलं होणं शक्य तरी आहे का ? सभोवतालचं मनाला भुरळ घालणारं सृष्टिसौंदर्य, आपण पाह्यलेली दिवास्वप्नं, संगीत हे सर्व एकाच गोष्टीचा पाठपुरावा करीत असतात पण प्रत्यक्षात घडतं ते मात्र अगदीच निराळं असतं, हे त्रिकालाबाधित सत्य आहे. तसं पाहिलं तर सुख आणि सत्य ह्या दोन्ही गोष्टी जीवनाच्या उंबरठ्याबाहेर असतात...नुसतं जगणं महत्त्वाचं नाहीये तर ह्या हऱ्याभऱ्या, चमकदार, रंगीबेरंगी स्टेपीमध्ये मिसळून जायला हवं. तिच्याशी एकरूप व्हायला हवं. इथली फळं, फुलं, डोंगर दऱ्या असल्या शाश्वत गोष्टींशी निरंतर, निरासक्तपणे समरस व्हायला हवं म्हणजे मग आनंदच आनंद आहे सगळीकडे...

महिन्याभरातच वेरा कारखान्यात राह्यला जाऊन जुनी झाली होती.

●●

अन्तोन चेखव (१८९७)



: ६ :

गूसबेरी

भल्या पहाटेपासून सगळं आकाश काळ्या पावसाळी मेघांनी झाकळलं होतं. सगळीकडे शांत शांत होतं. तशी गरमी नव्हती पण मनाला तेवढी प्रसन्नताही वाटत नव्हती. शेतावर काळेकुट्ट ढग जमा झालेले असतात, आपण पावसाची आतुरतेने वाट पहात असतो पण तो पडत मात्र नाही. त्यावेळी अशी सुन्न, कुंद आणि माणसाला उबग आणणारी हवा असते. जनावरांचा डॉक्टर इवान इवानिच आणि जिम्नाझिया*मधला शिक्षक बुरकिन, दोघांनाही पुढे चालायचा कंटाळा आला होता आणि दूर दूर पसरलेली ती शेतं कधी संपणार तरी आहेत का असा प्रश्न पडला होता त्यांना. दूर दूर कुठेतरी मिरनोसित्सको खेड्यातली पवनचक्की अस्पष्ट दिसत होती. टेकड्यांची रांग उजव्या बाजूंनी दूरवर गेलेली आणि खेड्याच्या पलीकडे कुठेतरी गायब झाली असावीसं वाटत होतं. दोघांच्याही लागलीच लक्षात आलं की हा नदीकाठचा प्रदेश असावा. माळरान, हिरवी लवाळी, शेती असणार इथं. ह्यातल्याच एखाद्या टेकडीवर चढलं तर तिथूनही असच विस्तीर्ण शेत, टेलीफोनच्या तारा आणि सुरवंटासारखी सरपटत जाणारी आगगाडीसुद्धा दिसणार. हवा स्वच्छ असती तर तिथून सगळं गाव दिसलं असतं. अशा कुंद हवेत निसर्गदेखील चिंताग्रस्त दीनवाणा झाला होता. पण इवान आणि बुरकिनला ती शेतं खूपच भावली. आणि त्यांच्या मनात आलं की आपला देश किती भव्य, दिव्य, सुंदर आहे.

"मागल्या खेपेला आपण म्हाताऱ्या प्रकोफियाच्या कोठीवर राह्यलो होतो नाही ?", बुरकिन म्हणला. तेव्हा तुम्ही कुणाची तरी गोष्ट सांगाल म्हणाला होता. आठवतं ?

"हो, तेव्हा मी माझ्या भावाविषयीच सांगणार होतो तुम्हाला."

गोष्ट सांगायला सुरवात करण्यापूर्वी इवाननं दीर्घश्वास घेतला, सिगरेट

पेटवली पण तेवढ्यात पाऊस यायला सुरवात झाली. पांच मिनिटात अंधारून आलं आणि धो धो पाऊस पडू लागला. पाऊस केव्हा थांबणार त्याचा अंदाज बांधता येत नव्हता. इवान आणि बुरकिन आपल्या विचारात गढून गेले होते. त्यांच्या बरोबरची कुत्री ओलीचिंब झाली होती. त्यांनी शेपट्या खाली टाकल्या होत्या आणि ती त्या दोघांकडे लाडिकपणे पाहात होती.

"आपल्याला कुठेतरी निवाऱ्याला जायला हवं," बुरकिन म्हणाला, "अलेखिनकडे जायचं का ? त्याचं गाव इथून लांब नाहीये फार." "चला, मग जाऊ या त्याच्याकडेच."

ती दोघं सखल जमिनीवरील शेतं ओलांडत, कधी सरळ तर कधी उजव्या बाजूनी असं वेडवाकडं जात जात रस्त्यावर येऊन पोहोचली. थोड्याच वेळात त्यांना पॉपलर वृक्ष, बगीचा आणि शेतावरच्या धान्याच्या कोठारांवरची लाल छपरं दिसू लागली. नदीचं पाणी चमकदार होतं. एकदम त्यांच्यासमोर पवनचक्की आणि पांढरं सार्वजनिक स्नानगृह असलेला नदीकाठचा विस्तीर्ण परिसर उभारून आला. हे होतं अलेखिनचं सोफिनो गाव.

पावसाचा आवाज गिळून टाकून चक्की घुरघुरत होती. पाण्याचा बांध थरारत होता. पावसाने भिजलेले घोडे गाडीजवळ खाली माना घालून उभे होते आणि पावसानं भिजू नये म्हणून डोक्यावर पोती घेतलेली माणसं इकडून तिकडे फिरत होती. सगळीकडे चिखल, दलदल होती. हवा कोंदट होती. पाण्याच्या जवळ गारठा जाणवत होता आणि निसर्गानं रौद्ररूप धारण केलं होतं. इवान आणि बुरकिनचं सर्वांग ओलं चिंब होऊन चिखलानं माखलं होतं, अंगावर शिरशिरी येत होती त्यांच्या. त्यांच्या पायातले बूट चिखलानं माखल्यामुळे जड झाले होते. धरण ओलांडून जमीनदाराच्या कोठीकडे जाण्यासाठी ते जेव्हा चढ चढू लागले तेव्हा त्यांच्या तोंडातून चकार शब्द निघत नव्हता. जणू ते एकमेकांवर सप्पाटून रागावले होते. कोठीमध्ये पंखा फिरत होता, दार उघडं होतं आणि त्यातून धूळ बाहेर उडत होती. उंबरठ्यापाशी खुद्द अलेखिन उभा होता. तो साधारण चाळीशीचा, उंच, लठ्ठ, लांब केस ठेवलेला असा होता. जमीनदारापेक्षा एखाद्या प्रोफेसर किंवा चित्रकारासारखा दिसत होता तो. त्यानं पांढरा अंगरखा आणि पाटलोण चढवली होती. कमरेला दोरखंडानं विणलेला पट्टा घातला होता त्यानं. त्याच्या बुटावर चिखल आणि गवताच्या काड्या चिकटलेल्या

दिसत होत्या. नाकडोळे धुळीनं काळे झाले होते. त्याने इवान नि बुरकिनला ओळखलं. त्याचा चेहरा सांगत होता की त्यांच्या येण्याने त्याला आनंद झाला होता.

"या, या मंडळी, आत या. मी आलोच हं एका मिनिटात."

त्याचं घर दोन मजली मोठंच मोठं होतं. तो स्वत: खालच्या मजल्यावर दोन खोल्यांत राह्यचा. खोल्यात जिकडे तिकडे कमानी होत्या. आणि लहान लहान खिडक्या होत्या. कोणे एके काळी तिथे गाडीवान राह्यचे. खोलीतला सगळा संच, टेबल, खुर्च्या वगैरे अगदीच साधारण प्रतीचं होतं. जळक्या ब्रेडचा, स्वस्त वोडकाचा आणि घोड्यावर घालायच्या कातडी जू चा वास दरवळला होता जिकडे तिकडे. वरच्या मजल्यावरच्या नीटनेटक्या सुशोभित खोल्यांचा वापर तो कधीमधीच करायचा. म्हणजे पाहुणे बिव्हणे आल्यावर. घरात आल्यावर इवान आणि बुरकिनची गाठ घराची देखभाल करणाऱ्या मोलकरणीशी पडली. ती तरुण होती आणि इतकी देखणी होती की ते दोघे एकमेकांकडे पहात काही क्षण जागच्या जागीच खिळून राहिले.

"मंडळी तुम्हाला पाहून मला किती आनंद झालाय याची तुम्हाला कल्पना नाही यायची", त्यांच्या मागोमाग ओसरीवर येत अलेखिन म्हणाला. "आज आपली भेट होणार याची मला कल्पनाही नव्हती ! पिलगेया, पाहुण्यांच्या कपडे बदलण्याची काहीतरी व्यवस्था कर," तो मोलकरणीला म्हणाला, "तेवढ्या वेळांत मी पण कपडे बदलून घेतो. सगळ्यात आधी जर काही करायला हवं तर ते म्हणजे अंघोळ. नाहीतर वसंतऋतूपासून आजवर मी अंघोळच केली नाही की काय असं वाटायचं ह्यांना. मंडळी इथे खायची प्यायची व्यवस्था होतेय तोपर्यंत तुम्हीपण स्नानगृहात चलता का माझ्याबरोबर ?"

सुंदर नाजूक आणि सोज्वळ अशी पिलगेया साबण आणि टॉवेल घेऊन आली आणि पाहुणेमंडळींना घेऊन अलेखिन स्नानगृहाकडे जायला निघाला.

"मी कितीतरी दिवसात अंघोळच केली नाहीये", कपडे काढता काढता तो म्हणाला, "हा आमचा अंघोळीचा तलाव प्रशस्त आहे नाही ? माझ्या वडिलांनी बांधलाय तो. पण अंघोळीला यायला कसं ते जमत नाही बघा."

तो पाण्यात पाय सोडून पायरीवर बसला आणि त्याने आपले लांब केस आणि मान साबण लावून धुतली. त्याच्या सभोवतीचं पाणी गढूळ, किरमिजी

झालं होतं.

"तुम्ही बरेच दिवसात अंघोळ केली नाही हे दिसतंच आहे", इवाननं कोपरखळी मारली.

"हो ना, खूपच दिवस झाले मला अंघोळ करून..."अलेखिन चाचरत म्हणाला, त्यानं पुन्हा साबण लावून डोक्यावरून पाणी घेतलं. ह्यावेळी भोवतीचं पाणी शाईसारखं निळशार दिसत होतं.

आता इवानची पाळी आली. पाऊस पडत असतानादेखील मोठा आवाज करीत त्याने पाण्यात उडी घेतली आणि जोरजोरात हात मारत तो पाणी कापू लागला त्यामुळे पाण्यावर लाटा येऊ लागल्या आणि त्या लाटांवर पांढरी लीली झुलू लागली. तो पोहत तलावाच्या मध्यापर्यंत गेला आणि त्यानं पाण्यात डुबी घेतली. एका मिनिटात तो दुसऱ्या जागी बाहेर आला आणि पोहू लागला. तळ गाठण्यासाठी तो सुरावर सूर मारत होता. "अहाहा काय मज्जा आली आज!" असं म्हणत म्हणत त्यानं चक्की गाठली. तिथं शेतकऱ्यांशी इकडच्या तिकडच्या गप्पा मारल्या आणि तो परत मागे फिरला. तळ्याच्या मध्यावर आल्यावर, पावसाकडे तोंड करून तो पाठीवर उताणा पडून राह्यला. बुरकिन आणि अलेखिन ह्या वेळपावेतो कपडे बदलून घरी जायला सज्ज होऊन बसले होते. पण इवान मात्र अजून पोहत होता. सूर मारत होता.

"ओ ऽ हो हो, देवाची कृपाच म्हणायची की आज आपल्याला इथं यायची बुद्धी झाली."

"आहेच बाबा तुझ्यावर देवाची मर्जी!" बुरकिन काठावरून ओरडला. सगळीकडे दिवे झगमगू लागले त्यावेळी बुरकिन आणि इवान रेशमी गाऊन आणि मखमली सपाता घालून आरामखुर्च्यांत बसले होते. स्वच्छ अंघोळ करून, केस नीटनेटके विंचरून अंगरखा घातलेला अलेखिन दिवाणखान्यात फेऱ्या मारत होता. घरातली ऊब, स्वच्छ कोरडे कपडे, हलकेसे बूट ह्या सगळ्यामुळे त्याला हलकं फुलकं आणि प्रसन्न वाटत होतं. एवढ्यात सुंदर, लोभस पिलगेया गालिच्यावरून चालतांना पावलांचा आवाज सुद्धा येणार नाही ह्याची खबरदारी घेत, स्मितहास्य करीत फळांचा जॅम आणि चहा घेऊन दिवाणखान्यात आली. तेव्हा कुठं इवाननी त्याची गोष्ट सांगायला सुरवात केली. अलेखिन आणि बुरकिन तेवढे ती गोष्ट ऐकत होते असं नाही तर तिथल्या

''खेड्यातल्या जीवनशैलीत एक आगळाच सुखवस्तूपणा असतो'', तो म्हणायचा, ''आपल्या बाल्कनीत तुम्ही चहाचे घोट घेत बसला आहात, समोरच्या तलावात बगळे पोहताहेत, आसमंतात सुगंध दरवळलाय आणि ...आणि गूसबेरीचं झाड...''

तो त्याच्या इस्टेटीचे नकाशे रेखाटायचा पण दरवेळी, त्यामध्ये त्यानि त्याच गोष्ट असायच्या. अ) जमीनदाराचं घर, ब) नोकराचाकरांची खोली क) परसबाग ड) गूसबेरीचं झाड.

तो अगदी चिक्कू माणसासारखा राहायचा. पोटभर जेवायचा नाही की मनसोक्त प्यायचा नाही. कपडे तर असे असायचे त्याचे की एक देवच जाणत असेल बहुतेक, अगदी एखाद्या भिकाऱ्यासारखे पै पै जमवत सगळे पैसे बँकेत टाकत असायचा. कमालीचा लोभी, कद्रु झाला होता तो. त्याची ती अवस्था पाहून मला वाईट वाटायचं. मी त्याला माझ्या कुवतीनुसार थोडीफार मदत करायचो. सणावाराला भेटवस्तू पाठवायचो. पण त्यासुद्धा न वापरता दडवून ठेवायचा तो. माणसाच्या मनात जर एखादी गोष्ट ठाण मांडून बसली ना तर दुसरं माणूस तिथं काही करू शकत नाही.

दिवसामागून दिवस जात होते. त्याची आता दुसऱ्या प्रांतात बदली झाली होती. चाळिशी येऊन ठेपली होती पण जाहिराती पाहणं नि पैसे साठवणं काही सोडलं नाही त्यानं मग कळलं की त्यानं लग्न केलंय. लग्न केलंय, पण त्या लग्नामागचा हेतू तोच होता की स्वत:साठी गूसबेरी असलेली शेतीवाडी विकत घ्यायची. एका कुरूप, वयस्क विधवेशी लग्न केलं होतं त्यानं. तिचं त्याला यत्किंचितही आकर्षण नव्हतं. पण तिच्याकडून पैशाचा ओघ येणं अपेक्षित होतं त्याला. तिच्याबरोबर सुद्धा त्यानं काटकसरीचाच संसार केला. तिला अर्धपोटी राहावं लागायचं. तिचे पैसे मात्र त्याने स्वत:च्या खात्यात जमा केले होते. तिचा पहिला नवरा पोस्टमास्तर होता. तिला केक, चांगल्या प्रतीच मद्य असं चांगलं चुंगलं खायची प्यायची सवय होती. पण ह्याच्याकडे पोटभर काळी ब्रेडसुद्धा नशिबात नव्हती. आयुष्यातला एकेक दिवस ती खंगत खंगत गेली आणि वर्षा दोन वर्षांत देवाघरी गेली. अर्थातच तिच्या मरणाला आपणच जबाबदार आहोत अशी खंत माझ्या भावाला एक मिनिटही वाटली नाही. 'वोडका'प्रमाणे पैसाही माणसाला चक्रम बनवतो. आमच्या गावात एकदा एक

व्यापारी मेला. मरणापूर्वी त्याने एका बशीत मध घालून प्यायला द्यायची आज्ञा केली नोकराला. आपली संपत्ती कोणालाही मिळू नये म्हणून त्याने आपले पैसे, लॉटरीची तिकीटं मधाबरोबर गिळून टाकली. असाच एकदा मी रेल्वेस्टेशनच्या फलाटावर मेंढ्यांच्या कळपाची तपासणी करीत होतो. त्याचवेळी एक व्यापारी आगगाडीच्या इंजिनखाली सापडला. त्याचा पाय कापला गेला होता. आम्ही त्याला अपघातग्रस्तांच्या कक्षेत उचलून नेलं. रक्ताची धार लागली होती. कठीणच अवस्था होती त्याची. तो हात जोडून सारखी विनवणी करीत होता की त्याचा तुटका पाय कुणी तरी शोधून आणील का ? अगदी बेचैन झाला होता तो. कारण काय तर त्याच्या तुटक्या पायाच्या बुटात लपवलेले वीस रुबल्स गायब होऊ नयेत म्हणून.''

''तुमची गाडी आता एकदम दुसऱ्याच रूळावरून धावायला लागलीय'', बुरकिन म्हणाला.

''बरं, ऐका, बायकोच्या मृत्यूनंतर,'' पळभर विचार करून इवान पुढे सांगू लागला, ''माझ्या भावाने इस्टेटीचा कसून शोध घ्यायला सुरवात केली. हे तर खरंच आहे की काही विकत घेण्यासाठी तुम्ही अगदी पाच वर्ष शोधाशोधीत घालवलीत तरी शेवटी तुमचा अंदाज चुकणार आणि तुमचं जे स्वप्न होतं त्याच्या पासंगाला सुद्धा पुरणार नाही अशी वास्तू तुम्ही शेवटी विकत घ्याल. निकलायनं आयुक्तामार्फत थकबाकीपोटी लिलावात निघालेली एका जमीनदाराची अडीचशे एकर जमीन त्यातील झाडझाडोरा इमारतीसकट खरेदी केली. त्यात नोकरमाणसांची खोली आणि बगीचा होता. फळबाग नव्हती, गूसबेरीचं झाड नव्हतं आणि पोहणाऱ्या बदकांचा तलावपण नव्हता. नदी होती पण तिच्या पाण्याचा रंग कॉफीसारखा होता. कारण इस्टेटीच्या एका बाजूस विटांची भट्टी आणि दुसऱ्या काठावर बोन मिल होती. पण माझ्या निकलायनं ते इतकं मनाला लावून घेतलं नाही. त्यानं गूसबेरीची वीस रोपं आणून लावली आणि तो एकदाचा जमीनदार झाला !''

''मागल्याच वर्षी मी त्याच्याकडे गेलो होतो. म्हटलं त्याचं कसं काय चाललंय ते डोळ्यांनी पहावं. तो आपल्या पत्रातून इस्टेटीचं नाव असं लिहायचा ''केवळ हिमालयीन.'' मी भर दुपारी त्याच्या वाडीवर पोहोचलो. खूप गरमी होती. जिकडे तिकडे खाच खळगे, डडोनियाची कुंपणे, तारांची कुंपणे, फरच्या

आहे. संध्याकाळी आम्ही चहा पीत बसलो होतो तेव्हा स्वयंपाकिणीनं शिगोशीग भरलेली गूसबेरीची बशी आमच्यासमोर आणून ठेवली. त्या काही बाजारातून विकत आणलेल्या गूसबेरी नव्हत्या तर त्याच्या बागेतल्या झाडाच्या होत्या. झाडं लावल्यापासून पहिल्यांदाच फळांनी बहरलं होतं झाड. निकलाय हसत हसत एक मिनिटभर मुकाट्यानं त्या गूसबेरीकडे नुसता पहात होता, डोळ्यात अश्रू तरळत होते त्याच्या. भावना उचंबळून आल्यामुळे तोंडातून शब्द फुटत नव्हता. मग त्यानं एक गूसबेरी तोंडात टाकली. आपलं आवडतं खेळणं अखेर मिळाल्याने उल्हसित झालेल्या बालकाप्रमाणे माझ्याकडे पाहून तो म्हणाला,

"फळ किती चवदार आहे !"

त्यानं भराभर गूसबेरी तोंडात कोंबल्या आणि परत परत तेच म्हणत बसला.

"आऽहा किती चवदार आहेत."

त्या गूसबेरी खरं तर टणक आणि आंबट होत्या पण पुष्किन म्हणतो त्याप्रमाणे "घोर आत्मवंचनेपेक्षा अज्ञानातलं सुखच आम्हाला जास्त प्रिय असतं." निकलायनी उराशी बाळगलेलं स्वप्न इतक्या सहजासहजी साकारलं होतं. ज्या माणसानं आपल्या आयुष्याचं ध्येय साध्य केलय, जे जे इच्छिलं होतं ते ते त्याला मिळालंय, जो स्वत:च्या बलवत्तर नशिबावर, इतकंच नाही तर स्वत:वर देखील बेहद्द खूष आहे अशा भाग्यवान माणसाला मी आज पहात होतो. माझ्या विचाराने माणसाच्या सुखाला नेहमी दु:खाची झालर असतेच. आत्तादेखील सर्वसुखी अशा माणसाकडे पहात असतांना माझ्या मनावर दडपण आल्यासारखं वाटलं, नैराश्य आलं मला. विशेषत: रात्री तर ते पराकोटीला पोहोचलं. माझा बिछाना भावाच्या खोलीसमोरच घातला होता. बिछान्यावर पडल्या पडल्या मला कळत होतं की भावाला झोप येत नाहीये. अंथरुणातून बाहेर येऊन त्यानं टेबलावरच्या बशीतून मूठभर गूसबेरी घेतल्या. सुखी आणि नशीबवान माणसं प्रत्यक्षात कशी असतात त्याची कल्पना आली मला ! मनाची पकड घेणारी कसली ही ताकद म्हणायची ! अशा जीवनात तुम्हीपण एकदा डोकावून पहा : धनदांडग्यांचा आळशीपणा आणि बेफिकिरी, कमकुवत माणसांमधली शेळ्या-मेंढ्यांप्रमाणे असलेली भीरुता आणि अजाणपण, भोवताली दिसणारं अठराविश्वे दारिद्र्य, कल्पनातीत खेंचाखेंच, अवनती, नशापान, तोंडपूजेपणा, दांभिकता...इतकं असून घराघरात आणि रस्त्यारस्त्यावर

शांतता पसरलेली असते; शहरातील पन्नास हजार नागरिकांपैकी एकजण देखील असल्या जीवनाविरुद्ध हाकाटी करताना, रागानं बेभान झालेला दिसत नाही. आम्ही अशीच माणसं पाहतो जी वाणीसामान आणायला बाजारात चाललेली असतात, दिवसा खातात, रात्री झोपतात, रटाळ, निरर्थक बडबड करतात, म्हातारे होतात, मृत्यू पावलेल्या आपल्या सग्यासोयऱ्यांना सद्गदित होऊन कबरस्तानातमध्ये नेऊन पोहोचवतात, पण आम्हाला असे लोक पहायला किंवा त्यांच्याविषयी ऐकायला मिळत नाही की जे मनोमनी कुढत असतात. आयुष्यात ज्या भयानक गोष्टी असतात त्या पडद्यापाठीमागे चाललेल्या असतात. सगळीकडे शांत, निरामय भासतं. तक्रार जर कोणी करीत असेल तर फक्त मुकी आकडेवारी. कितीतरी जणांना वेड लागलं असेल, माणसं बुधल्याच्या बुधल्या दारू ढोसत असतील, उपासमारीनं कित्येक बालकं मृत्युमुखी पडत असतील...अशाच प्रकारची व्यवस्था बहुधा लोकांना अपेक्षित असते अस दिसतं. खरं तर अभागी माणसं मुकाटपणे कालक्रमणा करीत असतात म्हणूनच सुखवस्तू मनुष्य स्वत:ला भाग्यवान समजत असतो. ती जर गप्प बसली नसती तर कुणालाही सुख लाभणं दुरापास्तच होतं. जनसामान्यांना पडलेली भुरळच आहे ही म्हणायची. प्रत्येक सुखी, समाधानी माणसाच्या बंद दारापलीकडे हातात कुऱ्हाड घेतलेला मनुष्य उभा असायला हवा, आणि आपल्या घावांनी आतल्या माणसाला त्यानं आठवण करून द्यायला हवी सारखी की ह्या जगात दुर्दैवी माणसं खूप आहेत. तो ह्या क्षणाला जरी सुखात लोळत असला तरी आज ना उद्या जीवन आपली नखं बाहेर काढीलच. दुर्दैव, आजार, गरिबी, जागोजागी होणारं नुकसान त्याला घेरतील. आत्ता तो जसं दुसऱ्याकडे दुर्लक्ष करतो, त्यांचं म्हणणं ऐकून घ्यायला तयार नसतो, अगदी तसचं कालांतरानं त्याच्याकडे कुणी ढुंकुनसुद्धा पाहणार नाही की त्याचं कोणी ऐकणारही नाही. पण वस्तुस्थिती अशी आहे की आज हाती कुठार घेतलेला तो मनुष्य दिसणारच नाही. नशिबवान मनुष्य आपल्याच तारेत असतो. ह्या सुखवस्तू माणसाला रोजमराच्या क्षुल्लक काळज्या शिशिर ऋतूतल्या वाऱ्याप्रमाणे क्वचितच बेचैन करतात. त्याचं आयुष्य चक्रनेमिक्रमेण पूर्ववत चालू राहतं.

''त्या रात्री मला समजलं.'' इवान उभा राहयला आणि पुढे सांगू लागला, ''की मी पण नाही का स्वत:ला सुखी, समाधानी समजायचो. पोटभर जेवल्यानंतर

किंवा शिकारीला गेलो असतांना माणसानं कसं जगावं, दुसऱ्यावर कसा विश्वास ठेवावा, लोकांना कसं मार्गदर्शन करावं ते दुसऱ्यांना शिकवीत असे. मी सुद्धा म्हणायचो की ज्ञान म्हणजे प्रकाश, शिक्षण ही एक अत्यावश्यक गोष्ट आहे, पण सध्यातरी सर्वसामान्य माणसाला लिहिता वाचता येणं पुरेसं आहे. स्वातंत्र्य म्हणजे वरदानच आहे. माणसाला हवे शिवाय जगता यायचं नाही तसंच स्वातंत्र्य नसेल तर सगळं फोल आहे, मी म्हणायचो, पण थोडी कळ काढायला हवी. हो, मीच असं म्हणत असे. आणि आजही मीच विचारतोय की किती दिवस ही अशी कळ काढायची नि वाट पाहायची ? मी तुम्हालाच विचारतो की वाट पहायचं असं कोणतं कारण आहे ? मला सांगण्यात येतं की सगळ्या गोष्टी, एकदम होत नसतात. जीवनात कोणतीही नवी संकल्पना टप्प्याटप्प्यानं, वेळ आली म्हणजे कार्यान्वित होत असते. पण मी म्हणतो कोण म्हणतो असं ? हे संयुक्तिक आहे ह्याला पुरावा काय ? सध्याची जी प्रस्थापित व्यवस्था आहे ती आपण स्वतःच नैतिकतेच्या मुद्द्यावर धुडकावून लावतो. मी एक जागरूक विचारवंत माणूस खिंडाराच्या बाजूला उभा आहे, आणि वाट पहातोय की मधलं अंतर आपोआप भरून येईल आणि त्यातील फटी बुजतील मग त्या वेळी मी उडी मारून पलीकडे जाईन किंवा मला मग त्याच्यावर पूल बांधता येईल असं म्हणणं सुसूत्र आणि वादातीत आहे का ? इतकं असून देखील सद्य:स्थितीत मी पुन्हा तेच विचारतोय की आपण कशाची वाट पाहयची ? आपण हतबल झालो असताना नुसतं वाट पहात बसायचं आणि शिवाय जगण्याला दुसरा पर्याय नाही म्हणून जगायचं, शिवाय जगण्याची तीव्र इच्छा तर आहेच !

मी दुसऱ्या दिवशी भल्या पहाटे भावाचा निरोप घेतला पण त्या दिवसापासून मला शहरात राहणं देखील असह्य झालं. शांतता आणि समाधानच मला अस्वस्थ करतात. मला खिडकीतून बाहेर डोकवायचं भय वाटतं. सध्या मला सर्वात अस्वस्थ करणारं दृश्य कोणतं असेल तर टेबलाशी बसून चहा पीत असणाऱ्या समृद्ध कुटुंबाचं. माझं वय झालंय त्यामुळे लढण्यात मला अभिमान उरला नाहीये आणि कुणाची निंदा करणं माझ्या स्वभावात नाहीये. माझ्या मनाचा नुसता कोंडमारा होत असतो, अंगाचा तिळपापड होतो. मी चिडचिड करतो, अधून मधून भडकतो, डोक्यात होणाऱ्या विचारांच्या थैमानामुळं ते तापतं आणि

मला झोप येत नाही...मी तरुण असतो तर किती बरं झालं असतं !''

इवान खोलीत येरझारा घालत होता नुसत्या, थोड्यावेळानं परत तेच म्हणाला, ''जर मी तरुण असतो तर !''

तो अलेखिन जवळ गेला आणि त्याचे हात हातात घेऊन दाबू लागला. ''अलेखिन !'' तो विनवणीच्या स्वरात म्हणाला, तुम्ही मुळीच अस्वस्थ होऊ नका. पण स्वत:ला भ्रमही पडू देऊ नका ! जोपर्यंत तुम्ही तरुण, ताकदवान, उत्साही आहात तोपर्यंत सगळ्यांशी चांगले वागणं सोडू नका ! नशीब वगैरे का ऽ ही नसतं, सगळं खोटं आहे. स्वत:चं सुख म्हणजे जीवनाची सार्थकता किंवा अंतिम ध्येय असू शकत नाही. अंतिम ध्येय त्याच्यापेक्षाही कितीतरी श्रेष्ठ उदात्त अशा विचारसरणीत सामावलेलं असतं. सगळ्यांच्या कल्याणासाठी झटत राहा.'' हे सगळं इवान केविलवाण्या, अजीजीच्या सुरात म्हणत होता, जणू काही तो स्वत:साठीच काही मागत होता.

मग ते तिघेही जण खोलीतल्या तीन कोपऱ्यात आराम खुर्चीवर जाऊन चिडीचूप बसले. इवानची ती कहाणी ना बुरकिनला आवडली ना अलेखिनला. सोनेरी फ्रेममधून त्यांच्याकडे पहाणारे लष्करी जनरल आणि खानदानी स्त्रिया गरीब बिचाऱ्या गूसबेरी खाणाऱ्या सरकारी नोकराची कहाणी ऐकता ऐकता संधिप्रकाशात सजीव झाल्यासारख्या वाटत होत्या. आम्हा सगळ्यांना उदास उदास वाटत होतं. का कोण जाणे उच्चभ्रू लोकांविषयी.' स्त्रियांविषयी काहीतरी बोलावसं, ऐकावसं वाटत होतं. ते बसलेल्या दिवाणखान्यातील सर्व गोष्टी, धूळ बसू नये म्हणून आवरणं घालून ठेवलेली झुंबरं, आरामखुर्च्या, पायाखालचे गालिचे सांगत होते की फ्रेममधून त्यांच्याकडे पाहणारी ही सर्व मंडळी पूर्वी केव्हातरी इथे वावरत होती, बसत होती, चहा पीत होती आणि त्याच ह्या जागी आज पिलगेया आवाज न करता अवती भवती वावरतेय हे सर्व कुठलीही गोष्ट ऐकण्यापेक्षा नक्कीच चांगलं होतं.

अलेखिनला केव्हा झोपीन असं झालं होतं. घराच्या जबाबदाऱ्या पार पाडायच्या होत्या म्हणून आज तो लवकर म्हणजे पहाटे तीनलाच उठला होता. त्याचे डोळे मिटायला लागले होते. पण पाहुणेमंडळी त्याच्या गैरहजेरीत काहीतरी मजेमजेच्या गप्पागोष्टी करतील ह्या भीतीनं तो झोपायला गेला नव्हता. थोड्या वेळापूर्वी इवान जे बोलत होता ते हुशारीचं होतं की रास्त होतं असले गहन प्रश्न

त्याला पडले नव्हते आणि ते सोडवण्याच्या फंदातही तो पडला नाही. पाव्हणे मंडळींनी धान्य, गवत, झाडापासून निघणारा रेडिंक ह्या त्याच्या जीवनाशी निगडित असलेल्या गोष्टींविषयी चकार शब्दही काढला नव्हता. म्हणून त्यांचं बोलणं त्याला आवडत होतं. आणि त्यांनी त्यांच्या गप्पा अशाच पुढे चालू ठेवाव्यात असं त्याला वाटत होतं...

"चला, झोपायची वेळ होऊन गेली," उठून उभा राहात बुरकिन म्हणाला, "मला शुभरात्री म्हणायची परवानगी द्या." अलेखिननं पाहुण्यांचा निरोप घेतला आणि तो खाली निघून गेला. पाहुणे मंडळी वरच राहिली. त्या दोघांना रात्रीसाठी म्हणून एकच मोठी खोली दिली होती. त्या खोलीत कोरीव, नक्षीकाम केलेले दोन जुने पलंग होते. कोपऱ्यांत ख्रिस्ताचा हस्तिदंती क्रॉस होता. पिलगेयानी घातलेल्या लांब, रुंद गारीगार बिछान्यावरच्या अंथरुण पांघरुणाला कोरेपणाचा सुखद असा सुगंध येत होता.

इवान इवाननं मुकाट्याने कपडे बदलले आणि त्याने बिछान्यावर अंग टाकले.

"देवा, आम्हा पाप्यांना क्षमा कर," असं मनाशी म्हणत त्याने डोक्यावरून पांघरूण घेतले.

टेबलावर पडलेल्या त्याच्या चिलीमीमधून तंबाखूचा जळकट वास घमघमला होता. बुरकिनला खूप वेळ झोप आली नाही पण असह्य दर्प कसला असावा हे त्याला कळेना.

रात्रभर खिडक्यांच्या तावदानावर पावसाच्या थेंबांची टपटप ऐकू येत होती.

●●

अन्तोन चेखव (१८९८)



: ७ :

रम्य घाटीत

भाग १

उकल्येयेवो खेडं एका घाटीत वसलं होतं. त्यामुळे महामार्गावरून जाताना किंवा रेल्वेस्टेशनवरून खाली दृष्टी गेली तर तिथल्या चर्चच्या घंटा आणि कापडांच्या गिरण्यांची धुराडी तेवढी दिसायची. त्या मार्गाने जाणारे येणारे जेव्हा विचारायचे, ''हे कुठलं खेड हो ?'' तेव्हा त्यांना मिळणार उत्तर पण ठरलेलं होतं ''हेच ते खेडं जिथं एकदा एका पाद्र्यानं अंत्यसंस्काराच्या जेवणाच्यावेळी एक अख्खा कॅव्हीयरचा डबा फस्त केला होता.''

तिथला वयस्क गिरणीकामगार कस्त्युकोवच्या आठवणीप्रमाणे म्हाताऱ्या पाद्र्यानं इतर खाद्यपदार्थांमध्ये ठेवलेलं भरगच्च दाणेदार 'कॅव्हीयर' पाहिलं आणि त्यानं आधाशासारखी त्याच्यावर ताव मारायला सुरवात केली. इतरांनी त्याला धक्का देऊन पुढे ढकलण्याचा प्रयत्न केला, त्याची बाही ओढली, पण तो 'कॅव्हीयर' खाण्यात इतका रंगून गेला होता की त्याच्यावर इतरांच्या सूचक वागण्याचा ढिम्म परिणाम झाला नाही. तो आपला खातच राहिला. तसराळ्यात चांगलं चार पौंड 'कॅव्हीयर' होतं पण त्यानं ते सगळंच्या सगळं एकट्यानं संपवलं. ह्या गोष्टीला कितीतरी वर्षं उलटून गेली, पाद्री केव्हाच देवाघरी गेला, पण त्या 'कॅव्हीयर'चा कोणाला अजून विसर पडला नाही. असं वाटायचं की ह्या गावात गेल्या दहा वर्षांत ह्या गोष्टीशिवाय गावाचं वैशिष्ट्य म्हणून सांगावं असं काही घडलंच नाही की काय !

तापाच्या साथीनं ह्या गावातून आपला मुक्काम कधी दुसरीकडे हलवलाच नाही. उन्हाळ्यात देखील इथे दलदल असायची विशेषत: कुंपणाखाली. कुंपणावरून लोंबणाऱ्या जुनाट रानटी वेलांची लांबवर पसरलेली सावट असायची तिथे. गिरणीतला कुडाकचरा आणि कापडाच्या छपाईसाठी वापरण्यात येणाऱ्या

ॲसिटिक ॲसीडची दुर्गंधी सर्व दूर पसरली होती. तीन कापड गिरण्या आणि एक कातडी कमावण्याचा कारखाना हे सर्व प्रत्यक्ष गावात नसलं तरी वेशीपासून थोडंच दूर होतं. हे काही फार मोठे कारखाने नव्हते. तिथे काम करणाऱ्या मजुरांची संख्या जेमतेम चारशेच्या जवळपास असेल, जास्त नाही. कातडी कमावणाऱ्या कारखान्यातलं सांडपाणी गावातल्या नदीत सोडलं जायचं. बरेचदा ते दुर्गंधीयुक्त असायचं. त्यामुळे सभोवतीची हिरवळ जळून जायची, शेतकऱ्यांच्या गुराढोरांना सैबेरियन अल्सरचा त्रास व्हायचा. हा कारखाना बंद करण्याची अनुज्ञा दिली गेली होती. कागदोपत्री तो बंदही होता. पण मागच्या दारानं नेहमीसारखंच काम चालू होतं तिथे. जिल्हा पोलीस अधिकारी आणि सरकारी दवाखान्यातला डॉक्टर यांनी डोळेझाक केल्यामुळे हे कारखाने चालू होते.कारण कारखान्यांचे मालक त्या दोघांना दरमहा दहा रुबल्सचा हप्ता देत होते. अख्ख्या खेड्यात फक्त दोनच विटकाम केलेली, पत्र्याचे छप्पर असलेली टुमदार घरं होती. एकात ग्रामीण जिल्ह्याधिकाऱ्याचे कार्यालय होते आणि चर्चच्या अगदी समोरच्या दुमजली घरात अेपिफानोव गावातल्या मध्यमवर्गीय कुटुंबातून आलेला ग्रीगोरी प्येत्रोविच त्सिबुकिन राहात असे.

ग्रीगोरीचं किराणा मालाचं दुकान होतं पण ते दुकान म्हणजे एक बुजगावणं होतं. तो वोडका, गुरढोरं, कातडी, धान्य आणि डुकरंसुद्धा विकायचा. थोडक्यात काय ज्यातून ज्यावेळी फायदा होतोय असं वाटेल त्या सगळ्या सगळ्याचा व्यापार करायचा तो. उदाहरणच द्यायचं झालं तर परदेशात मॅगपाय पक्षांची पिसं लावलेल्या टोप्या उच्चभ्रू फॅशनेबल स्त्रिया वापरू लागल्या तर त्याच्या दुकानात जोडीला तीस कोअेक किंमतीनं त्यांची विक्री चालू असायची. इमारती लाकडासाठी तो जंगलच्या जंगल विकत घ्यायचा. शिवाय व्याजानं गरजूंना पैसे उधार द्यायचा. एकंदरीत काय, म्हातारा मोठा हिकमती होता.

ग्रीगोरीला दोन मुलं होती. मोठा मुलगा अनिसिम गुप्तहेर खात्यात नोकरीला होता. तो घरी केव्हातरीच यायचा. धाकटा मुलगा स्तेपान वडिलांच्या व्यापारधंद्यात शिरला होता पण त्याच्याकडून खऱ्याखुऱ्या मदतीची अपेक्षाच नव्हती, कारण एकतर तो बहिरा होता आणि अशक्त पण होता. स्तेपानची बायको अकसिन्या देखणी आणि चलाख बाई होती. रविवारी किंवा सणावारी ती बॉनेट घालून, हातात छत्री घेऊन बाहेर पडायची. ती सकाळी लवकर

उठायची आणि रात्री उशिरा झोपायची. दिवसभर स्कर्ट सावरत आणि कमरेला अडकवलेल्या किल्ल्यांच्या जुडग्याचा आवाज करीत कोठीतून तळघरात, तळघरातून दुकानात अशी धापळ करीत असायची. म्हातारा ग्रीगोरी तिच्याकडे कौतुकाने पहायचा ना तेव्हा त्याच्या डोळ्यात एक प्रकारची चमक दिसायची. त्याला तसं म्हटल तर तिची कीवच यायची नि वाटायचं की तिच्याशी त्याच्या मोठ्या मुलाचं लग्न झालं असतं तर किती बरं झाल असतं. कारण एकतर त्याचा धाकटा मुलगा बहिरा होता आणि दुसरं म्हणजे स्त्री सौंदर्याची प्रशंसा करण्याची रसिकता त्याच्यात अजिबात नव्हती.

म्हातारा ग्रीगोरी कुटुंबवत्सल होता आणि त्याच्या दृष्टीनं कुटुंबापेक्षा मौल्यवान अशी जगातली कुठलीही गोष्ट नव्हती. विशेषत: त्याचा मोठा मुलगा अनिसिम आणि धाकटी सून अकसिन्या त्याच्या मर्जीतले होते. बहिऱ्याशी लग्न करून त्सिबुकिन कुटुंबात आल्या दिवसापासून अकसिन्याची प्रतिमा व्यापारी दृष्टिकोन असलेली कर्तबगार बाई अशीच होती. कुणाला माल उधार द्यायचा, कुणाला नाही हे तिला बरोबर कळायचं. किल्ल्यांचा जुडगा ती नेहमी स्वत:जवळ ठेवायची. स्वत:च्या नवऱ्यावर देखील तिचा विश्वास नव्हता. हिशोबाच्या गोट्यांच्या (अॅबॅकस) वर तिचा हात भरभर चालायचा. एखाद्या कुशल शेतकऱ्याप्रमाणे घोड्यांची परीक्षा ती त्याच्या दातावरून करायची. ती हसत तरी असायची नाहीतर आरडा ओरडा करीत तरी म्हातारा तिचं कौतुकच करायचा आणि पुटपुटायचा, ''काय सून मिळालीय मला वाऽ, नक्षत्र आहे नुसती...

त्याची बायको वारली होती पण मुलाच्या लग्नानंतर त्याला फार धीर धरवला नाही. त्यानं पण दुसरं लग्न केलं. त्याला मिळाली उकल्येयेवोपासून तीस कोसावर राहणारी मुलगी वारवारा निकलायेवना. ती चांगल्या घराण्यातली. मध्यम वयाची पण तरीसुद्धा देखणी आणि आकर्षक होती. ती वरच्या मजल्यावरच्या आपल्या खोलीत स्थिरस्थावर झाली मात्र त्याचं सगळं घर काचेच्या नव्या खिडक्या बसवल्यानंतर दिसावं ना तसं लखलखीत दिसायला लागलं. ख्रिस्ताच्या तसबीरीसमोरचे दिवे पेटवले गेले; टेबलावर बर्फाप्रमाणे पांढरेशुभ्र मेजपोस घातले गेले; खिडक्यातून आणि घरापुढच्या बागेतल्या ताटव्यात लाल रंगी फुलं फुलायला लागली. एकाच थाळीतून सर्वांनी जेवायची

पूर्वीची पद्धत जाऊन प्रत्येकाच्या पुढे एक एक प्लेट आली. वारवाराचा चेहरा प्रेमळ, गोड आणि हसतमुख होता आणि असं वाटायचं की तिच्यामुळे सगळं घरच हसतय. अंगणामध्ये ह्यापूर्वी कधीही दिसायचे नाहीत असे भिकारी, यात्रेकरू, साधू संन्यासी यायला लागले. खिडक्यांच्या खाली गावातल्या बायकांची रडारड, आजारी माणसाची खोकल्याची उबळ ऐकू येऊ लागली तर दारूच्या व्यसनापायी गिरणीतून कामावरून काढून टाकलेल्या, खंगून गेलेल्या कामगारांची ये जा सुरू झाली. वारवारा त्यांना पैसे, ब्रेड, जुने कपडे देऊन मदत करायची. थोड्याच दिवसांत तिला तिच्या घरातल्या स्थानाविषयी अंदाज आला. मग तर ह्या गोरगरिबांसाठी ती दुकानातून पाहिजे त्या वस्तू उचलून आणायची. एक दिवस तिनं दुकानातून चहाचे दोन पुडे उचलून नेतानाही बहीऱ्यानं त्यानं पाह्यलं. त्याचं डोकच उठलं.

"आईनं आज औंसा औंसाचे दोन पुडे उचलून नेले", त्यानं वडिलांकडे तक्रार केली, कुठे दाखवायचे ते आता हिशेबात ?"

म्हातारा काहीच बोलला नाही, आठ्या घालत तो क्षणभर उभा राह्यला विचार करत आणि मग वरच्या मजल्यावर बायकोकडे गेला नि प्रेमळपणे म्हणाला, "वारवारुष्का, तुला दुकानातून काही लागलं तर तू खुश्शाल आण. पाहिजे ते आणत जा तू, मुळीच संकोच करू नकोस बर का."

दुसऱ्या दिवशी अंगणातून इकडून तिकडे धावपळ करताना, स्तेपाननं आईला ओरडून सांगितलं, "आई तुला दुकानातून कुठल्या वस्तूची गरज पडली तर तू घेऊन जा हं !"

तिच्या दानधर्म करण्यात, ख्रिस्ताच्या तसबीरीपुढील लवलवत्या ज्योतीप्रमाणे किंवा खिडकीत सजवलेल्या लाल फुलाप्रमाणे प्रसन्न उत्साहवर्धक असं काहीतरी होतं. 'श्रोवटाइड' च्या वेळी किंवा स्थानीय सेंटच्या यात्रेच्या तीन दिवसाच्या सुट्टीत शेतकऱ्यांना शिळं गोमांस विकलं जायचं. त्याच्या पिंपाजवळ नुसतं उभं राह्यलं तरी वासानं डोकं उठायचं. त्याच्या पैशाच्या बदल्यात दारूच्या नशेतल्या त्या लोकांकडून विळे, टोप्या, बायकांचे डोक्याचे रुमाल घेतले जायचे. गिरणी कामगार घाणेरडी वोडका प्यायल्यामुळे नशेत तर्र होऊन चिखलात लोळत पडलेले असायचे तेव्हा वाटायचं पाप दाट धुक्याच्या रूपांत सगळीकडे उंच उंच चढतंय. त्याच वेळी एक गोष्ट मनाला सुखावून जायची की त्याच घरात एक शांत, निर्मळ मनाची बाई राहतेय, जिला ह्या

कुजक्या गोमांसाशी किंवा वोडकाशी काही देणं घेणं नाहीये. तसल्या त्या कंटाळवाण्या ढगाळ वातावरणात गोरगरिबांना, दु:खी पीडितांना केलेला दानधर्म मशीनमधल्या सेफ्टी व्हॉलप्रमाणे. आपद्‌कालीन कळीचं कार्य करीत असतो.

ग्रीगोरीच्या घरातला प्रत्येक दिवस कौटुंबिक काळज्या दूर करण्यात संपायचा. दिवस उजाडला नाही तोच अकसिन्या हाततोंड धुताधुतानाच चौफेर बारीक नजर टाकायची. स्वयंपाकघरात चहाचा सामोवार पाण्याला उकळी फुटल्यामुळे शिट्टी देत असायचा जणू काही येणाऱ्या संकटाची सूचनाच असायची ती. लहान चणीचा, नीटनेटका म्हातारा ग्रीगोरी लांब काळा कोट, प्रिंटेड विजार आणि चमकणारे उंच बूट घालून सर्व खोल्यांतून टाक टाक करत फिरत असायचा. त्या वेळी कुठल्याशा प्रसिद्ध रशीयन कवितेतल्या सासऱ्याची आठवण करून द्यायचा तो. मग दुकानाची दारं उघडायची. उजाडल्याबरोबर घोडागाडी पोर्चपाशी येऊन उभी राह्यची. आपली पीक कॅप कानापर्यंत ओढून घेऊन म्हातारा ग्रीगोरी झटकन उडी मारून तिच्यात बसायचा. त्याच्याकडे पाहून कुणालाही वाटलं नसतं कि त्याला छप्पन्न वर्ष पूर्ण झाली आहेत. त्याची बायको आणि सून त्याला निरोप द्यायला पोर्चमध्ये थांबलेली असायची. कडक इस्त्रीचा कोट घालून तीनशे रुबलला खरेदी केलेल्या काळ्या घोड्याच्या गाडीतून तो ऐटीत जायला निघायचा तेव्हा त्याची कुळं तक्रारी आणि विनंत्या घेऊन सामोरी आलेली त्याला आवडायचं नाही. त्याला त्यांचा तिटकारा यायचा. एखादा शेतकरी फाटकाशी त्याची वाट पहात उभा असलेला त्याच्या नजरेस पडला तर तो रागावून त्याच्यावर खेकसायचा, "कशाला उभा आहेस तू इथे ? चल नीघ !" भिकारी हात पसरत पुढे आला तर ओरडायचा, "देवाकडे माग तुला काय हवंय ते !"

ग्रीगोरी कामाला निघून गेल्यावर भडक रंगाच्या ड्रेसवरून काळा अेप्रन चढवलेली त्याची बायको खोल्यांची झाडझूड करायची नाहीतर स्वयंपाकघरात मदत करायची. अकसिन्या दुकानात काऊंटरपाशरी उभी असायची. अंगणात बाटल्यांची आणि नाण्यांची खळखळ, अकसिन्याचं हसणं, ओरडणं, फसवणूक झालेल्या गिऱ्हाइकांनी रागाने केलेली बाचाबाची कानावर पडायची. ह्या सगळ्यावरून कळायचंच की दुकानात वोडकाची चोरून मारून विक्री चालू झाली आहे. बहिरापण कधीकधी दुकानात बसायचा नाहीतर डोक्यावर टोपी न घालता, खिशात हात घालून निर्वीकारपणे दूरच्या झोपड्यांकडे नाहीतर कधी

आकाशाकडे पहात रस्त्यावर रेंगाळत असायचा. घरात दिवसातून सहा वेळा तरी चहा व्हायचा, चार वेळा तरी टेबालाशी बसून खाणं पिणं व्हायचं आणि रात्री दिवसभराच्या देण्याघेण्याचा मेळ लावल्यावरच निजानिज व्हायची.

उकल्येयेवमधल्या एकूण तीन कापडगिरण्या त्यांच्या गिरणी मालकांचे, ख्रिमिनी मोठी पाती आणि ख्रिमिनी छोटी पाती आणि कोस्त्युकोव यांची निवासस्थानं एका टेलिफोन लाईनवर जोडण्यात आली होती. हीच लाईन पुढे जिल्हाबोर्ड कार्यालयापर्यंत नेली होती. पण थोड्याच दिवसांत कार्यालयातील टेलिफोन यंत्रात ढेकूण आणि झुरळं वाढल्यामुळे ती बंद पडली होती. जिल्हा बोर्डाचा वरिष्ठ अधिकारी बेताचाच शिकलेला होता आणि लिहिताना प्रत्येक शब्द पहिल्या लिपीत लिहिलेला असायचा त्याचा पण टेलिफोन बिघडला तेव्हा मोठ्या ऐटीत म्हणाला, "हो, आम्हाला आता टेलिफोनशिवाय जडच जाणार आहे."

ख्रिमिनी मोठी पाती ख्रिमिनी छोट्या पातीवर बरेचदा कोर्टात दावे लावायची कधीकधी छोट्या पातीतल्या भावाभावात पण आपसात तंटेबखेडे चालायचे आणि ते कोर्टापर्यंत जायचे. अशा वेळी त्यांच्यात आपसात समेट होईपर्यंत गिरण्या महिनोन महिने बंद पडायच्या. मग काय गावातल्या रहिवाशांची खूप करमणूक व्हायची कारण प्रत्येक भांडण म्हणजे गप्पा नि वावड्यांना उधाण ! सणावारी कस्त्युकोव आणि ख्रिमिनी छोट्या पातीतील मंडळी गाड्यातून हिंडायला निघायचे. त्यांच्या भरधाव जाणाऱ्या गाड्यांखाली गाईची वासरं तुडवली जायची. सुंदर पोशाख केलेले अकसिन्या आपल्या खळीनं कडक केलेल्या स्कर्टची फडफड करीत दुकानाच्या समोरच्या रस्त्यावरून फलकारत असायची. तरुण ख्रिमिनी बळजबरी करतोय असं दाखवत तिला आपल्या गाडीत बसवून झटकन गाडी जोरात पिदाडायचा. लोकांना आपला नवा घोडा दाखवण्यासाठी म्हातारा त्सिबुकिनपण वारवाराला बरोबर घेऊन फेरफटका मारायचा.

फिरून घरी आल्यावर संध्याकाळी उशिरा गावातली माणसं झोपायला गेल्यावर छोट्या ख्रिमिनी अंगणात महागडा ॲकॉर्डियन वाजत असायचा. त्याच वेळी चांदण पडलं असलं तर त्या सुरांनी आनंदानं लोकांचं हृदय हेलावून जायचं. मग मात्र उकल्येयेवो गांवढळ खेडं वाटायचं नाही.

❋

भाग २

त्सिबुकिनचा थोरला मुलगा क्वचितच म्हणजे मोठ्या सणापुरताच घरी यायचा मात्र गावाकडून जाणाऱ्या येणाऱ्याबरोबर पत्र पाठवायचा. ही पत्रं पानभर, सुंदर वळणदार अक्षरात दुसऱ्या कोणाकडून तरी लिहिलेली असायची. पत्राची भाषा भावपूर्ण अशी असायची. तो बोलताना अशी भाषा कधीच वापरीत नसे. उदा. ''आदरणीय मम्मा आणि पापा, मी तुम्हाला तुमच्या प्रकृतीला योग्य आणि तुम्हाला आवडेल असं चहाच्या पत्तीचं पाकीट भेट म्हणून पाठवीत आहे.''

प्रत्येक पत्राखाली 'अनिसिम त्सिबुकिन' अशी गिचमिड अक्षरात केलेली सही असायची, वाटायचं की ती मोडक्या लेखणीनं केलेली असावी. ह्या सहीच्या खाली सुंदर अक्षरात ''मुखऱ्यार'' असं लिहिलेलं असायचं. त्याची ती पत्र घरात कितीतरी वेळा वाचली जायची. वाचता वाचता भावनाविवश होऊन त्सिबुकिन लालीलाल व्हायचा नि म्हणायचा, ''बघा ना, त्याला घरी राह्यचं नाहीये म्हणून शिक्षणाचं निमित्त करून बाहेर पडलाय. काही हरकत नाही ! जो तो आपल्या मनाप्रमाणे वागायला स्वतंत्र आहे !''

एक दिवस श्रोवेटाइडच्या आधी अचानक टपोऱ्या थेंबाचा जोराचा पाऊस आला. म्हातारा आणि वारवारा पावसाची मजा पहात खिडकीशी उभी होती. पहातात तो काय अनिसिम टमटममधून स्टेशनवरून घराकडे येत होता. तो आज येणार ह्याची कुणाला कल्पनाही नव्हती. तो घरात शिरला तोच मुळी अस्वस्थ आणि भयभीत अशा अवस्थेत. नंतरसुद्धा काही दिवस त्याची मन:स्थिती तशीच होती. तो सर्वांशी धड बोलायचासुद्धा नाही. अलिप्तपणे वागायचा. परत जायची घाई दिसत नव्हती त्याला. त्याला नोकरीवरून बडतर्फ केलाय की काय अशी कुणालाही शंका आली असती. तो आल्यामुळे वारवाराला खूप आनंद झाला होता. ती त्याच्याकडे चोरून पाह्यची, डोकं हलवत उसासा सोडायची ! ''काय याचं हे वागणं, देवालाच माहीत'', ती म्हणायची, ''हा मुलगा अठ्ठावीस वर्षांचा झाला आणि सड्या फटिंगासारखा उंडारतोय. ओख-त्येरव-त्ये...!''

शेजारच्या खोलीतून तिचं शांत एकसूरी बोलणं ''ओख-त्येरव-त्ये''

असं काहीतरी ऐकायला यायचं. ती नवऱ्याच्या आणि अकसिन्याच्या कानांत कुजबुजली तेव्हा त्यांचे चेहरे पण काहीतरी गुपित एकमेकाला सांगताहेत असे वाटत होते.

सगळ्यांनी मिळून अनिसिमचं लग्न करून द्यायचं ठरवलं. "ओख-त्येरव-त्ये" "तुझ्या धाकट्या भावाचं लग्न होऊन कितीतरी दिवस झाले", वारवारा म्हणाली, "आणि तू मात्र जोडीदारणीशिवाय बाजारात फिरणाऱ्या कोंबड्याप्रमाणे हिंडतोयस एकटाच. असं नाही चालायचं हं. देवाची इच्छा असेल तर लग्न करूनच परत नोकरीवर जाशील. तुझी बायको राहील इथं, कामात हातभार लावील आमच्या. सड्या फटिंगासारखा अनिर्बंधपणे वागतोयस तू. रीतीरिवाजांचा तुला विसर पडला का ? ही अशी वागता तुम्ही शहरी मुलं बेछूटपणे. ओख-त्येरव-त्ये !

आजपर्यंत त्सिबुकिन कुटुंबातील मुलांची लग्न श्रीमंत लोकांप्रमाणे सुंदर, देखण्या मुलींशीच झाली. आत्ता अनिसिमसाठी पण एक अशीच सुंदर मुलगी पसंत केली होती. तो स्वतः दिसायला अगदीच साधारण, अनाकर्षक असा होता. उंचीनं बेताचा, किरकोळ बांध्याचा असला तरी त्याचे गाल मात्र गोल, ओथंबल्यासारखे होते, डोळे स्थिर पण तीक्ष्ण होते, दाढीचे केस विरळ, तांबूस रंगाचे होते आणि विचारात मग्न असायचा तेव्हा ते तो तोंडात कोंबायचा नि चघळत बसायचा. त्याच्या चालण्यावरून तो खूप मद्यपान करत असणार हे कोणच्याही लक्षात आलं असतं. त्याला जेव्हा सांगितलं की त्याच्यासाठी एक सुंदर मुलगी पाह्यली आहे तेव्हा तो झटकन म्हणाला, "ठीकच आहे की, मी पण काही कुबडा नाहीये. आम्ही त्सिबुकिन मंडळी दिसायला सुंदरच आहोत."

त्यांच्या गावाला लागूनच तरगुयेवो नावाचं एक खेडं होतं. गेल्या काही वर्षांत ह्या खेड्याचा अर्धा भाग उकल्येयेवोत मिसळून गेला होता आणि उरलेला अर्धा भाग मूळचं खेडं होतं. शहरालगतच्या खेड्यातल्या भागात, स्वतःच्या छोट्याशा घरात एक विधवा राहात असे. तिच्याकडे तिची रोजंदारीवर काम करून पोट भरणारी बहीण आणि लीपा नावाची मुलगी राहात असे. ती पण आईबरोबर कामाला जायची. लीपाच्या सौंदर्याचा साऱ्या तुरगुयेवोमध्ये बोलबाला होता. पण तिचं दारिद्र्य तिच्या लग्नाच्या आड येत होतं. लोक आपापसात म्हणायचे की तिच्या रूपाकडे पाहून एखादा वयस्कर नाहीतर विधूर

मनुष्य तिच्या गरिबीकडे कानाडोळा करीत तिच्याशी लग्न करायला तयार होईल किंवा लग्न न करता तिला अशीच ठेवून घेईल. असं झालं तर तिच्या आईच्या पोटापाण्याचा पण प्रश्न सुटेल. लग्न जमवणाऱ्या मंडळींकडून वारवाराला लीपाविषयी इत्थंभूत माहिती कळली आणि ती थेट तरगुयेवोमध्ये दाखल झाली.

थोडे दिवसांनी मुलीच्या मावशीकडे मुलगी पाहण्याचा कार्यक्रम झाला. त्यानंतर खाणंपिणं आणि मद्यपानाचं आयोजन केलं होतं. लीपानं दाखवण्याच्या कार्यक्रमासाठी मुद्दाम शिवून घेतलेला गुलाबी ड्रेस घातला होता. तिनं केसाला भडक रंगाची ज्वाळेप्रमाणे लकाकणारी रिबन लावली होती. लीपा सडपातळ, किरकोळ शरीरयष्टीची, फेकपांढऱ्या चेहऱ्याची, नाकीडोळी नीटस आणि नाजूक होती पण शेतावर काम करण्यामुळे हातापायाची कातडी काळवंडली होती तिची. चेहऱ्यावर भित्रं, खिन्न हास्य होतं आणि तिच्या बालिश नजरेत विश्वास आणि कुतूहल यांचं मिश्रण दिसत होतं.

लीपा कोवळी पोर होती अजून, नुकतीच कुठं वक्षस्थलं उभारून यायला लागली होती, पण तसं लग्नाचं वय झालं होतं तिचं आणि मुख्य म्हणजे ती देखणी होती याबद्दल दुमत असणं शक्यच नव्हतं. फक्त तिच्यातली एकच गोष्ट खटकत होती. तिचे पुरुषाऊ लांबसडक हात खांद्यापासून लोंबत असल्यासारखे दिसायचे.

''हुंड्यापांड्याच्या आम्ही विरुद्ध आहोत'', म्हातारा त्सिबुकिन लीपाच्या मावशीला म्हणाला. आमच्या स्तेपानासाठी पण आम्ही गरिबाघरचीच मुलगी केली आहे. पण आज तिची तारीफ करायला आमचे शब्द अपुरे पडताहेत. घरात काय नि धंद्यात काय, ती हात लावील त्याचं सोनं होतंय.

लीपा दारापाशी उभी होती. तिला जणू सांगायचं होतं, ''माझ्या बाबतीत काय करायचं त्याचे सर्व अधिकार तुम्हाला उपजतच दिलेले आहेत. माझा तुमच्यावर पूर्ण विश्वास आहे.'' तिची मोलमजुरी करणारी आणि आज भीतीनं हातपाय गळून गेलेली आई प्रासकोव्या स्वयंपाकघराच्या बाहेर आलीच नाही. तिच्या ऐन तारुण्यात एकदा एका व्यापाऱ्याकडे फरशी पुसत असताना राग अनावर झालेल्या त्या नराधमाने तिला लाथ मारली होती. भीतीनं तिची बोबडी वळली होती नुसती. त्या दिवसापासून आजपर्यंत आयुष्यभर तिच्या मनातल्या त्या भीतीनं तिची पाठ सोडली नव्हती. भीतीमुळे नेहमी तिच्या हातापायाचा

थरकाप व्हायचा, तिचे गाल थरथरायचे. स्वयपाकघरात बसल्या बसल्या तिचे कान बाहेर पाहुणे मंडळी काय बोलताहेत त्याकडे लागून राहिले होते. सारखी ख्रिस्ताच्या तसबिरीकडे पहात कपाळावर हात दाबून क्रॉस करीत होती ती. किंचित नशा चढलेला अनिसिम स्वयंपाकघराच्या दाराची उघडझाप करीत होता आणि उगीचच लघळपणे म्हणत होता, ''आई तुम्ही इथं आत काय बसला आहात. तुमच्या शिवाय आम्हाला बाहेर बरं वाटत नाही.''

प्रासकोव्या दर वेळेला घाबरून आपले हात सुरकुत्या पडलेल्या कृश छातीवर ठेवत म्हणायची, ''महाराज, असं काय म्हणताय, हा तुमचा मोठेपणा आहे....''

मुलगी पाहण्याचा कार्यक्रम झाल्यावर लग्नाची तिथी निश्चित करण्यात आली. घरी आल्यावर अनिसिम शीळ घालत उगाचच खोल्यांतून येरझारा घालत होता. मध्येच कशाची तरी आठवण झाल्यासारखा विचारमग्न व्हायचा, जमिनीकडे एकटक भेदक नजरेनं पाह्यचा. जणू काही आपल्या तीक्ष्ण नजरेने तो जमिनीचा खोलवर ठाव घेत होता. आता आपलं लग्न होणार आहे, तेसुद्धा अगदी लवकर म्हणजे इस्टरच्या सणाच्या वेळी, ह्याचा पुसटसाही आनंद त्याच्या चेहऱ्यावर दिसत नव्हता की आपल्या वाक्दत्त वधूला भेटायची घाईपण दिसत नव्हती. तो हलकीशी शीळ घालत घरभर फिरत होता नुसता. स्पष्ट दिसत होतं की केवळ आईवडिलांच्या इच्छेखातर लग्नाला तयार झालाय आणि गावात अजून रिवाज आहे की मुलाचं लग्न फक्त घरकामाला दोन हातांची भर पडेल म्हणून करायचं असतं. त्याच्या नोकरीवर परत जाण्याची त्याला घाई नव्हती. त्याचं वागणंपण दरखेपेपेक्षा जरा वेगळं, तुटक वाटत होतं आणि जे बोलायला नको, नेमकं तेच बोलत होता तो.

⁕

भाग ३

शिकलोवो खेड्यात ख्लिस्तवपंथाच्या, बायकांचे कपडे शिवणाऱ्या दोन बहिणी रहात होत्या. त्यांना लग्नाचे सर्व कपडे शिवण्याचं काम दिलं होतं. त्या मापं घेण्यासाठी आणि शिवलेले कपडे कसे झाले आहेत त्याची चाचणी

घेण्यासाठी वरचेवर त्सिबुकिनकडे यायच्या आणि चहा पीत बराच वेळ गप्पा मारत बसायच्या. वारवाराचा ड्रेस काळी लेस आणि काचेचा मणी लावलेला तपकिरी रंगाचा होता तर अकसिन्याच्या ड्रेसचा वरचा भाग पिवळा आणि खालचा घोळ फिक्कट हिरव्या रंगाचा होता. शिंपीणींच काम संपलं तेव्हा त्सिबुकिननं त्यांची बोळवण पैशाऐवजी दुकानातला माल देऊन केली. त्या घरातून बाहेर पडल्या तेव्हा त्यांचे चेहरे पडले होते. त्यांच्या खांद्याला अडकवलेल्या पिशव्यांत चरबीच्या मेणबत्त्या आणि सारडीन माशांचे पॅकबंद डबे भरलेले होते. ह्या दोन्हीही गोष्टींची त्यांना मुळीच गरज नव्हती. गावातून बाहेर पडून शेतात आल्यावर त्या टेकाडावर बसून ढसा ढसा रडल्या.

लग्नाच्या फक्त तीन दिवस आधी कोरे करकरीत कपडे घातलेला अनिसिम घरी येऊन पोहोचला. त्याने रबराचे चकचकीत गमबूट घातले होते, नेकटायच्या ऐवजी टोकाला मणी लावलेली लाल कॉर्ड बांधली होती, बाह्यात हात न घालता कोट नुसताच दोन्ही खांद्यावर टाकला होता. तो पण नवाच होता.

देवाच्या तसबीरीपुढे उभं राहून गंभीरपणे प्रार्थना केल्यावर त्याने आईवडिलांना अभिवादन केले आणि दोघांनाही रुबल्सची आणि पन्नास कोपेअेकची प्रत्येकी दहा दहा चांदीची नाणी दिली. अकसिन्याला पंचवीस कोपेअेकची वीस नाणी दिली. ह्या मोहक भेटीचं वैशिष्ट्य म्हणजे प्रत्येक नाणं नवं कोरं होतं आणि सूर्यप्रकाशात चमचमत होत. धीरगंभीर आणि सभ्य दिसण्याच्या आटापिट्यात त्यानं चेहऱ्याच्या शिरा ताणून गाल फुगवले होते. त्याच्या सर्वांगाला मद्याचा वास येत होता. बहुतेक प्रत्येक स्टेशनवर गाडी थांबल्यावर मद्यपानासाठी बफेटकडे धाव घेतली असावी त्यानं. थोड्याच वेळात ओढून ताणून आणलेली सलगी संपून त्याचा मूळचा शिष्टपणा प्रकट होऊ लागला.

त्यानंतर अनिसिमनी वडिलांबरोबर चहाफराळ केला. नवी नाणी हातात खुळखुळवत वारवाराने त्याच्याकडे शहरात कामधंद्यासाठी जाऊन राहिलेल्या माणसांची ख्याली खुशाली विचारली.

"ठीक आहेत, देवाच्या कृपेनं मजेत आहेत", अनिसिम म्हणाला, "फक्त आपल्या त्या इवान इगरोवच्या कुटुंबात एक दुर्घटना घडली. त्याची आजी, सोफीया निकिफरोवना क्षयानं वारली. त्यांनी तिच्या बाराव्या दिवशी

मिठाईवाल्याकडून खाण्यापिण्याची व्यवस्था केली होती. माणशी अडीच रुबल्स खर्च आला त्यांना. द्राक्षाचं मद्य होतं सर्वांसाठी. आपल्या भागातले काही शेतकरी देखील जेवायला बोलावले होते. त्यांच्यासाठीसुद्धा अडीच रुबल्स खर्च केले होते त्यांनी. पण त्यांनी काऽऽही खाल्लं नाही त्या शेतकऱ्यांना सलामी बिलामीची काय चव !''

''अडीच रुबल्स !'' आश्चर्यानं मान हलवीत म्हातारा म्हणाला.

''हो मग ! ते काही आपलं खेडं नाही. काही तरी चाऊ माऊ करायला उपहारगृहात जातो आपण, एखाददुसरा पदार्थ मागवतो, तेवढ्यात मित्र मंडळी येऊन पोहोचतात. त्यांच्याबरोबर तुम्हीपण मद्याचा पेला रिता करता. पहाता पहाता दिवस उजाडतो. मग काय प्रत्येकाच्या खिशाला तीन चार रुबल्सची चाट पडते. सामरोदव बरोबर गेलो तर मग काही विचारायलाच नको. तुम्हाला माहीत आहे. कन्याकच्या एका पेल्याला साठ कोपेअेक मोजावे लागतात !''

''सगळ्या थापा'', म्हातारा कौतुकानं म्हणाला, ''चक्क थापा !''

''हल्ली तर मी नेहमीच सामरोदव बरोबरच जातो. हाच तो सामरोदव बरका माझी पत्रं लिहून देणारा काय सुंदर पत्र लिहितो नाही तो. ममाशा, तुला सांगू का'',जोशात येऊन अनिसिम म्हणाला, ''हा सामरोदव कशा तऱ्हेचा मनुष्य आहे याची तुला कल्पना नाही येणार. आम्ही सर्व जण त्याला मुरवतार म्हणतो, कारण तो जन्मानं अर्मेनियन आहे, चक्क काळा. मी त्याला डोक्यापासून पायापर्यंत अंतरबाह्य ओळखतो, माझ्या हाताच्या पाच बोटांप्रमाणे ममाशा त्याच्या सगळ्या भानगडी मला माहीत आहेत. त्यालापण ते कळून चुकलंय. त्यामुळे तो माझ्या मागेमागे असतो. आम्हाला दोघांना एकमेकांपासून विभक्त करणं अशक्यप्रायच आहे. त्याला खरं तर माझी थोडी भीतीच वाटते. पण माझ्याशिवाय नाही जगू शकायचा तो. जिथं मी तिथं तो. मम्मा मला देवानं दिव्य दृष्टीच दिली आहे म्हणेनास. सहज लोकांच्या जमावाकडे लक्ष जातं माझं. एक शेतकरी शर्ट विकत असतो जुन्याबाजारात ''थांब, हा शर्ट चोरून आणलेला आहे.'' ''माझंच खरं निघतं. तो शर्ट चोरीचाच असतो.''

''तुला कसं कळतं ते ?'' वारवारानं विचारलं.

''कुठून नाही कळत. माझी दृष्टीच तशी आहे असं वाटत मला, तो शर्ट काळा का गोरा मला काहीच माहिती नव्हती त्याची. पण का कोण जाणे मी

त्याच्याकडे आकर्षित होतो. हा चोरीचा माल आहे असंच माझं मन मला सांगत आणि मग निघतोही तो चोरीचा. मी ऑफीसमधून बाहेर जायला निघालो की सगळे म्हणतात, ''निघाला अनिसिम 'स्नाइप' पक्षाची शिकार करायला !'' त्याचा अर्थ असतो, चोरीचा माल पकडायला. खरंच आहे ते...चोरी तर काय कुणालाही करता येते. पण ती पचवणं महा कर्म कठीण असतं ! जग एवढं मोठंय पण चोरीचा माल लपवायला कुठेच जागा नाहीये.

''अरे, इथे त्या गुन्तरेवच्या घरी गेल्याच आठवड्यात एक एडका आणि दोन बकऱ्या चोरीला गेल्याना'', वारवारा उसासा सोडत म्हणाली, ''पण चोर पकडायला आहे कोण इथं...ओरव-त्येरव-त्ये...

''त्यात काय आहे एवढं. मला शोधता येईल त्या माणसाला. फक्त प्रयत्न करायला हवा.''

लग्नाचा दिवस येऊन ठेपला. हवा थंड होती जरा पण एप्रिल महिन्यातला लख्ख प्रकाशाचा, उत्साह द्विगुणित करणारा दिवस होता तो. पहाटेपासून उकल्येयेवकडे तीन घोड्यांच्या त्रोयकांची आणि दोन घोड्यांच्या गाड्यांची रीघ लागली होती. त्यांच्या घंटांचा खुळखुळाट कानावर पडत होता. त्यांच्या जोखडांच्या कमानीला आणि घोड्यांच्या आयाळीला लावलेल्या रंगीबेरंगी रिबीनी झिळमिळत होत्या. घंटांच्या आवाजाने गोंधळून गेलेले 'ग्राच' पक्षी कुंपणावरच्या लोंबणाऱ्या वेलींवर कलकलाट करीत होते. ''स्टारलिंग'' पक्ष्यांचं गाणं तर थांबतच नव्हतं. जणू त्सिबुकिनकडे लग्न आहे म्हणून त्यांचा आनंद गगनात मावत नव्हता.

घरामध्ये केव्हाच टेबलं लागली होती. त्यांच्यावर मोठे मोठे लांबच लांब मासे, डुकराचं मास, मसाला भरलेले पक्षी, स्प्रॅटस्चे हवाबंद डबे, तऱ्हेतऱ्हेची लोणची, वोडका आणि शँपेनच्या अगणित बाटल्या ठेवलेल्या होत्या. विस्तवावर भाजलेल्या सॉसेजेसचा आणि आंबवलेल्या लॉबस्टरचा घमघमाट येत होता. म्हातारा ग्रीगोरी दणदण पाय आपटत एका सुरीवर दुसरी सुरी घासत टेबलांभोवती फिरत होता. प्रत्येक जण वारवाराला ''हे कुठय ? त्याचं काय करायचं '' हे विचारण्यासाठी हाका मारत होतं. बिचारी गोंधळल्यासारखी धापा टाकत स्वयंपाकघरात खेपा घालत होती. स्वयंपाकघरात उजाडल्यापासून कस्त्युकव-कडचा आचारी आणि ख्रिमिनिकडची मुख्य स्वयंपाकीण स्वयपाकाच्या कामाला

लागले होते. केस कुरळे करून घेतलेली, बिनबाह्याचा स्कर्ट घातलेली अकसिन्या बूट करकर वाजवत वावटळीसारखी झरझर आतबाहेर करीत होती तेव्हा लोकांना तिचे उघडे गुडघे आणि डोकावणाऱ्या वक्षस्थळांचं ओझरतं दर्शन होत होतं. सगळीकडे सावळा गोंधळ चालला होता. काम करणाऱ्या लोकांना मालक मंडळी धारेवर धरीत होती. रस्त्यावरून जाणारे येणारे लोक सताड उघड्या फाटकासमोर रेंगाळत घरात विशेष काहीतरी कार्यक्रम असावा असा तर्क करीत होते.

''नवऱ्या मुलीला घेऊन यायला मंडळी गेली आहेत.'' कुणीतरी म्हणत होतं.

गाड्यांच्या घंटांचा खुळखुळ आवाज यायला लागला आणि तो थोड्या वेळाने कमी कमी होत गावाच्या पलीकडे दूर दूर जाऊ लागला. दुपारी तीनच्या सुमाराला घरातल्या माणसांचे घोळके पुढे पुढे जायला लागले. पुन्हा घंटाचा आवाज यायला लागला. नवऱ्या मुलीला घेऊन येत होते ! चर्च माणसांनी भरून गेलं होतं, झुंबरांमधून मेणबत्त्या लवलवत होत्या म्हाताऱ्या त्सिबुकिनच्या विनंतीवरून गाणाऱ्या मंडळींचा ताफा हातात पुस्तकं घेऊन गात होता. मेणबत्त्यांच्या ज्योतींच्या आणि नव्या कपड्यांच्या झगमगाटामुळे लीपाचे डोळे दिपत होते. तिला वाटत होतं की गाणाऱ्या मंडळींचा कर्कश्श आवाज हातोड्याच्या घावाप्रमाणे तिच्या डोक्यावर घणाघात करीत होता. आयुष्यात पहिल्यांदाच घातलेल्या त्या तंग कपड्यांमुळे तिला आवळल्यासारखं वाटत होतं. त्यातच त्या नव्या बुटात पाय मुडपत होता. तिच्या चेहऱ्यावरच्या भावावरून असं वाटत होतं की ही मुलगी नुकतीच बेशुद्धावस्थेतून शुद्धीवर आलीय आणि सगळीकडे टकमक पहातेय पण कळत मात्र काहीच नाहीये तिला. अनिसिमनं काळा कोट आणि गळ्याशी लाल कॉर्ड बांधली होती. तो कुठेतरी एकटक पहात विचारात हरवून गेलेला वाटत होता. गाणाऱ्यांचा आवाज मोठा मोठा होत जेव्हा टिपेला पोहोचला तेव्हा त्याने भानावर येऊन चटकन हाताचा क्रॉस केला. त्याचं मन हेलावून गेलं होते. त्याला रडावसं वाटत होतं. हे चर्च बालपणापासून त्याच्या परिचयाचं होतं. त्याची आई कधीतरी त्याला हाताला धरून चांगले संस्कार व्हावे म्हणून चर्चमध्ये घेऊन यायची. कधीकधी चर्चमधल्या समूहगानात तो मुलांबरोबर गायचा देखील. इथला कोपरान कोपरा,

प्रत्येक तसबीर त्याच्या परिचयाची होती. त्याच चर्चमध्ये त्याचं आज लग्न लागत होतं. सामाजिक बंधनानुसार लग्न व्हायलाच हवं म्हणून केवळ तो लग्नाला तयार झाला होता. पण ह्या क्षणाला त्याच्या मनात तो विचार नव्हता. त्याला काही कळतच नव्हतं. आपलं आज लग्न आहे. हे तो सपशेल विसरला होता. त्याचे डोळे अश्रूंनी डबडबल्यामुळे तसबीरी स्पष्ट दिसत नव्हत्या त्याला. छातीवर दडपण आलं होतं. तो देवाला विनवित होता की आज ना उद्या केव्हाही त्याच्यावर ओढवणारं अनिवार्य असं संकट ह्या ना त्या कारणाने टळू दे, दुष्काळात गर्जना करणारे काळे ढग पावसाच्या एका थेंबाचीही शिंपण न करता एखाद्या खेडेगावाला ओलांडून सरळ पुढे जातात ना तसं. भूतकाळात मी अगणित पापं केली आहेत, पाणी गळ्यापर्यंत येऊन पोहोचलंय, परतीची वाट दिसत नाहीये त्यामुळे क्षमा मागणंसुद्धा धाडसाचं आहे. पण त्यानं ते धाडस केलं, मोठमोठ्यानं हुंदके देऊ लागला तो. त्याचं नशीब की कोणीच त्याच्याकडे विशेष लक्ष दिलं नाही. लोकांना वाटलं की तो मद्याच्या नशेतच हे सगळं करतोय.

इतक्यात अतिशय घाबरलेल्या लहान मुलाचा आवाज कानावर पडला, "आई, आई ग, मला इथून बाहेर घेऊन चल ना !"

"कोण आवाज करतंय तिकडे, गप्प बसा", पाद्री ओरडला.

चर्चमधून वऱ्हाडी मंडळी घरी परतायला लागली, तेव्हा लोक पण त्यांच्या मागे धावत सुटले. दुकानाच्या भोवती, फाटकाजवळ आणि अंगणामध्ये खिडक्यांच्या खालीसुद्धा लोकांचे घोळके दिसत होते. नूतन दांपत्याचं अभिनंदन करण्यासाठी बायका आल्या. नवरा मुलगा नववधूला घेऊन उंबरठा ओलांडून आत येतो तोच गाणारी मंडळी सर्व शक्तीनिशी मोठमोठ्यानं गाऊ लागली. लग्नासाठी मुद्दाम शहरातून मागवलेला बँड वाजायला लागला. 'डॉन शँपेन'च्या उंच उंच पेल्यांनी आलेल्या मंडळींचा पाहुणचार सुरू झाला. उंच, किडकिडीत, डोळे मुष्किलीनंच दिसतील इतक्या जाड, दाट भुवया असलेला सुतार कामाचा ठेकेदार म्हातारा एलिझारव नवदांपत्याला उद्देशून म्हणाला, "अनिसिम आणि माझ्या लाडक्या पोरी, एकमेकांवर भरभरून प्रेम करा, मुलांनो देवाच्या मर्जीप्रमाणे रहा मग स्वर्गाची सम्राज्ञी तुम्हाला कधीच सोडून जाणार नाही." त्याने त्सिबुकिनच्या खांद्यावर डोकं टेकल आणि तो हुंदके देत म्हणाला, "ग्रीगोरी

प्येत्रोविच, आपण रडू या, आनंद झालाय म्हणून रडू या !'' हे वाक्य तो हळू आवाजात बोलला आणि दुसऱ्या मिनिटाला खो-खो-खो-खो करत खर्जात हसायला लागला. तुला सून सुंदर मिळाली आहे, प्रत्येक अवयव रेखीव आहे, मार्दव आहे. आवाजात कडकडाट नाहीये. सगळी यंत्रणा ठाक ठीक आहे, स्क्रूपण जागच्या जागी फिट केलेले आहेत.''

ह्या अेलीझारवचा जन्म येगोरेवस्की जिल्ह्यात झाला होता. पण तो वयात आल्यापासून उक्ल्येयेवच्या गिरणीत कामाला आहे. तो स्वत:ला इथलाच रहिवासी समजतो. इथल्या लोकांच्या आठवणीप्रमाणे गेली कित्येक वर्ष तो आज दिसतो तसाच वयस्क, सडपातळ, किंचित झुकलेला आहे. सगळी जण त्याला कुबड्या म्हणूनच संबोधायचे. गेली चाळीस वर्षं गिरणीमध्ये सतत दुरुस्तीचं काम करीत राहिल्यामुळे प्रत्येक वस्तूचं नि माणसाचंपण मूल्यमापन करण्याची त्याची मोजपट्टी होती फक्त त्याचा टिकाऊपणा. दुरुस्ती तर नकोय ना करायला? हाच पहिला विचार त्याच्या मनात यायचा. आजसुद्धा टेबलाशी बसायच्या आधी खुर्च्या धड आहेत की नाहीत ह्याची चाचपणी केली त्यानं. इतकंच काय सॅमन मासासुद्धा खायच्या आधी हातानं चाचपडून पाह्यला होता त्यानं.

शॅम्पेनचे ग्लास हातात घेऊन एकमेकांचे शुभचिंतन केल्यावर सगळीजण जेवायच्या टेबलाशी येऊन बसली. खुर्च्यांवर स्थानापन्न होईपर्यंत पाहुणे मंडळींची बोलणी चालूच होती. ओसरीत गायक गात होते, वाद्य वाजत होती. त्याच वेळी अंगणात बायकाचं लग्नात गायच्या विशिष्ट गाण्याचं बेसूर समूहगान चालू होतं. डोकं फिरायची वेळ आली होती नुसती.

अेलीझारवची खुर्चीत बसल्यावरसुद्धा सारखी चुळबुळ उठबैस चालली होती. तो शेजारी बसलेल्याला कोपरानं ढोशीत होता, लोक बोलत असताना मध्येच तोंड खुपसीत होता, रडत होता, हसत होता. ''मुलांनो, लाडक्या पोरांनो, बच्चे मंडळींनो'' त्याची बडबड चालली होती. बेटी अकसिन्यूश्का; वारवारारुश्का, आपण सगळीजण एकमेकाशी भांडण तंटा न करता सुखा समाधानानं जगू या, माझ्या लाडक्या छोट्या कुऱ्हाडींनो..

त्याला मद्यपानाची सवय नव्हती त्यामुळे आज एक ग्लास जीन घेऊनच नशा चढली होती त्याला. जीन कडू, मळमळ आणणारी होती. ती कशापासून

केली होती कोण जाणे पण घेतलेल्या प्रत्येकाला तिनं धुंदी आणली होती, जीभ जड होत होती, बोलण बोबडं येत होतं.

त्सिबुकिनकडे लग्नाला आलेल्या पाहुण्यांत पाद्री, गिरण्यामधले मुनीम आणि त्यांच्या बायका, व्यापारी मंडळी, शेजारपाजारच्या गावातले दारू विक्रेते होते. चौदा वर्ष एकाच कार्यालयात काम करीत असलेले तहसीलदार आणि त्याचा मुनीम इथेही पण शेजारी शेजारी बसले होते. त्यांनी आजवर कुठल्याही कागदावर झिगझिग केल्याशिवाय सही केली नव्हती की एकाही माणसाला कचेरीतून फसवल्याशिवाय, अपमान केल्याशिवाय किंवा दुखावल्याशिवाय बाहेर पडू दिलं नव्हतं. दोघेही जण लठ्ठ, खाऊन पिऊन मस्त होते. त्यांनी आजपर्यंत इतकी फसवाफसवी, खोटं नाटं काम केलं होतं की त्यांच्या चेहऱ्यावरचं कातडं पण असं निराळंच, आबरं गोबरं दिसत होतं, एखाद्या फसवणाऱ्या, लबाड कोडग्या माणसाच्या कातड्यासारखं. हडकुळी, तिरळी अशी कारकुनाची बायको आपल्या चिल्ल्या पिल्ल्यांनापण बरोबर घेऊन आली होती. भक्षावर तुटून पडणाऱ्या शिकारी पक्षासारखी तिची तीक्ष्ण नजर खाद्यपदार्थांच्या सगळ्या प्लेटींवर फिरत होती. ती जेजे हाताला येईल ते हडप करीत होती आणि आपल्या आणि मुलांच्या खिशात कोंबत होती.

लीपाचा चेहरा अगदी काठा ठिक्कर पडला होता आणि चेहऱ्यावरचे भाव अजूनही चर्चमध्ये होते तसेच होते. त्यांची दोघांची ओळख झाल्यापासून अनिसिम तिच्याशी एक शब्दही बोलला नव्हता. त्यामुळे तिचा आवाज कसा आहे हेही त्याला माहीत नसावं. आतासुद्धा तिच्या शेजारी जीन घेत मुकाट्यानं बसला होता तो. नशा चढल्यावर मात्र समोर बसलेल्या आत्याला हाक मारून बडबडू लागला. बर का आत्या, माझा एक मित्र आहे. त्याचं नाव आहे सामरोदव. तो म्हणजे एक अजब नमुना आहे. एक सन्माननीय व्यक्ती आहे तो. कसं बोलावं ते त्याच्याजवळून शिकावं. पण आत्या, मला त्याचे छक्के पंजे चांगले माहीत आहेत. तो पण ते जाणून आहे. त्याची प्रकृती चांगली राहो म्हणून आपण एक एक पेला घेऊ या का ?

वारवारा प्रत्येक टेबलाजवळ जाऊन पाहुण्यांना आग्रह करीत होती. ती दमली होती, कंटाळली होती पण तिला समाधान पण वाटत होतं की आज आपल्या घरी खाद्यपदार्थांची रेलचेल आणि सढळ हातान खर्च केला गेला

होता. त्यामुळे लोकांना नावं ठेवायला जागाच उरली नव्हती. सूर्य मावळला होता पण जेवणं चाललीच होती. आपण काय खातोय आणि काय पितोय ह्याचं कुणालाही भान नव्हतं. एवढा गोंधळ होता की कोण काय बोलतंय. तेही कळत नव्हतं. वाद्यांचा आवाज मधेच केव्हातरी बंद पडला. तेव्हा क्षणभर बाहेरून एका बाईचं ओरडणं कानावर पडलं. 'रक्तपिपासू, जुलूमशहा आहात तुम्ही. तडफडून मराल तुम्ही !''

संध्याकाळी बँडच्या तालावर नृत्याची पावलं पडत होती. छोट्या पातीतली ख्रिमिनी मंडळी आपलं मद्य घेऊन येऊन पोहोचली होती. त्यांच्यातील एकाने काद्रील नृत्य करताना आपल्या दोन्ही हातात मद्याच्या बाटल्या आणि दातात शॅम्पेनचा ग्लास पकडला होता. लोकांची हसून हसून पुरेवाट झाली. काद्रील नृत्य करताना काहीजण पायावर बसून रशियन पद्धतीच्या नृत्याप्रमाणे पाय हवेत उडवीत. होते. हिरव्या कपड्यातली अकसिन्या फलकारत ओझरती इकडून तिकडे जायची तेव्हा तिच्या कपड्यांच्या घेरातून वाऱ्याची झुळूक यायची. एका नाचणाऱ्याने तिच्या ड्रेसच्या घोळावर पाय टाकला तेव्हा ड्रेसची शिवण उसवली. तेव्हा अेलिझारव ओरडला, ''मुलांनो तुम्ही पायाच विस्कटून टाकला !''

अकसिन्याचे डोळे घारे आणि धूर्त वाटायचे. त्यांची केव्हातरीच उघडझाप व्हायची. चेहऱ्यावर कायम लबाड हास्य विलसत असायचं. तिच्या निश्चल डोळ्यात, लांब मानेवरच्या छोट्याशा डोक्यात आणि लवचिक शरीरयष्टीत नागिणीची झलक दिसायची. पिवळ्या जाकिटाचा हिरवागार ड्रेस आणि तिचं ते हास्य यामुळे ती वसंतऋतूत हिरव्या पिवळ्या राईच्या शेतातून आपली मान लांब करून, डोकं वर काढून झडप घालायच्या तयारीत असलेल्या गाद्युका जातीच्या सर्पिणीसारखी दिसायची. छोटे ख्रिमिनी कुटुंब आणि अकसिन्याचं चांगलंच गुळपीठ होतं आणि स्पष्टपणे जाणवत होतं की त्यांच्यातल्या मोठ्या भावाबरोबरची तिची बरीच पुराणी दोस्ती असावी. बहिऱ्याला मात्र काऽऽही समजत नव्हतं. तो तिच्याकडे ढुंकूनसुद्धा पहात नव्हता. पायावर पाय ठेवून सुकामेवा खात बसला होता तो. त्याचा आक्रोड, बदाम दातांनी फोडण्याचा आवाज इतका मोठा येत होता की पिस्तुलातून गोळ्या झाडतोय की काय असं वाटावं.

एवढ्यात म्हातारा त्सिबुकिन हातात रुमाल फलकावत, मी पण आता

नाचायला येतोय असं दाखवत नाचणाऱ्यांच्या मध्ये शिरला. तेव्हा सर्व घरादारात नि अंगणात, नि पाहुण्या मंडळीतून कौतुकाचे शब्द निघाले, "वा, म्हातारा स्वत: नाचायला निघाला की !"

वारवारा नाचाची पावलं टाकीत होती आणि त्सिबुकिन फक्त रुमाल फडफडवत होता, टाचा आपटत होता. अंगणात खिडक्यांपाशी उभी असलेली माणसं माना उंचावत एकमेकांवर कुरघोडी करीत कुतुहलानं आत डोकावून पहात होती. त्यांना इतकी मज्जा वाटत होती की क्षणभर त्सिबुकिनची आडमार्गानं मिळवलेली संपत्ती, त्याची फसवाफसवी ह्या सगळ्यांबद्दल त्यांनी त्याला माफ केलं होतं. "शाबास ग्रीगोरी प्येत्रोविच !" गर्दीतून आवाज उठला, "नाच, असंच चालू दे! म्हणजे अजून मन हिरवं आहे म्हणायचं ! हॉ-हॉ-हॉ !"

सगळा जल्लोश संपायला रात्रीचे दोन वाजले. अनिसिम झोकांड्या खात गाणाऱ्यांचे नि वाद्यवृंदाचे आभार मानायला त्यांच्याजवळ गेला आणि त्यानं प्रत्येकाला पन्नास कोपेकचं कोरंकरकरीत नाणं भेट म्हणून दिलं. म्हाताऱ्या त्सिबुकिनच्या अगदी झोकांड्या नव्हत्या जात पण अस्थिरपणे एका पायावर नाचत नाचत पाहुण्यांना निरोप देत होता तो आणि प्रत्येकाला ऐटीत सांगत होता, "लग्नाचा खर्च दोन हजार रुबल्सच्या घरात गेलाय !"

माणसं घरोघरी जायला निघाली तेव्हा लक्षात आलं की शिकलवोच्या दारूच्या दुकानदाराचा नवा किंमती कोट कोणीतरी लंपास केलाय आणि त्याच्या जागी आपला जुना कोट टाकून दिलाय. "थांबा, आत्ता काढतो मी शोधून. मला माहीत आहे कोणी नेलाय ते !"

एकदम रस्त्यावर पळत जाऊन अनिसिम कोणाचा तरी पाठलाग करू लागला. त्यानं त्याला पकडलं. त्या नशेत धुंद, रागानं लालबुंद आणि घाम फुटलेल्या माणसाचे बखोटे पकडून त्यानं त्याला घरात आणून पटकलं. त्याच वेळी आत्या लीपाला कपडे बदलायला मदत करीत होती. बायकांनी पटकन खोलीचं दार बंद करून घेतलं.

❋

भाग ४

लग्नानंतर पाच दिवस उलटले होते. अनिसिम जाण्यापूर्वी वारवाराचा निरोप

घ्यायला माडीवर गेला. तिच्या खोलीतले ख्रिस्ताच्या तसबीरीपुढचे सर्व दिवे तेवत होते. मेणबत्त्यांच्या धूपाचा वास दरवळला होता. वारवारा खिडकीजवळ बसून लाल लोकरीचे लांब पायमोजे विणत होती.

"ह्या खेपेला, अगदीच थोडा मुक्काम झाला तुझा आमच्या जवळ. कंटाळा आला का इथला ? ओरव-त्येरव-त्ये...आम्ही अगदी सुखात आहोत, आम्हाला कशाची कमी नाहीये. तुझं लग्न थाटात आणि मनासारखा व्यवस्थित पार पडलं. तुझे पपा तर म्हणत होते दोन हजार रुबल्स खर्च झाला. एका शब्दात सांगायचं झालं तर आम्ही एखाद्या बड्या व्यापाऱ्याच्या थाटात राहतोय. फक्त थोडं कंटाळवाणं होतं इतकंच. आजपर्यंत शेकडो लोकांना दुखवलं आहे आम्ही. माझं हृदय पिळवटून निघतं. अरे बाबा आम्ही त्यांना कसं लुबाडतो, ठगवतो ते एक देवच जाणे ! कर्जाच्या बदल्यात घोडा ठेवून घेतो. कुणाकडून काही माल खरेदी केला, कुणाला कामाला लावून घेतलं तरी पावलापावलाला नुसती लांडी लबाडी नि फसवाफसवी चाललेली असते. आमच्या दुकानातलं वनस्पती तूप कडसर नि वाशेळं असतं. त्याच्यापेक्षा डांबराची चव देखील गोड असेल. पण आता तूच सांग आम्हाला चांगलं तूप विकता नाही का यायचं ?

"कोण कोणाला शिकवणार ममा ?"

"अरे पण मेल्यानंतर काय होणार ? ओय-ओय, तू तुझ्या वडिलांना सांगू शकतोस ? मग उशीर कशाला ? आत्ताच का नाही सांगत !"

"अग, तू त्यांना समजवलंस तर जास्त बरं, नाही का ?"

"खरंय ते ! मी त्यांना सांगते पण ते मला तुझ्यासारखंच शिकवतात, अगदी तुझ्याच शब्दात "आपल्या मनाप्रमाणे वागायला प्रत्येक जण मुखत्यार आहे." तरीसुद्धा देवाघरच्या न्याय निवाड्यात गफलत होत नसते. कुणी चौकशीसुद्धा करणार नाही तुमचं किती नि दुसऱ्याचं किती !

"खरंय, तिथं ही चौकशी नाही करणार कुणी. अगं पण ममाशा देव आहेच कुठे ? मग तुम्हाला जाब तरी कोण विचारणार !"

वारवारानं त्याच्याकडे आश्चर्यानं पाहिलं. ती जराशी हसली आणि हात चोळीत बसली. तिच्या चेहऱ्यावरचं ते आश्चर्य आणि तो म्हणजे एक चक्रमच आहे असा भाव पाहून तो जरा अस्वस्थ झाला.

"देव असेलही कदाचित् पण विश्वास नाहीये कुणाला", तो म्हणाला,

माझ्या लग्नाचे विधी चालले होते तेव्हा मी माझा राहिलो नव्हतो. एखाद्यानं कोंबडीखालून अंड काढावं आणि त्यातून त्याला पिल्लाची चिवचिव ऐकू यावी तसंच त्यावेळी मला माझा आतला आवाज ऐकू येत होता. जोपर्यंत लग्नसोहळा चालला होता तोपर्यंत मला वाटत होतं कि देव नक्कीच आहे ! चर्चमधून बाहेर पडलो मात्र त्या भावनेचा, वाटण्याचा मागमूसही उरला नव्हता. मग मला कुठून कळणार देव आहे की नाही ? आम्ही जेव्हा लहान होतो त्या वेळी असल्या गोष्टी नाही शिकवल्या कुणी आम्हाला. अर्भक आईचं स्तनपान करीत असतं तेव्हापासून त्याच्या कानावर हेच पडतं, ''देवाचं अस्तित्व मानणं हा प्रत्येकाचा जन्मसिद्ध हक्क आहे. पप्पांचा तरी कुठे आहे देवावर विश्वास. तू म्हणत होतीस की गुंतोरेवकडचा एडका चोरीला गेला...मी घेतला त्याचा शोध शिकालोवच्या शेतावरल्या मजुरांनीच चोरला होता तो. त्यांनी तो चोरला पण चोरीचा माल शेवटी कुठे येऊन पोहोचला ? आपल्या दुकानात...ह्याला देवावर विश्वास म्हणायचा का ?''

अनिसिमनी डोळ्याची उघडझाप केली आणि हेटाळणीदर्शक मान हलवली.

''गावातला सर्वात जेष्ठ वयोवृद्ध माणूस सुद्धा आस्तिक वाटत नाही'', तो पुढे बोलू लागला. प्रमुख कारकुन नाही नि धर्मगुरूही नाही. ही मंडळी चर्चमध्ये प्रार्थना करतात ते फक्त लोकांनी त्यांना नावं ठेवू नयेत आणि स्वर्गात पापपुण्याच्या निवाड्याच्या समयी उपयोगी पडावं म्हणूनच. काही लोकांचं असं म्हणणं आहे की जगाचा अंत नजीकच्या टप्प्यात येऊन ठेपला आहे कारण माणसं मनानी कमकुवत होत चालली आहेत, आई वडिलांचा आदर करीनाशी झाली आहेत वगैरे वगैरे. ह्या सगळ्या वायफळ गप्पा झाल्या. ममाशा मी असं समजतो की लोकांच्यातील सदसद्विवेकबुद्धीचा लोप झालाय आणि म्हणूनच त्यांच्यावर आपत्तीमागून आपत्ती येत असतात. माझी दृष्टी लोकांच्या अंतर्मनाला भेदून जाणारी असल्यामुळे मला सर्व गोष्टींचे तत्काळ आकलन होतं. एखाद्याच्या अंगावरचा सदरा चोरीचा असेल तर ते मला दिसतं. एखादा मनुष्य दारूच्या दुकानात बसलाय आणि तुम्हाला दिसतंय की तो तिथं बसून चहाच पितोय, पण मला कळतं कि आत्ता पीत असेल तो चहा पण तो नेक, इमानदार मनुष्य नाहीये. दिवसभर जरी अशा नेक मनुष्याच्या शोधात फिरत

राह्यलात तरी मनानी निर्मळ असा औषधाला सुद्धा सापडायचा नाही तुम्हाला आणि ह्या सगळ्याचं मूळ कशात असेल तर देव आहे की नाही हे कुणालाच कळत नाही...बर ते जाऊ दे ममाशा, मला आता निरोप दे. तू आपल्या प्रकृतीला जप, मनस्वास्थ्य बिघडू देऊ नकोस आणि माझ्याविषयी गैरसमज करून घेऊ नकोस."

अनिसिमनं आईच्या पायांवर डोकं ठेवलं.

"सगळ्या सगळ्याबद्दल मी ऋणी आहे तुझा", तो म्हणाला, 'तुझं इथलं अस्तित्त्व ह्या घराचा आधारस्तंभ आहे. तू एक अतिशय शालीन स्त्री आहेस. तुझा मुलगा म्हणवून घेण्यात मी स्वत:ला भाग्यशाली समजतो."

भावनाप्रधान झालेला अनिसिम खोलीबाहेर पडला, पण परत मागं वळून म्हणाला, "सामरोदवनं मला अशा तऱ्हेनं फशी पाडलंय की मी एकतर खूप धनाढ्य होईन नाहीतर रसातळाला जाईन. माझं जर काही बरंवाईट झालं तर तू माझ्या वडिलांना आधार दे."

"अरे काय भलतंसलतं बोलतोयस तू! ओरव-त्येरव- त्ये...देव कृपाळू आहे. पण अनिसिम मला आपलं वाटतं की तू तुझ्या त्या अजाण बायकोशी जरा प्रेमळपणे वागायला हवं नाही का ? नाहीतर तुम्ही दोघंही एकमेकांकडे वन्यप्राण्यांप्रमाणे पहात असता हो ना ? हसत खेळत रहायला हवं."

"अग ती सुद्धा ना एक मजेशीरच मुलगी आहे," उसासा टाकीत अनिसिम म्हणाला, "तिला काऽऽही कळत नाही. गप्प गप्प असते अगदी कोवळी पोर आहे ती, थोडी समज यायला हवी तिला."

अनिसिमला जाण्यासाठी उंच, धिप्पाड, पांढऱ्या स्टॅलीयन घोड्याची गाडी पोर्चजवळ येऊन उभी होती. म्हातारा त्सिबुकिन तरुणाला लाजवेल अशा थाटात उडी मारून बग्गीत बसला आणि त्याने लगाम हातात घेतले. अनिसिमने वारवारा, अकसिन्या आणि आपल्या भावाचे चुंबन घेतले. लीपापण पोर्चवर निश्चल एका बाजूला पहात उभी होती. निरोप देण्यासाठी नाही किंवा तिचं तिलाच माहीत नसावं कशासाठी ते. अनिसिम तिच्याजवळ गेला आणि त्याने क्षणभर आपले ओठ हळुवारपणे तिच्या गालावर टेकवले, "बराय, निघतो मी", तो म्हणाला. तिनं मात्र त्याच्याकडे पाह्यलंही नाही तर चमत्कारिकपणे हसली ती. चेहरा थरथरत होता तिचा. सगळ्यांना तिची कीवच आली जराशी.

अनिसिम पण मोठ्या ऐटीत उडी मारून गाडीत जाऊन बसला. कारण आपण दिसायला सुंदर आहोत असा त्याचा भ्रम होता.

गाडी जेव्हा घाटीच्या वर आली तेव्हा अनिसिमनं मागे वळून आपल्या गावाकडे एक नजर टाकली. स्वच्छ सूर्यप्रकाश होता आणि हवा उबदार होती. आज पहिला दिवस होता की गुराढोरांना चरायला बाहेर काढलं होतं. कळपाच्या अवतीभवती सणासुदीचे कपडे घातलेल्या बायकामुली चालत होत्या. एक भुऱ्या रंगाचा बैल स्वातंत्र्य मिळाल्याच्या आनंदात हंबरत होता आणि मागच्या खुरांनी जमीन उकरत होता. वर, खाली चारी दिशांना लार्क पक्ष्यांचं गाण ऐकू येत होतं. अनिसिमची नजर पांढऱ्या टुमदार चर्चवर स्थिरावली. नुकताच रंग दिला होता त्याला. पाच दिवसापूर्वी ह्याच चर्चमध्ये आपण प्रार्थना केल्याची आठवण झाली त्याला. त्याने हिरव्या छपराच्या शाळेकडे गावातून वाहणाऱ्या नदीकडे पाह्यले. ह्याच नदीत कधी तो डुंबला होता, मासे पकडले होते त्याने. त्याचं हृदय आनंदान भरून आलं आणि अशी उत्कट इच्छा झाली त्याला की जमिनीतून अकस्मात एक भिंत वर आडवी यावी, तिनं त्याचा मार्ग आडवावा, म्हणजे मग त्याच्याजवळ फक्त त्याचा भूतकाळच शिल्लक राहील.

स्टेशनवर सर्वांनी विश्रामगृहात 'शेरीचा' एक एक ग्लास घेतला. ग्रीगोरीनं पैसे देण्यासाठी खिशात हात घातला.

''मी आज देणार पैसे ! अनिसिम म्हणाला.

म्हाताऱ्याने प्रेमाने त्याची पाठ थोपटली आणि विश्रामगृहाच्या मालकाकडे डोळे मिचकावून खुणवलं बघा, कसा आहे माझा मुलगा.

''अनिसिम', तू घरी राहून माझ्या धंद्यात मला मदत केली असतीस तर किती बरं झालं असतं ! अरे, मी तुला डोक्यापासून पायापर्यंत सोन्यानी मढवलं असतं.''

''नाही पापा, कसं शक्य आहे ते.'' 'शेरी' अंबूस होती आणि तिला लाखेचा वास येत होता तरीसुद्धा त्यांनी अजून एक एक ग्लास रिचवला.

म्हातारा स्टेशनवरून जेव्हा घरी आला तेव्हा क्षणभर त्यानं आपल्या धाकट्या सुनेला ओळखलंच नाही. नवरा अंगणाच्या बाहेर पडल्याबरोबर लीपाचं एका आनंदी स्त्रीत रुपांतर झालं होत. वापरून वापरून विटका, झीजलेला स्कर्ट, हाताच्या बाह्या दंडापर्यंत वर ओढलेल्या, अनवाणी अशी लीपा पोर्चच्या

पायऱ्या घासत पुसत आपल्या उंच, चंदेरी आवाजात गाणं म्हणत होती. मळकट, मातकट पाण्याचं मोठं टब वर उचलून तिनं जेव्हा लहान मुलासारखं निरागसपणे हसत सूर्याकडे पाह्यलं तेव्हा वाटत होतं की तीही एक चंडोल पक्षीणीच आहे.

घरातल्या जुन्या म्हाताऱ्या नोकरानं पोर्च ओलांडून जाताना डोकं हलवलं नि तो खाकरला. "वा, ग्रीगोरी प्येत्रोविच देवानं तुला काय देखणी सून दिलीय !" तो म्हणाला, "रत्न आहे रत्न !"

❋

भाग ५

शुक्रवारी आठ जुलैला लोकांनी कुबड्या म्हणून टोपण नाव ठेवलेला अेलिझारव आणि लीपा कझानस्कोअे गावाकडून घरी परतत होती. ती दोघं आणि लीपाची आई 'कझान मॅकडोना' च्या जत्रेच्या निमित्ताने पवित्र देवीच्या दर्शनाला गेली होती. लीपाची आई प्रास्कोव्या आजारी होती, तिला दम लागत होता त्यामुळे ती मागे पडली होती. संध्याकाळ व्हायला आली होती.

"वा, वा, हं, ह, असं ?" लीपाची बडबड ऐकता ऐकता अेलीझारव प्रतिसाद देत होता.

"इल्या, मला मुरंबा फार आवडतो." ती म्हणाली, "घरी मी एकटीच बसते आणि मुरंब्याबरोबर चहा पिते. एखाद दिवशी वारवारा निकलायेवना आणि मी एकत्र बसून चहा पितो. तेव्हा ती मला सुखदु:खाच्या मनाला चटका लावणाऱ्या कितीतरी गोष्टी सांगत असते. त्यांच्याकडे भरपूर मुरंबा केलेला असतो. मोठमोठ्या चार बरण्या भरून. त्या मला म्हणातात, "खा, लीपा खा संकोच नाही करायचा हं !"

"अरे बापरे, चार बरण्या भरून !"

"हो ना. श्रीमंत माणसं आहेत अरे ती. चहाबरोबर पांढरा पाव खातात ते. मासमटण तर हवं तेवढं खायला मिळतं. ऐषआरामात राहतात ते. तरी पण इल्या, मला सारखी भीती वाटते रे. खूप खूप भीती वाटते !"

"अग पोरी, कसली एवढी भीती वाटते तुला ?" अेलिझारवनी विचारलं आणि मागे वळून प्रास्कोव्या किती मागे राहिली आहे ते पाह्यलं.

''लग्न पार पडल्यावर पहिल्याप्रथम मला कोणाची जर भीती वाटली असेल तर ती अनिसिमची. ते चांगले आहेत रे. मला त्यांनी कधीच दुखवलं नाही. पण ते जवळ आले की माझं सर्वांग गार पडतं, थंडी हाडान हाडापर्यंत पोहोचते. एक रात्रसुद्धा मला झोप आली नाही. थरकाप व्हायचा माझा नुसता. मी देवाची प्रार्थना करीत बसायची. आता ते गेल्यावर इल्या, मला त्या अकसिन्याचं भय वाटतं. ती तशी बरी आहे सारखी हसत असते. पण कधी कधी ती खिडकीतून बाहेर पहात असते ना तेव्हा तिच्या डोळ्यात संताप भरलेला असतो आणि हिरवा प्रकाश चमकताना दिसतो. काळोख्या गोठ्यात मेंढीचे डोळे चमकतात ना अगदी तस्सा. धाकट्या पातीतला ख्रिमीनी तिच्या मनात सारखं भरवत असतो. ''तुझ्या सासऱ्याची ब्यूतोकिनोमध्ये जमीन आहे म्हणे जवळ जवळ चाळीस बिघे रेताड जमीन आहे आणि पाणीपण आहे तिच्याजवळ. तर मग अकसिन्या तू तुझी स्वत:ची विटाची भट्टी का नाही बांधत ? आपण भागीदारीत धंदा करू.'' सध्या विटाचा भाव हजारी वीस रुबल्स आहे. कालच जेवल्यावर अकसिन्या सासऱ्यांना म्हणाली ''माझा ब्यूतोकिनोमध्ये विटांची भट्टी उभी करायचा बेत आहे. मी माझा स्वतंत्र धंदा सुरू करीन म्हणते.'' ती हे सगळं हसत हसत म्हणाली. पण ग्रिगोरी प्येत्रोविचचा चेहरा एकदम काळवंडला. त्यांना ते पसंत पडलं नाही हे स्पष्ट दिसत होते. त्याचं म्हणणं ते जिवंत आहेत. तोपर्यंत धंदा एकत्रच करायचा. धंद्याची वाटणी करायची नाही. ते ऐकल्यावर तिनं त्यांच्याकडे जळजळीत कटाक्ष टाकला, दात ओठ खाल्ले...जेवताना तळलेले मासे वाढायला आले, त्याला पण तिनं नकार दिला.''

''काय म्हणतेस'', अेलीझारव आश्चर्यानं म्हणाला, ''ती मासे खायला नाही म्हणाली !''

''ती झोपते केव्हा तेच मला कळत नाही !'' लीपा पुढे सांगू लागली, ''जेमतेम अर्धा तास झोपत असेल ती की लागलीच ताडकन उठते. घरभर, आत बाहेर चकरा मारत कोपऱ्या कोपऱ्यावर लक्ष ठेवून असते ती, नोकरांनी काही जाळलं तर नाही ना, काही चोरलं असेल का...इल्या, मला तर तिची भीतीच वाटते बाबा !'' लग्नानंतर ख्रिमीनी छोटी पाती झोपलीच नाही की काय कोण जाणे. सरळ कोर्टात मोठ्या पातीविरुद्ध दावा लावायला गेले म्हणे. लोक तर म्हणताहेत त्यांच्या आपसातल्या भांडणाचं मूळ अकसिन्याच आहे. दोन

भावांनी तिच्या कारखान्यात सहभागाला संमती दिली त्यामुळे तिसरा नाराज झाला. एक महिना झाला गिरणी बंद पडलीय. माझा काका प्रोखोरची गिरणीतील नोकरी गेली आणि आता तो दारोदार भाकरीचा तुकडा मागत फिरतोय. मी त्याला म्हटलं, ''काका, तू शेतात कामाला नाहीतर लाकडं फोडायला का नाही जात ? असल्या अपमानित जिण्यापेक्षा ते बरं नाही का ?'' तर म्हणतो कसा ''शेतावरच्या कष्टाची मला सवय राहिली नाही लीपीन्का,* मला आता ते नाही जमायचं...''

ओटच्या तरारून आलेल्या शेताजवळ थोडी विश्रांती घ्यावी आणि प्रास्कोव्याची पण वाट पहावी म्हणून ती दोघं जरा विसावली.

अेलीझारव बरेच दिवसापासून मक्तेदार म्हणून काम करीत होता. पण त्यानं कधी घोडे ठेवले नव्हते. सगळ्या तहसीलभर पायीच जायचा. खांद्यावर नेहमी एक धोपटी असायची. कांदा-भाकरी असायची त्यात. हाताला झोके देत, लांब पावलं टाकत झपाझप चालायचा तो त्याच्याबरोबर चालणं कुणालाही शक्य नव्हतं.

राईच्या शेताच्या कुंपणापाशी आत शिरायच्या फाटकाजवळ मैलाचा दगड होता. अेलिझारवनी तो मजबूत सरळ आहे का नाही ते हातानं चाचपडून पाह्यलं. अेवढ्यात प्रास्कोव्या धापा टाकीत येऊन पोहोचली. तिचा सुरकुत्या पडलेला सदा भयभीत चेहरा, जरासा उजळला होता. आज इतरांप्रमाणे ती पण चर्चमध्ये प्रार्थनेला गेली होती. मग त्यांनी जत्रेमध्ये फेरफटका मारला. तिथं पेअरचं सरबत प्यायल्या ! तिच्या आयुष्यात अशा गोष्टी क्वचितच घडायच्या. इतकंच नाही तिला सारखं जाणवत होतं की आज पहिल्यांदाच तिनं स्वत:ची हौस मौज पुरवून घेतली होती. मनसोक्त आनंद लुटला होता. जराशी विश्रांती घेऊन तिघेही जण एकमेकांबरोबर जायला निघाले. सूर्य केव्हाच मावळला होता. त्याची किरणं राईच्या पिकाला विंधून झाडाचे बुंधे प्रकाशित करीत होती. दूरवरून कुठूनतरी लोकांच्या बोलण्याचा आवाज कानावर पडत होता. उक्ल्येयेवोच्या तरण्या पोरी केव्हाच पुढे गेल्या होत्या पण राईतच रेंगाळत होत्या, अळंबीच्या शोधात असाव्या बहुतेक.

''ए पोरींनो !'' अेलिझारवनं आवाज दिला, ''ए सुंदऱ्यानो !'' उत्तरादाखल हास्याचे फवारे उडाले.

"अेलीझारव येतोय ! अेलिझारव ! जख्खड म्हातारा !"

पाठोपाठ प्रतिध्वनीपण हसला. झाडांची राई मागे पडली. गिरणीच्या धुराड्यांची टोकं दिसायला लागली. चर्चच्या मिनाराचा क्रॉस चमकत होता. "हेच ते खेडं, जिथ कोणाच्या तरी बाराव्याला म्हाताऱ्या पद्र्यानं माशांची अंडी खाल्ली होती." ती मंडळी घरी येऊन पोहोचल्यासारखीच होती. एवढा घाट उतरला की झालं. अनवाणी चालणाऱ्या लीपा आणि प्रास्कोव्यानी बूट घालण्यासाठी गवतावर बसकण मारली. त्यांच्याशेजारी अेलिझारव ठेकेदार पण बसला. वरून खाली नजर टाकली तर उकल्येयेवो गाव तिथल्या त्या कुंपणावरून लोंबणाऱ्या हिरव्यागार वेलींमुळे, पांढऱ्या शुभ्र चर्चमुळे आणि नदीच्या वाहत्या प्रवाहामुळे चित्रासारखं अगदी शांत शांत दिसत होतं. कंजूशपणानं विटका, काळपट, उदासवाणा रंग दिलेली गिरणीची छपरं मात्र तिथल्या सौंदर्याला गालबोट लावीत होती. घाटीच्या दुसऱ्या बाजूला उतारावर वरीची शेतं होती. जिकडे तिकडे गवताच्या गंजी, पेंढ्या दिसत होत्या. जणू वादळानं विखरून टाकल्या होत्या. काही शेतात नुकतीच तोडणी झाली होती तिथे पेंढ्या ओळीत लावून ठेवल्या होत्या. ओटचं पीक हुरड्यावर आलं होतं आणि मावळतीच्या किरणांनी मोत्यांच्या दाण्यासारखं चकाकत होतं. पिकाच्या कापणीचं काम जोशात चालू होत. आज सणाचा दिवस होता उद्या शनिवारी वरई आणि गवताच्या पेंढ्या घरी आणून टाकायला हव्या होत्या. मग रविवारी पुन्हा सण होता. दररोज दूरवरून मेघांचा गडगडाट ऐकायला येत होता. हवेत दमटपणा आला होता. पावसाची चिन्हं दिसत होती. शेताकडे पाहून प्रत्येकाच्या मनात विचार येत होता की धान्याची उस्तवार वेळच्या वेळी करण्याची संधी देवानं दिली तर फार बरं होईल. म्हणजे मग जिकडे तिकडे उल्हास, आनंदी आनंद होईल. शेतकऱ्यांच्या डोक्यावरचं ओझं उतरेल.

"सध्या गवत कापणाऱ्यांचा भाव वाढलाय", प्रास्कोव्या म्हणाली, "दिवसाला चाळीस रुबल्स !"

कझानस्कोअेच्या जत्रेतून परत येणाऱ्या माणसांची रीघ लागली होती, स्त्रिया, नव्या कोऱ्या टोप्या घातलेले गिरणी कामगार, भिकारी, लहान मुलं. इतक्यात एक खटारा गाडी धूळ उडवत गेली. तिच्यामागून विकला न गेलेला घोडा धावत होता. मालकाने आपल्याला विकून टाकलं नाही म्हणून जणू

त्याला आनंद झाला होता. बेफामपणे उधळणाऱ्या गाईला शिंगाला धरून नेत होते. दुसरी एक गाडी आली. तिच्यात दारू प्यायलेले शेतकरी दाटीवाटीनं बसले होते. एक म्हातारी बाई मोठीच्या मोठी टोपी आणि सैल मोठे बूट घातलेल्या मुलाला हाताला धरून चालली होती. उन्हामुळे त्याचा चेहरा कोमेजला होता. त्याचे बूट इतके जड होते की चालताना त्याला गुडघ्यात पाय वाकवता येत नव्हते, फरफटत चालावं लागत होतं. तरीदेखील आपली खेळातली तुतारी सगळी शक्ती पणाला लावून खळ न पाडता फुंकत होता तो. म्हातारी आणि तो मुलगा घाटीत केव्हाच उतरली होती. पण त्याच्या तुतारीचा आवाज अजून सगळीकडे घुमत होता.

"आमच्या गिरणीमालकावर काहीतरी संकट आलं असावंसं वाटतं", अेलिझारव म्हणाला, "देवा, आमच्यावर दया कर बाबा! अग तो कस्त्युकव आहे ना, तो उगाचच ओरडला माझ्यावर, "तू इमारतीच्या कंगोऱ्यावर जास्त गोटे वापरले म्हणे." जास्त वापरले म्हणजे काय मी त्याला विचारलं, जेवढे वापरायला पाहिजे, तेवढेच वापरले कस्त्युकव, मी काही गोटे माझ्या पॉरीजमध्ये नाही वापरत." "तू माझ्याशी असली उर्मट भाषा कशी बोलू शकतोस ? मूर्ख कुठला ! विसरलास की काय ! तुला ठेकेदार मी बनवलाय !" मी म्हटलं, "हो ठीक आहे पण त्यात काय एवढं मोठ केलंस ? अरे मी ठेकेदार नव्हतो तेव्हापण मला दररोज चहा प्यायला मिळतच होता. खरं की नाही ? "तुम्ही सगळे जण एक नंबरचे लबाड आहात." मी गप्प बसलो. मनात म्हटलं, आम्ही इथं लबाड आहोत आणि तुम्ही, तुम्ही मात्र स्वर्गात लबाड ठराल. हैं-हैं-हैं दुसऱ्या दिवशी तो मऊ झाला. म्हणाला, "अेलीझारव, तू माझं कालचं बोलणं मनावर नको घेऊस, मी बोललो असेन जरा कमी जास्त. काही झालं तरी मी प्रथम श्रेणींचा व्यापारी आहे. शिवाय मी तुझ्यापेक्षा अनुभवी मिस्त्री आहे. तेव्हा तू माझं बोलणं मनावर घ्यायचं नाहीस." "तुम्ही बडे व्यापारी आहात आणि मी एक साधा सुतार आहे. हे खरंय मी म्हटलं, अहो सेन्ट जोसेफपण सुतारच होता. आमचा धंदा नेकीचा, सचोटीचा आहे. तो देवाला आवडणारा आहे. तुम्हाला जर माझ्यापेक्षा श्रेष्ठ असण्यात आनंद मिळत असेल. तर माझी त्याला मुळीच हरकत नाही." मग आमचा संवाद तिथंच संपला. मी मनाशी विचार केला, श्रेष्ठ कोण ? प्रथम श्रेणीचा व्यापारी की सुतार ? मला खात्री आहे पोरी,

सुतारच श्रेष्ठ असतो ! अेलीझारव क्षणभर गप्प बसला नि म्हणाला, "अग, मी म्हणतो तेच खरंय. जो हातांनी कष्ट करतो. दु:ख भोगतो, अनेक संकटांना सामोरं जातो तोच ज्येष्ठ आणि वरिष्ठ असतो."

सूर्य केव्हाच मावळला होता. नदीवर, गिरणीच्या आवारात आणि चर्चच्या अवती भवती दुधासारखं पांढरंशुभ्र धुकं पसरलं होतं. अंधार वाढत होता. घाटीतले दिवे लुकलुकायला लागले होते. तेव्हा असं वाटत होतं की धुक्यानं आपल्या पंखाखाली खोल दरीच झाकून घेतलीय. जन्मजात दारिद्र्य आणि जन्मभर अत्यंत हालाखीत आयुष्य कंठायची मनाची तयारी असलेल्या आणि फक्त आपलं लीन, दीन, भयभीत हृदय सोडून दुसऱ्यांना आपलं सर्वस्व अर्पण केलेल्या लीपा आणि तिच्या आईच्या मनाला क्षणभर असा विचार चाटून गेला असेल की ह्या एवढ्या मोठ्या रहस्यमय जगात आणि त्यातल्या कोट्यवधी जीवमात्राच्या अमर्याद मालिकेत आपण सामर्थ्यवान आणि इतरांपेक्षा श्रेष्ठ आहोत. या इथं डोंगरमाथ्यावर बसून निवांतपणाचा आनंद लुटतोय. हेच सुखासमाधानाचं हास्य त्यांच्या चेहऱ्यावर उमटलंय आणि त्यांना जणू विसर पडलाय की रोजमराच्या घाटीतल्या जीवनात परत जाण्याशिवाय त्यांना गत्यंतर नाहीये.

शेवटी एकदाच्या त्या दोघी घरी परतल्या. फाटकापाशी आणि दुकानाजवळ गवत कापणारे लोक जमिनीवर ठाण मांडून बसले होते. उक्ल्येयेवोमधले पेंढारी सहसा त्सिबुकिनकडे कामाला येत नसत. त्यामुळे बाहेरून शेतमजूर लावायला लागत.

आता अर्धवट उजेडात असं वाटत होतं की सभोवार सगळीकडे लांब काळ्या दाढ्यांची माणसं बसली आहेत. दुकान उघड होतं आणि दारातच बहिरा एका छोट्या मुलाबरोबर सोंगट्या खेळत बसला होता. गवत काप्यांचं हळू आवाजात गायलेलं गाणं पुसटसं कानावर पडत होतं. मधूनच ते मोठ्या आवाजात आपल्या कालच्या मजुरीची मागणी करीत होते. पण मजूर पैसे हातावर पडले की उद्या कामालाच यायचे नाहीत ह्या भीतीनं मालक मंडळी त्यांची मजुरी द्यायला अळंटळं करीत होती. डगला घातलेला म्हातारा त्सिबुकिन आणि अकसिन्या पोर्चच्या समोर बर्चचा झाडाखाली चहा पीत बसले होते. टेबलावर दिवा जळत होता.

"आऽऽजोऽऽबा !", त्यांच्यातला एक गवतकाप्या फाटकाच्या पलीकडून खिजवल्यासारखा ओरडला, "आम्हाला अर्धे पैसे तरी दे आऽजोऽबा !" त्याच क्षणी खदखदून हसण्याचा आवाज आला आणि मग गाण्याचा अस्पष्ट सूर कानावर पडला...

गिरणी मालक कस्त्युकव चहा-पिण्यासाठी टेबेलापाशी येऊन बसला. "आज आम्ही जत्रेला गेलो होतो", तो सांगू लागला, "हिंडलो, खूप मजा केली. महाराज तुमचीच कृपा. पण तिथं एक दुःखद घटना घडली. साशा लोहारानं तंबाखू विकत घेतली आणि अर्ध्या रुबलचं एक नाणं व्यापाऱ्याला दिलं. पण काय सांगू तुम्हाला, ते नाणं नकली होतं." - कत्स्युकव इकडे तिकडे पहात पुढं सांगू लागला, त्याच्या मनात ही बातमी कुजबुजत द्यायची होती. पण तो दबक्या घोगऱ्या आवाजात बोलत असल्यामुळे त्याचं बोलणं सगळ्यांना ऐकू येत होतं. ते नाणं खोटं निघाल्यामुळे व्यापाऱ्यानं साशाला ते कुठून आणलंस म्हणून विचारलं तेव्हा तो म्हणाला, "मला अनिसिम त्सिबुकिननं दिलं." व्यापाऱ्यानं पुढचा प्रश्न केला, केव्हा दिलं तुला त्यानं ते ? "लग्नाच्या दिवशी," असं उत्तर दिलं त्यानं...मग काय, पोलिसाला बोलावण्यात आलं आणि ते त्याला पकडून घेऊन गेले...बघ बाबा ग्रीगोरी, लोकात चर्चा चालू आहे. तुझ्या अंगावर काही शेकलं नाही म्हणजे मिळवली...

"आऽजोऽबाऽ !", फाटकाच्या पलीकडून तोच चिडवण्याचा आवाज आला, "आऽऽजोऽबाऽ!"

"ओऽ, मुलांनो, मुलांनो, मुलांनो", एका दमात कस्त्युकव बरळला आणि उठून उभा राह्यला. त्याच्या डोळ्यावरची नशा उतरली होती. "तुमच्या चहासाठी, साखरेसाठी आभार. झोपायची पण वेळ झालीय. मी सुतार मिस्त्री आहे. माझे खांब, वासे, तुळ्या सगळं झिजून चाललंय." हँ-हँ-हँ !

जाता जाता तो म्हणाला, "मरायची वेळ झालीय !" त्यानं उसासा सोडला.

म्हाताऱ्या त्सिबुकिनचा चहा कपातच राह्यला. तो तिथेच सुन्न होऊन बसून राहिला. डोक्यात विचारचक्र सुरू झालं होतं. त्याच्या चेहऱ्यावरचा भाव असा होता की तो अजून कस्त्युकवच्या पावलांचा मागोवा घेतोय. तो तर केव्हाच रस्त्यावर जाऊन पोहोचला होता.

हा साशा लोहार नक्कीच खोटं बोलतोय", म्हाताऱ्याच्या मनात काय

चालल असावं ह्याचा अंदाज बांधत अकसिन्या म्हणाली.

त्सिबुकिन घरात गेला आणि थोड्याच वेळात हातात एक पाकीट घेऊन परत आला. त्यानं ते पाकीट फोडलं मात्र त्यातून कोरे करकरीत चमचम करणारे रुबल्स बाहेर आले. त्यानं त्यातलं एक नाणं हातात घेतलं, दातानं जरासं चावलं आणि टेबलावर फेकलं, मग दुसर नाणं पारखून भिरकावलं...

"हे रुबल्स अक्षरश: खोटे आहेत", आश्चर्यचकित होऊन अकसिन्याकडे पहात तो म्हणाला, "अग, मागल्या खेपेला अनिसिमनं भेट म्हणून दिली होती ना, तीच ती नाणी आहेत. मुली, घे ही तूच", पुटपुटत त्यानं ते पाकीट तिच्या हातात जवळ जवळ कोंबलेच. "घे ते पाकीट आणि फेकून दे विहिरीत...कुणाला पाहिजेत असली खोटी नाणी. मात्र ह्या कानाचं त्या कानाला कळणार नाही असं बघ हं. नाहीतर आणखीनच लफडं व्हायचं...तो समोवार टेबलावरून हटव आणि दिवापण टाक मालवून...."

गोठ्यात बसून राहिलेल्या लीपा आणि प्रास्कोव्याने दिवे एकामागून एक मालवले गेलेले पाह्यले. फक्त माडीवर वारवाराच्या खोलीच्या खिडकीतून ख्रिस्ताच्या तसबिरीपुढे लावलेल्या निळ्या, लाल दिव्यांचा प्रकाश दिसत होता. तेच सर्व घरादारात शांतता, सात्त्विकता आणि समाधानाचा आभास निर्माण करीत होते. आपली मुलगी लग्न होऊन श्रीमंताच्या घरात पडलीय ह्याची प्रास्कोव्याला अजून सवय व्हायची होती. ती जेव्हा केव्हा मुलीला भेटायला तिच्या सासरी यायची तेव्हा ओसरीतच भीत भीत अंगाची जुडी करून बसायची आणि ओशाळल्यागत हसायची. तिला तिथे बाहेरच चहा पाठवला जायचा. लीपासुद्धा अजून ह्या घरात रुळली नव्हती. नवरा शहरात कामावर निघून गेल्यानंतर ती कधीच आपल्या खोलीतल्या बिछान्यावर झोपली नव्हती. ओसरीत नाहीतर स्वयंपाकघरात जिथे जागा मिळेल तिथे झोपायची ती. तिचं काम म्हणजे दररोज फरशा पुसणे, धुणी धुणे वगैरे वगैरे. तिला वाटायचं की इथेपण ती रोजावरच काम करतेय. आजपण यात्रेतून परत आल्यावर त्यांनी स्वयंपाकिणीबरोबर स्वयंपाकघरातच चहा घेतला. मग गोठ्यात जाऊन भिंत आणि ढकलगाडीच्या सापटीत आडव्या झाल्या त्या. तिथे काळोख होता आणि खोगीरांचा वास घमघमत होता. घराभोवतीचे दिवे विझले होते. मग बहिऱ्यानं दार बंद केल्याचं ऐकू आलं त्यांना. पेंढारी आवारातच झोपण्याच्या तयारीला

लागले होते. ख्रिमीनींकडे कुणीतरी महागडं अ‍ॅकॉर्डियन वाजवत होतं...प्रास्कोव्या आणि लीपा निद्राधीन झाल्या.

कुणाच्या तरी पावलांच्या चाहुलीनं त्या दोघी जाग्या झाल्या तेव्हा चंद्राचं चांदणं पडलं होतं, गोठ्याच्या दाराशी हातात अंथरुणाची गुंडाळी धरून अकसिन्या उभी होती. "इथं तरी गार असेल...असं म्हणत उंबऱ्याला लागूनच तिनं आपलं अंथरुण पसरलं. तिच्या सर्वांगावर चंद्राचा प्रकाश पडला होता.

अकसिन्याला झोप येत नव्हती. जोरजोरात श्वास घेत होती ती. उकाड्यानं तिची घालमेल होत होती. अंगावरचे जवळ जवळ सगळे कपडे फेकून दिले तिनं. अद्भुत अशा चंद्रप्रकाशात ती म्हणजे एक लावण्यवती, रूपगर्विता स्त्रीची प्रतिकृतीच होती !

थोड्या वेळानं पुन्हा पावलं वाजली. दारात म्हातारा त्सिबुकिन उभा होता. त्याने पांढरे स्वच्छ कपडे घातले होते.

"अकसिन्या", त्यानं हाक मारली, "तू आहेस होय ?"

"हो, का ?" ती फणकाऱ्यात म्हणाली.

"तुला मी ती नाणी विहरीत फेकायला सांगितलं होतं. टाकलीस ना ?"

"ऐका ह्यांचं बोलणं, मी काय वेडीबिडी आहे का तसली उपयुक्त वस्तू पाण्यात फेकून द्यायला ? मी गवतकाप्यांना दिली ती !..."

"हाय रे देवा !", आश्चर्यदर्शक आणि घाबऱ्या घुबऱ्या आवाजात म्हातारा म्हणाला, "काय दुराग्रही बाई आहेस तरी तू...देवा रे देवा !"

म्हाताऱ्यानं नैराश्यानं हात चोळत, स्वतःशीच बडबडत तिथून काढता पाय घेतला. थोड्या वेळानं अकसिन्या उठून बसली, चिडून दीर्घ उसासा टाकला तिनं, वळकुटी गुंडाळली आणि ती शेड बाहेर निघून गेली.

"आई, तू कशाला असल्या थोरामोठ्यांच्या घरी माझं लग्न लावून दिलंस ?" लीपा म्हणाली.

"प्रत्येकाचं लग्न हे व्हायलाच हवं माझ्या पोरी. हे काही आपण नाही ठरवलेलं. जगरीतच आहे तशी."

कधीही सांत्वन होणार नाही अशा अनुत्तरित, अपमानित भावनेनं त्या दोघींना घेरून टाकलं होतं. त्याचवेळी त्यांना असंही वाटत होतं की कुणीतरी खूप खूप उंचावरून, चमचमणाऱ्या ताऱ्यांच्या निळ्या आकाशातून

उकूल्येयेवोमध्ये काय काय घडतंय त्याची दखल घेतयं, रखवालदारी करतंय. दिवसा इथं कितीही दुष्कर्म घडत असली तरी रात्र मात्र प्रेक्षणीय, शांत असते. देवाच्या राज्यात न्याय आहे आणि भविष्यातही असणार, सत्य शांत सुंदर असतं अगदी ह्या रात्रीसारखंच. चंद्राचा प्रकाश रात्रीच्या अंधारात जसा एकरूप होऊन जातो. त्याप्रमाणे पृथ्वीवरील प्राणिमात्र सत्याशी न्यायाशी एकरूप होण्याच्या प्रतीक्षेत आहे.

त्यांचं अस्वस्थ मन शांत झालं आणि त्या एकमेकीच्या मिठीत झोपी गेल्या.

✲

भाग ६

बरेच दिवसांपूर्वी बातमी पसरली होती की अनिसिमला बनावट नाणी बनवण्यासाठी आणि ती चलनात आणण्याच्या गुन्हासाठी अटक केली आहे. महिन्यामागून महिने गेले, जवळ जवळ अर्ध वर्ष संपलं. लांब कंटाळवाणा हिवाळा संपुष्टात आला आणि वसंत दाराशी येऊन ठेपला होता. अनिसिम तुरूंगाची हवा खातोय ही गोष्ट घरातल्या आणि गावातल्या लोकांच्या अंगवळणी पडली होती. रात्रीच्या वेळी घरावरून किंवा दुकानावरून कोणी जाताना दिसलं तर घरच्यांना तुरूंगात बसलेल्या अनिसिमची आठवण व्हायची. गावात कुणाचा मृत्यू झाला आणि चर्चमधली घंटा घणघणू लागली तरीसुद्धा का कोण जाणे अनिसिमची त्यांना आठवण व्हायची, न्यायालयाच्या निकालाची वाट पहात अजून त्याला किती दिवस बसावं लागणार आहे याची काळजी वाटायची.

असं वाटत होतं की सगळ्या घरावर दु:खाचं सावट पडलंय. घर काळवंडलय, छपरावरच्या पत्र्यांना गंज चढलाय, दुकानाच्या जाडजूड, मजबूत, हिरव्या रंगाच्या लोखंडी दाराचा रंग गेलाय नि ते वाकडं झालंय. म्हातारा त्सिबुकिनसुद्धा काळवंडला होता. बरेच दिवसात त्याने आपले केस कापले नव्हते की दाढी केली नव्हती. दाढीचे खुंट गालावर वेडेवाकडे पसरले होते. आता तो गाडीत उडी न मारता हळूच बसत असे. भिकाऱ्यांवर ओरडत नसे. म्हणायचा ''देईल देव तुम्हाला.'' त्याची प्रकृती ढासळायला लागली होती आणि ते सगळ्यांना जाणवत होतं. लोकांवरचा दरारा कमी कमी व्हायला

लागला होता. पोलीस सरळ दुकानात नोटीस बजावत होते. खरं तर त्यांना पहिल्यासारखाच आजही हप्ता मिळत होता. म्हाताऱ्यावर तीनदा दारूचा काळा बाजार केल्याबद्दल शहरातल्या कोर्टात दावा लावण्यात आला होता. साक्षीदाराच्या गैरहजेरीमुळे तिन्ही वेळा पुढची तारीख पडली होती. म्हातारा अगदी टेकीला आला होता.

त्सिबुकिन वरचेवर मुलाला भेटायला तुरुंगात जायचा. त्याचा खटला चालवण्यासाठी त्यानं वकील लावला होता. कोणाकोणाकडे तरी अर्ज विनंत्या केल्या होत्या. मुलाची ह्या सर्वांतून सुटका व्हावी म्हणून चर्चमध्ये मेणबत्त्या लावल्या होत्या. मुलगा ज्या तुरुंगात खितपत पडला होता तिथल्या तुरुंगाधिकाऱ्याला ग्लास ठेवण्यासाठीची चांदीची बैठक भेट म्हणून दिली होती. त्या बैठकीवर कलमगिरीनं "आत्मा आपला आवाका जाणतो." अशी अक्षरं कोरली होती. सोबत एक चांदीचा चमचा पण दिला होता त्यानं.

"आपल्याला कुणाचा आधार नाहीये." वारवारा म्हणाली. "ओरव-त्येरव-त्ये...आपण एखाद्या वजनदार, सभ्य, प्रतिष्ठित व्यक्तिला मुख्याधिकाऱ्याला पत्र लिहायची विनंती करायला हवी की खटला सुरू होईपर्यंत त्याला जामिनावर सोडलं तर बरं होईल. का म्हणून पोरानं तुरुंगात खितपत पडायचं ?

वारवाराला फार दुःख झालं होतं. ती अंगानं जरा सुटली होती, पांढरी फटफटीत दिसायला लागली होती. पूर्वीसारखीच ती देवापुढे मेणबत्त्या पेटवत होती, घरात सगळीकडे स्वच्छता राखण्याची खबरदारी घेत होती. पाहुण्यांचा जॅम आणि सफरचंदाच्या जेलीनं पाहुणचार करीत होती. बहिरा आणि अकसिन्या दुकान पहात होते. तिचा नवीन धंदा सुरू होण्याच्या मार्गावर होता. ब्यूतोकिनोमध्ये विटांचा कारखाना उभारण्यात येत होता. अकसिन्याची तिकडे दररोज घोडागाडीतून चक्कर असायची. ती स्वतः गाडी चालवायची. आणि रस्त्यावर कुणी ओळखीचं भेटलं की दाण्यानी भरलेल्या वरईच्या पिकावरच्या सापासारखी आपली मान लांब करायची आणि भोळसट वाटणारं पण रहस्यमय अशी हसायची. लीपा लेन्टच्या सणाआधी थोडेच दिवस जन्मलेल्या आपल्या बाळाबरोबर दिवसभर खेळत असायची. तिचं मूल चिमुकलं, हातापायाच्या काड्या असलेलं, केवीलवाणं असं होतं. आपलं बाळ रडतंय, इकडे तिकडे

टकामका पाहतंय, घरातले सर्व जण त्याला मानवाचाच अवतार समजताहेत, त्याला निकीफोर ह्या नावानं संबोधताहेत हाका मारताहेत ह्या सगळ्याचंच तिला आश्चर्य वाटायचं. तो पाळण्यात झोपलेला असायचा. लीपा दारापर्यंत जायची नि तिथून वाकून म्हणायची, "शुभदिवस, निकिफोर अनिसिमिच !" परत धावत पाळण्याजवळ जायची, त्याचे चुंबन घ्यायची. असा खेळ चालायचा तिचा. चिमुकला आपले इवलेसे लाल लाल पाय हवेत उडवायचा आणि अेलिझारव सुतारासारखा एकाचवेळी हसायचा नि रडायचा, हसतोय का रडतोय तेच कळायचं नाही.

शेवटी एकदा कोर्टात अनिसिमविरुद्धचा खटला उभा राह्यला. म्हातारा त्सिबुकिन पाच दिवस शहरात मुक्काम ठोकून होता. ऐकण्यात आलं होतं की त्यांच्या खेड्यातून काही शेतकऱ्यांना साक्षीदार म्हणून बोलावून घेण्यात आलं होतं. त्सिबुकिनचा म्हातारा नोकरपण समन्स मिळालं म्हणून तिकडेच गेला होता.

गुरुवारी कोर्टाची तारीख पडली होती. पण रविवार उलटून गेला तरी म्हातारा काही घरी परत आला नाही आणि त्यानं निरोपबिरोप पण धाडला नाही. मंगळवारी संध्याकाळी वारवारा उघड्या खिडकिशी नवरा घरी येतोय की काय ह्याची चाहूल घेत बसून राहिली होती. शेजारच्या खोलीत लीपा आपल्या चिमुरड्याशी खेळत होती, त्याला हातावर घेऊन नाचवत होती, अंजारत गोंजारत होती नि आनंदानं म्हणत होती, "माझ्या बाळा, माझ्या बाळा तू मोठा खूप मोठ्ठा होणार ! चांगला तगडा शेतकरी होणार आणि मग आपण दोघं रोजंदारीवर शेतात कामाला जाऊ हं !"

"ए वेडे काय बोलतेयस ?" वारवाराला तिचं बोलणं ऐकून धक्काच बसला, ती म्हणाली, "रोजंदारीवर कामाला जायच्या कसल्या गप्पा करतेयस त्याच्याबरोबर ? अडाणी आहेस नुसती. तो व्यापारी होणार आहे व्यापारी !"

लीपा हळू आवाजात गाणं गुणगुणू लागली. थोड्याच वेळात स्वत:मध्ये दंग झाली आणि परत मुलाशी बोलू लागली, "तू मोठ्ठा होणार, ताकदवान होणार. मग आपण दोघांनी शेतावर कामाला जायचं बर का !"

"पुन्हा आपलं हिचं तेच. वेडी आहे झालं !" वारवारा म्हणाली.

लीपा निकिफोरला कडेवर घेऊन दारापर्यंत गेली नि थांबून तिनं वारवाराला

विचारलं, "आई, मला हा इतका का आवडतो ? त्याला भरभरून प्रेम द्यावं असं का वाटतं मला ?", तिच्या डोळ्यात अश्रू तरळले, कापऱ्या आवाजात ती पुन्हा विचारू लागली, "तो कोण आहे, तो असा कसा झालाय एखाद्या पिसासारखा, हलका फुलका, इटुकला पिटुकला. माझं त्याच्यावर खूप प्रेम आहे. मला तर तो माणसाचाच अवतार आहे असं वाटतं. खरं तर त्याला काही करता येत नाही नि बोलताही येत नाही. पण त्याच्या डोळ्यांकडे पाहून त्याला काय हवंय ते मला सगळं सगळं समजतं."

वारवारानं पुन्हा कानोसा घेतला. स्टेशनाच्या जवळ जवळ येणाऱ्या आगगाडीचा आवाज ऐकू येत होता. म्हातारा तर आला नसेल ना ह्या गाडीनं ? लीपा काय बोलत होती ते तिला काऽऽही ऐकू येत नव्हतं आणि समजतही नव्हतं, वेळेचंही भान राहिलं नव्हतं. तिचा नुसता थरकाप होत होता. घाबरून नाही तर अति उतावळेपणामुळे. तिनं शेतकऱ्यांनी खचाखच भरलेल्या, खडंखडं आवाज करीत भरधाव जाणाऱ्य खटाऱ्याचा आवाज ऐकला. ही स्टेशनवरून घरी येत असलेली साक्षीदार मंडळी होती. दुकानावरून गाडी जात असताना म्हातारा नोकर गाडीतून उडी टाकून घरात आला. अंगणातच सगळ्यांनी त्याला गाठलं आणि त्याच्यावर प्रश्नांचा भडिमार केला.

"निकाल लागला, त्याला त्याच्या सर्व मालमत्तेपासून आणि हक्कापासून वंचित करण्यात आलं आहे. सहा वर्षांची सक्तमजुरी होऊन सैबेरियात रवानगी झालीय त्याची", म्हातारा मोठ्यानं म्हणाला. अकसिन्या दुकानाच्या पाठीमागच्या दारानं बाहेर पडताना दिसत होती. नुकतंच तिनं कुणाला तरी रॉकेल विकलं होत. तिच्या एका हातात बाटली, दुसऱ्या हातान फनेल होतं आणि तोंडात चांदीची नाणी होती.

"पण पापा कुठे आहेत ?" तिनं हळू आवाजात विचारलं.

"स्टेशनवर आहेत", नोकरानं उत्तर दिलं, "म्हणाले, अंधार पडल्यावर घरी येईन."

अनिसिमला सश्रम कारावासाची शिक्षा झाली, ही बातमी अंगणात पोहोचली. मात्र स्वयपाकघरात स्वयंपाकिणीनं घरात कुणीतरी मेलंय अशा तऱ्हेनं गळा काढला. तिला असं वाटत असावं की ती असं रडली नाही तर रिवाजाला सोडून होईल ते. "तू आम्हाला असा सोडून का गेलास अनिसिम

ग्रिगोरिच, आमच्या लाडक्या पोरा''

कुत्री घाबरून भुंकू लागली. वारवारा खिडकीकडे धावली, दुःखानं कासावीस झाल्यासारखी उगीचच इकडून तिकडे फेऱ्या मारू लागली. शिरा ताणून, जिवाच्या आकांतानं स्वयंपाकिणीवर ओरडली, ''ए बंद कर, बंद कर तुझं ते रडणं स्तेपानिदा. आम्हाला आणखीन सतावू नकोस.''

आज चहाच्या समोवाराखाली विस्तव घालायचीपण कुणाला आठवण झाली नव्हती. कुणालाच काही सुचत नव्हतं. लीपाला मात्र काय झालंय त्याचं आकलन होत नव्हतं. ती आपली मुलाला पुढ्यात घेऊन खेळवत बसली होती.

म्हातारा त्सिबुकिन स्टेशनवरून घरी आला तेव्हा कुणाचीच त्याला काही विचारण्याची हिंमत झाली नाही. त्यानं पण सगळ्यांची जुजबी वास्तपुस्त केली आणि मग मुकाट्यानं सगळ्या खोल्या ओलांडत आत निघून गेला. रात्री जेवला पण नाही तो.

''आपलं सांत्वन करायला तरी कुणी उरलंय का ?'' ग्रीगोरी त्सिबुकिन आणि वारवारा एकमेकांना जेव्हा एकांतात भेटली तेव्हा वारवारानं बोलायला सुरवात केली. ''मी तेव्हाच म्हणत होते की नाही की एखाद्या प्रतिष्ठित, वजनदार माणसाची मदत घ्या म्हणून पण माझं ऐकलं नाहीत तुम्ही तेव्हा...निदान दयेचा अर्ज तरी करायला हवा होतात तुम्ही.''

''मी करता येण्यासारखं होतं ते सगळं केलं !'', हात चोळत म्हातारा म्हणाला, ''अनिसिमला शिक्षा ठोठावल्यावर मी त्याच्या वकिलाला भेटायला गेलो होतो. ''आता ह्यापुढे आपल्याला काही करता येण्याजोगं नाहीये, खूप उशीर झालाय.'' तो म्हणाला. अनिसिम पण सगळं हाताबाहेर गेलंय आता असंच म्हणत होता. तरीसुद्धा कोर्टातून बाहेर पडल्यावर मी एका वकिलाला पैसे देऊन आलोय. अजून एक आठवडा वाट पाहू. नाहीतर मग मी परत जाऊन येईन एकदा तिकडे. देवच कर्ता करविता आहे !''

म्हातारा परत मुकाट्यानं सगळ्या खोल्यांतून चक्कर मारून आला. खोलीत आल्यावर वारवाराला म्हणाला, ''मी आजारी पडलोय बहुतेक. माझं डोकं सुन्न झालंय. विचारांचा गोंधळ होतोय डोक्यात नुसता.''

लीपाला त्यांचं बोलणं ऐकू जाऊ नये म्हणून त्यानं दार ओढून घेतलं आणि हळू आवाजात तो पुढे बोलू लागला, ''मला आता माझ्या पैशांची

काळजी लागलीय. तुला आठवतंय का लग्नाच्या पूर्वी काही दिवस इस्टरच्या सणाच्या वेळी अनिसिमनं माझ्यासाठी रुबल्सची आणि अर्ध्या रुबल्सची नाणी आणली होती? एक पिशवी तर त्यावेळी मी लपवून ठेवली आणि उरलेली मी माझ्या पैशात मिसळून टाकली...माझा काका दिमित्री फिलातिच जिवंत असतानाची गोष्ट आहे. देव त्याच्या आत्म्यास शांती देवो. तो व्यापाराच्या निमित्ताने कधी मॉस्कोला तर कधी क्रिमीयाला जायचा. नवरा फिरतीवर जायचा तेव्हा दुसऱ्या पुरुषांबरोबर त्याची बायको रंग उधळायची. त्यांना सहा मुलं झाली. काकाला जेव्हा मद्याची नशा चढायची, तेव्हा तो हसायचा नि म्हणायचा, ''अरेच्या, मला तर ह्या मुलांमधली माझी कोणती नि दुसऱ्यांची कोणती तेही ओळखू येत नाही !'' आत्ताची माझी अवस्था अगदी तश्शीच आहे. माझ्या जवळच्या नाण्यातली कोणती खरी नि कोणती खोटी काहीच कळत नाही मला. आता तर मला ती सगळीच खोटी वाटताहेत.''

''देवाशपथ, असं काही बोलायचं नाही हं !''

''स्टेशनवर तिकिटाला तीन रुबल्स दिले. आता वाटतंय तेही खोटेच असणार. मला भय वाटतय. मी आजारी पडणारसं दिसतंय.''

''आपण सर्वजण देवाच्या हातातली बाहुली आहोत. ओरव-त्येरव-त्ये, वारवारा डोकं हलवत म्हणाली. आपल्याला आता जरा विचार करायला हवा प्येत्रोविच...अगदी काहीही होऊ शकतं. तू काही तरुण राहिला नाहीयेस आता. तुला जर मृत्यू आला तर तुझ्या नातवाला कोणी छळणार नाहीत असं पाह्यला हवं. हो, मला तर त्या पोराची, निकिफोरचीच काळजी लागून राह्यलीय ! त्याचा बाप असून नसल्यासारखाच आहे, आई तरुण आहे पण मूर्ख, अडाणी आहे...तू त्या पोराच्या नावावर जमिनीचा एखादा तुकडा केलास तर बरं होईल नाही का? तो बूत्योकिनोचा प्लॉट का देईनास त्याला. बघ प्येत्रोविच, विचार कर !'' वारवारा पटवून देण्याचा प्रयत्न करीत पुढे म्हणाली, ''पोर किती गुणाचं आहे ते, त्याच्यासाठी आपण काहीच केलं नाही. आपल्याला लज्जास्पद आहे ते ! उद्याच जा आणि त्याच्या नावाचा कागद करून ये. कशाची वाट पाह्यची आता !

''मी माझ्या नातवाला तर सपशेल विसरलो होतो की'', त्सिबुकिन म्हणाला, ''त्याला भेटून यायला हवं. तू म्हणतेस तसं पोर गोड आहे, नाही

का ? ठीक आहे, ठीक आहे, होऊ दे त्याला मोठा. देव त्याचे रक्षण करो !''

त्यानं दार उघडलं आणि बोटानी खुणवून लीपाला जवळ बोलावलं. मुलाला हातावर घेऊन ती त्याच्याजवळ आली तेव्हा तो म्हणाला, लीपीन्का, माझ्या लाडक्या मुली, तुला काही लागलं, कशाची गरज भासली तर संकोच न करता मागून घे. तुला जे आवडेल ते तू खा. आम्ही कधीच तुला बोल लावणार नाही. तू सुदृढ, आनंदी राहवंस हीच आमची इच्छा आहे...'', मुलाच्या अंगावर त्यानं क्रॉस केला. ''आमच्या नातवाला सांभाळ. मुलगा नाही तर नाही, नातू तर आहे ना आमचा !''

त्याच्या गालावरून अश्रू ओघळू लागले. त्यानं हुंदका दिला आणि तो तिथून आपल्या खोलीत निघून गेला. गेले सात दिवस त्याला झोप लागली नव्हती. अंथरुणात पडल्याबरोबर गाढ झोप लागली त्याला.

⁂

भाग ७

म्हातारा काही दिवसांसाठी शहरात गेला होता. कुणीतरी अकसिन्याला सांगितलं की तो डबीराकडे (नोटरीकडे) इच्छापत्र करायला गेला होता. त्याद्वारे तिची विटाची भट्टी असलेली ब्यूतोकिनोची जमीन तो आपल्या नातवाच्या, निकिफोरच्या नावानं करतोय. अकसिन्याला सकाळी जेव्हा बातमी कळली तेव्हा म्हातारा त्सिबुकिन आणि वारवारा पोर्चच्या समोर बिर्योझाखाली चहा पीत बसली होती. अकसिन्यानं दुकानाचं मागचं पुढचं दार बंद केलं, तिच्याजवळ होत्या नव्हत्या त्या किल्ल्या एकत्र केल्या आणि म्हाताऱ्याच्या पायापाशी भिरकावून दिल्या.

''ह्यापुढे मी तुमच्यासाठी काम करणार नाही.'', ती मोठ्यानं ओरडली आणि ओक्साबोक्शी रडायला लागली. ''असं दिसतंय की मी तुमची सून नाहीये तर एक मोलकरीण आहे ! सगळं जग खिल्ली उडवतंय, ''म्हणतय, बघा, काय कामसू मोलकरीण मिळाली आहे त्सिबुकिनला !'' मी काही तुमच्या दाराशी नोकरी मागायला नव्हते आले ! मी भिकारी नाहीये की एखादी अडाणी, गावंढळ बाई नाहीये. मला आई, वडील आहेत.''

तिने आपले अश्रू पुसले नाही. आपले अश्रूंनी डबडबलेले, जळजळीत रागानं लाल लाल झालेले डोळे म्हाताऱ्यावर रोखले. तिचा चेहरा, मान सगळं लाल लाल झालं होतं. सर्व शक्ती एकवटून, शिरा ताणताणून ती ओरडत होती. "ह्यापुढे काम करण्याची मला इच्छा नाहीये.", ती म्हणाली, "काम करून करून माझा पिट्टा पडलाय. माझ्या कामासंबंधी बोलायचं झालं तर दिवसभर दुकान चालवायचं आणि रात्री वोडकासाठी धावाधाव करायची. अशी ही मी आणि जमीन मात्र देणार तुम्ही या गुन्हेगाराच्या बायकोला नि तिच्या त्या कार्ट्याला. ती ह्या घराची मालकीण, जहागिरदारीण आणि मी मात्र तिची दासी ! सगळं सगळं देऊन टाका त्या कैद्याच्या बायकोला, येऊ दे सगळं त्यांच्या गळ्यापर्यंत ! मी जाईन माझ्या माहेरी. तुम्ही माझ्या जागी एका मूर्ख, जुलमी बाईला ठेवा नोकरीला !

म्हाताऱ्या त्सिबुकिननं आजतागायत कधीही आपल्या मुलांना शिवीगाळ केली नव्हती की कधी शिक्षा केली नव्हती. आपल्याच कुटुंबातील कुणी एक व्यक्ती त्याच्याशी इतक्या उर्मटपणे बोलू शकेल किंवा त्याचा अपमान, अनादर करील हे त्याच्या कल्पनेच्या बाहेर होतं. पण आज मात्र तो अगदी भयभीत झाला होता. तो घरात पळत जाऊन कपाटामागे लपून बसला. वारवाराची तर दातखिळीच बसली. तिला उठून उभं राहण्याचीसुद्धा ताकद नव्हती; गांधीलमाशांपासून स्वत:चं रक्षण करताना माणूस जसा हात हलवतो ना तसे ती आपले दोन्ही हात हवेत उडवत होती नुसती.

"काय हे, चाललंय तरी काय !" ती घाबऱ्याघुबऱ्या बडबडत होती, "एवढ्या मोठ्यानी कशाला ओरडतेय ही ? ओरव-त्येरव-त्ये, लोकांना ऐकू नाही का जाणार ! ती थोड्या खालच्या आवाजात बोलली तर नाही का चालायचं. जरा हळू !

"शिक्षा भोगत असलेल्या कैद्याच्या बायकोला ब्युतोकिनोची जमीन बहाल केलीत", तिचं आकांडतांडव चालूच होतं, "तिलाच का नाही देऊन टाकत सगळं. मला काऽऽही नको तुमचं ! गेलात उडत ! तुम्ही सर्वजण म्हणजे एक चोर डाकूंची टोळी आहे. चांगलं ओळखतं मी तुम्हला, वीट आलाय मला तुमचा ! तुम्ही जाणाऱ्या येणाऱ्यांना, प्रवाशांना अक्षरश: लुटलंत. लबाड, लुच्चे आहात तुम्ही. म्हातारा नाही, तरणा नाही, सगळ्यांना फसवलंत तुम्ही.

परवान्याशिवाय वोडका कुणी विकली ? आणि बनावट पैसा ? खोट्या पैशांनी पेट्याच्या पेट्या भरल्या आहेत तुमच्या. आता तुम्हाला माझी गरज उरली नाही !''

सताड उघड्या फाटकाभोवती केव्हाच लोकांचा घोळका जमला होता. माणसं अंगणात डोकडोकावून पहात होती.

''खुश्शाल पाहू देत लोकांना'', अकसिन्या ओरडली, ''मी त्यांच्यासमोर तुमचं पितळ उघडं करते का नही बघा ! शरमेनं खाक होऊन जाल तुम्ही, माझ्या पायाशी लडखडाल ! ए स्तेपान'', तिनं बहिऱ्याला हाक मारली, ''ह्या मिनिटाला आपल्याला आपल्या घरी जायचंय ! माझ्या आईवडिलांकडे जाऊ या...गुन्हेगारांबरोबर राह्यची माझी इच्छा नाहीये ! चल आवर आपलं सामान !''

अंगणामध्ये टांगलेल्या दोरीवर कपडे वाळत होते. तिने आपले ओले पेटीकोट, इतर कपडे दोरीवरून खसकन ओढले आणि बहिऱ्याच्या हातात थोपले. मग अंगात वारं संचारल्यासारखं इकडून तिकडे अंगणभर भराभर चालत तिनं दोरीवचे होते नव्हते तेवढे सगळे कपडे खाली ओढले. तिचे नव्हते ते कपडे तिनं जमिनवर फेकले नि पायानं तुडवले.

''ओऽहोऽहोऽ, थांबवा तिला कुणीतरी'', वारवारा हाय हूय करत कण्हत म्हणाली, ''काय झालय काय तिला ? कृपा करा नि ती ब्युतोकिनोची जमीन देऊन टाका तिला !''

''काय बाई आहे तरी'', कुणीतरी फाटकापाशी म्हणालं. कजाग बाई आहे नुसती, डोकं बिकं फिरलंय की काय हिचं. असा थयथयाट पाह्यलाय का तुम्ही कुणी ?''

अकसिन्या धावत धावत स्वयंपाकघरात गेली. तिथे चुलीवर कपडे उकळायला ठेवले होते. एकटी लीपा धुणं धुवत होती. स्वयंपाकीण चादरी अभ्रे खळबळायला नदीवर गेली होती. चुलीसमोरच्या टबमधून आणि पिंपातून वाफा निघत होत्या. त्यामुळं स्वयंपाकघरात धूसर धूसर झालं होतं. धुरानं घुसमटल्यासारखं झालं होतं तिथे. जमिनीवर अजून न धुतलेल्या कपड्यांचा ढीग होता आणि ढिगाऱ्याला लागूनच बाकावर आपले लाल वाळकुडे पाय झाडत निकिफोर पहुडला होता. त्याला तिथं अशासाठी निजवलं होतं की तो

जरी बाकावरून पडला तरी त्याला दुखापत व्हायला नको. अकसिन्या स्वयंपाकघरात शिरत होती तेव्हाच लीपानं अकसिन्याचा खमीस ढिगाऱ्यातून बाहेर काढून टबमध्ये टाकला. आपला हात लांब करून टेबलावरच उकळत्या पाण्यानं भरलेलं दांड्याचं भांडं तिनं उचललं नि खमीसवर ओतलं.

''दे ते इकडे'', लीपाकडे रागानं पहात अकसिन्या म्हणाली. तिनं टबमधून खमीस ओढून काढला, ''माझ्या कपड्यांना हात लावायचं काम नाही. तू एका गुन्हेगाराची बायको आहेस. तू कोण आहेस, तुझी जागा कुठे आहे ते तुला दाखवायलाच हवं !''

''लीपा घाबरून काय करावं ते न कळल्यामुळे तिच्याकडे नुसती पहातच राहिली. पण अचानक अकसिन्याच्या तिच्या मुलावर पडलेल्या नजरेकडे तिचं लक्ष गेलं आणि भीतीने तिचे हातपायच गळून गेले...

''माझी जमीन हडपलीस काय ? बघतच राहा आता काय होतंय ते !'' असं म्हणत म्हणत अकिसन्यानं उकळत्या पाण्याचं दांड्याचं भांडं उचललं आणि निकिफोरवर ओतलं. त्यानंतर एक किंकाळी ऐकू आली. अशी किंकाळी आजपर्यंत उकूल्येयेवोमध्ये कुणी ऐकली नसेल आणि कुणाचा विश्वासही बसला नसता की लीपासारखी दुबळी, पापभिरू मुलगी एवढ्या जोरानं ओरडू शकेल. अंगणात एकदम शांतता पसरली. अकसिन्या छद्मीपणानं हसत मुकाट्यानं घरात निघून गेली. बहिरा काखेत कपडे धरून अंगणात येरझारा घालत होता. त्याने मुकाट्याने पुन्हा एक एक कपडा दोरीवर घालायला सुरवात केली. स्वयंपाकीण नदीवरून येईपर्यंत कुणाचीही स्वयंपाकघरात जाऊन काय झालंय ते पाह्यची हिंमत झाली नाही.

*

भाग ८

निकिफोरला सरकारी दवाखान्यात नेण्यात आलं पण संध्याकाळी तो तिथे मरण पावला. कुणाच्या येण्याची वाट न पाहता लीपाने मृत बालकाला ब्लँकेटमध्ये गुंडाळले आणि ती त्याला घरी घेऊन गेली.

मोठ्या मोठ्या खिडक्या असलेला तो दवाखाना टेकडीवर नव्यानंच बांधण्यात आला होता. मावळत्या सूर्यकिरणांमुळे तो संपूर्णपणे प्रकाशित झाला

होता. असं वाटत होतं की त्याला आग लागली आहे की काय. उक्ल्येयेवो त्याच्या पायथ्याशी वसलं होतं. लीपा टेकडीवरून खाली आली, पण गावाकडे न जाता जवळच असलेल्या लहानशा तलावाच्या काठी जाऊन बसली. एक बाई घोड्याला पाणी पाजायला तलावावर घेऊन आली होती. पण घोडा पाणी प्यायला तयार नव्हता.

''तुला काय झालंय आज ?'' आश्चर्यानं हळू आवाजात ती बाई म्हणाली, ''तू पाणी का पीत नाहीयेस?''

लाल रंगाचा शर्ट घातलेला एक लहान मुलगा पाण्याच्या अगदी काठाशीच बसून वडिलांचे बूट धुवत होता. ह्या दोघा तिघांशिवाय गावात आणि टेकडीवर चिटपाखरूही नव्हतं.

''तो नाही प्यायचा''...लीपा घोड्याकडे पाहून म्हणाली.

मग ती बाई आणि बूट हातात घेतलेला मुलगा दोघेही निघून गेले. सूर्य किरमिजी आणि पिवळ्या रंगाची लांब रुंद शाल पांघरून झोपी गेला होता. लाल आणि जांभळ्या रंगाचे ढग दूरदूर आकाशभर पसरले होते. सूर्याला शांत झोप लागावी म्हणून रखवाली करीत होते जणू ते. कुठेतरी दूर, कळत नव्हतं कुठं ते एक पक्षी बगळ्यासारखा आवाज काढत होता. त्याचा घोगरा, दुःखी आवाज कोंडवाड्यात ठेवलेल्या गाईच्या हंबरण्यासारखा येत होता. ह्या पक्ष्याचं ओरडणं दरवर्षी वसंतऋतूत लोकांच्या कानावर पडायचं. पण तो कसा दिसतो, कुठे राहतो कुणालाही माहीत नव्हतं. टेकडीच्या माथ्यावर, दवाखान्याशेजारी तळ्याच्या भोवती, गावाच्या पलीकडे आणि शेताशेतातून नाइटिंगेलचं अखंड गायन चालू होतं. कोकिळा कुणाच्या तरी वयाचा हिशेब करीत होती. दर वेळेला तिची गणती चुकत होती नि पुन्हा पहिल्यापासून मोजायला सुरवात करीत होती. तळ्यात बेडकांचा रागावलेल्या कर्णकटू आवाजात सवाल जबाब चालला होता. एकमेकांशी अगदी तू-तू-मै-मै. आवाजावरून शब्द सुद्धा कळत होते. ''अग, तू अशी ! अग, तू तशी !'' सगळीकडे आवाजच आवज कानावर पडत होते. असं वाटत होतं, हे सगळे प्राणी मुद्दामच ओरडत होते, गात होते म्हणजे मग वसंताच्या त्या संध्याकाळी कुणीही झोपलं नसतं. अगदी चिडकी बेडकंसुद्धा आणि वसंताच्या प्रत्येक क्षणाचा आनंद लुटला असता त्यांनी. शेवटी काय आपल्याला देवानं एकच आयुष्य दिलंय. ते भरभरून जगायला नको का ?

भरगच्च ताऱ्यांच्या निळ्या आकाशात अष्टमीच्या चंद्राचा चंदेरी प्रकाश पडला होता. लीपाला आपण किती वेळ तळ्याच्या काठी बसलो आहोत ह्याचं भानच राहिल नव्हतं. पण ती जेव्हा चालायला लागली तेव्हा खेड्यातली सगळी माणसं निद्राधीन झाली होती. घराघरातले दिवे विझले होते. त्यांचं घर तिथून बहुतेक दहा बारा कोसावर असावं. तिच्यात एवढी ताकद उरली नव्हती आज आणि रस्ता शोधत शोधत जायला पण मन करत नव्हतं तिचं. चंद्र आत्ता डोळ्यासमोर तर जरा वेळानं उजवीकडे लकाकताना दिसत होता. ती मघाची कोकिळा ओरडून ओरडून ह्या वेळेपर्यंत घोगऱ्या झालेल्या आवाजात ओरडत होती. ती जणू हसत होती, ती लीपाला खिजवत होती. "तू रस्ता चुकली आहेस ! तू रस्ता चुकली आहेस !" लीपा भराभरा चालत होती. तिचा डोक्याचा रुमाल पडून गेला होता कुठेतरी, तिला कळलंच नव्हतं...आकाशाकडे पाहता पाहता तिच्या मनात विचार आला की तिच्या बाळाचा आत्मा कुठे असेल आत्ता, तिच्या मागे मागे येत असेल का उंच उंच आकाशात ताऱ्यांच्या जवळ तरंगत असेल. तो आपल्या आईला विसरून गेला असेल का ? रात्रीचं असं शेतातून जाणं किती एकलकोंडं उदासवाणं वाटतंय. पक्ष्यांच्या गाण्याचा आवाज आसमंतात घुमतोय नुसता पण आपण मात्र गाऊ शकत नाही. सभोवती अविरत वसंताचा आनंदोत्सव चालला असताना मला मात्र त्यांच्यात सहभागी होता येत नाहीये. आकशातून चंद्र खाली पहातोय. तो पण एकटाच आहे. पण त्याला आज वसंत आहे कि कडक हिवाळा आहे, माणसं जिवंत आहेत की मेली आहेत त्याचं काही सोयर सुतक नाहीये...आपण दुःखात डुबून गेलेले असतो तेव्हा सभोवताली माणसं नसली तर फार जड जातं. आज तिच्याजवळ तिची आई, कुबडा ओलिझारव स्वयंपाकीण किंवा दोन पाय आणि दोन हातांचं कोणीही असतं तर किती बरं झालं असतं, "बुऽऊ !" बगळ्याच्या जातीचा विप ओरडला - "बुऽऊ !"

अचानक चक्क माणसाचा आवाज तिच्या कानावर पडला. "वावीला, चल उठ, घोड्यांवर खोगीर चढव." थोडं पुढं गेल्यावर शेकोटी पेटलेली दिसली...त्यातून आता ज्वाळा निघत नव्हत्या फक्त लाल लाल निखारे चकाकत होते. घोड्यांची चारा चघळण्याची मचमच ऐकू येत होती. अंधारात दोन गाड्या असल्याचं दिसत होतं. एकात पीप होत. दुसऱ्या छकड्यात बोचकी होती.

शेजारी दोन माणसांच्या आकृत्या दिसत होत्या. एकजण घोड्याला जुंपायला घेऊन जायला निघाला होता आणि दुसरा मागे हात घेऊन विस्तवाजवळ निश्चल उभा होता. गाड्यांच्या जवळपास कुत्रं गुरगुरत होतं. घोड्याला हाताला धरून नेणारा मनुष्य थांबून म्हणाला, ''रस्त्यानं नक्कीच कुणीतरी इकडे येतंय.'' ''शारिक (ए चेंडू), गप्प बैस'', दुसरा कुत्र्यावर ओरडला. आवाजावरून कुणाच्याही लक्षात आलं असतं की दुसरा मनुष्य वयस्क असावा. लीपा थांबली नि म्हणाली, ''देवानं माझं ऐकलेलं दिसतंय !''

म्हातारा तिच्याकडे जायला लागला. आधी काहीच बोलला नाही. मग त्यानं तिला शुभेच्छा दिल्या.

''तुमचा कुत्रा मला चावणार तर नाहीना आजोबा ?

''घाबरू नकोस, ये इकडे, काही करणार नाही तो तुला.''

''मी दवाखान्यातून येतेय'', थोडं थांबून लीपा म्हणाली, ''माझ्या बाळाचा तिथं मृत्यू झाला ही मी त्याला घरी घेऊन जातेय.''

तिच्या त्या बोलण्यानं म्हातारा अस्वस्थ झाला. तिच्यापासून दूर जात म्हणाला, ''चालायचंच बाळे, देवाची मर्जी ! चल रे'', तो आपल्या बरोबरच्या मुलाला म्हणाला, ''चल आटप लवकर, आळस झाड जरा !''

''तुझा चाबूक दिसत नाहीये'', मुलगा म्हणाला.

''अरे मग तुझा काय उपयोग ?''

म्हाताऱ्याने निखारा उचलला, त्याच्यावर फुंकर मारली. त्या वेळी फक्त त्याच्या नाकावर नि डोळ्यांवर प्रकाश पडला. चाबुक सापडल्यावर हातानं निखारा घेऊनच तो लीपाजवळ आला. त्याने तिला न्याहाळून पाहिले. त्याच्या नजरेत कणव आणि ममता डोकावत होती.

''तू आई आहेस मुली, प्रत्येकच आई आपल्या मुलावर जिवापाड प्रेम करते !'' असं म्हणून त्यानं सुस्कारा सोडला नि डोकं हलवलं. बावीलाने त्याच वेळी विस्तवावर काहीतरी पाडलं. एकदम ठार अंधार झाला. काही दिसेनासं झालं. परत पहिल्यासारखं शेत, लुकलुकणाऱ्या ताऱ्याचं आकाश आणि एकमेकाला जागत ठेवणारे ते पक्षी. जिथे थोड्या वेळापूर्वी विस्तव पेटला होता त्याच जागेवर लँड्रील पक्षी ओरडत होता.

एखादं मिनिट गेलं असेल परत ती गाडी, म्हातारा आणि लंबुटांग्या बावीला

दिसायला लागले. गाड्या रस्त्यावरून जाताना करकरत होत्या.

"तुम्ही पाद्री आहात का ?"

"नाही, आम्ही फिरसानोवो चे रहिवासी आहोत.

"तुम्ही माझ्याकडे किती आपलेपणानं पाह्यलंत. माझ्या हृदयावरचं दडपण एकदम कमी झालं. हा मुलगा सुद्धा किती शांत आहे. म्हणूनच मला वाटलं की ही सज्जन मंडळी दिसताहेत."

"तुला खूप दूर जायचंय का ?"

"उक्ल्येयेवोला"

"मग बैस आमच्या गाडीत कुझमेनोकपर्यंत घेऊन जातो तुला. तिथून तुला पुढं सरळ जायचंय नि आम्हाला डावीकडे.

बावीला बोचकं ठेवलेली गाडी चालवू लागला. म्हातारा आणि लीपा दुसऱ्या गाडीत बसली. त्यांच्या गाड्या हळुहळू जात होत्या. बावीलाची गाडी पुढे होती.

"दिवसभर माझा मुलगा तडफडत होता", लीपा म्हणाली, आपल्या छोट्या छोट्या डोळ्यांनी माझ्याकडे एकटक पहात होता. त्याला काहीतरी सांगायचं होतं. पण तो सांगू शकत नव्हता. देव स्वर्गातून पहात असतो आणि 'मदर मेरी' आकाशातून. दुःखावेगानं माझा तोल जात होता. मी जमिनीवर पडत होते सारखी. आजोबा, मला सांगा त्या एवढ्याशा अर्भकाला एवढ्या यातना कशाला सहन करायला लागल्या. मोठी माणसं, बायका, पुरुष मरणापूर्वी तडफडत असतात ते मी समजू शकते की त्यांच्या पापाचा घडा भरलाय पण ह्या लहानग्यानं तर काही पाप केलं नव्हतं ना मग त्याला का इतकं भोगावं लागलं ? का म्हणून ?"

"कोणाला माहीत असणार का म्हणून ते ?" म्हातारा उत्तरला.

पुढच्या अर्ध्या तासाचा प्रवास जवळ जवळ मुकाट्यानंच झाला "सगळ्या गोष्टींचा का आणि कसं असा कार्यकारण भाव तुम्ही जाणू शकत नाही", म्हातारा म्हणाला, "पक्ष्याला दोनच पंख असतात, चार का नसतात? तर त्याचं उडायचं काम दोनवरच भागतं; त्याचप्रमाणे माणसाला प्रत्येक गोष्टींचं संपूर्ण ज्ञान असणं अपेक्षित नाही. त्यातल अर्ध किंवा पावपट असलं तरी पुरेसं असतं. जगण्यासाठी आवश्यक तेवढं ज्ञान माणसाला उपजतच असतं."

''आजोबा मला पायीच चालायला आवडेल. धक्यानं माझ्या हृदयाचा थरकाप होतोय.''

''काही हरकत नाही, बैस मुकाट्यानं.'' म्हाताऱ्यानं जांभई दिली आणि तोंडावर क्रॉस केला. ''काही हरकत नाही'', तो परत म्हणाला, ''तुझं आत्ताचं जे दु:ख आहे ना ते आयुष्यात भोगायला लागणाऱ्या दु:खाचा फक्त अर्धाच भाग आहे. आयुष्य कितीतरी लांब आहे. ह्या पुढच्या आयुष्यात चांगल्या गोष्टी घडतील आणि वाईटही. ''आपली मातृभूमी रशिया महान आहे'', दोन्ही बाजूला दृष्टिक्षेप टाकत तो म्हणाला, ''मी संपूर्ण रशिया पालथा घातलाय. तिच्यातल्या चांगल्या, वाईट दोन्ही गोष्टी पाह्यल्या आहेत, अनुभवल्या आहेत. मुली, तू माझ्या शुब्दावर विश्वास ठेव. वाईट गोष्टीच्या हातात हात घालून चांगल्याही घडतात. मी सैबेरियापर्यंत पायी प्रवास केलाय. आमूर नदीवरून नावेतून सफर केलीय आणि अलताय पर्वतावर पण चढलोय. मग शेवटी सैबेरियात स्थायिक झालो. तिथे शेतीवाडी केली. पण मग मला आपल्या जन्मभूमीची, रशियाची आठवण यायला लागली, तिची ओढ लागली. म्हणून परत माझ्या खेड्यात येऊन पोहोचलो. इथेही पुष्कळ तंगडतोड केली. मला आठवतंय एकदा आम्ही तरीतून नदी पार करत होतो. त्या सुमारास मी इतका अशक्त झालो होतो, कपड्यांची लक्तरं लोंबत होती. पायात बूट नव्हते. थंडी हाडापर्यंत पोहोचत होती, ब्रेडच्या तुकड्यावर गुजराण करीत होतो. त्याच तरीवरून एक सभ्य गृहस्थपण प्रवास करीत होता. आज जर तो हयात नसेल तर त्याच्या मृतात्म्यास शांती लाभो ! त्याला माझी दया आली. त्याच्या डोळ्यांतून अश्रू वहात होते. म्हणाला, ''आत्ता तू काळी ब्रेड खातोयस, आत्ताचं तुझं आयुष्य पण खडतर आहे, पण यापुढे...'' ''त्याच अवस्थेत घरी येऊन पोहोचलो. म्हणतात ना, 'ना घरचा ना घाटाचा', घरही नव्हतं अन निवारापण नाही. माझी बायको होती पण तिला मृत्यू आल्यामुळे मी सैबेरियातच मूठमाती देऊन आलो होतो तिला. शेतावर मोलमजुरी करू लागलो. तुला काय वाटतं ? तुला सांगतो त्यानंतर माझ्या आयुष्यात वाईट दिवस आले नि चांगलेही आलेच की. पण पोरी आज मला मरावसं वाटत नाहीये. अजून वीस वर्ष जगायची तयारी आहे माझी. ह्याचाच अर्थ आयुष्यात वाईटापेक्षा चांगले दिवस जास्त असणार. ओ हो, बघ, काय सुंदर आहे आपला रशिया !,'' असे म्हणत त्याने

उजवीकडे, डावीकडे, मागे, सगळीकडे नजर वळवली,

''आजोबा'', लीपानं विचारलं, ''माणूस मेल्यानंतर त्याचा आत्मा पृथ्वीवर किती दिवस रेंगाळत राहतो?''

''कोणाला माहीत किती दिवस ते. थांब बाविलाला विचारून पाहू. तो शाळेत शिकलाय. त्यांना अलीकडे सगळं शिकवतात म्हणे.''

''बावीला'', म्हाताऱ्याने बावीलाला हाक मारली.

''अं, काय म्हणताय ?''

''बावीला मनुष्य मरतो त्यानंतर त्याचा आत्मा पृथ्वीवर किती दिवस घोटाळत राहतो ?''

घोडा थांबवून बावीला म्हणाला, ''नऊ दिवस. माझा मामा किरीला मेला ना, त्याचा आत्मा आमच्या झोपडीत तेरा दिवस घुटमळत होता.''

''तुला कसं कळलं रे हे ?''

''तेरा दिवस चुलीच्या भट्टीतून 'टक टक' ऐकू येत होती.

''ठीक आहे, ठीक आहे, चल पुढे चल'' असं दिसत होतं की त्या वयस्क माणसाचा असल्या गोष्टीवर मुळीच विश्वास नव्हता. कुझमेनकी जवळ गाड्या उजवीकडे जाऊन महामार्गाला लागल्या आणि लीपा तशीच पुढे चालू लागली. दिशा उजळू लागल्या होत्या. ती जेव्हा घाटीत उतरली तेव्हा उक्ल्येयेवोमधल्या झोपड्या नि चर्च धुक्यात लपली होती. थंडी पडली होती तिला वाटलं तीच ती कोकीळा इथे पण ओरडतेय. ती घरी येऊन पोहोचली तर गुरंढोर अजून रानात चरायला गेली नव्हती. घरात सगळीकडे सामसूम दिसत होती. ती पोर्चपाशी घरातली माणसं उठण्याची वाट पहात बसली. पहिल्यांदा म्हातारा त्सिबुकिन बाहेर आला. तिच्याकडे पाहिल्याबरोबर काय घडलंय ते त्याल कळून चुकलं. बराच वेळ त्याच्या तोंडातून शब्द फुटेना. तो ओठांनी नुसतं चक चक करीत राह्यला.

''काय ग लीपा'' अखेर तो म्हणाला, ''तू माझ्या नातवाला नाही संभाळू शकलीस ना...

त्यानं मग वारवाराला उठवलं. तिनं हातावर हात चोळले नि ती हुंदके द्यायला लागली. सर्व जण लागलीच मूठमाती द्यायच्या तयारीला लागली.

''पोर कसं गोड होतं अगदी'' वारवारा तेच तेच म्हणत होती सारखी.

''ओरव-त्येरव-त्ये एकुलत एक पोर होतं, त्याला सुद्धा संभाळता आलं नाही ना तुला ? मूर्ख कुठली...

मृतात्म्याच्या शांतीसाठी सकाळ संध्याकाळ चर्चमध्ये प्रार्थना करण्यात आली. दुसऱ्या दिवशी बालकाला मूठमाती दिली. त्यानंतर सर्वांसाठी जेवण होतं. पाहुणे मंडळी आणि पाद्री खाद्यान्नावर अशा प्रकारे तुटून पडले की जणू ते कित्येक दिवसांचे उपाशी होते. लीपा टेबलांशी उभं राहून हवं नको पहात होती. खारवलेल्या अळंबीत अडकवलेला काटा हातात धरून पुजारी लीपाला म्हणाला, ''तुझ्या लहानग्यासाठी इतका शोक करू नकोस. त्याच्यासारख्या अर्भकांना स्वर्गात निश्चित जागा मिळते.''

पाहुणे मंडळी घरोघरी निघून गेली. मग यापुढे आपल्यापुढे काय वाढून ठेवलय, निकीफोर गेला, तो आता परत दिसायचा पण नाही, ह्या आणि अशा अनेक समस्या लीपाच्या ध्यानात येऊ लागल्या आणि तिला रडू कोसळलं. तिला कळेना की आवरत नसलेले हुंदके तिनं आता कुठल्या खोलीत जाऊन द्यायचे. तिला वाटायला लागलं मुलाच्या मृत्यूनंतर तिला ह्या घरात स्थान उरलं नाही, इथं आता तिचं काही काम उरलं नाहीये, अडगळच होणार आहे तिची. घरातील इतरांनाही बहुतेक असंच वाटत असावं.

''काय गळा काढून आक्रोश करतेयस एवढा'', एकदम दाराजवळ येऊन अकसिन्या म्हणाली. मूठमाती द्यायच्या वेळी तिने मात्र नवेकोरे कपडे घातले होते आणि तोंडाला पावडर पण लावली होती. ''गप्प बैस मुकाट्यानं !'' लीपानं शोक आवरण्याचा प्रयत्न केला पण तिला ते जमलं नाही. ती आणखीनच मोठ्यानं आक्रोश करू लागली.

''ऐकायला नाही आलं का तुला ?'', संताप अनावर झाल्यामुळं पाय आपटत अकसिन्या ओरडली. ''मी कोणाशी बोलतेय कळतेय ना ? फाटकाबाहेर चालती हो. पुन्हा तुझं पाऊल इथं पडता कामा नये. गुन्हेगार कुठली ! चल नीघ !

''अग, अग काय हे'', म्हातारा एकदम म्हणाला, ''अकसिन्या, ए बाई शांत हो जरा...ती रडतेय...साहजिकच आहे. तिचं मूल गेलंय निसर्ग नियमच आहे...

''निसर्ग नियम, निसर्ग नियम आहे म्हणे'', अकसिन्या उलटी

म्हाताऱ्यावरच ओरडली. फार तर आजची रात्र राहू देत तिला पण उद्या सकाळी तिची सावलीसुद्धा इथं दिसता कामा नये.'' ती कडाडली आणि हसत हसत दुकानात निघून गेली.

दुसऱ्या दिवशी उजाडायच्या आत लीपा तरगुयेवोला आपल्या आईकडे निघून गेली.

*

भाग ९

आता दुकानाचे छप्पर, दारं रंग दिल्यामुळे चकाकत होती. खिडक्यांमध्ये पहिल्यासारख्याच जिरेनियमच्या कुंड्या फुलांनी डवरल्या होत्या. तीन वर्षांपूर्वी त्सिबुकिनच्या घरात घडलेल्या घटनांचं आज नामोनिशाण नव्हतं. पूर्वीप्रमाणेच घरातला कर्ता पुरुष म्हणून म्हातारा त्सिबुकिनच समजला जायचा पण प्रत्यक्षात मात्र सर्व व्यवहार अकसिन्याकडे हस्तांतरित झाला होता. तीच मालाची खरेदी करायची नि विक्री करायची. तिच्या संमतीशिवाय घराची काडी इकडची तिकडे व्हायची नाही. ती सर्वेसर्वा झाली होती. तिचा विटांचा कारखाना जोरात चालला होता. रेल्वेसाठी विटांची मागणी वाढल्यामुळे त्यांचा भाव हजारी चोवीस रुबल्सला जाऊन भिडला होता. स्त्रिया आणि तरुण मुली विटा स्टेशनपर्यंत वाहून नेऊन वाघिणीमध्ये भरायच्या. त्यासाठी त्यांना प्रत्येकीला पंचवीस कोपअेक मजुरी मिळायची. अकसिन्या ख्रिमिनी धाकट्या पातीबरोबर भागीदारीत विटांचा कारखाना चालवीत होती. त्यामुळे त्यांचा कारखाना आता ''ख्रिमिनी छोटी पाती आणि कंपनी.'' म्हणून ओळखला जाई. स्टेशनला लागूनच दारूचं दुकान उघडलं होतं त्यांनी आणि त्यांचा तो महागडा ॲकॉर्डियन गिरणीवर नाही तर ह्या दारूच्या दुकानात वाजत असे. इथे पोस्टमास्तर वरचेवर यायचा. त्यानी पण तिथे कसला तरी धंदा सुरू केला होता. स्टेशनमास्तरपण यायचा ह्यांच्या दारूच्या दुकानात. बहिऱ्या स्तेपानाला ख्रिमीनिंनी सोन्याचं घड्याळ भेट म्हणून दिलं होतं त्याला. ते घड्याळ खिशातून बाहेर काढायचा नि कानाला लावायचा एक चाळाच लागला होता त्याला. गावात अफवा पसरली होती की अकसिन्याचं वर्चस्व दिवसेंदिवस वाढतंच चाललं होतं आणि

ते खरंही असावं. ती सकाळी स्वत:च्या गाडीतून दिमाखात कारखान्यात जायची तेव्हा लालबुंद, सुंदर दिसायची. तिच्या चेहऱ्यावर छद्मी हास्य विलसत असायचं. त्यानंतर कारखान्यात लोकांना ती ज्या तऱ्हेनं हुकूम सोडायची त्यावरून तिची ताकद वाढली आहे हे सगळ्यांनाच जाणवायचं. घरात, गावात, कारखान्यात सगळीकडे सर्वजण तिला भिऊन असायचे. ती पोस्टात जायची तेव्हा पोस्टमास्तर उडी मारून तिला म्हणायचा, ''या ना, या ना, बसा.''

एक दिवस एक कीमती तलम कापडाचा कोट आणि पेटंट लेदरचे उंच बूट घातलेला, मध्यम वयाकडे जरासा झुकलेला अक्कडबाज जमीनदार अकसिन्याकडे घोडा विकायला म्हणून आला होता. तिच्या बोलण्यावर तो इतका भाळला की ती म्हणेल त्या किंमतीत घोडा द्यायला तयार झाला तो. कितीतरी वेळ तिचा हात आपल्या हातात धरून ठेवला होता त्यानं. तिच्या मोहक आणि नखरेल डोळ्यांकडे पहात तो तिला म्हणाला, ''अकसिन्या अब्रामोवना, तुमच्यासारख्या स्त्रीसाठी मी काहीही करायला एका पायावर तयार आहे. फक्त एवढंच सांगा की आपण आता परत केव्हा भेटू या ? दुसऱ्या कुणाची लुडबुड नको हं !''

''हो, तुम्ही म्हणाल तेव्हा भेटू या !''

त्यानंतर तो वयस्क जमीनदार जवळ जवळ दररोज बीअर पिण्यासाठी त्यांच्या दुकानात येऊ लागला. खरंतर त्यांच्या दुकानातली बिअर कडसर, उग्र वासाची, मातट असायची. जमीनदार नाराजीनं मान हलवायचा पण प्यायचा.

अलीकडे म्हातारा त्सिबुकिन धंद्याच्या उलाढालीत ढवळाढवळ करीत नसे. तो आपल्या खिशात पैसेपण ठेवत नसे कारण खऱ्या खोट्याचा फरक त्याला कळत नसे. त्याच्यातल्या ह्या कमजोरीचा कुणाला पत्ता लागू नये म्हणून गप्पच बसायचा तो. का कोण जाणे तो आता विसराळूपण झाला होता. त्याला कुणी जेवण दिलं नाही तर स्वत: तो कधी ते मागत नसे. जेवतानाच्या त्याच्या अनुपस्थितीची आता सगळ्यांना सवयच झाली होती. वारवारा शांतपणे म्हणायची, ''गेला आजही हा न जेवता झोपी !'' तिच्याही ते अंगवळणी पडलं होतं. उन्हाळा असू दे नाही तर हिवाळा, तो त्याचा फरकोट घालूनच हिंडायचा. खूपच गरमी असली तर मात्र घराच्याबाहेर पडायचा नाही. आपला फरकोट घालून त्याची कॉलर उलटी करून स्वत:ला बंदिस्त केल्यासारखा तो

गावातल्या रस्त्यावरून, तर कधी स्टेशनच्या रस्त्याने हिंडत असायचा. कधी कधी सकाळपासून संध्याकाळपर्यंत चर्चच्या दाराजवळच्या बाकावर निश्चल बसलेला असायचा. तिथून जाणारे येणारे त्याला खाली वाकून नमस्कार करायचे पण त्यांच्या शुभेच्छांना तो उत्तर द्यायचा नाही. शेतमजुरांविषयीचा त्याच्या मनातला आकस मात्र अजून कमी झाला नव्हता. कोणीही त्याला काही विचारलं तर त्याचं उत्तर समंजसपणाचं, नम्र आणि थोडक्यात असायचं.

गावात बोलबाला होता की सुनेनं सासऱ्याला त्याच्या स्वत:च्या घरातून हाकलून दिलाय, त्याला खायला प्यायलासुद्धा घालत नाही ती. तो जसा काही लोकांच्या दयेवर जगतोय. ह्या गोष्टींचा गावातल्या काही लोकांना आनंद होत होता तर काहीजण म्हाताऱ्याची कीव करीत होते.

वारवारा आणखीनच स्थूल झाली होती, तिचा चेहरा पांढरा फटफटीत पडला होता. पहिल्याप्रमाणेच ती दानधर्म करायची. त्याला अकसिन्याचा विरोध नव्हता. उन्हाळ्यात मुरंबे इतक्या मोठ्या प्रमाणात केले जायचे की, दुसऱ्या वर्षीच्या स्ट्रॉबेरीज बागेत पिकायला आल्या तरी ते खाऊन संपायचे नाहीत. त्यांची नुसती साखर व्हायची आणि मग वारवारा रडायचीच बाकी असायची की ह्या मुरंब्याचं आता करायचं तरी काय !

अनिसिमचा जवळ जवळ सगळ्यांनाच आता विसर पडला होता. एकदा त्याच्याकडून कागदाचं संबंध पान पाठपोट भरलेलं, काव्यबद्ध, अर्जवी पत्र आलं. पत्रातलं अक्षर मागे असायचं तसच वळणदार, सुवाच्य होतं. धडधडीत दिसत होतं की त्याचा तो जानीदोस्त सामोरोदव पण त्याच्याबरोबरच शिक्षा भोगीत असावा. ह्या काव्याच्या खाली अगदी घाणेरड्या गिचमिड अक्षरात लिहिलं होतं "मी इथे सारखा आजारीच असतो. फार यातना भोगतोय मी. कृपा करून मला मदत करा."

ग्रीष्म ऋतूतल्या स्वच्छ सूर्यप्रकाश असलेल्या एके दिवशी संध्याकाळच्या वेळी म्हातारा त्सिबुकिन चर्चच्या फाटकाजवळच्या बाकावर फर-कोटची कॉलर वर करून बसला होता. दुरून फक्त त्याच्या नाकाचा शेंडा आणि गुलाबी टोपी दिसत होती. त्याच लांब बाकाच्या दुसऱ्या टोकाला मक्तेदार एलिझारव आणि त्याच्या पलीकडे सत्तर वर्षाचा, तोंडाचं बोळकं झालेला शाळेचा रखवालदार याकोव बसला होता. कुबडा एलिझारव आणि चौकीदार गप्पा मारत होते.

"मुलांनी आपल्या आईवडिलांना खायला प्यायला घातलच पाहिजे...तुझ्या आई वडिलांचा सन्मान आदर करायला शीक म्हणावं", याकव तावातावानं म्हणाला, "त्याच्या त्या सुनेनं त्याला त्याच्याच घरातून बाहेर काढलंय. म्हातारा अन्नाला मोताद झालाय. कुठं जायचं त्यानं ? तीन दिवस अन्नाचा कण गेला नाहीये त्याच्या पोटात."

"तीन दिवस ?", कुबड्यानं आश्चर्य व्यक्त केलं. "हो. हे बघ असाच बसून आहे बिचारा मुकाट्यानं. बोलण्याचे सुद्धा त्राण उरले नाहीये. त्याच्यात पण त्यानं गप्प बसून आपल्या इस्टेटीवर काय म्हणून पाणी सोडायचं ? तिला चांगलं कोर्टात खेचायला हवं. तिथेच ती चांगला धडा शिकेल..."

"कोर्टात काय शिकेल म्हणालास तू ?" ऐकू न आल्यामुळं कुबड्यानं विचारलं.

"काय, काय म्हणतोयस ?" याकवनं विचारलं.

"अरे ती तशी काही वाईट बाई नाहीये. कष्टाळू आहे. बायकांच्या आयुष्यात असं काही होणं म्हणजे विशेष नाही काही...म्हणजे मला म्हणायचंय छोटं मोठं पाप हे होणारंच...

"त्याच्या घरातून त्यालाच बाहेर काढायचं", याकव रखवालदार रागानं म्हणाला. आधी आपलं घर बांध, मग खुश्शाल हाकल दुसऱ्याला बाहेर. स्वतःला समजते तरी कोण ती ! ती समाजाला लागलेली कीडच आहे एक प्रकारची !" त्सिबुकिन सगळं ऐकत ढीम्म बसून होता.

"घर स्वतःचं असू दे नाहीतर दुसऱ्याचं, त्यानं काय एवढा फरक पडतोय, जोपर्यंत ते उबदार आहे आणि त्यात राहणाऱ्या स्त्रिया एकमेकांशी न भांडता गुण्यागोविंदानं राहताहेत", कुबडा म्हणाला नि हसला. मी जेव्हा तरुण होतो ना तेव्हा मी माझ्या नास्तास्यावर खूप खूप प्रेम केलं. ती अतिशय शांत स्वभावाची बाई होती. सारखी माझ्या मागे लागायची. "मकारिच, घर घे ! मकारिच घर घे ! मकारिच, घोडा घे एक तुला !" ती मेली तरी मरता मरतासुद्धा तिनं एकच धोशा लावला होता, "मकारिच, तुला धावणारी गाडी विकत घे, म्हणजे मग इतकी पायपिट नाही करायला लागणार तुला." पण मी तिच्यासाठी काय केलं ! फक्त एकच गोष्ट तिच्यासाठी म्हणून विकत घेऊ शकलो, आल्याची केक बस्स."

"अरे, तिचा नवरा बहिरा, मूर्ख माणूस आहे", कुबड्या अेलिझारवच्या बोलण्याकडे कानाडोळा करत चौकीदार बोलत राहिला. "मला तर म्हणायचंय मूर्खातला मूर्ख माणूस आहे तो स्तेपान. बदकाइतकीपण अक्कल नाहीये त्याला. त्याल काऽऽही कळत नाही. बदकाच्या डोक्यावर काठीचा तडाखा मारला कोणी तर बदकाला कळतं का ? तसंय ते."

कुबड्या अेलिझारव आपल्या घरी जाण्यासाठी उठून उभा राहिला. याकव चौकीदारपण उठला. दोघेजण गप्पा मारत मारत पुढे चालायला लागले. ती दोघं चाळीस पन्नास पावलं दूर गेले असतील नसतील तेवढ्यात म्हातारा त्सिबुकिन पण उठला आणि जणू काही बर्फावरून चालतोय असा लडखडत, झोकांड्या खात त्यांच्या मागेमागे चालू लागला. उक्ल्येयेव खेडं संध्याकाळच्या संधिप्रकाशात न्हाऊन निघालं होतं. सूर्याचा प्रकाश फक्त वरून जाणाऱ्या रस्त्यावर दिसत होता. चढावावर रस्ता सापाप्रमाणे वळण घेत घेत खालून वर चढत गेला होता. म्हाताऱ्या स्त्रिया आणि त्यांच्यामागून पळत जाणारी लहान मुलं घरी परतत होती. बायकांच्या हातात आळंबीनं भरलेल्या करंड्या होत्या. विटा मालगाडीमध्ये चढवण्यासाठी गेलेल्या बायका आणि तरुणी घोळक्यांनी स्टेशनवरून येत होत्या. डोळे सोडून त्यांचे नाक, तोंड, कान सर्व विटांच्या लाल मातीनं माखली होती. त्या गाणी म्हणत चालल्या होत्या. आपल्या बारीक, किनऱ्या आवाजात लकेरी घेत लीपा सर्वांच्या पुढे चालली होती. मधून मधून ती आनंदित होऊन आकाशाकडे पहात होती. जणू ती देवाचे आभार मानत होती की आजच्या दिवसाचं काम एकदाचं संपलं, आता आराम करायला हरकत नाही. बायकांच्या घोळक्यांमध्ये कामावर गेलेली तिची आई प्रास्कोव्या पण होती. तिच्या हातात गाठोडे होते आणि दम लागल्यामुळे धापा टाकत चालली होती ती.

"नमस्कार, अेलिझारव", कुबड्याला पाहून लीपा म्हणाली, "नमस्कार !"

"नमस्कार, लीपीन्का !" कुबड्याला लीपाला पाहून खूप आनंद झाला होता. बायकांनो आणि पोरींनो, ह्या तुमच्या पैसेवाल्या मिस्त्रीवर तुमची मर्जी असू द्या ! हँ-हँ-हँ ! अग पोरींनो, माझ्या लाडक्या मुलींनो, माझ्या कुऱ्हाडींनो !"

कुबड्या आणि याकव चौकीदार पुढे निघून गेले तरी त्यांच्या गप्पा सगळ्यांना ऐकू येत होत्या. एवढ्यात त्या बायकाच्या घोळक्याला त्यांच्या पाठीमागून येणार त्सिबुकिन दिसला आणि सगळीकडे एकदम शांत शांत झालं. लीपा आणि प्रासकोव्या बाकीच्या बायकांपासून जरा मागे रेंगाळल्या जेव्हा म्हातारा त्यांच्या जवळ येऊन ठेपला तेव्हा लीपानं त्याला खाली वाकून आदरानं अभिवादन केलं.

''नमस्ते, ग्रीगोरी प्येत्रोविच !''

तिची आईपण आदरानं खाली वाकली. म्हातारा थांबला आणि त्या दोघींकडे मुकाट्यानं पहात राह्यला. त्याचे ओठ थरथरत होते. डोळ्यात अश्रू दाटले होते. लीपानं आईच्या गाठोड्यातून ? दाट खिरीतला केकचा तुकडा बाहेर काढला नि त्याला दिला. त्यानं तो घेतला नि खायला लागला.

·सूर्य अस्ताला गेला होता. वरच्या रस्त्यावरपण आता त्याचा प्रकाश राह्यला नव्हता. काळोख पडला होता. हवेत गारवा यायला लागला होता. लीपा आणि प्रास्कोव्या आपल्या घराच्या वाटेला लागल्या होत्या पण कितीदातरी हाताचे क्रॉस करून देवाची विनवणी केली होती त्यांनी.

●●

अन्तोन चेखव (१९०२)



: ८ :

हिरवे भूशिर

भाग १

काळ्या समुद्रावर मी आणि माझे नायक नायिका यांच्या दैनंदिनीत वारंवार उल्लेख असलेला 'हिरवं भूशिर' नावाचा एक सुंदर 'दाचा'* आहे. विषयाची जाण असलेल्या, शास्त्रशुद्ध पद्धतीवर भर देणाऱ्या काटेकोर वास्तुशिल्पकाराच्या दृष्टीनं हा दाचा नगण्य असेल कदाचित पण एखाद्या कवीला, चित्रकाराला मात्र ती एक मनमोहक, अद्भुत वास्तू वाटेल. मला पण ती नीरव, नितान्त सुंदर जागा फार आवडते. संगमरवरी निर्जिवपणा तिथं जाणवत नाही. तिथले खांब भव्य नसले तरी साधे पण सुबक आहेत. ती जागा आपल्या सौंदर्यामुळे सभोवतालच्या निसर्गरम्यतेला बाधा आणीत नाही. अतिथ्यशील, आदबशीर आणि कल्पनारम्य अशी वाटते ती. सडसडीत, चंदेरी मुलामा चढवलेले पॉपलर वृक्ष, उंच मीनार, चर्चचे कळस, बिर्योझाच्या झाडावरच्या खाचा, तराफ्याचे बांबू या सर्व गोष्टींमुळे ती जागा मध्ययुगीन असावीसं वाटतं. मी त्या दाचाकडे पाहतो तेव्हा मला जर्मन भाषेतील मनोविकार परिप्लुत कादंबऱ्या, त्यांच्यातले किल्ले, सरदार, रहस्यमय अशा सरदारांच्या बायका, तत्त्वज्ञानाचे वाचस्पती ह्यांची आठवण होते. हा 'दाचा' डोंगरावर आहे. त्याच्या सभोवती नागमोडी पाऊलवाटांचा, गर्द हिरव्या झाडांनी नटलेला बगीचा, कारंजी, रोपवाटिका होत्या आणि खाली डोंगराच्या पायथ्याशी निळाशार समुद्र. अवकाशातून अव्याहत झुळझुळणारा दमट नखरेल वारा, नानाविध पक्ष्यांचा किलबिलाट, निरंतर स्वच्छ आकाश, पारदर्शक पाणी एकूण काय अद्भुत जागा !

"दाच्याची मालकीण मारीया इगरवना मिकशादझे ही एक सरदार कन्या होती पण तिचा नवरा जॉर्जिया किंवा सरक्याशिया ह्यापैकी कुठल्याच प्रांताचा

सरदारपुत्र नव्हता. मारीया इगरवना ही पन्नास वर्षांची सुदृढ बांध्याची. तिच्या तरुणपणी सौंदर्यवती म्हणून गणली जात असे. ती प्रेमळ, मनमिळाऊ, आतिथ्यशील पण कर्तव्यकठोर, शिस्तीची पण तऱ्हेवाईक होती थोडीशी. आम्हाला ती चांगलं चुंगलं उत्तम प्रतीचं खायला प्यायला द्यायची. मात्र त्याच्या बदल्यात आमच्याकडून भरपेट पैसे घ्यायची आणि सारखी धारेवर पण धरायची. शिष्टाचार हा तिचा एक 'छंद' होता. तर ती एका सरदाराची बायको आहे हा दुसरा. ह्या दोन बुटांवर गिरक्या मारता मारता ती सदोदित लोकांच्या जखमांवर मीठ चोळत असायची, सगळ्यांना सळो की पळो करून सोडायची. ती कधीही हसताना दिसायची नाही कारण तिच्या मते ती किंवा तिच्यासारख्या उच्चभ्रू महिलांसाठी ते असभ्यपणाचं लक्षण होतं. तिच्यापेक्षा जो कोणी लहान असेल मग एखाद्या वर्षांनीच का होईना, ती त्याला दूधपितं बाळ समजायची. तिच्या मते खानदानीपणा हा एक सद्गुण आहे. बाकी सगळ्या गोष्टी त्याच्यापुढे क:पदार्थ, कवडी मोलाच्या असतात. चंचलपणा आणि उतावळेपणा हे ती शत्रू मानायची, तिला कमी बोलणं आवडायचं वगैरे वगैरे. तिच्याशी जमवून घेणं म्हणजे एक दिव्यच होतं. तिची मुलगी जर तिथे नसती तर आज हिरव्या भूशिराच्या आठवणीत रमून जाण्याचा आनंद आम्हाला कधीच मिळाला नसता. त्या तथाकथित प्रेमळ बाईसाहेब म्हणजे आमच्या त्या सुखद आठवणींना लागलेला कलंकच... मारीयाची मुलगी ओल्या* म्हणजे हिरव्या भूशिराचं भूषण होतं. ओल्या सडपातळ बांध्याची, भुऱ्या केसाची, एकोणीस वर्षाची गोड युवती होती. ती चुणचुणीत हुशार मुलगी होती. आडमुठेपणा नव्हता तिच्यात. तिला चित्रकला अवगत होती, वनस्पतिशास्त्राचा अभ्यास करायची ती, फ्रेंच भाषा फाडफाड बोलायची. जर्मन मात्र मोडकंतोडकं येत होतं तिला. वाचनाची खूप आवड होती तिला, नाचायची थेट 'त्येरप्सिखोरा' सारखी. गायनशाळेत संगीताचे धडे घेतले होते तिने, वाद्यवादनात पण बऱ्यापैकी गती होती तिची. आम्हा पुरुषमंडळींचं तिच्यावर फार प्रेम होतं म्हणजे आम्ही तिच्या प्रेमाबिमात नव्हतो पडलो पण फार आवडायची ती आम्हाला सर्वांना. तिच्याशिवाय हिरवं भूशिर आम्हाला कबूलंच झालं नसतं. 'हिरव्या भूशिराचे' काव्य तिच्याविना अधुरच राह्यलं असतं. ती एखाद्या सुंदर चित्रकृतीतील स्त्रीची मूर्ती होती. मनुष्याकृतिविरहित निसर्गचित्र का कोण जाणे मला मुळीच आवडत

नाही. तिथल्या समुद्राची खळखळ आणि झाडांची सळसळ निसर्गरम्यच आहे पण त्यात ओल्याचा तार स्वर, आमचे खर्ज, मध्यम आणि पियानोचा सूर मिसळल्यानंतर समुद्र आणि बगीचा पृथ्वीवरील स्वर्गच वाटायचा... आम्ही सरदारीण बाईंवर पण प्रेम करायचो कारण दुसरा पर्याय नव्हता म्हणून. ओल्याला आम्ही आमच्या मंडळाचं सन्माननीय सभासदत्त्व बहाल केलं होतं. ती पण आमच्याशी आपलेपणानं वागायची. आम्हा पुरुषमंडळींच्या सहवासाचं तिला आकर्षण होतं आणि आमच्या सान्निध्यातच तिची कळी खुलायची. आम्ही तिच्या आसपास नसलो तर ती उदास व्हायची, तिचं गाणं बंद व्हायचं. आमच्या पलटणीत 'हिरव्या भूशिरात' उन्हाळ्यात राह्यला येणारे लोक, पाहुणे मंडळी, शेजारी पाजारी यांचा समावेश होता. त्यातले पुढारी म्हणजे डॉक्टर याकवकिन, ओडेसाहून आलेला पत्रकार मुखीन्स्की, ड्रील मास्तर फीयेवस्की आणि तीन विद्यार्थी. चित्रकार चेखव, खारकवहून येणार कायद्याचा विद्यार्थी जमीनदार पुत्र आणि मी ओल्याचा माजी शिक्षक. तिला मोडकं तोडकं जर्मन बोलायला आणि गोल्डफिश जाळ्यात पकडायला मी शिकवलं होतं. आम्ही सर्वजण दरवर्षी मे महिन्यात 'हिरव्या भूशिरात' राह्यला जायचो आणि त्या मध्ययुगीन किल्ल्यामधल्या सगळ्या खोल्या आणि आऊट हाऊस राखून ठेवायचो. प्रत्येक वर्षी मार्च महिन्यात आम्हाला 'हिरव्या भूशिरातून' दोन आमंत्रणपत्रं यायची. एक महत्त्वाचं, कडक शब्दात लिहिलेलं. कायदे-नियमांचं भरलेलं सरदारीणबाईंकडून आणि दुसरं लांबलचक, उत्साहवर्धक आणि सुट्टीत, करावयाच्या वेगवेगळ्या कार्यक्रमाची लांबच लांब यादी असलेलं आमची आतुरतेनं वाट पहात असणाऱ्या सरदार कन्यकेचं. सप्टेंबर महिन्यापर्यंत आमचा मुक्काम असायचा तिथे. तिथे आम्हाला जवळ जवळ दररोज भेटणाऱ्या शेजाऱ्यांमध्ये सुट्टीवर आलेला आर्टीलरीतला लेफ्टनंट इगरव. इगरव तरुण होता. दोनदा ॲकॅडमीच्या परीक्षेला बसला पण दोन्ही वेळा नापास झाला होता. तो समंजस, सुसंस्कृत आणि बहुश्रुत होता. वैद्यक शाखेचा विद्यार्थी करोबव आणि त्याची पत्नी इकातेरीना जमीनदार अल्येऊतव; आणि आणखी कितीतरी. पण त्यातील बरेचसे जमीनदार, नोकरीत असलेले नि पेन्शन घेतलेले, आनंदी तसेच लांब आंबट चेहऱ्याचे, भंपक आणि उपद्व्यापी अशा तऱ्हेचे होते. ओल्याला आमचं हे मित्रमंडळ मनापासून आवडायचं. ती ह्या सगळ्यापेक्षा मोठ्यानं

ओरडायची, गिरक्या मारायची, गडबड, बडबड करायची. आमच्या ह्या टोळक्याचा उन्हाळाभर दिवसरात्र खाणे, पिणे, खेळणे, फटाके उडवणे, एकमेकांची टिंगल करणे हाच उद्योग होता. तरीदेखील ओल्या आम्हा सगळ्याचं जीवन होतं, आत्मा होता.

दररोज संध्याकाळी राणीसाहेब आम्हाला सगळ्यांना दिवाणखान्यात बोलवायच्या, लाल लाल चेहरा करून आमच्या वागण्यावर कडाडून टीका करायच्या, आम्हाला शरमिंदा करायच्या, शपथेवर सांगायच्या की आमच्या मेहेरबानीनं त्यांचं डोकं उठतं. आम्हाला उपदेशाचे घोट पाजण्यात त्यांना आनंद व्हायचा. आम्हाला विनामोल सल्ले द्यायच्या. त्यांची अगदी खात्री होती की त्या जे सांगताहेत ते शेवटी आमच्या फायद्याचंच ठरणार आहे. सगळ्यात जास्त कानउघडणी बिचाऱ्या ओल्याचीच व्हायची. त्यांचं असं म्हणणं असायचं की आम्ही जे जे उपद्व्याप करतो त्या सगळ्याला ओल्याच जबाबदार आहे. ओल्याला आईची भीती वाटायची पण आदरही वाटायचा. ती तिचा उपदेश शांतपणे उभं राहून लाक्षपूर्वक ऐकायची. अशावेळी तिचा चेहरा लाल लाल दिसायचा. सरदारीणबाई तिला अगदी लहान मूल समजायच्या. त्या तिला कोपऱ्यात उभं करायच्या. कधी कधी नाष्टा द्यायच्या नाही, जेवण न देता उपाशी ठेवायच्या. ओल्यासाठी कोणी रदबदली करणं म्हणजे आगीत तेल ओतण्यासारखंच होतं. जर शक्य असतं तर त्यांनी आम्हालासुद्धा कोपऱ्यात उभं केलं असतं. त्या आम्हाला संध्याकाळच्या प्रार्थनेसाठी चर्चमध्ये धाडायच्या, प्रार्थना तोंडपाठ म्हणायला लावायच्या, आमचे चादरी, अभ्रे मोजायच्या, आमच्या कुठल्याही कामाचा विचका करायच्या. आम्हीसुद्धा त्यांची कात्री इकडे तिकडे नेऊन टाकायचो, त्यांची अल्कोहोलची बाटली कुठे ठेवली ते आम्हाला आठवायचं नाही आणि त्यांचं अंगुस्तान शोधता शोधता नाकीनव यायचं आम्हाला.

''अडाणी कुठला'', त्या सारख्या खेकसायच्या, माझ्या जवळून नुसता गेलास, माझ्या हातातलं ते पाडलस पण उचलून द्यायचं काही कळत नाही ना ? उचल ते ! तुमच्या ह्या अशा वागण्यामुळं देव मलाच शिक्षा करतोय! जा आता इथून तोंड काळं कर तुझं.''

पुष्कळदा त्यांना शांत करण्यासाठी आमच्यापैकी कुणीतरी त्यांची क्षमा

मागायला आणि का आणि कशी चूक झाली ह्याचा खुलासा करायला म्हाताऱ्याबाईंकडे जाऊन पोहोचायचा.

"तू आला आहेस का आता सारवासारव करायला ?", कोर्ट सुरू व्हायचं, तुझी हिम्मत कशी झाली इथं यायची ?"

"मी मुद्दाम नाही."

"गप्प बैस ! मी विचारतेय, इथे यायचं धाडस कसं झालं ?"

सवाल जबाबाचा शेवट माफी देऊन समेटानं व्हायचा. तिच्या हाताचं चुंबन घेतलं जायचं आणि न्यायाधीशांच्या खोलीतून बाहेर पडताना "होमरच्या" हसण्यानं नाटक संपायचं. सरदारीण बाई आमच्याशी कधी आपुलकीनं वागल्याच नाहीत. त्या फक्त वयस्क बायकांशी आणि छोट्या मुलांशी बोलतानाच प्रेमळ शब्द उच्चारायच्या.

इतक्या दिवसाच्या सहवासात मी त्यांना हसताना कधी पाह्यलंच नाही. एक वयस्क जनरल दर रविवारी त्यांच्याकडे पिकेट (पत्यातला खेळ) खेळायला यायचा तेव्हा त्या हळू आवाजात आत्मप्रौढीनं सांगायच्या की आम्ही डॉक्टर्स, मॅजिस्ट्रेट, चित्रकार, लेखक त्यांच्या अक्कल हुशारीनं वागलो नसतो ना तर ह्या जगात आमचा टिकाव लागलाच नसता. आम्ही पण त्यांचं म्हणणं कधी खोडून काढलं नाही. आम्ही म्हणायचो मिळू दे त्यांना अज्ञानाचा आनंद. 'हिरव्या भूशिरा'च्या नियमाप्रमाणे सकाळी आठपेक्षा उशिरा कुणी उठायचं नाही आणि रात्री बाराच्यापुढे जागायचं नाही असं होतं. त्याची उजळणी वरचेवर झाली नाही तर बाईंना चैनच पडत नसे. गरीब बापुडी ओल्या अकरालाच झोपून जायची. विरोध करायला मनाईच होती. आम्ही मधून मधून आमच्या व्यक्तिस्वातंत्र्यावर होत असलेल्या ह्या बेकायदा आक्रमणाबद्दल हसत हसत टोमणे मारायचो. मधुनच एखाददिवशी सगळेमिळून त्यांची क्षमा मागायला जायचो ! रशियन कवी 'लोमोनोसव'च्या शैलीत आभारप्रदर्शन काव्य तयार करायचो, सरदार मिकशादझे च्या मर्दुमकीचा परिचय करून देणाऱ्या झाडाचे चित्र काढायचो वगैरे वगैरे. सरदारीणबाईंना हे सगळं खणखणीत नाण्यासारखं वाटायचं आणि आम्ही मात्र त्यांच्या पाठीमागे खदाखदा हसायचो. आम्ही अमीर उमराव घराण्यातले नाही म्हणून त्यांना खेद व्हायचा, उसासे सोडायच्या त्या. आम्हाला मायापण लावायच्या. नित्याच्या सहवासामुळे त्या आम्हाला आपल्या मुलांप्रमाणं मानायच्या... लेफ्टनंट इगरव मात्र त्यांना मुळीच आवडाचा

नाही. मनापासून द्वेष कराच्या त्या त्याचा, एखाद्या हाडवैऱ्यासारख्या वागायच्या. त्याच्या बरोबर आर्थिक व्यवहार होता म्हणून आणि सभ्याचार म्हणून त्यांनी त्याला आमच्यातला एक म्हणून कबूल केलं होतं. पहिल्यापहिल्यांदा तो आवडायचा त्यांना कारण तो देखणा होता, चेष्टा मस्करी करण्यात त्याचा हात कोणी धरू शकत नव्हता, बोलणं मोजकंच पण मुद्देसूद असायचं त्याचं आणि सर्वात महत्त्वाच म्हणजे फौजी मनुष्य होता तो. पण कधीकधी त्याच्या अंगात भुताचा संचार व्हायचा. तो एकाजागी बसून राह्यचा, कपाळावर मुठी आपटायचा एकदम अचकट विचकट बोलायला लागायचा. सगळ्या सगळ्यांबद्दल तक्रार असायची त्याची. त्याच्या तडाख्यातून जिवंतच काय मेलेली माणसं पण सुटायची नाहीत. अशा वेळी सरदारीण आपल्या खोलीतून बाहेर यायची आणि आम्हाला खोलीबाहेर हाकलायची.

एकदिवस जेवणानंतर इगरव डोक्यावर मुठी मारू लागला आणि कॉकेशसमधल्या सरदार दरकदारांवर न भूतो न भविष्यति अशा तऱ्हेने झोड उठवू लागला. त्यानं खिशातून एक 'ड्रॅगन फ्लाय'काढली आणि सरदारणीच्या समक्ष पुढील बातमी वाचून दाखवली "तिफलिस एक सुंदर शहर आहे. ह्या शहराची महती सांगायची झाली तर तिथे सरदार मंडळी रस्ते झाडताना दिसतात आणि विश्रामगृहातून बूट पॉलीश करण्याचं काम करतात." सरदारीण टेबलावरून उठली आणि मुकाट्यानं बाहेर निघून गेली. एक दिवस तिच्या स्मरणवहीत इगरवनं आमच्या नावापुढे आपल्या हस्ताक्षरात आमची आडनावं लिहून ठेवली तेव्हा तर ती त्याच्यावर तुटूनच पडली. तिच्याबद्दलचा हा आकस अपेक्षित नव्हता आणि तो प्रकट करण्याची वेळही योग्य नव्हती असं वाटतं. कारण लेफ्टनंट ओल्याशी लग्न करायची स्वप्न रंगवीत होता आणि ओल्यापण त्याच्या प्रेमात पडली होती. आपल्या स्वप्नाच्या पूर्तीबद्दल आशंका असून देखील ती बघणं सोडून देणं त्याला अशक्यप्राय होतं. ओल्या त्याच्यावर प्रेम करायची पण छपत लपत, चोरून, मनातल्या मनात, घाबरत घाबरत आणि कुणाच्याही लक्षात येणार नाही अशा तऱ्हेने. त्या दोघांच्या बाबतीत असं प्रेम करणं म्हणजे सार्वभौम सत्तेचा मनाई हुकूम जारी झालेली निषिद्ध गोष्ट होती. तिला प्रेम करण्याची परवानगी नव्हती.

***

भाग २

त्या मध्ययुगीन किल्ल्यामध्ये अनेक मध्ययुगीन खुळचट प्रेमप्रकरणांपैकी एक प्रकरण अतिशय गाजलं.

सात वर्षांपूर्वीची सरदार मिकशादूझे हयात असतानाची गोष्ट आहे ही. 'हिरव्या भूशिरात' मिकशादूझेचा प्रिय मित्र, कॅथेरीन राणीच्या काळचा जमीनदार, सरदार चायखिद्झेव पाहुणा म्हणून आला होता. ती एक धनाढ्य आसामी होती. आयुष्यभर त्यानं मज्जाच मज्जा केली, चैन ऐष आरामात, जीवन व्यतीत केलं आणि तरीही आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत तो धनवान, संपन्नच राहिला. मिकशादूझे आणि तो बालपणापासूनचे मित्र होते. मिकशादूझेच्या मदतीने त्याने आपल्या गावाकडून एका तरुण मुलीला पळवून आणली होती. तीच कालांतराने चायखिद्झेवाची पत्नी झाली. ह्या प्रसंगामुळे ह्या दोन सरदारांना मैत्रीच्या बंधनात घट्ट बांधून ठेवलं होतं. ह्या वेळी चायखिद्झेवने आपल्याबरोबर आपल्या मुलाला पण आणलं होतं. हा बटबटीत डोळ्यांचा, निरुंद छातीचा, काळ्या केसांचा मुलगा जिम्नाझियामध्ये शिकत होता. आल्याबरोबर दोन मित्र सलगीने एकमेकाची चेष्टामस्करी करण्यात दंग झाले होते. त्याचा तरुण मुलगा मात्र तेरा वर्षाच्या ओल्याच्या मागेमागे फिरत होता, थट्टा मस्करी करीत प्रियाराधन करीत होता. ते सर्वांच्याच लक्षात आलं. वडीलधाऱ्यांनी मुलांकडे पाहून डोळे मिचकावले. त्या दोघांची जोडी चांगली जमेल असं वाटलं त्यांना. मदिराप्राशन करीत असताना त्या दोन मित्रांनी मुलांना एकमेकांचे चुंबन घ्यायला लावलं आणि दोन सरदार मित्रांनी पण हस्तांदोलन करून एकमेकांचे अभिनंदन केले. मिकशादूझेच्या डोळ्यात आनंदाश्रू तरळले. ''परमेश्वराला हेच मंजूर दिसतंय. तुला मुलगी मिळाली, मला मुलगा, परमेश्वराचीच कृपा !

दोन्ही मुलांना एकएक अंगठी देण्यात आली आणि दोघांचा एक फोटो काढला. हा फोटो खूप दिवस मिकशादूझेंच्या दिवाणखान्यात टांगलेला होता. इगरव मात्र त्या फोटोकडे पाहून बेचैन व्हायचा. पण हा फोटो हेतूपर्वकच टांगण्यात आला होता.

सरदारीण मारियाने भावी युगुलाला मोठ्या ऐटीत आशीर्वाद दिले. मुलांच्या

वडिलांची ही अफलातून कल्पना तिला आवडली. चायखिद्झेव मंडळी जाऊन एक महिना झाला असेल नसेल ओल्याला पोस्टाने त्याच्याकडून एक मौल्यवान वस्तूची भेट आली. अशा तऱ्हेच्या भेटी तिला त्यानंतरही दरवर्षी येत होत्या. तरुण चायखिद्झेव सर्व घटनांकडे जरा जास्तच गंभीरपणे पहात असे. तो कोत्या मनोवृत्तीचा मुलगा होता. दरवर्षी तो 'हिरव्या भूशिरात' यायचा, चांगला आठवडाभर पाहुणचार घ्यायचा. त्याचं बोलणं माफक असायचं पण खोलीत बसून ओल्याला प्रेमपत्र धाडत राह्यचा. ओल्या ती पत्र नीट वाचायची पण नंतर मात्र ती अस्वस्थच व्हायची. ती हुशार असल्यामुळे तिला आश्चर्यच वाटायचं की एवढा मोठा मनुष्य असं मूर्खासारखं कसं लिहू शकतो ! तो मात्र तसली पत्र एकामागून एक पाठवतच राह्यचा. त्यानंतर दोन वर्षांनी मिकशाद्झे मरण पावला. अखेरच्या घडीला ओल्याला जवळ बोलावून तो म्हणाला, "लक्षात ठेव, दुसऱ्या कुठल्या मूर्ख माणसाशी लग्न करू नकोस हं. चायखिद्झेवशीच कर. तो हुशार आहे आणि तुला योग्य असाच मुलगा आहे." चायखिद्झेवची हुशारी ओल्याला चांगलीच कळली होती. पण वडिलांना तिनं विरोध केला नाही. तिनं त्यांना चायखिद्झेवशीच लग्न करायचं वचन दिलं. "ती माझ्या पप्पांची अखेरची इच्छा आहे !" आम्हाला ती मोठ्या अभिमानानं सांगायची. जणू ती एक महत्‌कृत्यच करीत होती. तिला अभिमान वाटायचा की वडील आपल्याबरोबर तिनं दिलेलं वचन कबरीत घेऊन गेले आहेत. तिच्या दृष्टीनं तिने दिलेला शब्द असाधारण आणि अद्भुत होता ! पण निसर्गक्रमाने आणि सारासार विवेकबुद्धीने लगाम आपल्या हातात घेतले. रजेवर असलेल्या लेफ्टनंट इगरवची आणि तिची वरचेवर भेट होऊ लागली. त्याबरोबरच जशी जशी वर्षं जात होती तसं तसं चायखिद्झेव तिला जास्त जास्तच मूर्ख वाटायला लागला.

एक दिवस लेफ्टनंटनं ओल्याला त्याच्या तिच्यावरील प्रेमाचं मोठ्या हिंमतीनच सूतोवाच केलं. पण ह्यापुढे असलं काही न बोलायची तिनं त्याला काकुळतीची विनंती केली. तिनं वडिलांना दिलेल्या वचनाची त्याला आठवण करून दिली. ती सबंध रात्र रडत बसली. सरदारीण दर आठवड्याला चायखिद्झेवला मॉस्कोला पत्र पाठवून त्यानं आपला विद्यापीठातला अभ्यासक्रम लवकरात लवकर पूर्ण करण्याला बजावत होती. "माझ्याकडे उन्हाळ्याच्या सुट्टीत राह्यला येणारे विद्यार्थी तुझ्यासारखी दाढी ठेवत नाहीत पण आपला

अभ्यासक्रम मात्र वेळेवर संपवतात.'' तिनं त्याला लिहिलं होतं. चायखिद्झेवने आज्ञाधारकपणे गुलाबी कागदावर पत्राचे उत्तर पाठवले. दोन पानाच्या त्याच्या पत्रात त्यानं हे समजवण्याचा प्रयत्न केला होता की घालून दिलेल्या वेळेच्या आधी अभ्यासक्रम पूर्ण करणं कुठल्याही परिस्थितीत शक्य होणार नाही त्याला. ओल्यापण त्याला पत्र पाठवत असे. त्याला पाठवलेल्या ह्या पत्रांपेक्षा तिनं मला पाठवलेली पत्र कितीतरी सुंदर असतीलसं वाटतं. सरदारीणबाईंचा आपल्या मुलीवर पूर्ण विश्वास होता की ती चायखिद्झेव शिवाय दुसऱ्या कोणाशीही लग्न करणार नाही. नाहीतर तिनं ओल्याला इकडे तिकडे भटकायची, तिच्या दृष्टीनं 'फालतू' गोष्टीत वेळ घालवायची, आमच्यासारख्या रिकामटेकड्या नास्तिक आणि सरदार घराण्यातील नसलेल्या मुलांच्या संगतीत राहण्याची मोकळीक दिलीच नसती. तरीसुद्धा संशयाला जागा राहू नये यासाठी जरूर तेवढी काळजी ती घ्यायची. ओल्याला सुद्धा असंच वाटायचं की तिनं देखील अधून मधून चायखिद्झेवला पत्र लिहायला हवं.

पण तसं काही झालं नाही. नियोजित वर-वधू च्या वडिलांची इच्छा पूर्ण व्हायच्या आधीच धुळीला मिळाली. चायखिद्झेवचं प्रेमप्रकरण सफल झालं नाही. ह्या प्रकरणाचा शेवट सुखान्तिकेत व्हायचं विधिलिखित होतं.

गेल्या वर्षी चायखिद्झेव 'हिरव्या भूशिरावर' जूनच्या अखेरी अखेरीस आला होता. ह्या वेळी तो साधा शिकाऊ विद्यार्थी नव्हता तर काम करणारा विद्यार्थी होता. सरदारीणबाईंनी दीर्घ आलिंगन देऊन थाटामाटात त्याचं स्वागत केलं आणि त्याचबरोबर लांबच लांब उपदेशपर भाषण पण केलं. ओल्याने नियोजित वराला भेटण्यासाठी म्हणून खास शिवलेले भारी कपडे घातले होते. शहरातून शॅम्पेन आणण्यात आली. वाड्यावर रोषणाई केली होती. दुसऱ्या दिवशी सकाळी 'हिरव्या भूशिर'भर जिकडे तिकडे जूनच्या शेवटाला हे लग्न होणार अशी बातमी पसरली. 'बिचारी ओल्या' ! आम्ही कुजबुजलो. आम्ही नाखूष झाल्यामुळे ह्या टोकापासून त्या टोकापर्यंत फेऱ्या मारत होतो, आम्हाला दु:स्वास वाटणाऱ्या त्या माणसाच्या पूर्वेकडच्या बागेत उघडणाऱ्या खिडक्यांकडे रागारागाने पहात आम्ही पुटपुटलो, ''बिचारी ओल्या !'' चेहऱ्याचा रंग उडालेली, अर्धमेली, उदासवाणी ओल्या बागेत येरझारा घालत होती. आम्ही जेव्हा मित्रत्वाच्या नात्याने तिला सल्ला द्यायचा प्रयत्न केला तेव्हा ती म्हणाली,

''आई बाबांची इच्छा !''

''हो, मग ती मूर्खपणाची असली तरी ! काय अमानुषपणा ! आम्ही जवळजवळ ओरडलोच तिच्यावर. तिने खांदे उडवले आणि आपला दु:खी-कष्टी चेहरा दुसरीकडे वळवला. नियोजित वर आपल्या खोलीत बसून नोकराबरोबर ओल्याला भावनाप्रधान पत्र पाठवतच होता. पण ओल्याशी बोलतानाचा आमचा मनमोकळेपणा आणि धिटाई त्याला खटकली. तो फक्त जेवणापुरता खोलीबाहेर पडायचा. कुणाकडेही न पहाता मुकाट्यानं जेवायचा, विचारलेल्या प्रश्नांना शुष्कपणे उत्तरं द्यायचा. फक्त एकदाच त्यानं विनोद सांगायची हिंमत केली. पण तो पण फुसका, सगळ्यांना माहीत असलेलाच निघाला. जेवणानंतर सरदारीणबाई. त्याला आपल्याजवळ बसवून घ्यायची. आणि पत्त्यातला 'पिकेट' नावाचा खेळ शिकवायची. चायखिदूझेव गंभीरपणे खेळत असे, विचार करून चाल चालायचा , खालचा ओठ चावायचा आणि नुसता घामघूम व्हायचा. पिकेट खेळण्यातली त्याची ती एकाग्रता सरदारीणबाईला भावायची... एक दिवस जेवणानंतर चायखिदूझेव पिकेटच्या बैठकीतून निसटला आणि त्याने बागेत असलेल्या ओल्याकडे धाव घेतली.

''ओल्या आंद्रेयेवना !'' त्यानं सुरवात केली, ''मला माहीत आहे तुझं माझ्यावर प्रेम नाहीये. आपलं वडीलधाऱ्यांनी ठरवलेलं लग्न खरच अत्यंत मूर्खपणाचं आहे. पण मला आशा आहे की तू पण माझ्यावर प्रेम करायला लागशील.'' तो हे कसंबसं म्हणाला, गोंधळलाच जरासा पण तसाच तडक आपल्या खोलीत निघून गेला.

. लेफ्टनंट इगरव आपल्या स्वत:च्या वाडीत बसून राहिला होता. तो कुणालाही कुठे बाहेर दिसला नाही. चायखिदूझेववर बाजी उलटवणं त्याला काही जमत नव्हतं.

चायखिदूझेवच्या 'हिरव्या भूशिरा' वरच्या आगमनानंतरच्या पुढच्या रविवारी असेल बहुतेक म्हणजे पाच जुलैला भल्या पहाटे आमच्या विद्यार्थ्यांच्या कक्षेत सरदारीणबाईंचा पुतण्या असलेला विद्यार्थी येऊन धडकला आणि त्याने आम्हाला सरदारीणबाईंचे एक आज्ञापत्र दिले. त्याचा सारांश असा होता. संध्याकाळच्या मेजवानीच्या वेळी आम्ही सर्वांनी शिस्तशीर वागावे; संपूर्ण काळे कपडे, पांढरा नेकटाय, हातमोजे घालणं जरूरीचं आहे; सभ्यतेने,

समंजसपणे, नम्रतेने वागावे; विचारलेल्या प्रश्नांना हजरजबाबीपणाने उत्तरे द्यावीत; एखाद्या पाळीव कुत्र्याप्रमाणे गडबड, गोंधळ न घालता वागण्याचा प्रयत्न करावा. आपल्या खोल्या नीटनेटक्या स्वच्छ ठेवाव्या. 'हिरव्या भूशिरात' सर्व गोष्टी शिस्तबद्ध दिसायला हव्यात.

शहरातून शँम्पेन, वोडका आणि त्याच्या बरोबर खायचे फराळाचे पदार्थ आणले गेले. आमच्या सेवकांना स्वयंपाकघरात कामाला लावण्यात आले. जेवणानंतर पाहुणेमंडळी यायला जी सुरवात झाली, ती संध्याकाळी उशिरापर्यंत येतच होती. सर्वांचा समुद्रावर बोटीतून फेरफटका झाल्यानंतर आठ वाजता बॉल डान्सला सुरवात होणार होती.

बॉल डान्सची वेळ होईपर्यंत आमच्या कंपूची एक सभा झाली. त्यात आम्ही सर्वांनी एकमताने निर्णय घेतला, कोणत्याही परिस्थितीत ओल्याला चायखिद्झेवपासून दूर न्यायचं. मग आमच्यावर कितीही मोठं बालंट आलं तरी हरकत नाही. सभा संपल्यावर मी लेफ्टनंट इगरवचा शोध घेण्याच्या कामावर तातडीनं निघालो. तो हिरव्या भूशिरापासून वीस कोसावर त्याच्या वाडीवर रहात होता. मी तीरासारखा सुटलो आणि गाठलं त्याला. पण कशा अवस्थेत ! पिऊन तर्र आणि मेल्यासारखा पडला होता तो. मी त्याला परिस्थितीची जाणीव करून दिली. अंघोळ करायला लावली, नीटनेटके कपडे घालायला लावले आणि त्याला चढलेली नशा, त्याची शिवीगाळ आरडा ओरडा त्या सर्वांकडे काना डोळा करत मी त्याला हिरव्या भूशिरावर घेऊन गेलो.

दहा वाजता बॉल डान्स टिपेला पोहोचला होता. चार खोल्यांत दोन पियानोंच्या साथ संगतीत मंडळी नाचत होती. मध्यंतरानंतर बागेतल्या छोट्याशा टेकाडावर तिसरा पियानो वाजू लागला. आम्ही केलेल्या रोषणाईवर खुद्द सरदारीण देखील बेहद्द खूष झाली होती. आम्ही बागेत, किनाऱ्यावर आणि दूर समुद्रात उभ्या असलेल्या होड्यांवर दिव्यांची रोषणाई केली होती. किल्ल्याच्या छतावर बंगाली दिवे एक आड एक उघडत मिटत होते. त्यांनी सगळं भूशिर प्रकाशित केलं होतं. दोन दोन बुफेमध्ये मद्य प्राशनाची सोय केलेली होती. एक बागेतल्या एका पर्णकुटीत होतं नि दुसरं घरात. आजची उत्सवमूर्ती अर्थातच चायखिद्झेवच होता. आबरा गोबरा, लाल चेहरा, घामेजलेलं नाक, घट्ट तंग टेलकोट घातलेला तो ओल्याबरोबर नाचाची पावलं टाकत होता. खिन्नपणे हसत होता. तो जरा

अवघडल्यासारखाच वाटत होता. तो आपल्या "पा" च्या ठेक्यावर नाचत होता. आपण उल्हसित दिसावं असा त्याचा प्रयत्न होता. पण जोश म्हणून काही चढत नव्हता त्याच्यात. दरम्यान ओल्या मला म्हणाली की आजच्या या संध्येत मला ह्या सरदारपुत्राची कीवच येतेय. तिला तो बिच्चारा, बापुडवाणाच वाटत होता. त्याला जणू काही आशंका होती की ज्या मुलीविषयी वर्गात पाठ चालू असताना, झोपताना, जागं झाल्याबरोबर तो स्वप्न रंगवत असायचा त्या त्याच्या भावी वधूला कोणीतरी त्याच्यापासून दूर नेणारच. त्याच्या डोळ्यातून करुणा ओसंडत होती. त्याला आम्ही सर्वजण, धटिंगण, निष्ठूर, गारुडी आहोत अशी जबर शंका असावी.

तयार ठेवलेल्या मद्याच्या उंच पेल्यावरून आणि सरदारीणबाईंच्या घड्याळाकडे पहाण्यावरून आम्ही तर्क केला की समारंभाची नियोजित घटिका जवळ येऊन ठेपली आहे. बरोबर बारा वाजता चायखिद्झेवला ओल्याचे चुंबन घेण्याची विनंती करण्यात येणार होती. आम्हाला कामाला लागायला हवं होतं. साडे अकरा वाजता मी चेहरा फटफटित दिसावा म्हणून तोंडाला पावडर फासली, नेकटाय सैल केला, काळजी वाटत असल्यासारखा गंभीर लांबट चेहरा करून, केस फिसकारून ओल्याकडे गेलो.

"ओल्या," तिचा हात पकडून मी तिला म्हणालो, "देव तुझं रक्षण करो !"

"काय झालं ?"

"देव आहे आपल्या पाठीशी. तू काही घाबरू नकोस ओल्या...दुसरं काय होणार ? हे असं होणारच हे धरूनच चालायला हवं होत."

"असं झालंय तरी काय ?"

"तू घाबरू नकोस ग...त्याचं काय आहे...बाई ग ! इगरव...

"त्याला काय झालंय ?"

"तो मरणार बहुतेक..."

"ओल्याचा चेहरा खरकन उतरला. तिनं आपल्या व्याकुळलेल्या, विश्वासू नजरेनं माझ्याकडे सहानुभूतीनं पाह्यलं..."

"इगरव मरायला टेकलाय..."

ओल्या थरथर कापायला लागली, ती आपल्या पांढऱ्या फटफटीत

कपाळावरून बोटं फिरवू लागली.

"मला अपेक्षित होतं. अगदी तसंच झालं", मी म्हटलं, "तो मरणार... त्याला वाचव, ओल्या !" ओल्यानं माझा हात पकडला.

"तो...तो...कुठंय ?"

"इथं बागेत. पर्ण कुटीत आहे तो. माझ्या लाडके, फारच भयंकर अवस्था आहे त्याची पण...इथे लोक आपल्याकडे पहाताहेत. चल गच्चीवर जाऊ या आपण...तो तुला दोष देत नाहीये...त्याला माहीत होतं की तुझं त्याच्यावर...

"काय, काय झालंय त्याला ?"

"त्याची प्रकृती खूप खूप खालावलीय !"

"चला जाऊ या... मी भेटून येते त्याला...माझी अशी मुळीच इच्छा नाहीये की माझ्यामुळे...माझ्यामुळे...

आम्ही गच्चीवर पोहोचलो. ओल्या भीतीने गर्भगळीत झाली होती. मी पण डोळे पुसल्याचं नाटक केलं...आमच्या जवळून गच्चीवरून आमच्याच कंपूतील मंडळी चेहरे पाडून, घाबरल्याचा आव आणून उगीचच इकडून तिकडे धावपळ करीत येरझारा घालत होती. त्यांचे चेहरे भयभीत झालेले, काळजीग्रस्त असेच वाटत होते.

"रक्त थांबलंय आता"...आमच्यातल्या पी.टी. मास्तरानं माझ्या कानात ओल्याला ऐकू जाईल अशी खबरदारी घेऊन दबक्या आवाजात सांगितलं.

"चला जाऊ या आपण," माझा हात पकडत ओल्या पुटपुटली.

आम्ही गच्चीवरून खाली आलो. उन्हाळ्यातली शांत पण चहुकडे प्रकाश पसरलेली अशी रात्र होती ती. पियानोचे सूर, मोठ्या झाडांच्या पानांची सळसळ, टोळांची फडफड कानाला सुखावत होती. खाली समुद्राची गाज कानावर पडत होती.

ओल्या कशीबशी चालत होती. तिच्या पायातली ताकद गेली होती आणि ते तिच्या जड, लांब पोशाखात लडखडत होते. ती कापत होती नुसती. भीती वाटल्यामुळे तिनं माझा दंड गच्च पकडला होता.

"माझा काही दोष नाहीये..." ती पुटपुटली. शपथ घेऊन सांगते मी गुन्हेगार नाहीये. पपांना तसं बरोबर वाटलं म्हणून...त्याला हे कळायला हवं होतं...बरा नाही होणार तो ?"

''काही माहीत नाही. मिखाइलनं आटोकाट प्रयत्न केले आहेत. तो चांगला हुशार डॉक्टर आहे आणि इगरवचा पण दोस्त आहे तो...आपण इगरवकडे जायलाच हवं ओल्या...

''मी, मला काही भयानक दृश्य नाही ना पहायला लागणार ? मला भीती वाटतेय...मी नाही पाहू शकत हो...त्याच्या डोक्यात हे काय खूळ शिरलं ?''

ओल्याच्या डोळ्यातून घळाघळा अश्रू वाहायला लागले.

''मी काहीच अपराध केला नाहीये. त्याला हे कळायलाच हवं होतं. मी त्याला सगळ्या गोष्टींचा खुलासा करते आता.''

आम्ही पर्णकुटीजवळ येऊन पोहोचलो.

''इथे आहे तो'', मी म्हटलं.

ओल्यानं डोळे घट्ट मिटून घेतले आणि दोन्ही हातानं मला पकडून धरलं.

''मला नाही सहन...काय करू मी...''

''भिऊ नकोस...इगरव, तू जिवंत आहेस ना अजून बाबा ?'', पर्णकुटीकडे तोंड करून मी ओरडलो.

''हो, अजून तरी आहे...काय झालं ?''

विस्फारलेल्या केसाचा, खूप मद्यपान केल्यामुळे चेहरा उतरलेला कोटाची बटणं न लावलेला, चेहऱ्यावर चंद्रप्रकाश पडलेला लेफ्टनंट इगरव पर्णकुटीच्या तोंडाशीच बसला होता...

''काय झालं ?'', त्यानं परत तोच प्रश्न केला.

ओल्यानं मान वर करून इगरवकडे...तिनं एकदा माझ्याकडे एकदा इगरवकडे, परत माझ्याकडे पाह्यलं...मला हसू फुटलं...तिचा चेहरा उजळला, ती आनंदानं जवळजवळ ओरडलीच. तिनं एक पाऊल पुढे टाकलं, मला वाटलं ती आमच्यावर रागावेल...पण ह्या मुलीला रागावता येतच नव्हतं. तिनं आणखी एक पाऊल पुढे टाकलं, थोडा विचार केला आणि इगरवकडे धाव घेतली. इगरवनं घाईघाईनं कोटाची बटणं लावली आणि आवेशानं हात पसरले. ओल्या त्याच्या छातीवर विसावली. इगरव खुशीत येऊन हसला. ओल्याच्या तोंडावर श्वासोच्छ्वास होऊ नये म्हणून त्याने आपले तोंड बाजूला केले आणि उगीचच काहीतरी निरर्थक पुटपुटला.

''तुझं काहीच बरोबर नाहीये...माझा ह्यात मुळीच दोष नाहीये. मम्मी-

पप्पांना जे योग्य वाटलं तेच त्यांनी ठरवलं. इतकंच.''

मी त्यांच्याकडे पाठ केली आणि लगबगीनं रोषणाई केलेल्या किल्ल्याकडे जायला लागलो.

किल्ल्यात त्यावेळी सर्व पाहुणे मंडळी वधूवरांचं अभिष्टचिंतन करण्याच्या तयारीत अस्वस्थपणे घड्याळाकडे पहात होती. पडवीत सेवक मंडळी बाटल्या आणि चषक ट्रेमध्ये ठेवून तयारीत उभी होती. चायखिद्झेव अस्वस्थ होऊन हात चोळत ओल्याला शोधत होता. सरदारीणबाई मुलीला शोधण्यासाठी सर्व खोल्यातून फिरत होती कारण तिला समारंभात ओल्याला कसं वागायचं, आईच्या प्रश्नाला कशी उत्तर द्यायची त्यासंबंधी सूचना द्यायच्या होत्या...आमचं टोळकं एकमेकांकडे पाहून गालातल्या गालात हसत होतं.

''ओल्या कुठेय, तुला माहीत आहे का ?'', सरदारीणबाईंनी मला विचारलं.

''नाही बुवा, मला नाही माहीत.''

''जा, शोध तिला.''

मी बागेत गेलो. हात पाठीमागे घेऊन घराभोवती दोन फेऱ्या मारल्या. आमचा चित्रकार बिगुल वाजवत होता. त्याचा अर्थ होता, ''पकडून ठेव, सोडू नकोस'' इगरव पर्णकुटीतून घुबडासारखा आवाज काढून उत्तर देत होता ''ठीक आहे, ठेवतो पकडून !''

थोडा वेळ इकडे तिकडे फिरल्यावर मी घरात गेलो. हुजऱ्यांनी ट्रे टेबलावर तयार ठेवले होते पण काहीच काम नसल्यामुळे ते पाहुणे मंडळींकडे पहात रेंगाळत उभे होते. पाहुणे मंडळी द्विधा मनःस्थितीत घड्याळाकडे पहात होती सारखी. मोठा काटा केव्हाच तीनवर पोहोचला होता. पियानोचा आवाज बंद पडला होता. सगळ्या खोल्यांमधून एकप्रकारची चिंताजनक, गूढ, निःशब्द शांतता पसरली होती.

''कुठेय ओल्या !'', रागानं लालबुंद झालेल्या सरदारीणबाईंनी मला विचारलं.

''मला नाही माहीत...बागेत तर काही दिसत नाही.''

''तिला माहीत का नाहीये की शुभवेळ केव्हाच टळून गेली ते ?'' माझी बाही पकडत तिनं दरडावून विचारलं.

मी खांदे उडवले. माझ्यापासून पुढे जाऊन त्या चायखिद्झेवच्या कानात हळूहळू काहीतरी बोलल्या. चायखिद्झेवने पण खांदे उडवले. त्यांनी त्याची बाही पकडून धरली.

"मूर्ख कुठली !", ती कुरकुरली आणि घरभर धावत सुटली.

नोकर चाकर, मोलकरीण, जिम्नेझियात शिकणारे विद्यार्थी, सरदारीण बाईंचे नातेवाईक सर्वजणच आरडा ओरड करीत जिन्यावरून उतरून बगीच्यात दूरपर्यंत बेपत्ता वधूच्या शोधात नुसती पळत सुटली. मी पण बागेत गेलो. मला इगरव ओल्याला पकडून ठेवू शकतो की नाही याबद्दल शंका होती. सर्व खटाटोप व्यर्थ जाण्याची भीती होती. मी पर्णकुटीचा रस्ता धरला. विनाकारणच भ्यायलो होतो. ओल्या इगरवच्या जवळ बसली होती. आपली बोटं त्याच्या डोळ्यापुढे धरून गुजगोष्टी चालल्या होत्या तिच्या. मग इगरव बडबडू लागला. सरदारीणबाई ज्याला "कारस्थान" म्हणायच्या ते तिला सांगायचा तो प्रयत्न करीत होता... आपला प्रत्येक शब्द तो चुंबनानी गोड करीत होता. बोलताना सेकंदासेकंदाला चुंबन घेण्यासाठी पुढे वाकायचा आणि ओल्याला मद्याच्या वासाचा त्रास होऊ नये म्हणून लागलीच तोंड दुसरीकडे फिरवायचा. दोघंही प्रेमालापात रंगून गेली होती. अगदी आकंठ सुखात होती. असं वाटत होतं की भोवतालच्या जगाशी त्यांना काही देणं घेणं नाहीये आणि वेळेचंही भान राह्यलं नाहीये. मी पण पर्णकुटीच्या दाराशी क्षणभर उभा राह्यलो. आनंदानं हुरळून गेलो होतो मी. त्यांच्या एकतानतेचा भंग न करता मी किल्ल्याकडे जाऊ लागलो.

सरदारणीला चक्कर आली. तिनं अमोनिया हुंगला. नाना तऱ्हेच्या तर्क वितर्क, शंका, कयास अशा सर्वांनी तिला घेरलं. तिचा स्वत:वर ताबा राह्यला नाही. ती कोणावरतरी चिडत होती, रागावत होती. आलेल्या पाहुण्यांना, प्रत्यक्ष वराला, अवघडल्यासारखं वाटावं असं वागत होती ती. ती कधी नोकरांच्या अंगाला हात लावत नसे. पण राजकुमारी कुठेच सापडत नाही अशी बातमी द्यायला आलेल्या मोलकरणीला तिनं चक्क ढकललं. शँपेन पिण्यासाठी आणि अभिनंदन करण्यासाठी उतावळी झालेली पाहुणेमंडळी हसत हसत कुचाळक्या करू लागली होती. त्यांनी पुन्हा नाच सुरू केला.

एक तास उलटून गेला. ओल्याचा थांगपत्ता लागेना. सरदारणीच्या अंगाचा तिळपापड झाला नुसता.

"ही सगळी तुमचीच मखलाशी आहे !", आमच्यापैकी कुणीही तिच्या जवळून जायला लागला की ती फुसकारायची. "तिची चांगलीच खरडपट्टी काढते आल्यावर. कुठेय ती ?" ओल्याचा ठावठिकाणा सांगणारा, तिचा संकटहारी शेवटी एकदाचा अवतरला...तो दुसरा तिसरा कुणी नव्हता तर बुटका, ढेरपोट्या, पुतण्या होता सरदारीण बाईंचा. तो पिसाटासारखा बागेतून पळत पळत थेट सरदारीणबाईंपर्यंत पोहोचला...त्यानं गुडघ्यावर वाकून आदर व्यक्त केला आणि तिच्या कानात कुजबुजला...सरदारीणबाईंचा चेहरा खाडकन उतरला. तिनं आपला ओठ रक्त येईपर्यंत कचकन् चावला.

"पर्णकुटीत ?", तिनं विचारलं.

"हो."

सरदारीण उठून उभी राहिली. तिनं कसलेल्या राजकारणी पुरुषासारखं तोंडवर हसू आणलं आणि पाहुणेमंडळींना निवेदन केलं की ओल्याचं डोकं दुखतंय. तिनं आपणा सर्वांची क्षमा मागितली आहे. पाहुण्यांनी खेद व्यक्त केला आणि ते आपापल्या घरी निघून गेले.

दोन वाजेपर्यंत इगरवने ओल्याला उत्कटपणे बाहुपाशात पकडून ठेवले होते. दोन वाजता मी गच्चीच्या प्रवेशद्वारापाशी ओलीआंडरच्या झाडांच्या भिंतीमागे ओल्याच्या परत येण्याची वाट पहात उभा होतो. मला ओल्याचा ह्या क्षणीचा चेहरा पाहण्याची इच्छा होती. स्त्रियांचे समाधानी, आनंदी चेहरे न्याहाळायला मला फार आवडतं. इगरव संबंधीची प्रेमभावना आणि आईचं भय ह्या दोन्ही गोष्टी एकाचवेळी एकाच चेहऱ्यावर टिपायची माझी इच्छा होती. प्रेम की भय ? कोणतं पारडं जड ? मला ओलीआंडरचा वास फार काळ घेत बसायची पाळी आली नाही. मी माझ्या तीक्ष्ण नजरेनं तिच्या चेहऱ्यावरचे भाव अधीरतेने टिपले. तिने आपला पोशाख किंचित वर उचलून धरल्यामुळे हळू हळू चालताना तिचे छोटे छोटे बूट डोकावत होते. चंद्रप्रकाश आणि झाडावरची रोशणाई दोन्हीमुळे तिचा चेहरा उजळत होता. दिव्यांच्या झगझगाटाने चांदण्याला फिकं पाडलं होतं. तिचा चेहरा गंभीर, उतरलेला दिसत होता. नजर विचारमग्नतेमुळे जमिनीकडे झुकली होती. कठीण समस्या सोडवताना सहसा डोळे असे दिसतात. ओल्याने जेव्हा पहिल्या पायरीवर पाय ठेवले तेव्हा ती गोंधळल्यासारखी, विचलित झाल्यासारखी वाटली. तिला एकदम आईची

आठवण झाली असावी. आपली विस्कटलेली केशरचना तिनं हलक्या हातानं ठीकठाक केली. द्विधा मन:स्थितीत पहिल्या पायरीवरच ती थोडावेळ थबकली, मानेला हलकासा झटका दिला आणि मनाचा हिय्या करून ती दाराकडे जाऊ लागली...तिथं काय काय घडले असेल, काय वाढून ठेवलं असेल ह्याचं चित्र माझ्या डोळ्यासमोर उभं राह्यलं...दार किलकिलं होताच ओल्याच्या चेहऱ्यावर लख्ख प्रकाश पडला. तिचा थरकाप झाला. तिनं एक पाऊल पाठीमागे घेतलं आणि हळूच बसकण मारली...थिजूनच गेली होती ती अगदी...उंबरठ्याशीच तिची वाट पहात उभ्या असलेल्या, लालबुंद चेहऱ्याच्या, रागाने आणि शरमेने थरथरणाऱ्या सरदारीणबाईंनी मान वर केली...क्षण दोन क्षण नि:स्तब्धतेत गेले.

"सरदाराची मुलगी", सरदारीणबाई म्हणाल्या, आणि "सरदाराचीच वाग्‌दत्त वधू तू. एका लेफ्टनंटला भेटायला गेली होतीस ? घाणेरडी मुलगी कुठली !"

ओल्याने सपशेल शरणागती पत्करून, अंग अकसून घेऊन सापाच्या सरपटत्या चालीने आईला ओलांडून आपल्या खोलीकडे धाव घेतली. ती मग रात्रभर आपल्या बिछान्यावर भयभित आणि दु:खित अंत:करणाने खिडकीकडे एक टक पहात बसून राहिली होती.

रात्री तीन वाजता आम्ही सर्वजण पुन्हा एकत्र जमलो. नशिबाने इगरवला हात दिल्यामुळे आमचा उत्साह द्विगुणित झाला होता. त्याच सभेत आम्ही आमच्या खारकवच्या वकील मित्राची लवाद म्हणून चायखिद्‌झेवकडे पाठवणी केली. सरदार चायखिद्‌झेव अजून जागाच होता. आमच्या वकिलाने आपुलकीने चायखिद्‌झेवच्या झालेल्या गैरसोईबद्दल आणि त्याला पडलेल्या पेचाबद्दल त्याची समजूत घालायचा प्रयत्न केला. त्यानं त्याला विनवलं की त्याच्यासारख्या सुसंस्कृत सुशिक्षित सरदारानं त्याच्यावर ओढवलेल्या ह्या संकटावर मात करावी आणि आमच्या लुडबुडीबद्दल आम्हाला एकाद्या सद्‌गृहस्थाप्रमाणं मित्रत्वाच्या नात्यानं क्षमा करावी. चायखिद्‌झेव वकिलाला म्हणाला की त्याला ह्या सगळ्या गोष्टींची पूर्ण कल्पना होती. तिच्या वडिलांच्या अंतिम इच्छेला त्याच्या दृष्टीनं काहीच महत्त्व नाहीये. पण ओल्यावर मनापासून प्रेम आहे म्हणून त्यानं एवढा हट्ट धरला होता...त्याने वकिलाशी स्नेहभावपूर्ण हस्तांदोलन केले आणि दुसऱ्या दिवशी तिथून निघून जायचे आश्वासन पण दिले.

दुसऱ्या दिवशी सकाळी ओल्या चहाच्या टेबालवर आली तेव्हा तिचा चेहरा भकास, निर्विकार आणि पुढे वाढून ठेवलेल्या संकटाचा अंदाज असल्याने निराश दिसत होता. तिला भय वाटत होतं आणि त्याचबरोबर शरम पण वाटत होती...आम्हाला दिवाणखान्यात पाहिल्यावर मात्र तिची कळी एकदम खुलली. आम्ही सर्वच्या सर्वजण सरदारीणबाईसमोर उभे राहून मोठमोठ्यानं वाद घालत होतो. सगळेजण एकाच वेळी बोलत होतो. आम्ही आमचे मुखवटे उतरवले आणि राणीसाहेबांना आमच्या कटाशी सहमत करून घेण्याचा अटोकाट प्रयत्न करू लागलो. ज्या तऱ्हेने आम्ही ओल्याला फशी पाडलं त्याच पद्धतीनं स्त्रीच्या स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाची महती आम्ही त्यांना सांगितली आणि आपला सहचर निवडीच्या स्त्रीच्या स्वातंत्र्याबद्दलची कायदेशीर बाजूपण समजावून सांगितली. सरदारणीबाईंनी खिन्नपणे आमचं म्हणणं शांतपणे ऐकून घेतलं आणि मग त्यांनी इगरवनं त्यांना धाडलेले पत्र वाचून दाखवलं. त्या पत्राची जुळवणी आमच्याच मंडळींनी केली होती. त्या पत्रात "लहान तोंडी मोठा घास घेतल्यामुळे", "अननुभवामुळे" "तुमच्या आशीर्वादामुळे" वगैरे वगैरे शब्दांची जागोजागी पेरणी केली होती. आमचं बोलणं सरदारीणबाईंनी लक्षपूर्वक ऐकून घेतलं. तसंच इगरवचं लांबच लांब पत्र शेवटपर्यंत वाचून काढलं आणि म्हणाली, "दुधपित्या तुमच्यासारख्या बच्चांनी मला म्हातारीला अक्कल शिकवायची मला जरूरी वाटतं नाहीये. मला जे योग्य वाटतं तेच मी करणार. चहा प्या आणि दुसऱ्या कुणाचं तरी डोकं उठवायला निघून जा इथून. माझ्यासारख्या म्हातारीकडं तुमच्यासारख्यांनी राहणं योग्य नाही...तुम्ही हुश्शार माणसं आहात आणि मी तर दुष्ट, वाईट म्हातारी...देव तुमचे रक्षण करो...मी जन्मोजन्मी तुमची उतराई होईन !"

अशा तऱ्हेनं सरदारीण बाईंनी आमची हकालपट्टी केली. आम्ही त्यांना आभारप्रदर्शक पत्र सादर केलं, त्यांच्या हाताचं आदारानं चुंबन घेतलं आणि जड अंत:करणानं त्याच दिवशी इगरवच्या बंगलीवर राह्यला गेलो. चायखिद्झेव पण आमच्या बरोबरच बाहेर पडला. इगरवकडे राहण्यात आमची दोन उद्दिष्टे होती. ओल्याला धीर देऊन तिचा कंटाळा घालवायचा आणि इगरवला शांत करायचं. आम्ही त्याच्याकडे जवळ जवळ दोन आठवडे राह्यलो. तिसऱ्या आठवड्यात आमच्या जमीनदार वकील मित्राला सरदारणीकडून एक पत्र आले.

त्यात तिने त्याला काहीतरी दस्तऐवज करण्यासाठी 'हिरव्या भूशिरावर' बोलावलं होतं. आमचा हा कायदेतज्ज्ञ तिच्या विनंतीला मान देऊन तिच्याकडे गेला. तो गेल्यानंतर दोन एक दिवसांनी आम्हीपण जणू त्याचा शोध घेण्यासाठी तिकडे गेलो. हिरव्या भूशिरावर आम्ही जेवणाआधी पोहोचलो. आम्ही एकदम घरात नाही शिरलो. खिडकीकडे पहात बागेतच रेंगाळत बसलो. सरदारीणबाईंनी आम्हाला खिडकीतून पाह्यलं.

"कोण आहे बाहेर ? तुम्ही आला का परत ?", त्या कडाडल्या.

"हो आम्हीच आहोत."

"काही काम आहे का तुमचं इथं ?"

"आम्ही आमच्या मित्राला शोधायला आलो होतो."

"हा जमीनदाराचा मुलगा तुमच्या सारख्या उडाण टप्पू बरोबर कधीच नव्हता. तो कागदपत्र लिहितोय."

आम्ही टोप्या काढल्या आणि खिडकीजवळ गेलो.

"बाईसाहेब, तुम्ही कशा आहात ?" मी विचारले.

"बाहेरूनच कशाला चमचेगिरी करताय ?" त्या म्हणाला, "या, आत या."

आम्ही खोलीत जाऊन नम्रपणे खुर्च्यांवर बसलो. आमच्या सहवासाला कंटाळून चिडलेल्या सरदारीणबाईंना आमचा हा नम्रपणा भावला. तिनं आम्हाला जेवायला थांबवून घेतलं. जेवताना आमच्यातल्या एकाच्या हातून चमचा खाली पडला. मग काय तिनं त्याला धारेवर धरलं आणि आमचीपण कानउघडणी केली की जेवायच्या टेबलावर कसं वागावं. जेवणाच्या वेळची शिस्त म्हणजे काय ते आम्हाला मुळी कळतच नाही. मग आम्ही ओल्याबरोबर फेरपटका मारला. रात्री आणि दुसऱ्या दिवशीपण तिथेच होतो. असं करत करत सप्टेंबर उजाडेपर्यंत 'हिरव्या भूशिरा"वरच मुक्काम ठोकला आम्ही. आमच्यातील समेटामुळं शांतीचं राज्य पसरलं होतं.

काल मला इगरवचं पत्र आलंय. तो लिहितोय की हिवाळाभर तो सरदारीणबाईंपुढे गोंडा घोळत राह्यला आणि त्यांच्या रागाचं अखेर दोस्तीत रूपांतर झालं. त्यांनी शब्द दिलाय की उन्हाळ्यात त्या दोघांचं ओल्याचं आणि त्याचं लग्न होईल म्हणून.

थोड्याच दिवसांनी मलाही नक्कीच दोन पत्र यायला हवीत. एक कडक शब्दातलं, कायदाप्रिय सरदारीणबाईंकडून आणि दुसरं मोठंच मोठं, आनंद ओसंडून वाहणारं, नवनवीन योजनांनी भरलेलं ओल्याचं. मे महिन्यात मी 'हिरव्या भूशिरावर' परत जाईन.

●●

(१८८२)



टीपा

गवतातील नाकतोडी

* दाचा (पान २८) : शहरापासून थोडं दूर, हवा पालटण्यासाठी बांधलेलं घरकुल.

* समवार (पान २९) : चहा गरम राहण्यासाठी मुद्दाम तयार केलेले पात्र.

अरिआदना

* अरिआदना (पान ६१) : ग्रीक सौंदर्य देवता.

गूस्बेरी

* जिम्नझिया (पान १२०) : रशियन झारच्या काळात सरदार, जमीनदार वगैरे उच्चभ्रू नागरिकांच्या पाल्यांसाठी शास्त्रीय शिक्षण देणाऱ्या शासकीय शाळा. तिथे ग्रीक, लॅटीन सारख्या प्राचीन भाषा शिकवल्या जात.

जन्मस्थानाच्या कुशीत

* वेरच्का (पान १०५) : वेराच लाडकं संक्षिप्त रुप.

* रशियन भाषेत विशेषनामाचे जवळच्या आप्तेष्टांनी ठेवलेले लाडके टोपणनाव वापरण्याचा प्रघात आहे.

उदा. - मूळओसिप - ओस्का (पान ५३)

मूळ नाव : वेरा - वेरच्का (पान १०५)

मूळ नाव : ओल्गा - ओल्या (पान १०९)

त्याचप्रमाणे व्यक्तिच्या आदरार्थी संबोधनात व्यक्तिचे नाव आणि त्यापुढे अमुक नावाच्या व्यक्तिचा मुलगा किंवा मुलगी असा उल्लेख करण्याचा प्रघात आहे.

उदा. - पावेल : व्यक्तिचे नाव

इवानिच : (इवानचा मुलगा)-पावेल इवानिच असे संबोधतात.

ओल्गा : स्त्रीचे नाव.

इवानवना : इवानची मुलगी - ओल्गा इवानवना.

अन्तोन पावलविच.

* ओल्या (पान १९१) : ओल्गा ह्या विशेषनामाचे लाडिक टोपणनाव.

●●



प्राध्यापिका **सौ. सुमती कानिटकर** यांचा जन्म २६.५.१९२७ रोजी खानदेशातील चाळीसगाव येथे सहस्रबुद्धे घराण्यात झाला.

प्राथमिक व माध्यमिक शिक्षण चाळीसगाव येथे झाले. येथील आनंदीबाई बंकट हायस्कूलमधून १९४५ साली मॅट्रिकची परीक्षा दिली. १९४८ साली ना. दा. ठाकरसी विद्यापीठातून G. A. ही पदवी संपादन केली.

१९५० साली पुणे येथील शिक्षणतज्ज्ञ कै. प्रो. शंकर रामचंद्र कानिटकर यांचे चिरंजीव माधव शंकर कानिटकर (B. E. Civil) यांच्याशी विवाह झाला.

१९५५ साली राष्ट्रभाषा सभेची राष्ट्रभाषा प्रवीण उत्तीर्ण.

१९५८ ते १९६१ ही चार वर्षे हिमाचल प्रदेशातील मंडी येथे वास्तव्य असताना समाज कल्याण मंडळाच्या मंडी जिल्ह्याच्या मानद कार्याध्यक्ष म्हणून काम केले.

१९६१ ते १९६३ बराऊनी (बिहार) येथील मुक्कामात रशियन पेट्रोकेमिकल शास्त्रज्ञांच्या १०० कुटुंबांबरोबर राहण्याची संधी मिळाली. तिथेच रशियन भाषेच्या अभ्यासास प्रारंभ. १९६४ च्या मे-जून महिन्यात मॉस्को येथील रशियन भाषेच्या प्राध्यापिका नतालिया गुसेवा पोयवेन्का यांनी पुणे येथे घेतलेला रशियन भाषेचा इन्टेन्सिव कोर्स पूर्ण केला.

१९६५ ते १९७४ या काळात पुणे विद्यापीठातील परकीय भाषा विभागात जर्मन व फ्रेंच भाषेप्रमाणेच रशियन भाषेचा एम्. ए. पर्यंतचा अभ्यासक्रम चालू होण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले. पुणे विद्यापीठातील लोअर डिप्लोमा इन रशियन लँग्वेज (मे १९६६), डिप्लोमा इन रशियन लिटरेचर (नोव्हेंबर १९७१) आणि

१९७४ साली एम्. ए. (रशियन) पहिल्या वर्गात उत्तीर्ण.

पुणे विद्यापीठात शिकत असताना भारत-सोविएत सांस्कृतिक मंडळाच्या पुणे शाखेतर्फे चालणाऱ्या रशियन भाषावर्गात ४ वर्षे अध्यापनाचे काम केले.

१९७४ ते १९७८ या काळात पुणे विद्यापीठात रशियन भाषा व वाङ्मय या विषयाच्या प्राध्यापक म्हणून काम केले. या अवधीत इन्स्टिट्यूट ऑफ आर्मामेंट टेक्नॉलॉजी गिरीनगर, पुणे ४११ ०२५ येथील लष्करी अधिकाऱ्यांसाठी रशियन भाषेच्या मानद प्राध्यापक म्हणून एक वर्ष काम केले.

१९६८ साली भारत सोविएत सांस्कृतिक मंचातर्फे आणि १९७६ मध्ये पुणे विद्यापीठातर्फे मॉस्को येथील लुमुम्बा फ्रेंडशिप विद्यापीठात पाच आठवड्यांच्या रशियन भाषा शिक्षकांच्या रिफ्रेशर कोर्समध्ये सहभाग.

रशियन भाषेचे अध्ययन आणि अध्यापन चालू असताना १९७२ ते १९८२ या काळात 'सृष्टिज्ञान' मासिकामध्ये रशियन विज्ञानरंजन कथांचे मराठीत अनुवाद केले.

सकाळ पेपर्सच्या 'साप्ताहिक स्वराज्य' मध्ये आणि स्त्री, बायजा वगैरे मासिकांतून १९७८ ते १९८२ या वर्षांत अनेक रशियन कथांचे मराठी अनुवाद प्रसिद्ध केले.

१९७८ ते १९७९ या वर्षात बंगाली भाषेचा आंतरभारतीतर्फे चालणारा बंगाली भाषेचा अभ्यासक्रम पहिल्या वर्गात उत्तीर्ण.

१९८० मध्ये रशियन भाषा शिक्षकांच्या मदतीने पी. ई. एस. गर्ल्स हायस्कूल पुणे मधील नववी इयत्तेतील मुलींसाठी रशियन भाषेचा इंटेन्सिव कोर्स चालवला.

१९८२ मध्ये अन्तोन चेखवच्या 'विश्न्योविय साद' या नाटकाचा 'चेरीचा मळा' हा मराठी अनुवाद कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे ३० तर्फे प्रकाशित.

अलीकडे 'कलासक्त' पुणे तर्फे प्रकाशित 'केल्याने भाषांतर' या त्रैमासिकासाठी १९९९ ते २००१ या काळात रशियन लेखक व कवी यांच्या साहित्याचा गद्य आणि पद्य मराठी अनुवाद वेळोवेळी प्रसिद्ध.

चेखवच्या 'सात कथा' हा मराठी अनुवाद २००२ साली प्रसिद्ध झाला आहे.

●●

मराठीतून विश्ववाङ्मयाकडे

शेक्सपीयर	*हॅम्लेट*	परशुराम देशपांडे
शेक्सपीयर	*राजमुकुट*	वि. वा. शिरवाडकर
शेक्सपीयर	*सुनीते*	परशुराम देशपांडे
शेक्सपीयर	*ज्यूलिअस सीझर*	अ. अं. कुलकर्णी
समीक्षा	*शेक्सपीयरची शोकनाटये*	पशुराम देशपांडे
टॉलस्टॉय	*तीन दीर्घकथा*	पंढरीनाथ रेगे
दस्तयेवस्की	*काकांचे स्वन्प*	अविनाश बिनीवाले
दस्तयेवस्की	*जुगारी*	जयंत दीक्षित
दस्तयेवस्की	*गुन्हा आणि प्रायश्चित*	का. बा. कोनकर
दस्तयेवस्की	*कारमाझफ बंधू*	भाऊ धर्माधिकारी
दस्तयेवस्की	*शापित कोझाकीण*	अशोक डांगे
दस्तयेवस्की	*समीक्षा*	अनिरुद्ध कुलकर्णी
इब्सेन	समीक्षा	अनिरुद्ध कुलकर्णी
ब्रेश्ट	*माता धीराई*	अविनाश बिनीवाले
चेखव	*चेरीचा मळा*	सुमती कानिटकर
चेखव	*सात कथा*	सुमती कानिटकर
चेखव	*आठ दीर्घ कथा*	सुमती कानिटकर
मेटरलिंक	*वैजयंती*	वि. वा. शिरवाडकर
पुश्किन	*कॅप्टनची मुलगी*	पंडित आवळीकर
पुश्किन	*कथा*	पंडित आवळीकर
पुश्किन	*जीवन व काव्य*	पंडित आवळीकर
स्टाइन	*बिकटवाट*	व्यंकटेश माडगूळकर
स्टीव्हन्सन	*गुप्तखजिना*	द. भा. वाघोलीकर

स्टीव्हन्सन	*पळवलेला पोर*	वि. कृ. श्रोत्रिय
फ्लोबेर	*मादाम बोवारी*	जयंत धुपकर
संकलन	*फ्रेंच कविता*	मीरा गुणारी
फील्डिंग	*टॉम जोन्स*	द. धों. नगरकर
डिकन्स	*डेव्हिड कॉपरफील्ड*	वि. कृ. श्रोत्रिय
अभ्यास	*जर्मन वाङ्मयाचा इतिहास*	न. का. धारपुरे

●●